ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : ग्रंथमाला
शिवाजी आणि रामदास

संपादक : विष्णू गोविंद विजापूरकर

प्रकाशक : विष्णू गोविंद विजापूरकर

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२०

म. म. दत्तो वामन पोतदार

ग्रंथ संग्रह

# दुर्मिळ ग्रंथ

(हे पुस्तक अत्यंत जपून हाताळावे)

# ग्रंथमाला.

मासिकपुस्तकांत छापलेलीं प्रकरणें.

---

# शिवाजी आणि रामदास.

हे निबंध

अनेक लेखकांनीं

तयार केले

ते

**विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए**

संपादक ग्रंथमाला

यांनीं

कोल्हापूर 'विद्याविलास' व 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिले.

किंमत १ रु०

# शिवाजी आणि रामदास.

## अनुक्रमणिका.

# शिवयुगमाहात्म्य.

" स्वदेश स्वधर्म स्वभाषादिकांचा। जगीं मान व्हावा असा हेतु साचा ॥ " हा ग्रंथमालाकारांचा बाणा (Motto) अमोल होय. वर निर्दिष्ट केलेल्या तीनही हेतूंच्या सिद्ध्यर्थ, त्यांचा सुरू असलेला प्रयत्नही योग्य व स्तुत्य आहे. स्वधर्म व स्वभाषेचा उत्कर्ष लेखनानें व भाषणांनीं होऊं शकतो, पण स्वदेशाची उन्नति —राजकीय व सामाजिक— व्हावी अशी इच्छा असल्यास, आपल्या देशाच्या इतिहासास उजेडांत आणण्यासारखें दुसरें खात्रीचें साधन नाहीं. ह्मटलें आहे कीं, ज्या राष्ट्रास इतिहास नाहीं, त्यास भविष्यकाळ नाहीं. खानदानाच्या इतिहासांत, तसेंच राष्ट्राच्या इतिहासांत कांहीं काल ग्लानीचे व कांहीं काल भरभराटीचे असतात. इतिहासाची हमेषा पुनरावृत्ति होत असते. " धाता यथापूर्वमकल्पयत् " या श्रुतीचाही हाच भावार्थ आहे. झालेल्या गोष्टी नेहमीं पुन्हां पुन्हां घडून येत असतात. प्युनिक युद्धांमध्यें हनिबॉलनें जी क्लृप्ति लढविली, ती युक्ति शिवाजी महाराजांनीं शास्तिखानाला शास्त केला, त्यावेळीं योजिली. वस्तुतः शिवाजी महाराजांना हनिबॉलची माहिती होती असें थोडेंच आहे. ह्मणून ज्या एखाद्या राष्ट्रास ग्लानि आली असेल, त्या राष्ट्रास त्याच्या पूर्वेतिहासाचें स्मरण करून देण्यासारखें दुसरें अंजन नाहीं. तें स्मरण झाल्याबरोबर आलेली आगंतुक सुस्ती दूर झालीच पाहिजे. एवढी गोष्ट मात्र सत्य आहे कीं, जशी ज्यावेळीं परिस्थिति असेल, त्या मानानें उद्भूत होणाऱ्या जागृतीचा उपयोग होईल. पूर्वेतिहासाचें स्मरण झालें ह्मणजे विवक्षित जित राष्ट्र पुन्हां जेतें होईलच असें नाहीं. तर ज्यांच्या अमलाखालीं तें असेल, ते राज्यकर्ते जर उदात्त विचाराचे असले, तर ते या जित राष्ट्रांमध्यें उत्पन्न होणाऱ्या चळवळीला नवीन वळण देऊन आपलेसें करूं शकतात. व जर ते तसे नसले तर मग कोणा एकाचा तरी नाश

होतो. रोमन साम्राज्याच्या वेळचें जर्मनी, हल्लींचीं ब्रिटिश साम्राज्यांतील क्यानडा, आस्ट्रेलिया वगैरे अशीं फारच थोडीं पूर्व पक्षांतील उदाहरणें होत. दुसऱ्या प्रकारांतील उदाहरणें मात्र पुष्कळ सांपडतील. जसें शिवयुगींचें महाराष्ट्र, वाशिंग्टनच्या कालचें अमेरिका, या शतकांतील इटली, आणि दक्षिण आफ्रिकेंतील बोअर संस्थानें. वर दिलेल्या तऱ्हेच्या उदाहरणांत बहुतेकांचा परिणाम मालक राष्ट्रास हानिकर, असाच झाला.

आपल्या महाराष्ट्र देशाच्या इतिहासाच्या जीर्णोद्धारार्थ आजपर्यंत बऱ्याच लोकांनीं वीरकंकणें बांधलीं, त्यांपैकीं कित्येकांस अनेक कारणामुळें नुस्ती कंकणें धारण करण्याचा दुःकारक प्रसंग आला. परंतु या पूर्व अनुभवास न जुमानितां, सध्यां मित्र रा. रा. पारसनीस व राजवाडे आणि वे. शा. सं. वासुदेवशास्त्री खरे हे त्याच मार्गानें अव्याहत श्रम करीत आहेत. या त्रिमूर्तीचें अभिनंदन करावें तितके थोडेंच आहे. रा. शास्त्रीबुवाची सत्यनिष्ठा, स्वावलंबन, विशेष श्रम इत्यादि गुण त्यांस व त्यांच्या देशास अत्यंत भूषणावह होत. शास्त्रीबुवांचा हा गुण विशेष आदरणीय आहे कीं, ते कधींही आपल्या हातून होईल त्यापेक्षां अधिक वचन देत नाहींत, व एकदां वचन दिल्यावर तें पुरें केल्याशिवाय राहत नाहींत. रा. पारसनीसांनीं केलेले श्रम अद्यापि जगापुढें यावे तसे आले नाहींत. पण ते लवकरच सर्वांपुढें येण्याचा सुयोग येईल अशी उमेद आहे. रा. राजवाड्यांची उद्योगपरायणता फार जबर आहे. त्यांनीं गोळा केलेला लेखसमूहही अतिशय आहे. आणि त्यांचा मराठी इतिहासाचा जबर व्यासंग, मार्मिकता, भाषाशैली, स्पष्टवक्तेपणा इत्यादि गुण अभिनंदनीय व आदरणीय होत.

असें जरी आहे, तरी या प्रयत्नास यावें तितकें व्यवस्थित रूप आल्याचें दिसत नाहीं. संमेलनाचा जो जोर असतो तो या प्रयत्नास आला पाहिजे. एक ऐतिहासिक संस्था स्थापित झाली पाहिजे. कांहीं कायमच्या वर्गणीदारांविषयीं खटपट झाली पाहिजे. त्या संस्थेच्या

ताब्यांत मोठासा फंड जमला पाहिजे. या संस्थेस धनिकांचें साहाय्य मिळविण्याविषयीं खटपट होणें इष्ट आहे. कदाचित् शिवाजी फंडाचाही इकडे उपयोग केल्यास त्या फंडाचा दुरुपयोग होणार नाहीं. अशी संस्था अस्तित्वांत येण्यास तीस न्यायमूर्ति रानडे व लोकनायक टिळक यांच्या सारख्याची सहानुभूति मिळविली पाहिजे. हल्लींची तरुण व होतकरू मंडळी हें काम हातीं घेईल काय? एकदा अशा प्रकारच्या खटपटीस आरंभ झाला ह्मणजे मग पैसे गोळा होणें कठीण पडणार नाहीं. चांगला यत्न केला ह्मणजे कांहीं कठीण पडणार नाहीं. अशी ऐतिहासिक संस्था स्थापित झाली ह्मणजे, मराठी इतिहासाची प्रसिद्धि करण्याच्या उद्योगास व्यवस्थित स्वरूप येईल. या संस्थेच्या आश्रयाखालीं नवीन पुस्तकें तयार होतील व होतकरू लेखकांस साहाय्य देण्यांत येईल. तसेंच कागदपत्रें गोळा करण्यासही सोपें पडेल. परंतु यांत एक बाब अत्यंत जरूरीची आहे, ती ही कीं, या कामांत आस्थेवाईक व खरोखर कळकळीचे लोक पाहिजे आहेत, नाहीं तर आहे तेंच बरें आहे असें ह्मणावें लागेल.

आतांपर्यंत या नवीन चालू असलेल्या चळवळीचा सामान्यतः विचार केला. आतां अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांनीं आमच्या इतिहासावर कोणता नवीन प्रकाश पाडला आहे, हें पहावयाचें आहे. रा० रा० राजवाडे यांनीं आपल्या मराठी इतिहासाच्या साधनांच्या ४ थ्या खंडास जोडलेल्या कंठाळी प्रस्तावनेंत, शिवयुगींच्या बऱ्याच बाबतींचा खल केला आहे. त्यांत त्यांनीं आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें, कांहीं दोष, आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या इतिहासकारांच्या माथीं मारिले आहेत. सध्यां ज्या कांहीं बखरी उपलब्ध आहेत, त्या इतिहासरूपच होत व त्यांच्या कर्त्यांच्या माथीं कांहीं दोष दडपून देण्याचे पूर्वी, त्यांच्या कल्पनांशीं आपलें तादात्म्य झालें पाहिजे. जाणूनबुजून खोटीं विधानें करण्याचें त्यांस कांहींच प्रयोजन नव्हतें. कोणत्याही कृत्याला दोष देण्यापूर्वी त्याचा हेतु ( Motive ) पहाणें जरूरीचें आहे. बखर-

कारांच्या कृतींत तसा हेतु निदर्शनास येत नाहीं. यावरून असें ह्मणतां येईल कीं, ज्या दृष्टीनें एखादी गोष्ट आपण पहातों, त्या पेक्षां निराळ्या विचारांनीं तीच गोष्ट, दुसरा खलांत आणू शकतो. जसें जसें कालमानानें त्या समयापासून आपलें अंतर वाढत जातें, तसें तसें त्या युगमाहात्म्याची आपणांस माहिती कमी पडूं लागते. अशा सारखाच कांहीं प्रकार रा० राजवाडे यांचे हातून प्रस्तुत प्रसंगीं झाल्याचें दिसतें.

शिवयुग ह्मटलें ह्मणजे महाराष्ट्राच्या इतिहासांत केवळ नव्हे, तर जगाच्या इतिहासांत, अत्यंत महत्वाचा काल होय. या युगाचें माहात्म्य वर्णावें तितकें थोडेंच आहे. तथापि अत्यंत दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, या कालाविषयीं असावी तितकी माहिती मुळींच नाहीं व सध्यां उपलब्ध होण्याची अशाही दिसत नाहीं. या कालीं एका महान् अवतारी पुरुषानें, अनेक महात्म्यांच्या मदतीनें नामशेष राष्ट्राचें पुनरुज्जीवन केलें. जरी शहाजी आदीकरून वीर शिवाजीच्या पूर्वी चमकत होते, तरी आपली ओळख ते विसरून गेल्यानें दिसतें. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या वाक्यास शिवाजीनें खरेपणा आणिला. 'पवित्र हिंदु साम्राज्याची' कल्पना उत्तर हिंदुस्थानांत कधींही विलयाला गेली नाहीं. उदेपूरच्या बाणेदार क्षत्रियांनीं दिल्लीपतीशीं चालविलेल्या अखंड वैराचें तरी हेंच तत्व आहे. महाराष्ट्रांत श्रीरामदास स्वामी व शिवाजी महाराज यांचे वेळीं, व कांहीं अंशानें राजारामाचे वेळीं, या काळांशिवाय करून 'प्रस्तुत यवनाचें बंड' ही मनोभावना महाराष्ट्रांत फारशी दृग्गोचर होत नाहीं. पेशव्यांनीं केलेल्या पराक्रमाचें बीज निराळ्या गोष्टींत आहे. शिवाजी महाराजांचे मनांत मात्र हें बंड मोडून 'पवित्र हिंदु साम्राज्याची' स्थापना करावी असें होतें. बाकी पेशव्यांचे वेळीं, दिल्लीपतीचें माहात्म्य फारच वाढलें होतें, असें जागोजाग असलेल्या उल्लेखावरून दिसून येतें. सुप्रसिद्ध नाना आपल्या आत्मचरित्रांत पृथ्वीपतीचें दर्शन झाल्याबद्दल आपणांस धन्य धन्य मानून घेतात!! बादशहा केवळ आपल्या

सरदारांच्या हातांतील बाहुलें झाला असतां, पेशवे त्यांची नायबी मिळण्यांत भूषण मानितात!!! व अशाच दुसऱ्या पुराव्यांवरून असें वाटतें कीं पेशवाईत 'पवित्र हिंदू साम्राज्याच्या' कल्पनेची ओळख बुजून गेली होती. आतां कल्पना ह्मणजे काय?

आमच्या इकडील इतिहासपोषक अशी सामग्री विपुलपणें ज्ञात असती तर, या कल्पनेचें स्पष्ट स्वरूप त्यावरून दाखवून देण्यांत आलें असतें. परंतु तदभावीं समकालीन परकीय इतिहासाचें अवलंबन करून कांहीं उपयोग होत असल्यास, तो करून घेणें अवश्य आहे. सध्यां हिंदुस्थानांत सहाजिकच इंग्लंडच्या इतिहासाचें ज्ञान करवितात. परंतु महाराष्ट्राच्या स्थितीशीं त्या देशाचा इतिहास अत्यंत विसदृश आहे. इंग्लंड हें बेट असल्यामुळें, त्यास सरहद्दीच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. त्या देशाच्या लोकांच्या कर्तव्याची इतिकर्तव्यता ह्मटली ह्मणजे परचक्रापासून आपली उन्नति करणें, व आपल्या देशांतल्या वर्धमान होत जाणाऱ्या प्रजेस वसाहत करण्याकरितां नवीन भूमिकावीज करणें, ही होय. व इंग्लंडच्या इतिहासांत बरींच शतकें पावेतों याच गोष्टीं आहेत. या शिवाय स्वराष्ट्राची उन्नति करणें व त्यांत धंदे वाढवून, त्यांचा खप होऊन परदेशांतून पैसे ओढून आणण्याकरितां, हिंदुस्थानसारखे श्रीमान्, परंतु अशक्त देश, ताब्यांत आणणें, हेही उद्योग आढळून येतात. इंग्लंडांत साम्राज्याविषयीं उसळलेली हाव जी हल्लीं खूप जोरावर आहे–हिचा उद्भव अलीकडील आहे. त्या विषयींही सविस्तर विचार प्रस्तुत निबंधांत पुढें येईल. अस्तु.

वर दिलेल्या कारणास्तव इंग्लंडच्या इतिहासापासून आपणास उपयोग नाहीं. महाराष्ट्र देश एका खंडातल्या अनेक देशांपैकीं एक देश आहे. त्यास भरतखंडापैकीं इतर देशांच्या हालचालीवर बरेच अवलंबून राहावें लागतें. महाराष्ट्राशीं तुलनायोग्य असा देश स्पेन हा होय. या दोन देशांचे ऐतिहासिक साम्य फार मजेचें आहे. परंतु प्रस्तुत स्थलीं त्यांचा विचार करण्याचें योजिलें नाहीं. वर असें

सांगण्यांत आलें आहे कीं, शिवयुगीं महाराष्ट्रांत कांहीं निराळेच विचार प्रचलित होते. शिवयुगावर प्रकाश पाडील असा भाग शार्लमान्यनें स्थापिलेल्या 'पवित्र रोमन राज्या' चा इतिहास हा भाग आहे. इ० स० च्या ९ व्या शतकापासून तो १७ व्या शतका पावेतों मध्य यूरोपांत, जी कल्पना प्रमुखत्वेंकरून होती, तीच कल्पना समकालीन शतकांत प्रथम उदेपूरच्या आसपास, व नंतर शिवयुगीं महाराष्ट्रांत होत होती. राजारामानंतर ती विलयाला गेली. व तिकडे यूरोपांत नेपोलियननें तिला नाहींशीं केली. तिच्याच तुल्य कल्पनेचा जगतांत पुनश्च उदय लार्ड बीकन्सफील्ड यांनीं इ० स० १८७७ त राणी सरकारांस हिंदुस्थानची महाराणी हें पद दिलें, त्यावेळीं केला.

या कल्पनेचें सम्यक् स्वरूप लक्षांत येण्याकरितां, "पवित्र रोमन साम्राज्या" च्या इतिहासाचे कर्ते ब्राईस साहेब, यांनीं आपल्या पुस्तकांत जें वर्णन दिलें आहे, तें खालीं रूपांतर करून वाचकांपुढें ठेविलें आहे:— "गमन करींत असलेल्या पौराणिक कालानें ज्या दोन कल्पना पुढच्या पिढीकरितां राखून ठेविल्या होत्या, त्या पृथ्वीपतित्व व एकधर्मत्व या होत. रोमचा विजय होण्यापूर्वीं ज्यांस एकमेकां-विषयीं माहिती अगदीच नाममात्र होती, व ज्यांस विस्तृत राजकीय ऐकमत्याचा अनुभव नव्हता, अशा लोकांचे असे विचार असत कीं, एकराष्ट्रीयत्वाच्या कामीं जातिभिन्नत्व ही नैसर्गिक व अपरिहार्य अडचण होय. त्याचप्रमाणें त्यांस धर्म ही स्थानिक महत्वाची व स्वजात्यानुसंबंधी बाब वाटत असे. ज्याप्रमाणें त्यांच्यांत, पर्वतावरील देव व खिंडींतील देव किंवा जमीनीवरील देव व समुद्रांतील देव असत, त्याप्रमाणें प्रत्येक जातीनें स्वाभीष्ट देवांची पूजा करावी; जे भिन्नदेवोपासक असतील, त्यांची शत्रुभावेंकरून गणना करावी, असे विचार जर पौरस्त्य देशांत जोरदारपणें असत, तर ग्रीस व इटली या देशीच्या प्राचीन कागदोपत्रीं अशा विचारास भार सांपडतो. इजिप्शियन, हिंदू व चिनी या लोकांमध्यें विदेशीयाविषयीं दिसून येणारी भेदबुद्धि, ही केवळ, ग्रीक

लोकांची व परकीयांची अव्याहत चालू असलेली लढाई. ही नैसर्गिक आहे. या ॲथेन्स येथील तत्ववेत्यांच्या मनाचें, आग्रही रूप होय. रोमन साम्राज्य पुष्कळ देशास एक भाषा व सार्वत्रिक अभिन्न नीती, या देत्या झाल्यामुळें, राजकीय परकेपणाचा विनाश होता झाला. आणि ख्रिस्ती धर्माच्या कारणानें कोटिश: देवांचे एकेश्वरी मतांत पर्यवसान झाल्यामुळें धार्मिक संमेलनही पूर्णपणें स्थापित होतें झालें.

" पवित्र रोमन साम्राज्याचा ऑटोच्या अमलाखालीं पुन्हा उदय होण्याचीं कारणें फार खोल विचारानें शोधिलीं पाहिजेत. त्यावेळची मदत करणारीं कारणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. ऑटो व त्याच्या सॅक्सन व फ्रचांकिश वारसास आपल्या देशापासून एका निरर्थक मुकुटाच्या मागें लागून रोम सारख्या लांब शहरांत खेंचून आणणारें, इटालियन लोकांस परकीयांचा ताबा मंजूर करविणारें, आणि सर्व मध्ययुगांतून हल्लीच्या, सुंदर परंतु अकालीन, अशा, त्याच्या दिसणाऱ्या रूपापेक्षां, निराळ्या प्रकारानें **साम्राज्यास** भासवून त्यास असें दैविक रूप देवविणारें कांहीं तरी जबरदस्त कारण त्या कालामध्यें आपलें काम करीत असलें पाहिजे, व त्याचें अस्तित्व त्या काळच्या स्वरूपांत व नियमांत असेल यांत संदेह नाहीं. पूर्वीचें रोमचें साम्राज्य जरी भपकेदार असतें झालें; तरी, त्याच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांस, त्यांनीं आणिलेल्या दु:खेंकरून आणि स्वत:च्या निर्बलत्वामुळें परकीयांस त्यांच्यावर हमला करण्यास उत्तेजन मिळत असल्यामुळें, त्याचा निकाल वरच्या दोन गोष्टीमध्यें केव्हांच लागला होता. आतां तरी त्यास गतासु होऊन बराच काल लोटला होता व प्रसंगाची परंपरा त्याचा पुनर्जन्म होण्यास अनकूल नव्हती. त्या साम्राज्याचे प्रत्यक्ष वारस असे जे रोमन लोक, ते तर केवळ अव्यवस्थित जनसमूह रूपानें होते व तेही त्या बेबंदशाहींतही वाईट ठरलेल्या अशा बेछूट वर्तनांत बुडून गेले होते. असें असतांनाही लोक त्या महाकल्पनेस चिकटून राहिले होते, व त्या लांब कालांतून, कालच्छंदास अवरोध करण्याचा त्यांचा सारखा प्रयत्न, या वृथा भ्रमावर चालला कीं, आपण कालाच्या गतीस

अवरोध करीत आहोंत, परंतु वस्तुतः स्थिती अशी होती कीं, तो लोंढा आपल्या बरोबर त्यांस जुन्यापेक्षां जुन्याहून, लांब लांब वाहवून नवीन आचार, नवीन विचार, व अभिनव मनोविकारांत नेत होता.

"या शतकांत असलेल्या मनुष्यस्वभावाच्या स्थितींत या विरोधाचें स्पष्टीकरण सांपडणार आहे. मध्ययुग हें मुख्यत्वें करून अपार्थिव होतें. जसें प्राक्कालीन लोकसत्तात्मकास, राजकीय अवगत असलेल्या कल्पना; सर्वांच्या हिताविषयींच्या तसेंच राष्ट्रहिताविषयींच्या कल्पना; लोकांच्या हक्काबाबत, अनेक राज्यरीतिची तुलनादर्शक गुणावगुणासंबंधीं--इत्यादि कल्पना, जरी कधीं प्रत्यक्ष उपयोगांत आणिल्या गेल्या, तरी त्यांच्या वैचारिक (speculative) रूपामध्यें, त्या त्यांस अज्ञात, बहुतेक अभेद्य होत्या. त्या कालाचें एक मोठें अपत्य सरदारी (Feudalism) हें होय. आणि ही पद्धत, सामाजिक व नैतिक असून, अप्रत्यक्ष रीतीनें राजकीय होती. तथापि मनुष्यस्वभाव सुस्त नसून, कांहीं बाबींत अत्यंत उद्योगी होता. त्यास स्वानुबंधी किंचिन्मात्र विचारांशिवाय तसें रहातांही आलें नसतें. हे विचार वस्तुस्थितीचे उद्घाटकही नव्हेत. किंवा गतकालावरून अनुमितही केले गेले नव्हते; ते अंशतः मागील व्यवस्थेपासून आले होते व अंशतः जे ईश्वरविषयक तत्वविचार स्कोल्यास्टिसिझम (वेदान्तशास्त्रासारखें शास्त्र) मध्यें परिपक्व दशेस येत होते, त्यापासून ते निघाले होते. वर पहिल्या परिग्राफांत सांगितल्याप्रमाणें गमन करीत असलेल्या युगांनीं पृथ्वीपतित्व व एकधर्मत्व या दोन कल्पना जगावर सोडून दिल्या होत्या.

"धर्म हा राष्ट्रांना मूलाधार होय. अनेकेश्वरी मत प्रचलित असल्यामुळें, अनेकदेशीयत्वही भासमान होत असे, एकेश्वरी मताच्या उदयासह ईश्वरानें स्वस्वरूपतुल्य उत्पन्न केलेला, असा जो मनुष्यवर्ग, त्याच्याही संमेलनास आरंभ झाला. ख्रिस्ति धर्मानें घालून दिलेला पहिला धडा ह्मटला ह्मणजे, प्रेमाचा होय; कीं ज्या प्रेमेंकरून संशय, पूर्वग्रह व वृथाभिमान या योगेंकरून जे भिन्न लोक अमित्र असत,

ते मित्र व्हावेत. याप्रमाणें या धर्माच्या योगानें भक्ताचा एकसमाज —पवित्र साम्राज्य—सर्व लोकांस आपल्यांत सामील करून घ्यावे या हेतुस्तव अस्तित्वांत आला. ज्याप्रमाणें सीझरांचे सार्वत्रिक राज्य त्यांच्या पूर्वींच्या अगणित राजांशीं व संस्थानांशीं तोलले असे, त्याप्रमाणें ख्रिस्तभक्तांचा हा समाज, अनेकेश्वरी पंथाशीं तोलला जात असे. या दोघांतील सारखेपणामुळें, दोन्ही चळवळी एकाच मोठ्या उलथापालथीचे भाग आहेत असें दिसलें. त्यांच्या सरहद्दींचे एकावभासामुळें, कीं जे साम्य कान्स्टनटाइनच्या पूर्वींपासून सुरू झालें होतें व त्याच्या मागूनही बरींच वर्षें कायम राहिलें, रोमन व ख्रिस्ति हे नाममात्र भिन्न आहेत असें झालें होतें. ज्या ठिकाणीं साम्राज्यांतील सर्व धर्मगुरु, राष्ट्राच्या पार्थिवाच्या अध्यक्षतेखालीं चालणाऱ्या आचार्यपरिषदेंत, जमत असत, तेथें त्यायोगें पार्थिवाचे व धर्माचे एकीकरणाविषयीं उत्तम उदाहरण दिसून येत असे. पश्चिम युरोपांत सरकारी कामकाजाची भाषा, जी पवित्र ग्रंथाची व प्रार्थनेची, तीच होती; आपल्या पिढीचा सर्वांत मोठा मनुष्य असा जो ऑगस्टीन, त्यानें, रोमचे पार्थिव महाराष्ट्र नष्ट झाल्याबद्दल खालील शब्दांनी शांतवन केलें. त्यानें आपल्या पिढीच्या लोकांस, अशा प्रकारानें गेलेल्या रोमच्या वारसाचें वर्णन केलें कीं, " या शहराच्या पायांचा बांधणारा आणि करणारा प्रत्यक्ष ईश्वर आहे. "

या विवेचनासंबंधी एका टिपेंत नामदार ब्राईस साहेब ह्मणतात—' माझें असें ह्मणणें नाहीं कीं, वर वर्णित केलेली कल्पना—परंपरा चार्लस, ऑटो किंवा फ्रेडरिक यांच्या काळीं पूर्णपणें प्रस्थापित झाली होती. ४ थ्या शतकापासून तो १३ व्या शतकापावेतों ती वारंवार वाढत किंवा घटत असे असें दिसतें. आणि तिची जीं मुख्य तत्वें असत, त्यांचें महत्व तुलनापरत्वें कमीजास्त होत असे; परंतु जसा एखादा चितारी असतो, कीं ज्याला दूरच्या भूपृष्ठभागावर वारंवार पडणारा उजेड अगर अंधकार दिसत असून तो आपल्या पडद्यावर कुंच्यांनीं वठविण्यास लागणाऱ्या वेळेपेक्षां, तो जलद बदलत असल्यानें तो हुबेहुब वठ-

विण्याची निराशा झाल्यामुळें, तो जसा त्या देखाव्याची प्रत्येक न्यून्याधिकता दाखविण्याचे ऐवजीं फक्त त्याच्या मनावर जो एकंदर परिणाम झाला असतो, त्यांतच समाधान मानून घेतो; त्याप्रमाणें प्रस्तुत प्रसंगींही ज्या मुख्य कल्पनांवर साम्राज्याची इमारत रचली गेली होती, त्यांचेच सम्यक् वर्णन करणें उपयोगाचें दिसतें. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, जी व्यवस्था असल्याचें दाखविलें जाईल, ती कदाचित् कोणे एखादे विवक्षित काळीं नसेलही, आणि उदाहरणें दाखल करावीं लागतील, ती कांहीं पूर्वकालीन व कांहीं पश्चात्कालीनही असतील. ज्याअर्थी साम्राज्याचें मत मध्ययुगामध्यें तत्वेंकरून एकच होतें, त्याअर्थीं, मला अशी आशा आहे कीं, जें सामान्य वर्णन प्रकृत स्थलीं देण्याचा प्रयत्न केला आहे, ते जसें १०० या शतकास तसेंच १४ व्या शतकासही लागूं पडेल.’ ही जर स्थिति युरोपखंडांतील एका अत्यंत महत्वाच्या चळवळीच्या इतिहासाची आहे, तर मग आमच्या महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल काय विचारावयाचें आहे?”

वर दिलेल्या अवतरणांतून जो विद्युत्प्रकाश झळकतो आहे, त्याच्या साहाय्यानें महाराष्ट्राच्या इतिहासाचे अज्ञात भाग धुंडाळले पाहिजेत. शिवयुगींच्या लोकस्थितींत व यूरोपांतील मध्ययुगांतील कल्पनांचे बरेंच साम्य आहे. तेव्हां यूरोपीय इतिहासाच्या अनुरोधानें या लेखाच्या आरंभीं निर्दिष्ट केलेल्या रा० राजवाड्यांच्या ‘मराठी इतिहासाच्या साधनाच्या ४ थ्या खंडास’ जोडिलेल्या प्रस्तावनेंतील कांहीं शंकांचें विवरण करावयाचें आहे. या लेखांत खालीं लिहिलेल्या चार गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. ते मुद्दे हे:—[ १ ] बखरकारांचा वंशावळी देण्याचा हेतु; [ २ ] शिवाजी हा मराठा क्षत्रिय होता किंवा रजपूत क्षत्रिय होता; [ ३ ] संत मंडळींचें कार्य; [ ४ ] महाराष्ट्र धर्म.

## ( १ ) बखरकारांचा वंशावळी देण्याचा हेतु.

भारतवर्षीय आर्यशाखेचे आद्य इतिहास वेद होत. वेदांमध्यें राजन्य असा स्वतंत्र वर्ग होता. हाच वर्ग पुढें क्षत्रिय या रूपांनीं

प्रसिद्धीस आला. ऋग्वेदांत एके ठिकाणीं ( १-१०८-७ ) ब्राह्मण व राजानें असा उल्लेख आहे, व दुसरे ठिकाणीं ( ऋ. अ. ८ मं. १० अ. ७ ) चारही वर्णांचा नामनिर्देश आहे. याच ठिकाणीं विराटस्वरूपापासून सर्वांची उत्पत्ति झाल्याचें सांगून, प्रत्येक ज्ञातीची सामाजिक व्यवस्थाही लावून दिली आहे. या व्यवस्थेचा भारतीय आर्यशाखेवर कसा परिणाम झाला आहे, हें त्याची व यूरोपीय आर्यशाखेच्या इतिहासाची तुलना केली असतां दिसून येणार आहे; परंतु तो विषय जरी मजेचा आहे तरी, त्याचें विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे.

वेदानंतरचे आमचे ऐतिहासिक ग्रंथ ह्मटले ह्मणजे पुराणें हीं होत. पुराणामध्यें राजांच्या वंशावळी सांगणें हें मुख्य कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य असें समजलें जातें. या ग्रंथांमध्यें मुख्यत्वेंकरून क्षत्रियांचे दोन भेद वर्णन केले आहेत. एकाची उत्पत्ति सूर्यापासून व दुसऱ्याची चंद्रापासून. ज्यांची उत्पत्ति सूर्यापासून कल्पिली गेली, त्यांस सूर्यवंशी ह्मणत व त्याचप्रमाणें ज्यांची उत्पत्ति चंद्रापासून कल्पिली गेली त्यांस चंद्रवंशी ह्मणत. या कल्पनेचा भारतवर्षाच्या इतिहासावर फारच चांगला परिणाम झालेला दिसून येईल. या देशामध्यें धर्मगुरूंत व राजांत बेबनाव झाल्याचें दिसून येत नाहीं. ऋषींचा मान राजे लोक ठेवीत असत; परंतु पोप महाराजांप्रमाणें ऋषींनीं कधींही राज्यकारभारांत ढवळाढवळ केल्याचें फारसें दिसून येत नाहीं. केव्हां केव्हां एखादा व्यास उपदेशार्थ पुढें येत असे. शंकराचार्यांचे वेळीं व नंतर युरोपीय इतिहासासारखा एखादा प्रसंग यावयाचा. परंतु एक तर आचार्य अगदीं निरिच्छ होते व दुसरें त्यावेळीं जैनादि धर्मांचे बहुतेक राजे लोक असल्यामुळें, केवळ राजांमध्यें त्यांचें वितुष्ट पडलें नाहीं. तदनंतर जेव्हां त्यांनीं पुनश्च आर्यधर्माची स्थापना केली, त्यावेळीं सर्व लोकांवर त्यांचें वजन सहजच बसलें व पोपप्रमाणें त्यांस आपली सत्ता जबरदस्तीनें स्थापण्याचें कारण उरलें नाहीं. शंकराचार्यांच्या अनुगाम्यांनीं मात्र धर्मसंबंधीं सत्ता बळकाविण्याचा प्रयत्न केला होता; पण

राजा हा देवाचा अंश, ही कल्पना जनसमुदायाच्या मनावर दृढ असल्यामुळें, यांचें कांहीं चाललें नाहीं. या कल्पनेमुळेंच युरोपांत जशी पोपची व एम्परसची भयंकर रणकंदनें लांबार्डीच्या अत्यंत सुपीक प्रदेशावर बरींच वर्षें माजून राहिलीं होतीं, तशी इकडे कधींही झालीं नाहींत. अगदीं अलीकडच्या इतिहासांत जसे शिवयुगीं श्रीसमर्थ होते, तसेच विजयनगरच्या भरभराटीच्या काळीं सुप्रसिद्ध वेदभाष्यकार श्री सायनमाधवाचार्य हे तेथें होते. याप्रमाणें धर्मगुरूंची राजास मदत असे; परंतु विरुद्धभाव कधींही नसे; इतर पक्षीं राजेही आचार्यासच काय परंतु सर्व ब्राह्मणवर्गास मान देत असत. अस्तु.

हे जें वर मत सांगितलें, त्याचा अंमल आमच्या बखरकारांवर पूर्णपणें होता. बखरकारांस ऐतिहासिक विषय लिहिण्याकरितां पुराणें हाच कित्ता ( Model ) होत. यामुळें तेही वंशावळी देण्याचे भानगडींत पडत असत. याशिवाय त्यांस दुसरें एक सबळ कारण झालें होतें. धर्मराजानंतर जरी पुष्कळशा उलाढाली झाल्या, तरी दिल्ली—अथवा त्यावेळचें हस्तिनापूर—येथील राज्यकर्ते आपणास धर्मराजाचे वशंज ह्मणत असत. धर्मराज्य, आमच्या “ पवित्र हिंदू साम्राज्याचा ” आरंभ होय. खरी अगर खोटी अशी वंशावळही त्या वंशांत तयार केलेली असे. धर्मराजाशीं संबंध असल्यामुळें, आपण “ पवित्र हिंदू साम्राज्याचे ” अथवा “ धर्मराज्याचे ” हक्कदार आहोंत असें त्यास वाटे. व हे वाटणें स्वाभाविकच होतें. दिल्लीचे माहात्म्य तसेंच आहे. धर्मराज्याची ती राजधानी होती. मुसलमानांनींही तेथें आपल्या गादीचें ठिकाण ठेविलें. आपल्या महाराणी सरकारांसही सार्वभौम पद तेथेंच घेणें जरूरीचें वाटलें! त्यावेळीं पृथ्वीराजा राज्य करीत असतां, घरभेदीच्या साहाय्यानें मुसलमानांनीं हस्तिनापूर हस्तगत केलें, त्यावेळीं “ धर्मराज्या ” वर मोठाच प्रसंग आला. जरी कनोजचें राज्य विशेष संपत्तिमान् व प्रबल होतें, तरी मानानें दिल्लीपतीच मोठा समजला जात असे. व ह्मणूनच पृथ्वीराजानें आर्यावर्तांत झालेला शेवटला,

अन्वर्थक असा, राजसूय यज्ञ केला. दिल्ली परकीयांच्या ताब्यांत गेल्यानंतर, "धर्मराज्या" ची राजधानी, गुजराथेंत वल्लभीपूर येथें होती. कांहीं काळानें तेथेंही परकीयांचा उपद्रव झाल्यामुळें, ती राजपुतान्यांत चित्तोड येथें गेली. चित्तोडचा महाराणा, राणासंग, याच्या वेळीं, "धर्मराज्या" ची बरेच दिवसांनीं पुन्हा एकदां भरभराट झाली होती. परंतु त्याचाही बाबरनें पराभव केल्यापासून, तो शिवाजी महाराज 'धर्मराज्या' ची स्थापना करी पावेतों, आमचे पवित्र हिंदू साम्राज्य बहुतेक नामशेष झालें होतें. फक्त चितोडच्या राजघराण्यानें आपला बाणा व वीर्य कायम राखिलें होतें. आणि ह्मणूनच त्या घराण्याचा रजपुतामध्यें इतका मान आहे. शिवाजी महाराजांनींही याच कारणाकरितां, आपण तदन्वय आहोंत, असें सिद्ध करविलें! मध्यंतरीं अकबराचे वेळीं धर्मराज्य त्याच्याजवळही नांदत होतें असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. ही गोष्ट प्रत्यक्ष चितोडच्या राजघराण्याच्या पुरुषांनींही कबूल केली होती. अकबराबरोबर ही गोष्ट गेली. त्याच्या मुलांनीं व नातवानीं त्याचेच अंशतः अनुकरण केलें; परंतु अवरंगझेबानें पुनश्च हिंदू लोकांस त्रास-देण्याचें आरंभिलें. त्यावेळीं उदेपूरच्या महाराण्यांनीं त्यास टक्कर देण्याची तयारी केली; परंतु यावेळीं एका नवीन राष्ट्राचा उदय होत असल्यामुळें, या चळवळीस फारसें महत्व आलें नाहीं. 'धर्मराज्या'ची तिसरी राजधानी चितोड येथें होती; परंतु अकबरानें तो गड काबीज केल्यावर पुनश्च रायगडीं तिची स्थापना होईपावेतों, आमच्या हिंदुमय बादशाहीस राजधानी नव्हती. रायगडाहून राजधानी पुण्यास गेल्यावर हल्लीं ती कलकत्ता येथें स्थापित झाली आहे! इंग्रज सरकाराचेंही राज्य, धर्मराज्याचे कायदेशीर वारस आहे, हें निःसंशय आहे!! इंग्रजी राष्ट्रीय स्तवनाच्या भाषांतरकारांच्या मनांत ही कल्पना पूर्णपणें बिंबली होती असें दिसतें!!!

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून हें दिसून येईल कीं, शिवाजीमहाराज हे "धर्मराज्या" चे कायदेशीर व हक्कदार वारस होते. आणि

हीच गोष्ट सिद्ध करण्याकरितां लांब लांब वंशावळी देण्याच्या खटपटींत बखरकार पडले. ज्या कालाचा इतिहास ते लिहीत होते त्या कालाशीं त्यांचें पूर्ण तादात्म्य झालें होते. परंतु रा० राजवाड्यांची स्थिति तशी नसल्यामुळें, त्यांस त्या वंशावळी अप्रस्तुत व निरुपयुक्त वाटतात. जर शार्लमान्यसारखा जर्मन बादशहा आपणास रोमन महाराजाचा वारस समजतो व पोपच्या साहाय्यानें तो समज सिद्ध करवून घेतो, तर शिवाजीसारख्या पूर्ण हिंदुधर्माभिमानी क्षत्रियास तसें ह्मणवून घेण्यास कोणती हरकत होती? " धर्मराज्या " ची स्थापना करण्यास, जशी युरोपांत तशीच महाराष्ट्रांत, या गोष्टीची फार जरूरच होती. चीनसारख्या जुनाट राष्ट्रांत व जपानसारख्या सुधारणेंत आलेल्या नवीन राष्ट्रासही आपली वंशावळ फार जुनी आहे असें भासविणें भाग पडतें ( पहा Lord Curzon's Problems of the Far East. ). मग १७ व्या शतकाच्या महाराष्ट्रास ती अवश्यकता वाटली यांत आश्चर्य कोणतें! अमेरिकेप्रमाणें लोकसत्तात्मक राष्ट्रास मात्र यांतील मर्म कळणें नाहीं. रा० राजवाड्यांनीं या ह्मणण्याचा विचार करून मग बखरकारांची चूक काढणें असल्यास ती काढावी. एवढें मात्र खरें आहे कीं, ऐतिहासिक वृत्तांताला सोडून जी बखरकारानीं वंशावळीची व्यवस्था लाविली आहे, ती अशुद्ध असून, त्यांच्या अज्ञानाची प्रदर्शक आहे. पण त्यांचा रा० राजवाडे यांच्यापेक्षां, ज्या कालाविषयीं, ते मुख्यत्वेंकरून लिहीत आहेत, त्या कालाशी परिचय विशेष होता, असें विधान करण्यास बाध येईल असें वाटत नाहीं.

### ( २ ) शिवाजी हा मराठा क्षत्रिय किंवा रजपूत क्षत्रिय?

खलास घेतलेल्या प्रश्नाचा पूर्ण विचार करण्याकरितां, आर्य नर्मदेच्या दक्षिणेस आले तेव्हां आपल्या संपूर्ण वर्णव्यवस्थेसह आले किंवा कसे? व त्यांची दक्षिणेंत वसाहत झाल्यानंतर उत्तरेकडील प्रदेशांशीं त्यांचें दळणवळण कितपत होतें? या दोन प्रश्नांचा विचार

होणें अवश्य आहे असें वाटतें. इ० स० पूर्वीं ४ थ्या शतकांत आर्य, अगस्ति ऋषीबरोर, नर्मदा उतरून दक्षिणेंत आले. त्यानीं नर्मदा कुठें ओलांडली हें पहाणें जरूरीचें आहे. ऋग्वेदांत पंजाबांतील नद्या शिवायकरून इतर नद्यांचा उल्लेख असेल असें वाटत नाहीं. त्या वेदाच्या परिशिष्टांत खालील ऋचा आढळतें:—[ यत्र गंगा च यमुना यत्र प्राची सरस्वती । यत्र सोमेश्वरदेवो तत्र मांम् अमृतं कृधी ] ॥ वर निबोधित केलेलें स्थल ह्मटलें ह्मणजे, प्रयाग हें होय. मी लिहीत असलेल्या वेदविषयक चर्चेच्या ३ ऱ्या लेखांत, परिशिष्ट रचनाकाल इ० स० पू० १११९ पासून तो ३०० पर्यंत दाखवून दिला आहे. याच परिशिष्टांत खालील ऋचा आहे. :—

नर्मदायै नमो प्रातर्नर्मदायै नमो निशि ।
नमोस्तु नर्मदे तुभ्यं त्राहि माम् विश सर्वत: ॥

ही ऋचा आर्यांची वस्ती नर्मदेच्या कांठीं असतांना, झाली असावी. ऋग्वेदांत अगर त्याच्या परिशिष्टांत विंध्यपर्वताचें नांव आढळत नाहीं. मनुस्मृतींत तें आहे. तेव्हां ही ऋचा जबलपूरजवळच्या भागाविषयीं असावी असें वाटतें. जबलपुराजवळच एका ऋषीचा आश्रम असल्याचेंही लोक दाखवितात. तेथून आर्यांची वसाहत करणारी टोळी हल्लींच्या ‘ मध्य प्रदेशां ’ तील शिवणी या शहराचे बाजूनें खालीं उतरली असेल. पुराणवस्तुशोधनार्थ सरकारांतून जी मोजणी होत असते, तिच्या रिपोर्टावरून असें कळतें कीं, हल्लींचें दौलताबाद हें पूर्वीचें देवगिरी नसून, तें शहर ‘ मध्य प्रदेशा ’ च्या वऱ्हाडास लागून असलेल्या भागांत हल्लीं पडक्या स्थितींत आहे. यावरून असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, आर्यांचा प्रवेश महाराष्ट्रांत पूर्व दिशेकडून झाला. महाराष्ट्रांत ज्यावेळीं आर्यांचा प्रवेश झाला, असें वर अनुमान केलें आहे, तो काल महाभारतयुद्धाचा पुढचा असल्यामुळें, व महाभारतकालीं आर्यांची चातुर्वर्ण्यव्यवस्था पूर्णपणें अमलांत असल्यामुळें, महाराष्ट्रांत आर्य आले त्यावेळीं ते आपल्या वर्णव्यवस्थे-

सकट आले असें दिसतें. यावरून मराठे क्षत्रियांची संस्था सिद्ध होते व क्षत्रियाची जात केवळ रजपूतांतच राहिली आहे ही कल्पना विलयाला जाते. रजपूत व मराठे क्षत्रियाखेरीज कांहीं त्या वर्णापैकीं हल्लीं हयात आहेत, ते उत्तरहिंदुस्थानांतील कायस्थ व महाराष्ट्रांतील परभू हे होत.

याप्रमाणें एका प्रश्नाचा निकाल लागल्यावर दुसरा प्रश्न हातीं घ्यावयाचा, तो हा कीं, नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशाचे व उत्तर हिंदुस्थानांतील देशांचें दळणवळण कितपत होतें? नर्मदा ही नदी अद्यापि तिच्याभोंवतीं प्रदक्षिणा करणारांस भीतिप्रद वाटते, तेव्हां मुसलमानी अंमल दक्षिणेंत होण्यापूर्वीं, ही नदी ओलांडून जाणारा एखादा राजमार्ग होता कीं काय? या नदीच्या कांठीं भिल्लादि लुटारू लोकांची वस्ती प्राचीन कालापासून फार आहे. तेव्हां त्यांच्या देशांतून राजमार्ग असण्याचें संभवत नाहीं. या मतास दुसरें एक पुष्टिकारक प्रमाण असें आहे कीं, दक्षिणेवर मुसलमानांची पहिली धाड आणणारा अल्लाउद्दीन खिलजी हा दिल्लीहून सरळ मार्गानें न येतां, अलहाबाद, कोरा या वांकड्या बाजूनें खालीं उतरला. तेव्हां त्यासही हा मार्ग कष्टप्रद वाटला असेल. दिल्लीहून अजमेरीवरून माळव्यांतून दक्षिणेंत येण्याचा मार्ग मोगल बादशाहीच्या वेळेस सुगम झाला होता, हें येथें सुचविणें जरूर दिसतें.

आतां बखरकारांच्या ह्मणण्याप्रमाणें शिवाजीचें घराणें दक्षिणेंत येण्याचा काल ह्मटला ह्मणजे चितोड गडावर अल्लाउद्दीनानें केलेल्या स्वारीचा होय. यावेळीं नर्मदापार होण्याचा मार्ग सोपा नव्हता असें दाखविण्यांत आलेंच आहे. तेव्हां तेथून कोणी त्यावेळीं दक्षिणेंत सुखरूप येऊन पोंचलेंच असेल असें संभवत नाहीं. शिवाय इतक्या थोड्या कालांत भोसल्यांचें घराणें अस्सल मराठे क्षत्रियांत मिळून जाणें असंभवनीय आहे. या सर्व कारणांकरितां भोजांच्या घराण्याचे भोंसले आहेत, या रा० राजवाड्यांच्या मतास पुष्टि देण्यास हरकत वाटत

नाहीं. नांवांच्या स्वरूपांत कालस्थलादिभेदेंकरून किती फरक पडतो, याचें एक उदाहरण प्रस्तुत लेखकास द्यावेंसें वाटतें. प्रस्तुत लेखकाचें आडनांव किबे हें आहे. त्यासंबंधानें त्याचें असें अनुमान आहे कीं, हें नांव चतुर्वेदी, चोबे, क्योबे आणि किबे या क्रमानें अस्तित्वांत आलें असावें. पहिलीं दोन नांवें तर अद्याप उत्तर हिंदुस्थानांत ऐकूं येतात. फक्त मधली सांखळी अद्यापि आढळण्यांत आली नाहीं. असो.

वरील एकंदर विवेचनावरून शिवाजी हा अस्सल मराठा क्षत्रिय असल्याचें दिसून येईल. बखरकारांनीं त्यांस उदेपूरान्वय कां बनविलें याचे कारण पहिल्या विवेचनांत ध्वनित केलें आहे. तें असें कीं, शिवाजी महाराजास "धर्मराज्या" ची स्थापना करावयाची असल्यामुळें, उदेपूरशीं संबंध असणें किती आवश्यक होतें हें वर स्पष्ट करून सांगितलें आहे. ही कारणें लक्षांत घेतलीं असतां बाळजी आवजी चिटणिसांच्या माथीं, शिवाजीस मराठ्यांतून काढून रजपूत केल्याचा दोष मारण्याचें कांहीं कारण रहाणार नाहीं.

## ( ३ ) संतमंडळाचें कार्य.

रा० रा० राजवाडे यांनीं संतमंडळीवर मोठाच हल्ला केला आहे. त्यांच्या मतें संतमंडळीच्या हातून देशाचें अहित फार झालें आहे. संतमंडळीच्या कालामध्यें महाराष्ट्रांत स्वाभिमान नष्टप्राय झाला होता. संताच्या पंथास त्यांनीं पंगु ह्मटलें आहे. यद्यपि न्यायमूर्ति रानड्यांनीं या शेवटल्या मुद्याचें नुक्तेंच खंडन केलें आहे तरी, संतांचें कार्य काय व किती महत्वाचें होतें, हें समजणें अवश्य आहे. जर रा० राजवाडे ह्मणतात त्याप्रमाणें संतांचें हातून आमच्या देशाची अवनति झाली असेल, तर त्यांचे आमच्या मध्यें अस्तित्व ईश्वरी कोपाचें दर्शक समजलें पाहिजे. परंतु वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे, असें पुढें केलेल्या विवेचनावरून दिसून येईल. रा० राजवाड्यांनीं या विषयाचा जितका विचार करावयास पाहिजे होता, तितका केल्याचें मुळींच आढळत नाहीं, व त्यांनीं आपल्या अपुऱ्या विचारांचे लोकापुढें प्रसिद्धीकरण करण्यापूर्वीं जरा

थांबावचें होतें. परंतु जर त्यांचें असें ह्मणणें पडेल कीं, त्यांनीं जें मत प्रकाशित केलें आहे, तें त्यांच्या पूर्ण विचाराचें फल आहे, तर असें ह्मणावें लागेल कीं, त्यांचें लिहिणें एकतर्फी आहे.

रा० राजवाड्यांनीं संतपंथाच्या उत्पत्तीविषयीं दिलेला इतिहास सर्वथैव खरा आहे, असें मला वाटत नाहीं. कदाचित्, त्यांनीं जीं कारणें दर्शविलीं आहेत, तींही संतांच्या उदयास संवर्धक अशीं झालीं असतील; परंतु तीं मुख्य कारणें नव्हत हें खास आहे. माझ्या वेद-विषयक चर्चेत वेदामध्यें वर्णित केलेल्या धर्मापासून संतांच्या धर्मा पावेतों, हिंदुधर्माची कोणकोणतीं व कशीं स्थित्यंतरें होत गेलीं, हें मी सविस्तर दाखविलें आहे. वेदांत धर्माचें श्रीशंकराचार्यांनीं अद्वैत रूपानें प्रति-पादन केलें. परंतु यांत लोकवशीकारक असें कांहीं नसल्यामुळें, हा सामान्य जनांचा धर्म होऊं शकला नाहीं. पुढें त्याच वेदांत धर्माचें मध्वाचार्यांनी पूर्ण द्वैतरूपानीं आविष्करण ( interpretation ) केलें. त्यांतही जसें सामान्य जनांस तसें तत्वज्ञास पूर्णपणें मान्य होण्याजोगें कांहीं नसल्यामुळें, तोही सार्वजनिक झाला नाहीं. त्याच्या आधीं रामानुजाचार्यांनीं आपला तोडजोडीचा विशिष्टाद्वैत पंथ निर्माण केला होता. हा पंथ सर्व मान्य होण्यास बरींच सबळ कारणें होतीं व जरी सर्व आर्यधर्माभिमानी लोक रामानुजाच्या विशिष्ट पंथाचे अनुयायी नाहींत, तरी सामान्य जनांस, आत्म्याचा व परमात्म्याचा सेव्यसेवकभाव, हे या पंथाचें आद्यतत्व पूर्णपणें संमत आहे. याच तत्वाच्या अनुरोधानें आमचा महाराष्ट्रीय संतमार्ग आहे. या मार्गाचे आद्य ग्रंथकार श्री ज्ञानेश्वर महाराज यांस जरी अद्वैत मार्ग अभिमत होता, तरी ज्ञानेश्वरी-वरून असें दिसून येईल कीं, हे आत्म्यास परमात्म्या पेक्षां कमी लेखितात. पंढरीच्या विठोबाचें माहात्म्य यांच्यानंतर वाढलें, तरी त्यासही भजणारे तुकारामादि भक्त, विशिष्टाद्वैतमतानुयायीच होत. रा० राजवाड्यांचें जें ह्मणणें आहे कीं जैन, व ज्या पंथांमध्यें त्यांच्या विरुद्ध वास येतो असें लिंगायत, मानभाव वगैरे पंथाचें, संतमार्ग बनविण्यांत अंग असावें

तें अप्रस्तुत दिसतें. संतमार्गाची सुरवात शके बाराशेपासून धरली पाहिजे. यावेळीं जैनादि धर्माचा कोल्हापुराकडेसुद्धां सुळसुळाट कमी पडला होता. कोल्हापूरची अंबाबाई ही शके १२०० पेक्षां प्राचीन आहे. अंबाबाईची स्थापना जैनधर्माच्या उच्छेदाची दर्शक होय. हल्लींही जैनधर्म हिंदुस्थानांतून नाहींसा झाला असें ह्मणतां येईल काय? असें जर नाहीं, तर ११ व्या किंवा १२ व्या शतकांत तो थोडा बहुत असला ह्मणून काय झालें! त्याचें एका उदित होत असणाऱ्या पंथावर वजन पडेल इतका जोम त्यांत होता काय? शिवाय जैन, लिंगायत, मानभाव इत्यादिकांमध्यें दिसून येणारी विवर्जनशीलता ( exclusiveness ) संत-मंडळीच्या भागवत धर्मांत आहे काय? उलट भागवत धर्मांत अठरापगड हिंदुजातीचा समावेश होतो, इतकेंच नव्हे तर मुसलमानादि अन्य धर्मांचाही समावेश होऊं शकतो. यावरून असें अनुमान होतें कीं, भागवत धर्महि वेदांत धर्माची शाखा असून, विशिष्टाद्वैताचें जें मुख्य तत्व कीं, आत्म्याचा व परमात्म्याचा सेव्यसेवकसंबंध आहे, त्या मार्गानें आलेली होय. ज्ञानेश्वरीच्या समाप्तीचें वेळीं, देवगिरीचे राज्य हयात होतें. ज्ञानेश्वराचे पूर्वीचा संत आढळत नाहीं. देवगिरीकरांचा राष्ट्रीय धर्म हिंदुधर्मास अनभिमत असा नव्हता. मग रा० राजवाडे ह्मणतात त्याप्रमाणें जैन व तद्विरुद्ध लिंगायत, मानभावादि धर्मांचा एक समयाच्छेदे करून, संताच्या धर्मावर कसा परिणाम झाला, कोण जाणे!

रा० राजवाड्यांचा एकंदर विधानांच्या झोकांवरून संतांनीं एकंदर जगास काय उपदेश केला, याचें ज्ञान त्यांस झाल्याचें दिसत नाहीं. माझ्या मतें संतांनीं जी आपली नैतिक व तात्विक मतें प्रकट केलीं आहेत, तीं हल्लींच्या काळच्या यूरोपांतील निरनिराळ्या मतवाल्यांस मान्य होण्यासारखीं आहेत. संतांचें लक्ष जरी ऐहिक जगाकडे नव्हतें, तरी त्यांच्या नैतिक मतांचा राष्ट्रावर फारच परिणाम झाला आहे. रा० राजवाड्यांस जें फक्त संताचें पंगुत्व दिसत आहे, हें त्यांचें व त्यांच्या वाचकांचें दुर्दैव आहे. इ० स० १८९९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या

Allahabad university Magazine मध्यें संतांचीं नैतिकतत्वें, या विषयावर एक लहानसा निबंध मी लिहिला होता, त्याचें रूपांतर येथें देतों, ह्मणजे संतांच्या मतांची योग्य कल्पना होईल. मुकुंदराज हा मराठी कवींत बहुतकरून अगदीं पहिला होय. हा इ० स० ११९०च्या सुमारास होता, याचें हल्लीं ज्ञात असलेले दोन ग्रंथ ह्मटले ह्मणजे ‘ विवेकसिंधु ’ व ‘ परमामृत ’ हे होत. हा गीतेंत सांगितलेल्या नैतिक मार्गाची प्रशंसा करणारा होता. मुकुंदराजानंतर ज्ञानेश्वराचा अवतार झाला. याचे दोन भाऊ व एक बहीण, हेही लिहीत असत. याचे तत्वशास्त्रावरील ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत; परंतु याचें लक्ष संसाराकडे नव्हतें. याची भगिनी मुक्ताबाई इच्या ग्रंथांत मात्र ‘ भक्ति, प्रेम व सत्य ’ यांचें अत्यंत उदात्त स्वरूप दृष्टीस पडतें. जरी ही आपल्या १६व्या वर्षीं वारली, तरी इचे पुष्कळ अभंग प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वराच्या कालापासून तों एकनाथाचा उदय होईपावेतों कोणताही नांव घेण्यासारखा संत अगर कवि उत्पन्न झाला नाहीं. या मध्यंतरीच्या तीनचार शतकांमध्यें मुसलमानांची जबरदस्त लाट येऊन महाराष्ट्रराज्याचा समूळ विनाश झाला; परंतु मुसलमानांचें राज्य इकडे प्रस्थापित झाल्यानंतर, भक्त मंडळींनीं पुन्हां एकदां उचल करून हिंदुधर्म कायम केला; अस्तु. १६व्या शतकांत एकनाथ नांवरूपास चढला. त्यानें प्राचीन ग्रंथांचें उज्जीवन केलें, व रामायण व भागवत यांवर स्वतः ग्रंथरचना केली. एकनाथी भागवत फारच सुरस आहे, ही गोष्ट मराठ्यांस तरी सांगण्याचें कारण नाहीं. मुक्तेश्वर हा एक नांवाजलेला ग्रंथकार होऊन गेला. वर दिलेल्या लेखकांत नैतिकपणापेक्षां धार्मिकपणा अधिक आढळतो, तरीही त्यांतल्या त्यांत पहाणें असल्यास ज्ञानेश्वर स्वोन्नतिवादी ( transcendental ) होता. एकनाथादि लोकही कमीअधिक मानानें त्याच मार्गानें जाणारे होते. ज्या शब्दाचें स्वोन्नतिवादी असें वर भाषांतर केलें आहे, तो वाद हल्लीं यूरोपांत सर्वमान्य आहे. इंग्रजी नीतिशास्त्राशीं ज्यांचा थोडाबहुत परिचय आहे, त्यांस या गोष्टी चांगल्या समजतील. निव्वळ मराठी वाचकांनीं प्रो० भानु प्रसिद्ध करीत असलेल्या गीतेच्या पहिल्या भागाचा उपसंहार पहावा.

परंतु वस्तुतः संतमंडळींत तुकाराम व रामदास ही जोडी फार महत्वाची होय. या दोघांत असलेलें सादृश्य व तसेंच वैसादृश्य फारच तीक्ष्ण व गमतीचें आहे. दोघेही निःसीम ईश्वरोपासक, शांत, दांत, महाभक्त, स्वदेशकल्याणेच्छु, इ० गुणविशिष्ट होते. परंतु एक जितका निर्विकारी ( passive ), तितकाच दुसरा आग्रही ( assertive ); एक केवळ समाजसुधारणेच्छु, तर दुसरा राष्ट्रीयप्रगति करणार, एक लोकसंग्राहक ( utilitarian ) तर दुसरा स्वोन्नतिवादी; याप्रमाणें या दोन सत्पुरुषांमध्यें जितकें साम्य, तितकाच विरोधही पण होता. वर सांगितलेले त्यांचे गुणधर्म त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट करून दिलें असतां, कोणत्याही प्रकारच्या शंकेचें कारण रहाणार नाहीं; परंतु तसें करण्याचें हें स्थल नव्हे. तरी पण एक दोन उतारे देऊन माझें ह्मणणें मी अंशतः सिद्धकरून देतों. तुकारामरामदासांपैकीं, पहिल्याचा निर्विकारी स्वभाव, व दुसऱ्याचा आग्रह, हें खालीं दिलेल्या उताऱ्यावरून दिसून येतील. ‘ बोले तैसा चाले त्याचीं वंदावी पाऊलें. ’ व ‘ फुकाचे मुखीं बोलतां काय वेंचे। दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ॥ क्रियेविण वाचालता व्यर्थ आहे। विचारी मना तूंचि शोधूनि पाहे ॥ ’ अवतरणांत दिलेल्या उताऱ्यांत दोघांसही एकच गोष्ट सांगावयाची होती, परंतु पहिल्यातलें मार्दव व दुसऱ्यांतलें काठिण्य हीं लक्ष्यांत ठेवण्यासारखीं आहेत. यावरून त्यांच्या स्वभावाची परीक्षा होते. आतां त्यांच्या नैतिक मताविषयीं पाहिलें तर, तुकाराम ह्मणतो कीं ‘ जगाच्या कल्याणा संताच्या विभूती। देह कष्टवीती उपकारें ॥ ’ यांत ‘ जास्त लोकांचें जास्त कल्याण ’ या लोकसंग्राहक मताची झाक दिसत नाहीं, असें कोण ह्मणेल बरें! आतां रामदासाकडे वळलें तर त्यानें केलेल्या ‘ मनाचे श्लोका ’ वरून एकंदर त्याचें धोरण दिसून येईल. तो ह्मणतो ‘ विचारूनी बोले, विवंचूनी चाले। तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥ बरें शोधल्यावीण बोलो नये हो। जनी बोलणें शुद्ध नेमस्त राहो ॥ ’ याप्रमाणें त्याच्या ग्रंथावरून बरींचशीं उदाहरणें दाखवितां येतील. बाकी रामदासामध्यें इतर संतांपेक्षां विशेष असें कांहीं दिसून येत नाहीं. जर सम-

र्थांनीं शिवाजीस महाराष्ट्रराज्य वाढविण्याचा उपदेश केला, तर तुकारामानें, आपल्या समाजांत ज्या वाईट चालीरीती दिसून आल्या त्यांचें खंडन केलें आहे. तुकोबाइतका समाजसुधारक दुसरा अढळणें कठीण आहे. प्रत्येक वाईट किंवा दांभिक बाबीवर त्याचा हल्ला आहेच. कार्लाइलप्रमाणें त्यासही दंभ, देखावा, खोटेपणा, लबाडी इत्यादिकांचा अत्यंत तिटकारा असे. ज्याप्रमाणें कार्लाइलनें इंग्रजी विचारास आपल्या लेखणीनें एक नवीन प्रकारचें वळण दिलें, तद्वतच तुकोबाच्या अभंगांचा परिणाम तत्कालीन लोकांवर दिसून आला. जसें हल्लीं इंग्लंडांत Imperialism चें जें स्तोत्र माजलें आहे त्याचें अर्धें श्रेय कार्लाइलास दिलें पाहिजे, त्याप्रमाणेंच शिवयुगीं जी चळवळीची लाट उसळली होती, तिचेंही निम्में श्रेय तुकारामास देणें भाग आहे. आणि ज्याप्रमाणें वरच्यापैकीं राहिलेलें श्रेय बीकन्सफील्ड यास दिलें पाहिजे, त्याप्रमाणें शिवयुगींचें श्रेय रामदासास मिळणें वाजवी आहे. ज्याप्रमाणें रामदासानें शिवयुगींच्या कल्पनेस व्यवस्थित रूप दिलें व सारस्वतांत त्या विचारांस जागा देवविली, त्याप्रमाणेंच बीकन्सफील्डनें आपल्या भाषणानें व कृतीनें हल्लीच्या Imperialism च्या चळवळीविषयींही केलें. बीकन्सफील्डनें तर आपल्या भाषणांतही कित्येक वेळां बोलून दाखविलें कीं आपण आपल्या पक्षाला शिकवीत आहोंत. दिल्लीस इ० स० १८७७ त झालेला समारंभ त्याच्याच इच्छेचें फळ होय. महाराणी सरकारचे प्रस्तुतचे मुख्य प्रधान लार्ड सालसबरी हे बीकन्सफील्डचे पट्ट शिष्य आहेत. व यांनीं गुरुच्या विचारांस हल्लीं पूर्णस्वरूप आणिलें आहे. आतां यांत एकच खात्री आहे, ती ही कीं, आमच्या महाराणीस ‘ इंग्लंडच्या राणी ’ असेंच ह्मणतात. तेव्हां थोडक्याच दिवसांत हें नांव सोडून त्याचे ऐवजीं ब्रिटिश साम्राज्याच्या स्वामिनी असें नांव घेतलें जाईल. असें झालें ह्मणजे Imperialism च्या कल्पनेस पूर्णस्वरूप येईल. आमच्या इकडेही शिवाजीस पट्टाभिषेक करवून घेणें आवश्यक वाटलें. असो.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून हें दिसून येईल कीं, रा० राजवाड्यांनीं तुकारामादि संतास पंगु ह्मटलें आहे, हें केवळ त्यांच्या इच्छेचें फळ आहे. एकट्या रामदासासच समर्थ ह्मणण्याचा प्रघात आहे तोही असाच. ते हे विसरतात कीं, मनुष्य कालास करीत नाहीं, तर काल मनुष्य उत्पन्न करतो; पण कार्यपरंपरेमुळें कालही जमून येतो. अशा स्थितींत एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या हातून अमुक एक कार्य घडून आलें, असें ह्मणण्यापेक्षां, कारणसमुच्चयामुळें एखादें कार्य बनून आलें हें ह्मणणें विशेष खरें आहे. ज्याप्रमाणें Imperialism ( साम्राज्या )चे कल्पनेस कार्लाइल, बीकन्सफील्ड व इंग्लिश लोक यांचे सारखेंच साहाय्य आहे, त्याप्रमाणेंच महाराष्ट्र साम्राज्यास, तुकाराम, रामदास, व शिवाजी यांची सर्वांचीही मदत होती. केवळ एकाच व्यक्तीच्या हातून ती गोष्ट घडली असें नाहीं. रा० राजवाड्यांच्याही ही गोष्ट लक्षांत यावयास पाहिजे होती कीं, रामदासाच्या लेखांच्या कांहीं भागामध्यें राजकीय विषयांचा खल केला आहे, ह्मणून तो केवळ राजकीय साधु होता, असें ह्मणतां येत नाहीं. रामदासाच्याही मनांत इतर तत्कालीन संताप्रमाणें विचार होते, हें त्याच्या लेखावरून दिसून येतें. ‘ मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ’ हें ह्मणणें त्याचेंच आहे. तसेंच ‘ रायानीं करावे राजधर्म । क्षत्रीं करावा क्षात्रधर्म । ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नानाप्रकारें ॥ ’ हेंही तोच ह्मणतो. त्याचे आजचे अनुयायी व पंढरीचे वारकरी यांमध्यें कांहींच भेद दृष्टीस पडत नाहीं! यावरून असें दिसून येईल कीं, रा० राजवाड्यांचा संतावरील प्रहार अप्रस्तुत आहे. जातां जातां आमच्यांतील विद्वानांस अशी सूचना आहे कीं, English Men of Letters Series या धर्तीवर आमच्यांतील कविमंडळींचीं चरित्रें प्रसिद्ध करावी. निदान तुकाराम व रामदास यांचे चरित्रलेख लिहिण्यास अवघड जाईल असें वाटत नाहीं.

शके १२ शे पासून तों शके १६ शें पावेतों झालेल्या संतमंडळींनें सर्वांत मोठीं अशीं तीन कार्यें घडवून आणलीं. तीं हीं कीं, [ १ ] आमच्या भाषेंत सारस्वताची रचना केली; [ २ ] संघशक्ति वाढविली

व [ ३ ] मुसलमानांच्या मनांतील हिंदूविषयीं असलेला वैरभाव कमी केला; आणि या तीनही कारणांचा शिवयुगावर परिणाम झाला हें कबूल करणें भाग आहे.

[ १ ] आतां पहिल्या कारणाचा पहिल्यानें विचार करितां, असें उघड दिसतें कीं, ज्ञानेश्वरांनीं गीतादिग्रंथांचें रूपांतर मराठींत केल्यामुळें, मराठीस स्थायिकता प्राप्त झाली. त्यावेळीं व त्या कालानंतर कित्येक दिवसपावेतों संस्कृतज्ञ शास्त्री मराठीस कमी योग्यतेची मानीत असत, हें वामन पंडितांच्या आख्यायिकेवरून आपणांस कळतें. याशिवाय :–

पिता दामाशेटी । अभंग दोन कोटी ।
भक्तिभावें ताटीं । निवेदी देवा ॥
तीन कोटी अभंग । गोणाईचा वाद ।
स्वात्मसुखबोध । सुखाचा तो ॥
तीन कोटी अभंग । नारोबाची कविता ।
उगवी स्वात्महिता । दिवसरजनी ॥
तीन कोटी अभंग विठाचा झगडा ।
प्रेमरस गोड । प्रेमाचा तो ॥
महादा आणि गोंदा । अडीच अडीच कोटी ।
प्रेमरस पोटीं । प्रेमळ तो ॥

व याप्रमाणें आणखी कोट्यवधि कवितांचा जो भरणा झाला, त्याचा परिणाम कांहींच नाहीं काय? जर महाराष्ट्रास सुसंस्कृत अशी भाषा नसती, तर हिंदुस्थानावर राज्य करण्याची धमक त्यांत येती काय?

( २ ) संतांनीं महाराष्ट्रांत उत्पन्न केलेली संघशक्ति तर अवर्णनीय होय. दरवर्षीं लाखो भक्तांचा मेळा पंढरीस विठ्ठलनामाचा जयघोष करीत जात असे, याचा परिणाम त्या काळावर अगदींच झाला नसेल काय? भर मुसलमानी अमदानींत हरिभक्तांचा सुळसुळाट होता ही काय थोडी गोष्ट आहे? रामदासानेंही शिवाजीस जें उत्तेजन दिलें, तें तरी मुसलमानीच्या महाराष्ट्रांतील अमदानीच्या अखेरीस यवनांनीं

पुनश्च हिंदूंचा छळ मांडला ह्मणून, ‘ तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्टविलीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ह्मणोनी ॥ ’ व ‘ देव ब्राह्मण उच्छेदिले । कर्म अवघें भ्रष्टविलें । नामसंकीर्तन लोपलें । दुष्ट-योगें ॥ ’ याच तत्वावर ( Plea ). असें असतांना निरनिराळे संत आपल्या भिन्नभिन्न पंथांसकट त्या काळीं हयात होते. या लोकांनीं हिंदुधर्माचें केलेलें रक्षण अभिनंदनीय होय. ते ईश्वरावर सर्व भार ठेऊन असत, किंवा ते ‘ **जगाच्या** कल्याणा संताच्या विभूती ’ या तत्वाचे अनुयायी असत, ह्मणून ते पंगु किंवा निरुपयोगी होते हें ह्मणणें बरोबर नाहीं. इंग्लंडांत लोकसंग्राहकवादी आहेत व ख्रिस्ती धर्मांत शांततेचीं तत्वें सांगितलीं आहेत, ह्मणून इंग्रजांनीं राजकीय उन्नति कर-ण्याचें सोडलें आहे काय? संतांचा उपदेश फक्त ज्यांस ईश्वरसाधन करावयाचें त्यांसच लागू आहे. संतांमध्यें मुसलमानही संत होते, ह्मणून तुकारामानें कधीं विठ्ठलाशिवाय दुसऱ्या कोणाचें नामस्मरण केलें आहे काय? ‘ स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ’ हें तत्व कोणासही अमान्य नव्हतें. तसेंच तुकारामासही वर्णव्यवस्था अमान्य नव्हती हें त्याच्या ब्राह्मणाविषयींच्या आदरावरून व्यक्त होतें. महा-राष्ट्राची राजकीय उन्नति होऊं नये असें कोणत्याही संताचें मत नव्हतें. उलटें ज्ञानेश्वरानीं आपल्या समकालीन राज्यकर्त्याचें नांव दाखल केलें आहे. शिवाय ‘ महाराष्ट्रमंडळी ’ हाही शब्द त्याच्या ग्रंथांत प्रथम आला आहे. संतानीं जे पंथसंघ उत्पन्न करून मराठ्यांत एकीची वृद्धि केली, तिचाच उपयोग पुढें राजकीय कामांत करून घेतां आला. ऐक्याभिवृद्धि संतांचें दुसरें मोठें कार्य होय.

( ३. ) मुसलमानांच्या तीव्र द्वेषाचें उपशमन करणें, हें संताचें तिसरें मोठें कार्य होय. संतानीं आपल्या प्रशांत अशा तेजानें परधर्मीयांची नांगी मोडून टाकिली. दामाजीपंतानीं आपल्या विलक्षण औदार्यानें, इमानानें व मुख्यत्वें देवाविषयीं निस्सीम भक्तीनें आपल्या क्रुद्ध झालेल्या प्रभूचें शांतवन केलें, इतकेंच नव्हे, तर त्यास आपल्या भजनीं लावून दिलें. कबीर

किंवा शेखमहमदासारख्या मुसलमानास 'राम व रहीम एक' असें ह्मणावयास लाविलें. दक्षिणेच्या मुसलमानी दरबारांत मराठे सरदारांचा जो उदय झाला, त्यास त्यांचें शौर्य तर कारण खरेंच, परंतु संतांच्या कृतींचाही उपयोग झाला नसेल असें ह्मणवत नाहीं. संतांस जरी राजकीय घडामोडीशीं कांहीं एक कर्तव्य नव्हतें तरी त्यांचे अप्रत्यक्ष परिणाम शिवयुगावर पुष्कळ झाले यांत कांहीं संशय नाहीं. रा. राजवाडे ह्मणतात त्याप्रमाणें जर संताच्या उपदेशाचें सार—त्यांच्या शिकविण्याचा मथितार्थ, पंगूपणाचें असतें, तर शिवयुगीं महाराष्ट्रांत जी एवढी मोठी चळवळ झाली ती झाली नसती. ज्या कल्पनेचा पाया मालोजीनें घातला, जिची मुहूर्तमेढ शहाजीनें रोंवली, व जिला सार्वत्रिक रूप शिवाजीनें दिलें, त्या कल्पनेस संतांचें साहाय्य होतें. अशक्ताचे पालन व दुष्टांचा संहार, सद्धर्माचें-- मग तो रामाचें भजन करो अगर रहीमाचें करो-- रक्षण, आणि जगाचे--ज्याची जगाविषयीं जेवढी कल्पना असेल तेवढ्याचें कल्याण हीं तीन संतांच्या धर्माचीं मुख्य अंगें होत. मालोजी, शहाजी व शिवाजी, या तिघांचेही हेच उद्दिष्ट हेतु होते. मालोजीची स्वधर्मनिष्ठा, व शहाजीची मुत्सद्दगिरी, हीं दोनीही शिवाजीमध्यें वसत होती. शौर्य हें तर त्या घराण्याचें ब्रीदच होय. याशिवाय संतांचे महाराष्ट्रावर अगणित उपकार झाले आहेत, त्यांचें अंशतः गुणग्रहण वर झालें असल्यास लेखक धन्य धन्य होईल.

## ( ४ ) महाराष्ट्रधर्म.

महाराष्ट्रधर्माचें इंग्रजी रूपांतर Marathaism ( मराठाइझ्म ) असें करावें असें वाटतें. न्या० रानड्यांचा या कल्पनेचा Religion of the Maharashtra असा अर्थ अंशतः बरोबर आहे. परंतु त्या योगेंकरून पूर्ण अर्थ होतो असें वाटत नाहीं. रा० राजवाड्यांनीं केलेला मराठ्यांचें कर्तव्यकर्म हाही अर्थ बरोबर नाहीं. कारण महाराष्ट्रधर्मांत या दोनही कल्पनांचा अंतर्भाव होतो. यूरोपांत प्रस्तुत कालीं ज्याप्रमाणें Socialism (समाजांत वरिष्ठ, कनिष्ठ भेद काढून

टाकणें ), ( राजसत्ताविध्वंसक ), (साम्राज्यवर्धन) इत्यादि नानाप्रकारचीं मतें प्रचलित आहेत व त्यांचे अनुयायीही आहेत, त्याप्रमाणें शिवयुगीं महाराष्ट्रधर्म हा होता. एका सन्मान्य विद्वद्वर्याचें तर असें मत आहे कीं, शिवाजीस व त्याच्या अनुयायास केवळ स्वदेशाभिमानाची कल्पनाच नव्हती. त्यांचीं सर्व कृत्यें धार्मिक उत्साहाची ( Zeal ) फळें होत. हें ह्मणणें जरी सर्वांशी खरें नाहीं, तरी यांत सत्यांश नाहीं असें ह्मणतां यावयाचें नाहीं. तो काळच असा होता कीं, ज्यांत धर्म हाच सर्व कृत्यांचा मूळ हेतु असे. ह्मणून रा० राजवाड्यापेक्षां न्या० मूर्तींच्या अर्थांत विशेष खरेपणा आहे. रा० राजवाडे, महाराष्ट्रधर्मास जितके धर्मापासून अलग करूं पाहतात, तितका तो खचित नाहीं.

आयर्लंडांतील न्याशन्यालिझम ( राष्ट्रधर्म ) व शिवयुगींचे महाराष्ट्रांतील महाराष्ट्रधर्म, या दोहोंत फारच साम्य आहे. पहिल्याची चांगली कल्पना येण्यास पार्नेलच्या वेळच्या आयरिश इतिहासाची साधारण माहिती असणें अवश्य आहे. असो. आयरिश न्याशन्यालिस्टांचा हेतूही असाच आहे कीं, आपल्या राष्ट्रधर्मास ह्मणजे, रोमन क्याथलिसिझमास, आपल्या देशांत पूर्ण स्वातंत्र्य मिळावें ; आपणास राजकीय स्वातंत्र्य असावें, आपल्या देशाचें स्वतंत्र नांव असावें, इ० इ०. यापैकीं हल्लीं त्यांचे बरेच हेतू सिद्धही झाले आहेत. शिवाजीच्या मनांतही बरच्यासारखीच कल्पना होती हें सांगणें नलगे. शिवाजीनें आपल्या धर्मास व तदनुयायांस परकीयांच्या जुलुमापासून सोडविलें ; महाराष्ट्राचें नांव गाजविलें ; आणि महाराष्ट्रभूमि सर्व प्रकारच्या नररत्नांस प्रसविण्यास समर्थ आहे, हें सर्वांच्या निदर्शनास आणिलें. महाराष्ट्रधर्माच्या हातून भिन्न परिस्थिति असल्यामुळें, न्याशन्यालिझमपेक्षां विशेष कार्य घडलें ही गोष्ट सत्य आहे. पण दोघांचें स्वरूप एकच, हेंही निर्विवाद आहे.

वर जीं मी विधानें केलीं आहेत, त्यांच्या सत्यत्वार्थ, प्रत्यक्ष रामदासाचीच साक्ष देऊन हें प्रकरण संपवूं. श्रीस्वामींनीं महाराजांस नीति सांगितली ती :—

प्रस्तुत यवनांचें बंड । हिंदु उरला नाहीं चंड ।
बहुता दिवसांचा मुंड । शास्ता न मिळे तयांसी ॥ १ ॥
देव ब्राह्मण उच्छेदिले । कर्म अवघे भ्रष्टविले ।
नाम संकीर्तन लोपलें । दुष्टयोगें ॥ २ ॥
पापराशी बळावले । धर्मवान निर्बळ झाले ।
आनंद गौरव निवाले । संकटकाले ॥ ३ ॥
संकटें पापकाल उदेला । देवीं घेतल्या खोळा ।
ब्राह्मणीं सोडिला टिळेमाळा । तद्रूप वर्तती ॥ ४ ॥
दुष्ट भाषणें करिती । नानापरी जांचिती ।
रघुपतीसी नावडती । ह्मणोनि योजना केली ॥ ५ ॥
तुह्मी आहांत अंशभूत । प्रजेचें करा कांहीं हित ।
धर्म स्थापावा तुह्मां उचित । काळपरत्वें ॥ ६ ॥
धर्माकरितां मरावें । मरोनि अवघ्यासी मारावें ।
मारतां मारतां घ्यावें । राज्य आपुलें ॥ ७ ॥
राज्य आहे धर्मनीतीचें । नीती करितां सर्व सांचे ।
साच चाळतां वैभवाचे । मान पावती ॥ ८ ॥
माना करितां तरवार घेतली । वैरीकुळें संहारिली ।
प्रगट कीर्ती जगीं झाली । आनंदमूर्ती ॥ ९ ॥
आनंद असावा सर्वाठायीं । शूरत्वें करावी कमाई ।
कमाई करितां सुख देही । पावेल तोची ॥ १० ॥

या समर्थाचे साक्षीवर विवेचन करणें व्यर्थ होय. जर शार्लमान्यचे हेतूविषयीं आल्कूइननें कांहीं ह्मटलें, तर तें खरें मानणें भाग आहे, तर शिवाजीविषयींचे रामदासाचे उद्गार सत्य समजणें जरूरीचें आहे.

या लेखाच्या आरंभीं ठरविल्याप्रमाणें चारही मुद्यांचें यथामति परीक्षण केलें, आतां शिवयुगीच्या मध्यवर्ती व्यक्तीविषयीं समकालीन लोकमत, त्याकालीं रचिलेल्या गेलेल्या अशा शिवराजभूषण काव्यांतून दर्शवून देऊन, हें लांबलेलें, परंतु अत्यल्प गुणग्रहण पूर्णतेस नेऊं.

[ १ ] दसरथके जो राम भयो वसुद्योके गोपाळ ।
सोई प्रगटयो साहीके श्रीसिवराज भुवाल ॥ १० ॥

अर्थ :--ज्याप्रमाणें दशरथास राम झाले व वसुदेवास गोपालकृष्ण, त्याप्रमाणें शाहूच्या येथें श्रीशिवराजाचा अवतार होता झाला. (भुवाल)

( २ ) तेरो करवाल भयो दक्षिगको ढाल, भयो हिंदको दिवाल,
भयो काल तुरकानको ॥ १९ ॥

अर्थः--तुझें कृत्य ( करवाल ) दक्षिणेची ढाल, हिंदुस्थानची संरक्षण करणारी भिंत ( किंवा—हिंदुस्थानांतून दक्षिणेंत येत असतांना मुसलमानाच्या राज्यास अडवणारी भिंत ), व तुरकांचा मृत्यु, होते झालें.

( ३ ) श्रीनगर, नयपाल, जुमिलाके ( ? जम्मूके ) छितपाल भेजत
रसाल चौरगूढ कुहीवाजकी।
मेवार, ढंढार, मारवार, औ ( र ) बुंदेलखंड, झारखंडै,
बांधौ धनी चाकरी इलाजकी ॥
भूषन जे ( ? कहे ) पूरब, पछाह, नरनाह ते वै ( ? जे )
ताकदपनाह दिल्लीपति सिरताजकी ।
जगतको जेतवार जीत्यो अवरंगजेब, न्यारी रीती भूतल-
विहारी सिवराजकी ॥ ४१ ॥

अर्थः—श्रीनगर ( काश्मीर ), नेपाळ, जम्मू, याठिकाणचे क्षितीश, खंडणी न चुकतां ज्यास देतात; मेवाड, ढूंढार ( ? ) मारवाड, व झारखंड ( बंगाल ) या ठिकाणचे लोक आपणांस ज्याचे चाकर ह्मणवून घेतात; आणि भूषण ह्मणतो कीं ज्यांस युद्ध देण्याची शक्ति असणारा असा नरेश पूर्वेस अगर पश्चिमेस नाहीं, असा जो दिल्लीपती, जगतास जिंकणारा ( यांत अलमगीर या शब्दावर श्लेष आहे ) अवरंगझेब त्यास ( शिवाजीनें ) जिंकिलें. याप्रमाणें पृथ्वीतलावर वासकरणारा ( = भूतलविहारी हा शब्द महत्वाचा आहे. ) असा जो शिवराज त्याची विलक्षण रीति आहे.

( ४ ) सिवा औरंगहि जीती, सकै और न राजा राऊ ।
हथ्थिमथ्थपर सिंघ विनु और न घाले घाऊ ॥ १३ ॥

अर्थः—शिवाजीनें औरंगजेबास जिंकिलें, तें करण्यास इतर कोणीही राजा समर्थ नाहीं. मस्त हत्तीवर सिंहाशिवाय दुसरा कोणीही उडी घेत नाहीं. ( शिवाजीस भूषणकवीनें जागोजाग सरजा–सिंह–ह्मटलें आहे हेंही लक्षांत घेतलें पाहिजे. )

( ५ ) मच्छहु, कच्छमें, कोल, नृसिंघमें, वामनमें, भनि भूषण जो है ।
जो परसराममें, जो रघुराममें, जोव कन्ह्यो, बलिराम हु को है ॥
बोधमें जो अरु, जो कलकी मह, विक्रम, हुवे को आगे सुनोहै ।
साहस भूमी ( ? साह संभुमे ) अधार, सोई अब श्रीसरजा
शिवराजमे सो है ॥ ५९ ॥

( ६ ) ब्रह्मा रचें, पुरुषोत्तम पोषत, संकर सृष्टिसंवारन हारे ।
तूं हरिको अवतारू सिवानृप, काज संबारे, सबै हरिवारे ॥ ९४

अर्थ :— ब्रह्मदेव रचना करतो, विष्णु पालन करतो, व शंकर सृष्टिसंहार करतो; तूं शिवाजी नृपा विष्णुचा अवतार आहेस; (आणि) तूं हरीप्रमाणेंच आपलें काम संभाळतोस ( ह्मणजे तूं प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करतोस. )

( ७ ) मन कवि भूपनको सिवकी भगती जीत्यो, सिवकी भगत
जीती साधुजन सवाने ।
साधुजन जीते या कठिनकाल, कलिकाल जीते
महावीर, राजनि महिमाने ॥
जगतमे जीते महावीर महाराजानि, ते महाराज बावन
हूं पातसाहि लेवाने ।
पातसाहि बाबन्नो, दिल्लीके पातसाही, दिल्ली पातसाहि,
( की ) हिंदुपतिपातसाहि सिवाने ॥८॥

अर्थ—भूपण कवीचें मन शंकराच्या भक्तांनीं जिंकिलें; शिवाच्या भक्तांनीं सर्व साधु लोकांस जिंकिलें; राजसुपूजित अशा साधुजनांनीं कठीण अशा कलियुगास जिंकिलें; महाराजांच्या योध्यांनीं जगतास जिंकिलें; असे जे महाराज त्यांनीं बावन्नही पादशाया घ्याव्या एतदर्थ,

दिल्लीच्या पादशाहींत, बावन्नही पादशाह्यांचा समावेश होतो ह्मणून, ती पादशाही, शिवाजीनें हिंदुपति पादशाही [ केली ].

आतां परिशिष्टांतून दोन उतारे देऊन हें प्रकरण पुरें करितों :-

( ८ ) कुंभकरण असुर अवतारी औरंगजेब, कीनी मथुरा
कतल, दुहाई फेरी रबकी ।
खोददारे देवी देव सहर महल्ले वांके [ १ वहांके ], लाखो किये
मुसलमान, माला छूटगयी तबकी ॥
भूषण भजत भागो काशीपति विश्वनाथ, और कौन गिनती
ने, जहां भूलीगत भवकी ।
चारो वरण धरम छोड, कलमा निमाज पढें, सेवाहून हो तो
तो सुन्नत होती सबकी ॥ ९ ॥

अर्थ :—कुंभकर्ण दैत्याचा जो अवतार अवरंगझेब त्यानें मथुरेची कत्तल करून, आपल्या धर्माची स्थापना केली, तेथील देव, देवी व आळ्या खोदून टाकल्या. लाखों लोकांस मुसलमान धर्माची दीक्षा दिली. लोकांच्या हातांतील जपमाळा सुटून गेल्या. आणि भूषण ह्मणतो कीं, काशीपति विश्वनाथ हाही पळून गेला, व जेथें प्रत्यक्ष शंकराचीही दशा तेथें इतरांची कथा काय? चारही वर्ण आपआपले धर्म सोडून कलमा व निमाज पढतात. श्री ( हू ) शिवाजी नसता तर सगळ्यांची सुंता झाली असती.

( ९ ) बदे राखे, बिदित पुरान, राखे सारसुत, रामनाम राख्यो
अति नसात सुघरमें ।
हिंदुनकी चोटी, रोटी राखीहै, सिपाहिनकी कांधेमे जनेऊ
राख्यो, माला राखी गरेमे ॥
मीड ( ? मोड ) राखे मुगल, मरोड राखे बादशाहा, बैरी पीस
राखे, बरदान राख्यो करमे ।
राजनकी हद्द राखी, तेरा बल शिवराज देव, राखे देवल,
स्वधर्म राख्यो घरमें ॥ २१ ॥

अर्थ:—वेदांचे रक्षण केलेंस, पुराण ज्ञात ठेवलेंस, सारस्वताचें रक्षण केलेंस, अति रसाळ रामनाम राखिलेंस, हिंदूची शेंडी व जात (रोटी) राखलीस, शिपायांच्या खांद्यावरील जानवें राखिलेंस, लोकांच्या गळ्यांत माळ राखलीस, मोंगलांचा पाडाव करून टाकिलास, बादशहास पराजित केलेंस, वैऱ्यांस पिळून काढलेंस, अनुग्रह हातांत ठेवलास, राजांची राज्यें रक्षित झालीं, देवळांचें रक्षण केलेंस, स्वधर्म हिंदुस्थांत [घरमे] राखिलास, हीं सर्व कृत्यें शिवाजी तुझ्या बलानें झालीं.

येथपर्यंत जे उतारे दिले आहेत त्यांत व या लेखाच्या आरंभीं ब्राइस साहेबांच्या पुस्तकांतून दिलेल्या उताऱ्यांत पुष्कळ साम्य असल्याचें दिसून येईल. ज्या ग्रंथांतून हे उतारे दिले आहेत, तें जरी काव्य आहे तरी तत्कालीन समजुतीचें त्यांत उत्तम प्रतिबिंब दिसून येतें हें निःसंशय आहे. वरील उताऱ्यांत (१) व (५)यांत शिवाजी हा ईश्वरी अवतार होता असें दिसतें. (२), (३), (४), व (७) यांत शिवाजीचें महत्व व शौर्याचें वर्णन आहे. [८]व[९] यांत शिवाजीच्या आयुष्याच्या अंतिम हेतूचे (summum bonum) आविष्करण आहे. तेंच शिवाजीच्या अवतारकृत्याचें सार होय.

शिवयुगांतील विशिष्ट प्रकारांचें वर्णन करून शेवटीं सामान्य दिग्दर्शन केलें. यावरून त्या कालाच्या माहात्म्याची थोडीशी तरी कल्पना होईल. रा० राजवाड्यांनीं ज्या जागेवरून व ज्या दुर्बिणींतून या गोष्टी पाहिल्या, त्यापेक्षां भिन्न जागेवर उभें राहून त्याच गोष्टींचें पर्यालोचन केलें आहे. इतिहासांत नेहमीं निरनिराळ्या दृष्टीनें घडून आलेल्या प्रकारांचें निरीक्षण केल्यास, नवीन सिद्धांताचा लाभ होतो. रा० राजवाड्यांत व माझ्यांत जरी कांहीं ठिकाणीं मतभेद झाला आहे, तरी त्यांचे सिद्धांत मला सर्वथैव त्याज्य वाटतात असें नाहीं. रा० राजवाड्यांची स्वदेशाची सेवा अत्यंत आदरणीय आहे. त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

मा० वि० किबे.

# श्रीशिवाजी महाराजांचे चरित्रापासून घेण्याजोगा बोध.*

आजकाल सर्व महाराष्ट्रांत शिवाजी महाराजांसंबंधीं जी चळवळ चालली आहे, तिचा पोंच केवढा आहे, त्या चळवळीपासून एकंदरीनें आपणास फायदा किती होणार आहे, ह्या गोष्टीचें आपणास विवेचन करावयाचें आहे. शिवाजी गादीवर बसल्यापासून सुमारे २२५ वर्षें होऊन गेलीं. तेव्हांपासून आमच्या स्थितींत अनेक व भिन्नरूप फेरफार झाले व अलीकडे पेशवाई बुडाल्यापासून एकंदरीनें महाराष्ट्रास सर्वथा पारतंत्र्य प्राप्त झालें आहे. त्या गोष्टीला आज ७५ हून अधिक वर्षें होऊन गेलीं. त्या काळांत आपण शिवाजीच्या स्मारकाविषयीं किंवा त्याच्या समाधिविषयीं जशा प्रकारचा विचार केला नाहीं, तसा हल्लीं एक दोन वर्षांत करूं लागलों आहों. यांतील बीज काय? उगीच एक वावटळ आल्याप्रमाणें आमच्या समाजाची स्थिति झाली आहे, यांत कांहीं विशेष हांशील नाहीं, असें कित्येक आपल्यापैकीं लोकांचें मत आहे; परंतु या चळवळीवर राजद्रोहीपणाच्या आरोपाचाही ध्वनि, कित्येक असमंजस अँग्लोइंडिअनांच्या लेखांत व भाषणांत गोचर होतो. अँग्लोइंडिअन ह्मणजे इंग्लंडचे लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले आहेत ते. त्यापैकीं समंजस लोक आणि ते पुष्कळ आहेत, त्यांचें या कामास सर्वथा आनुकुल्यच आहे. फार कशाला, अशापैकींच एकानें शिवाजीच्या समाधीची दुरवस्था लोकांच्या व सरकाराच्या नजरेस आणिली. व एवढेंच करून तो राहिला नाहीं, तर त्याणें आपल्या पदरास खारही लावून घेतला. असे समंजस अँग्लोइंडिअन लोकच

---

* राजारामीय संमेलनासंबंधीं ७ वें व्याख्यान या विषयावर झालें. तें वैशाख शु० २ ( बुधवार तारीख १५ एप्रिल ) रोजीं झालें. त्यानंतर लिहून काढल्यामुळें, कांहीं मजकूर कमीजास्ती झाला आहे.

फार; परंतु वरवर पाहणारे लोकांस ही चळवळ भयंकर वाटते. शिवाजी महाराजांनीं तरवारीचे बळावर महाराष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून दिलें, अथवा असें ह्मणण्यापेक्षां त्यांनीं महाराष्ट्रच नवीन उत्पन्न केलें व त्यास स्वातंत्र्यप्राप्ति करून दिली, तसाच कांहीं प्रकार या चळवळीच्या पुढारी लोकांचा असावा, असें या अपक्व विचाराच्या लोकांस भासत आहे असें मला वाटतें; परंतु कालमानाप्रमाणें आमचे विचार आहेत. इंग्रज सरकारचे अमलांतून एकदम आपली अगदीं सुटका करून घेणें इष्ट नाहीं. त्याचा आमचा तावडतोब सर्वथा संबंध तुटल्यापासून आमचें अतोनात नुकसान आहे, असा आमचा पूर्ण समज आहे, हें त्या लोकांस कळलें नाहीं किंवा कळूनही तिकडे दुर्लक्ष करीत असतील कोण जाणें ? पूर्वीं होऊन गेलेल्या अलौकिक पुरुषाबद्दल आदर व अभिमान ज्या देशांतील लोकांचे मनांत वास करीत नाहींत, तो देश तितक्यापरीनें अगदीं निकृष्ट स्थितीस पावला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असें झालें ह्मणजे प्राचीनकाळीं लोकांत असणाऱ्या गुणाचा लोप झाला इतकेंच सिद्ध होत नाहीं, तर ते गुण चांगले व तसे लोकांत यावे अशा बुद्धीचाही सर्वथैव लोप झाला असें स्पष्ट होतें. तशी अगदीं निकृष्ट स्थिति महाराष्ट्रास प्राप्त झाली नाहीं, एवढें हल्लींच्या चळवळीपासून सिद्ध होत आहे. शिवाजीनें जें जें ह्मणून केलें, तें तें हुबेहुब तशाच प्रकारानें करण्यास आज लोक प्रवृत्त व्हावेत असा आमच्यांतील प्रमुख मंडळीचा बिलकुल आग्रह नाहीं, व तसें करण्याची इच्छा होण्यास जीं कारणें आवश्य आहेत, तींही परमेश्वरकृपेनें हल्लीं नाहींत. शिवाजीनें राष्ट्र तयार करून त्यास स्वातंत्र्य मिळवून दिलें, त्या कामीं कोणकोणते गुण त्यानें दाखविले, त्या सर्वांचा प्रादुर्भाव प्रस्तुत स्थितीस अनुरूप अशा रीतीनें झाला पाहिजे, इकडेच लोकांचें विशेष लक्ष आहे, व तसें असणें जरूर आहे. शिवाजीनें आपला देश स्वतंत्र केला, तसाच आह्मांसही आपला देश स्वतंत्र कर्तव्य आहे; परंतु आमची स्वातंत्र्याची कल्पना कांहीं अंशीं भिन्न आहे, आणि त्याप्रमाणेंच आमचीं साधनेंही भिन्न आहेत. स्वातंत्र्य ह्मणजे एकच प्रकारचें असतें असें नाहीं. अगदीं साधारण इतिहासवाचकांस

देखील माहित आहे कीं, राज्यपद्धतींचे प्रकार अनेक आहेत. त्यांत सर्व लोकांस एकच प्रकारचें स्वातंत्र्य असतें असें नाहीं. फ्रान्स व इंग्लंड हे देश स्वतंत्र आहेत, तसेंच अमेरिकेंतील निरनिराळीं संस्थानें स्वतंत्र आहेत. त्याचप्रमाणें ब्रिटिश वसाहतीही आपआपल्यापुरत्या स्वतंत्र आहेत. ह्यामध्यें संपूर्ण स्वातंत्र्य, एक इंग्लिश व फ्रेंच लोकांसच आहे. बाकीच्यास आपली आपली अंतर्व्यवस्था पाहण्याचा पूर्ण अधिकार आहे; परंतु त्यास लढाई व तह करण्याचे अधिकार नाहींत. परकीय देशाशीं त्यांना पृथक्पणें कोणताही व्यवहार ठेवतां येत नाहीं, असें असलें तरी, त्यांत शौर्य, स्थैर्य, विद्या, उद्यम, इत्यादि सर्व गुणांचा चांगला फैलावा झालेला दृष्टीस पडतो व त्यांचें पाऊल सुधारणेच्या मार्गांत उत्तरोत्तर विशेषच पुढें पडत चाललें आहे.

इंग्रजी राज्याचा अम्मल आमचेवर बसल्यापासून, आह्मांमध्यें कोणकोणत्या चांगल्या गोष्टींचा प्रसार झाला, याचा बारकाईनें विचार केल्यास, आपली स्थिति आमच्या राज्यकर्त्यांस व आपणांस फारशी समाधानकारक आहे, असें ह्मणतां येणार नाहीं. सुधारणेचीं बाह्यस्वरूपें कमीअधिक मानानें दृग्गोचर होत आहेत. टपाल, तारायंत्रें, आगगाड्या, गॅसदिवे व क्वचित् विजेचे दिवे, शाळा, पाठशाळा ( कॉलेजें ) व निरनिराळीं खातीं या सर्व गोष्टींची कांहीं विशेष उणीव आहे, असें कोणासही प्रतिपादितां येणार नाहीं. इंग्लिशराज्यकर्ते हे आमचे शिक्षक आहेत, आणि ते हिंदुस्थानच्या प्रजेसंबंधी सर्व प्रकारें काळजी वाहत आहेत. लोकांस शहाणे करून, त्यांचा त्यांनीं राज्यशकट वहावा, अशी त्यांचे ठायीं योग्यता यावी अशा धोरणानें राज्य चालवूं, ह्मणून आमच्या सरकारचीं वचनें व अभिवचनें आहेत; परंतु त्या सर्वांचा परिणाम गेल्या पाऊणशें वर्षांत गुरु व शिष्य या दोहोंसही बिलकुल श्रेयोवह झाला नाहीं. आमचें हस्तकौशल्य लुप्त झालें व युरोपीय यंत्रकौशल्याच्या प्रतापामुळें, आह्मांस प्रत्येक बारीकसारीक गोष्टींमध्यें परकीयांवर अवलंबून राहण्याची संवय लागून राहिली आहे. इंग्रजसरकार आह्मांस एका प्रकारानें व इंग्लंडांतील व वसाह-

तींतील प्रजेस वेगळ्या प्रकारानें वागवीत आहे, असें ह्मणण्यास सबळ पुरावा आहे. सर्वप्रकारें जाति, वर्ण, भाषा व धर्म यामुळें आह्मीं आपल्या प्रजाजनांमध्यें फरक करणार नाहीं, सर्वांस सारखे लेखूं अशा प्रकारें सर्वथा उत्तेजक अश्वासनें आह्मांला दिलीं असून, तीं पूर्ण करण्याकडे सरकारची प्रवृत्ति व्हावी अशी परिस्थिति येईल असें निदान तूर्त तरी हल्लींच्या आमच्या व आमच्या राज्यकर्त्यांच्या वर्तनक्रमावरून दिसून येत नाहीं. राजकीय, औद्योगिक व नैतिक शिक्षणानें आह्मीं इंग्रज लोकांची बरोबरी करावी, ह्मणून इंग्रज सरकारानें झटावें व इतर बाबींत खर्च तोडून आह्मांस सुजाण व सशक्त करण्याकडे द्रव्याचा बराच व्यय करावा असें आह्मांस वाटतें; पण प्रजेचा वाटावा तितका विश्वास न वाटल्यामुळें, व शत्रूंचें भय दिवसेंदिवस वृद्धिंगत झाल्यामुळें, आमच्या सरकारास तें फार कठिण जात आहे. ही सरकारची विपत्ति ओळखून, सरकाराशीं आपला प्रेमभाव कसा वाढेल, त्यांचा आपल्यावर भरंवसा कसा बसेल व हिंदुस्थानच्या तीस कोटी प्रजेपासून सरकारास मदत पोहोंचून, त्याचें बाह्यशत्रुभय नष्ट कसें होईल इकडे आमचें लक्ष जाणें जरूर आहे.

यासाठीं देशकालास अनुसरून, आह्मांस वसाहतीप्रमाणें किंवा अमेरिकेंतील अथवा जर्मनींतील एकाद्या संस्थानाप्रमाणें स्वातंत्र्य मिळण्याची हाव धरणें, यांत आह्मीं आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांशीं कोणत्याप्रकारें विरोध करितों, हें समंजसपणानें सांगणें अशक्य आहे. देश आपला आहे, त्याप्रमाणेंच आपल्या हातीं त्याचें सुखदुःख, कल्याण अकल्याण असावें, हें तेथील सुजाण लोकांस वाटणें साहजिक नाहीं, असें प्रतिपादणारा आमच्या मतें पृथ्वींत कोणी नसेल. मात्र मूर्ख लोकांस स्वातंत्र्य देणें हें अगदीं विध्वंसकारक आहे, तसेंच निःशक्त लोकांस सशस्त्र करून रणांगणावर धाडणें ह्मणजे, पराजयश्रीसच माळ घालणें आहे. आळशी व गैरहुशार लोकांच्या हातीं व्यापारधंदा असणें ह्मणजे विपत्तीस यथास्थित संचार करण्यास मार्ग खुला ठेवणेंच होय. अशाप्रकारें मूर्ख, निःशक्त, आळशी व गैरहुशार स्थितींत, हिंदुस्था-

नच्या प्रजेनें पडूं नये, असा ज्या राज्यकर्त्यांनीं आपला मानस व्यक्त केला आहे, जगाच्या इतिहासांत अश्रुतपूर्व असा जितजेतृसंबंध दाखवून, जितांस जेत्यांची योग्यता आणून देण्याचा, ज्या उदार सरकारानें विडा उचलल्याप्रमाणें त्यांच्या कित्येक श्रेष्ठ मुत्सद्यांचें वर्तन झालें आहे, त्या राज्यकर्त्यांच्या जातभाईपैकीं कोणी शिवाजीच्या चळवळी-विरुद्ध असेल, तर तें इंग्रजी राज्यनीतीस सर्वथा सुटून आहे यांत कांहीं शंका नाहीं.

आपल्या महाराष्ट्रांत चाललेल्या चळवळीवर, असमंजस लोकांकडून येऊं पाहणाऱ्या आरोपांनें याहून विस्तृत विवेचन करण्याचें आज प्रयोजन नाहीं. आतां ही चळवळ कशी चालली पाहिजे ह्मणजे आमच्या देशाचें खरें हित होईल, या गोष्टीचा विचार होणें जरूर आहे. शिवाजीसारख्या खरोखर शूर पुरुषाच्या चरित्रापासून नाना-प्रकारें बोध घेतां येण्याजोगा आहे. त्याप्रमाणें आपणास घेऊन फायदा करून घेतां आला, तरच त्यांत आपलें कल्याण आहे. जागोजाग जत्रा भरविल्या, जयंत्या केल्या, नानाप्रकारें उत्साह केला, भोजनाचा थाट उडवून दिला, मिरवणुकींचा समारंभ बहारींत उरकला व व्याख्यानें, कीर्तनें व पुराणें सुरस आणि मनोवेधक केलीं, किंवा याहूनही अधिक ह्मणजे भली मोठी वर्गणी गोळा करून, जागजागीं मंदिरें उभारलीं किंवा स्थानविशेषीं चुना, दगड, माती, लांकुडफांटा यांचा अत्यंत उपयोग करून, सर्व रचनाकलाकौशल्य खर्चीं घातलें तरी आपण शिवरायाचे उतराई झालों असें होणार नाहीं. त्याला खुद्द जें आवडत होते तें हा बाह्य देखावा नव्हे. देशांत स्वधर्म व स्वभाषा यांचा प्रसार व उत्कर्ष व्हावा आणि देशास स्वातंत्र्य प्राप्त होईल त्या मार्गास आपल्या लोकांना वळविण्याचें कामीं खरोखर जेवढा प्रयत्न होईल, तेवढाच त्याचे पायीं रुजू होईल. नुसता आतांच सांगितलेला उत्सवप्रकार होईल, तर त्यास बिलकुल मानवणार नाहीं. शिवाजीचा आत्मा जर कोठें आपल्या सर्वांच्या डोक्यावर आकाशांत राहून, आह्मां सर्वांचीं बोलणीं व करणीं ऐकत व पहात असेल तर,

जोंपर्यंत आह्मीं स्वकर्तव्यपराङ्मुख आहों तोंपर्यंत त्याला खेदच होत राहील. आपण स्वर्गस्थ झाल्यानंतर, पुढें आपल्या मुलानें गादीची धुळधाण होण्याजोगें वर्तन केलें; तरी कांहीं कालपर्यंत आपलें उदाहरण ध्यानांत ठेवणारे लोक निपजले व त्यांच्या स्वामिभक्ति, देशाभिमान, धर्माभिमान व दूरदृष्टि यांच्यायोगानें, अनेक शत्रुविरुद्ध हिंदुपादशाही राहिली. पुढें ह्या अमूल्य सद्गुणांचा आपल्या वंशजांतून लोप होऊन, त्यांना पारतंत्र्यस्थिति प्राप्त होऊन, ते केवळ हतवीर्य झाले आहेत, ही स्थिति पाहून शिवाजीच्या डोळ्याचें पाणी खळलें नसेल. आतां जर आपल्या लोकांत खरी जागृति झाली असेल व त्यापासून शिवाजीच्या पराक्रमभूमीस स्वातंत्र्यसुखाचा लाभ होणार असेल, तर तो केवळ शिवाजीजयंत्यांनीं, संगीत नाटकांनीं, व्याख्यानकीर्तनांनीं होणार नाहीं, तर शिवाजीच्या गुणांचा उदय झाल्यानेंच, होईल. जेथें जेथें शिवाजीचे गुण जातील जेथें जेथें त्याचा पराक्रम जाईल, तेथें तेथें त्यांचीं फलें दृष्टीस पडतील. त्याचे गुण हल्लीं आह्मांत नाहींत, तर त्यांचीं कार्यें कोठून येतील? शिवाजी हा अलौकिक पुरुष होता; परंतु त्याच्याही जन्मतिथीस केवळ उत्सव-स्वरूप दिलें तर, आज आपण रामजयंति, कृष्णजयंति किंवा हनुमान-जयंति करतों, त्याप्रमाणेंच होणार आहे, तशाप्रकारेंच आपणही ही तिथी पाळूं लागलों तर, कालेंकरून तेतीस कोटी देव आहेत, तसा शिवाजीही तेत्तीस कोटींत पहिला देव होऊन बसेल, आणि रामचंद्र, कृष्ण इत्यादींच्या सच्चरित्रापासून व्यावहारिक सद्बोध घेणें जसें विचारबाह्य झालें आहे, तीच गत शिवाजीची होईल.

झाले ते आजवर आपले दोष होऊन गेले. येथपासून तरी आतां, या आनंदजनक समयापासून आपला फायदा करून घेण्यास विसरूं नये, ह्मणून मी आज आपणांस चार शब्द सांगण्याचें धाडस केलें आहे. शिवाजीच्या चरित्रापासून पहिला बोध घेण्याचा तो **आपल्या कार्यास अनुकूल होण्याजोगे असतील तितक्या लोकांत ऐक्यभाव उत्पन्न करण्यास झटणें** हा होय. शिवाजीचे परमपूज्य गुरु श्रीसमर्थ रामदास यांच्य

उपदेशानें महाराष्ट्रराज्याची स्थापना व उत्कर्ष शिवाजी महाराजांनीं अत्यंत एकनिष्ठ पराक्रमानें साधिला. त्यांचा महाराष्ट्र लोकांचें राज्य स्थापण्याचा जो खरा संकल्प होता तो पायाशुद्ध व शुद्ध अंतःकरणाचा होता. कोणाचें हरण करण्याच्या बुद्धीनें केलेला नव्हता. आपल्या लोकांच्या मुलुखांत येऊन अविंधांनीं धुंडाई माजविली, आपल्या धर्माची, देवतांची व चालीरीतीची विटंबना केली, त्याबद्दल दुष्टांचें शासन करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावा. हाच शिवाजी महाराजांचा हेतु होता. मुसलमान तितका बुळीस मिळवावा. मुसलमानीधर्मास आपल्या मुलखांत थारा नसावा. मुसलमानानें सुखासमाधानानें राहूं नये असा त्यांचा केव्हांही हेतु नव्हता. हल्लीं हिंदुस्थानास पुरी दुर्गति आल्याकारणानें, नाहीं नाहींत्या बाबतींत हिंदुमुसलमानांचें वैमनस्य येतें–येणें अत्यंत घातक आहे;–पण ऐन शिवाजीचेवेळीं व त्यापूर्वी केवळ मुसलमान ह्मणून हिंदूंनीं एकाद्याचा द्वेष केला आहे, असें क्वचित्च होई. तीच स्थिति मुसलमानांची. त्यांनींही कधीं हा हिंदू ह्मणून एकाद्याचा छल केला नाहीं. आतां या नियमास कांहीं अपवाद असतील. असमंजस हिंदु व असमंजस मुसलमान यांणीं प्रसंगविशेषीं व्यक्तिमत्सरास जातिद्वेषाचे क्रूर व भयंकर स्वरूप दिलें असेल; नाहीं असें नाहीं; पण सामान्यतः पाहतां, मुसलमानांनीं हिंदूंस व हिंदूंनीं मुसलमानांस प्रेमानें, आदरानें व विश्वासानें वागविल्याचीं उदाहरणें आहेत, आणि तशीं असणें साहजिक आहे. ही गोष्ट इतिहासज्ञ वाचकांस सांगण्याचें कारण नाहीं. कर्मधर्मसंयोगानें दोन गृहस्थ एकत्र जमले व त्यांस कांहीं दिवस एके ठिकाणीं राहण्याचा प्रसंग आला ह्मणजे, जाति, धर्म, वर्ण व पूर्वग्रह ह्या सर्वांस अजीबात फांटा मिळून, त्या दोघांचा अत्यंत स्नेह जडतो. ते एकमेकाच्या जीवास जीव देतात. अशा प्रकारचीं उदाहरणें हल्लींच आपण शाळांत व पाठशाळांत विद्यार्थिदशेंत असलेल्या विद्यार्थ्यांचीं घ्या. परवां मुंबईस भयंकर दंगे झाले त्यावेळींच, हें मानवस्वभावाचें मनोहर स्वरूप सुरेख दिसून आलें. हिंदूंच्या भरवस्तींत सांपडलेल्या मुसलमान विद्यार्थ्यास एक दोन दिवसपर्यंत हिंदुविद्यार्थ्यांनीं आपल्या बिऱ्हाडीं अगदीं स्वयंपाकगृहापर्यंत

नेऊन लपवून ठेविलें, व सर्व सामसूम झाल्यावर सोडून दिलें. आपल्या दुष्टजातिबांधवांच्या क्रूरतेपासून, आपल्या विधर्मी बंधूंस राखण्यासाठीं हिंदु विद्यार्थ्यांनीं हें जसें आचरण केलें, तसा हिंदुविद्यार्थ्यांचाही उपयोग मुसलमानांनीं केल्याचा माझ्या ऐकिवांत आहे. असा मित्रभाव, व्यवसायसाम्यानें जर हल्लीं उत्पन्न होतो, तर शिवाजी महाराजांचेवेळीं व पूर्वींही तशाच कारणानें तो कां उत्पन्न होऊं नये हें कळत नाहीं; आणि तसा उत्पन्न झाला होता हें अगदीं इतिहाससिद्ध आहे. मुसलमान लोक दक्षिणेंत आले व त्यांनीं आपला अंमल जिकडे तिकडे बसविला ; त्या कामीं अनेक शूर व धूर्त अशा मराठ्यांची मदत घेतली. प्रथमतः मुसलमान दक्षिणेंत आले, त्यांणीं आपली संख्या वाढविली ती हिंदूंस मुसलमान करून वाढविली. यामुळें त्यांच्या जमावांत, हिंदुरक्ताचे मुसलमान आल्यानें, त्यांचें पूर्ण महंमदीयत्व कायम राहिलें नाहीं. आपल्या पूर्वींच्या लोकांकडे त्यांचें मन ओढत होतें ; शिवाय उत्तरेंतील मुसलमानांचा व दक्षिणेंतील मुसलमानांचा जसजसा अधिक अधिक बेबनाव झाला तसतसें हिंदु व मुसलमान यांचें दक्षिणेंत अधिकाधिक जमूं लागलें व मराठे सरदारांस मोठमोठीं पथकें देऊन, लष्करी अधिकारी केले. अशानें शिवाजी महाराजांच्या अवतारापूर्वींच मुसलमानांच्याच मेहेरबानीनें व विश्वासानें मराठे लोकांचें डोकें वर निघण्यास आरंभ झाला होता. शिवाजी महाराजांत व त्यांचे पूर्वींचे थोर व शूर मराठे सरदारांत एक विशेष फरक होता, तो एवढाच कीं, त्यांना हे सर्व राज्याधिकार भोगूनच आपल्या लोकांनीं संतुष्ट राहूं नये सर्व राज्यच आपलें व्हावें, हा मुसलमानांचा मुलूख नव्हे, राज्यमदानें अंध होऊन प्रसंगविशेषीं आपली आपल्या धर्माची व आपल्या देवताची यांणीं विटंबना करूं नये, आणि इतकें सर्व आपल्या लोकांत एकी झाली तर दुःसाध्य कां असेना, पण साध्य आहे आणि यासाठीं जीवापाड कष्ट झाले तरी हरकत नाहीं, पण हे करून पहावयाचे, या कामीं ह्मणजे महाराष्ट्र गादी स्थापन करण्याचे कामीं जे जे आपणास साहाय्य होतील, ते ते आपले मित्र, व जे जे विपरीत जातील ते ते आपले शत्रु, असा शिवाजी महाराजांचा

पूर्ण संकल्प. इतकाच कायतो त्यांच्यामध्यें व त्यांच्या पूर्वींच्या मराठे सरदारांमध्यें फरक आहे. त्यापैकीं कोणासही अशी स्वराज्यस्थापनेची कल्पना सुचली नाहीं, ह्मणून '**मराठा तितका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा**' अशी खटपट झाली नाहीं. हिंदुमुसलमानांच्यासंबंधाचें हें सामान्य स्वरूप, त्या कालच्या इतिहासांतील कांहीं गोष्टी सांगून आपणास दाखवितां येण्याजोगें आहे, आणि त्या काळीं जर आपण हिंदु व मुसलमान एका जुटीनें वागलों, तर हल्लींही तसें कां वागूं नये हें मला समजत नाहीं. शिवाजी महाराजांस औरंगजेब बादशहानें कसकसा त्रास दिला, हें इतिहासज्ञास सांगण्याचें कारण नाहीं. परंतु त्यापैकीं औरंगजेब बादशहाचे पदरचे पुष्कळ सरदार लोक शिवाजी महाराजांनीं खूष ठेऊन, वेळीं आपल्या उपयोगीं पडतील असें केलें होतें. त्यामध्यें हिंदुसरदार अशा रीतीनें वश असल्यास नवल नाहीं ; पण औरंगजेबाच्या मुलाचा शिवाजीवर लोभ होता, ही गोष्ट आपणास आठवत असेल, आणि यामुळें औरंगजेबाचा हुकूम सरकार रीतीनें हातीं येण्याच्यापूर्वीं, आपल्याजवळ असलेल्या शिवाजीच्या लोकांस सुरक्षितपणें निघून जाण्यास त्याणें सांगितलें हें आपल्या स्मरणांतून गेलें नसेलच. छत्रसाल बुंदेले हिंदु, आणि औरंगजेबाचा नोकर, महाराजांचे चाकरीस राहण्यास आलेला ; पण त्याचा केवळ हिंदु ह्मणून महाराजांनीं अंगीकार केला नाहीं, त्यांचा त्यांना विश्वास पटला नाहीं, ह्मणून त्यास नोकरीस ठेवण्याचें नाकारलें; परंतु विजापूरच्या बादशाहाच्या पदरीं असलेले पण नाखुष होऊन निघालेले मुसलमान शिपायांचे पथक महाराजांनीं आपल्या मातोश्रीचा सल्ला घेऊन आपलेच पदरीं ठेविलें. याहून अधिक विश्वासाचें काम ह्मणजे सर्व जलसैन्याचा अधिकार शिवाजी महाराजांनीं इब्राहीमखान नांवाच्या मुसलमानास दिला होता. समुद्रयान निषिद्ध आहे, व तें पापमूलक ह्मणून अनाचरणीय असा तेव्हांही लोकांचा ग्रह असून, तो पाण्यावरील आरमाराचा अधिकार घेण्यास लोक कांकूं करीत होते; तथापि लक्षांत ठेवण्याची गोष्ट इतकीच कीं, जशी शिवाजीबद्दल आमची चळवळ इंग्रजी राज्याविरुद्ध नाहीं, तशीच

आमच्या मुसलमानबंधुविरुद्धही नाहीं. आह्मीं ज्यास अत्यंत पूज्य मानतों, अशा ह्या महावीरास, मुसलमानांचा द्वेष केवळ धर्मदृष्टया होता असें ह्मणता येत नाहीं. कित्येक लोक ह्मणतात कीं, शिवाजीचा अवतार 'निशेंड्याचे निसंतान' करण्यासाठीं ; पण नुक्तेंच सांगितलेल्या इतिहासप्रसिद्ध गोष्टी पुढें ठेऊन असें कोण ह्मणेल त्यास बृहस्पतीचीच उपमा देऊं. दुसरें काय? शिवाजी महाराजांची पूर्वपीठिकाही अशीच दोहोमध्यें प्रेमभाव स्थापन करण्यासच उपयुक्त आहे. महाराजांचे वडील शहाजीराजे व त्यांचे बंधु सरफोजीराजे हे दोघेही शहासरीफ नांवाचे पिरास नवस केल्यावरून झाले असल्यानें, त्यांस हीं नांवें दिलीं आहेत, हेंही आपण सर्व जाणतच आहां. आतां याचप्रकारच्या कांहीं मुसलमान ह्मणजे तीन चारशें वर्षांपूर्वींचे हिंदूच अशाबद्दल एकदोन गोष्टी ठळकशा आहेत, त्याही ध्यानांत धरण्याजोग्या आहेत. त्या ह्या कीं, निजामउलमुल्क हा जातीचा ब्राह्मण, पात्री गांवचा कुलकर्णी तसेंच युसफ आदिलशाहाची बायको ही हिंदूच होती. ह्या दोघांनींही आपल्या पूर्वसंबंधीच्या लोकांस आपल्या उत्कर्षकालीं चांगलीच जोड दिली, हेंही प्रसिद्ध आहे. असो अशाप्रकारें यासंबंधानें आपणास प्रस्तुत प्रसंगीं जितकें सांगावें तितकें थोडें आहे. सांप्रतकालीं देखील पीरास नवस करणारे हिंदू व हिंदुचे देवास भजणारे व हिंदूचीं व्रतें व आपल्या धर्माचींही व्रतें आचरणारे मुसलमान आहेत; पण आतां हा विषयाचा भाग मला सोडला पाहिजे. हा प्रमाणाचे बाहेर गेला आहेच. सारांश, हल्लीं विश्वचालक परमेश्वराचे अगाध करणीनें या दोनही महावीर राष्ट्रांची पूर्ण अधोगति झाली आहे. मुसलमान शूर, तसेंच मराठेही. दोघांचाही आज तिसऱ्यांनीं पाडाव केला आहे. दोघांसही सारखेंच निर्वीर्य व निःशस्त्र केलें आहे. उन्नतिमार्ग साधावयाचा असल्यास, दोघांनीं सारखाच हातांत हात घालून साधला पाहिजे. एकाचें तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचें पश्चिमेकडे, असें करून उपयोगी नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांपैकीं कांहीं अदूरदृष्टि अम्मलदारांस फूट करून, हिंदुस्थानचें राज्य चालवावें असें वाटत असल्यानें, हिंदु व मुसलमान यांच्यामधील

वैषम्य वाढविण्याचा त्यांनीं प्रयत्न केल्यास, या उभय जातींनीं त्या जाळ्यांत सांपडूं नये. परिणामींच्या हितावर नजर देऊन, कधीं हिंदूंनीं तर कधीं मुसलमानांनीं घस सोसून, तंट्याचें बीज नाहींसें करावें. हा बोध शिवाजीच्या चरित्रापासून घेतला तर, आह्मीं त्याचें उत्तम प्रकारें स्मारक केलें असें होईल. सर्व लोकांस व विशेषत: आमचे हिंदु बांधवांस माझें मोठ्या कळकळीनें सांगणें आहे कीं, आपसांतल्या कलहाची मख्खी परकीयांस सांपडल्यानें, परमेश्वरानें हिंदुस्थानासारख्या प्रचंड गिरिकाननसागरादि सीमांनीं सुरक्षित अशा देशावर, हा दारुण प्रसंग ओढवला आहे, त्या मख्खीचा त्यांना अधिकाधिक फायदा घेऊं देऊं नका व आपली स्थिति अधिकाधिक दुर्धर करूं नका. रागाच्या आवेशांत देखील मुसलमान लोकांच्या ताबुतांस हसनहुसनचीं मढीं ह्मणून त्या कडव्या जातीस चिडवूं नका. त्यांनीं व तुह्मीं गुण्यागोविंदानें वर्तन केल्यास इंग्लिशराज्यकर्ते योग्य ते अधिकार व योग्य ते हक्क तुह्मांस दिल्याशिवाय राहणार नाहींत. भिक्षा मागून हे हक्क प्राप्त होत नसतात. ह्याला कष्ट करावे लागतील. या कष्टास राष्ट्रांतील अति महत्वाची जीं दोन अंगें त्यांचा कलह हा अत्यंत विघातक आहे; यापायीं सर्व मेहनत व्यर्थ जाईल. दुसरें कांहीं केलें नाहीं आणि नुसतें हिंदुमुसलमान एकोप्यानें प्रेमभावानें वागतील तर देखील मोठेंच कार्य होईल असा माझा दृढ ग्रह आहे. आह्मीं निर्बल झालों आणि आह्मां दोघांचा पाडाव झाला, अशा स्थितींत कोणत्याही कारणावरून निर्दयपणानें आमच्या राज्यकर्त्यांस आपली प्रजा कापून काढावी असें वाटलें तर, त्यांत एका दावणीनें गोवलेले हिंदु व मुसलमान लोक एकमेकांसाठीं झटलेले असे बसून मांगाच्या तरवारीखालीं आपलीं डोकीं देत आहेत हा देखावासुद्धां आमच्या शत्रूच्या पोटांत अत्यंत धास्ती उत्पन्न केल्याशिवाय राहणार नाहीं. हें सहमरणसुद्धां भावी सहसुखोपभोगाचें अत्यंत प्रोत्साहक चिन्हच मी समजेन. सारांश, मरूं तर बरोबर, मारू तरही बरोबरच, असा हल्लींच्या काळीं हिंदु व मुसलमानांनीं कट्टा निग्रह केला पाहिजे.

जशी ही गोष्ट मी मुसलमानजातीसंबंधानें सांगितली, तशीच इतर साह्यकारीमंडळीसंबंधानें. शिवाजीचे तेवेळचे शत्रू मुसलमान असोन, आपल्या कार्यास मदत करणारे ह्मणून, त्यांच्याशीं त्यानें जसा निष्कपट संबंध ठेवला, तसेंच हल्लींही आह्मांस साहाय्यभूत होतील ते आमच्या प्रेमास, विश्वासास व आदरास पात्र झाले पाहिजेत. हा शिवाजी महाराजांचा गुण लक्षांत ठेवून, कोणत्याही जातीचे सरसकट वैर आह्मांस कर्तव्य नाहीं. खुद्द साहेब लोकांत जे आमचे परम हितचिंतक आहेत तेही आमचे बंधूच. अशा प्रकारें जो आमच्या स्वातंत्र्याचा पक्षपाती तो आमचा बंधु, इतका भाव ठेवला पाहिजे.

शिवाजीच्या चरित्रापासून घेण्याजोगा हा जो बोध सांगितला कीं, मुसलमानांशीं वैमनस्य करणें हें सर्वथा अनुचित आहे, त्याचाच दुसरा एक पूरक भाग आहे त्यास मी अंतर्भेद असें नांव देतों. हिंदुमुसलमानांतील भेदास बाह्यभेद ह्मटलें असतां चालेल; परंतु आमच्या हिंदु लोकांत तरी आपसांत ऐक्य असलें पाहिजे. जातिभेदापासून जितके वाईट परिणाम आहेत असें आपणांस वाटत आहे, तितके कांहीं परिणाम नाहींत; परंतु उगीच कलहप्रिय नारदतुल्य लोकांनीं ही दुही विशेष माजविली आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून हा एक मोठा बोध घेण्याजोगा आहे. त्यांणीं सर्व जातीस सारखें वागवून, सर्वांनीं एकमेकांस मदतच करावी अशी योजना केली; त्यामुळें जनसमाज हल्लींप्रमाणें अंतर्भेदजर्जर झाला नव्हता. निरनिराळ्या जातींची त्यांच्या त्यांच्या कर्तबगारीप्रमाणें योग्यता राखून महाराजांनीं सर्व प्रजेंत प्रेमभाव उत्पन्न केला. हल्लीं उगीच कलह माजवून ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांमध्यें बेबनाव होऊं पहात आहे, व कित्येक ठिकाणीं त्याचें स्वरूप भयंकर होण्याची भीति आहे, ही गोष्ट अत्यंत देशहितविघातक आहे. शक्तीच्या मानानें व व्यापारधंद्यांत अवश्य असलेल्या अक्कलहुषारीच्या मानानें, ब्राह्मणजातीपेक्षां ब्राह्मणेतरांस प्रांजलपणें श्रेष्ठपद देणें रास्त आहे. आणि त्याप्रमाणेंच बुद्धीच्या कामीं किंवा लिहिण्यावाचण्याचे कामीं ब्राह्मणमंडळीचा हात वर असणें साहजिक

आहे. या गोष्टींचा यथायोग्य फायदा शिवाजी महाराजांनीं करून घेतला. त्यांणीं ज्या ज्या गोष्टी केल्या त्या सर्वांत हें त्यांचें शहाणपण पूर्णपणें दिसून येत आहे. फार कशाला त्यांची अष्टप्रधानांची योजनाच पहा. मुख्य शौर्य व धैर्याचें काम ब्राह्मणाचे हातून होणें नाहीं ह्मणून तें मराठ्यासच दिलें आहे. पुढें त्यांच्याच तंत्रावर, ही व्यवस्था कायम करून पुढील राजांनीं चालविली, ती कांहीं अंशानें तरी अद्यापि आमच्या या संस्थानांत दिसत आहे. आमचे महाराजसरकारचे पिढीजादे मांडलिक सरदारांची घराणीं अवलोकनांत घेतली तरी हें दृष्टीस पडत आहे. फार प्राचीनकालापासून आलेला हा श्रमविभाग एकंदरीनें मोठा श्रेयस्कर आहे, मात्र मध्यंतरीच्या कालाप्रमाणें शिक्षण शरीरसामर्थ्य व नैसर्गिक बुद्धिमत्ता या गोष्टीचा विचार करून सामान्य नियमास कांहीं अपवाद निघाले तरी हरकत नाहीं. ज्यानें एकंदरींत देशाचें हित होईल असा फेरबदल करतांना आपसांत वैषम्य व वैमनस्य आलेंच पाहिजे असा कांहीं भाग नाहीं. सांगण्याचें तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं, मराठ्यांनीं ब्राह्मणाचा व ब्राह्मणांनीं मराठ्यांचा द्वेष करणें हें स्वहितनाशक आहे. किती जरी बलाढ्य सैन्य असलें तरी अंतर्भेदजर्जर झालें कीं, भोंग्यानें पोंखरलेल्या खांबाप्रमाणें अत्यल्प आघातानेंही जमीनदोस्त होतें. यासाठीं महाकवी श्रीभवभूतीनें माल्यवानाचे मुखीं केलेला उपदेश आपल्या मनीं ठसला पाहिजे.

अमोघमस्त्रं क्षत्रस्य ब्राह्मणानामनुग्रहः ।
दुरासदं च तत्तेजः क्षात्रंच ब्रह्मसंयुतं ॥

क्षात्रतेजाचा ब्राह्मतेजाशीं संयोग झाल्यावर, सर्व विघ्नांची व सर्व शत्रूंची राखरांगोळी होण्यास काय उशीर आहे? हिंदुस्थानांतील सर्व जाति व उपजाति एकत्र प्रेमानें वागूं लागल्यावर, आमच्या इंग्रज सरकारानें सर्व जगास तुच्छ मानावें. सारे जगांतील वीर, सारा दारूगोळा रशियाच्या बाजूला दिला, तरी हिंदुस्थानच्या टापूंतला एक ढेंकूळ देखील त्यास मिळावयाचा नाहीं. हिंदुस्थान देशास जर खरें स्वातंत्र्य मिळावयाचें असेल, तर हिंदुस्थानांतील लोकांना जवळ जवळ बांगड्या

भरण्याचा प्रसंग आणून ठेवला आहे, तो टळला पाहिजे. कोट्यावधि रुपयांचा चुराडा उडवून, काबूलचे अमीरास तुष्ट ठेवण्यापेक्षां, हिंदुस्थानांत एकी करून, प्रत्येक तरुण मनुष्यास लढाईचें शिक्षण देणें, हेंच आमच्या सरकारास परिणामीं हितावह होणार आहे. आपली शीव राखण्यासाठीं, आपल्या तरवारीचें पाणी जे लोक शत्रूंस दाखवूं शकत नाहींत, आपणावर कोणते कोणते कर बसवावे व न बसवावे हें ठरविण्याचें ज्यांच्या हातीं नाहीं, आपल्या राजकीय बाबीसंबंधीं वाटेल तितका खर्च करण्यास व वाटेल ती काटकसर करण्यास ज्या राष्ट्रांस अधिकार नाहीं, आपल्या राज्यकारभारांत ज्या लोकांचे अधिकारी अत्यंत थोडे आहेत, अशा राष्ट्रास जर सुखाचे दिवस यावयाचे असतील, तर शिवाजी महाराजांप्रमाणें, आपली जमात वाढविण्याची खटपट केली पाहिजे. अंतर्भेद ह्मणून सर्व लुप्त झाला पाहिजे, तरच देशास स्वातंत्र्यप्राप्ति होईल. एरवीं ह्या पारतंत्र्यपंकांतून वर येण्याची आशा बिलकुल नको.

येथवर आपणांस शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून अति महत्वाचा बोध घेण्याजोगा कोणता आहे, हें सांगितलें; परंतु शिवाजी महाराजांनीं आपल्या उपदेशानें व उदाहरणानें आह्मांस कधींही न विसरण्याजोगे लहान लहान धडे घालून दिले आहेत, त्यांचा थोडा थोडा तरी उल्लेख करणें अत्यंत अगत्याचें आहे. ह्या सर्व गोष्टीकडे चांगलें लक्ष पुरविल्यास, स्वतंत्र होऊं पहाणाऱ्या लोकांमध्यें कोणकोणते गुण अवश्यमेव आले पाहिजेत, हें आपल्या चांगलें ध्यानांत भरेल.

शिवाजी महाराजांचेवेळीं शौर्य, धैर्य व चातुर्य या गुणांचें अतिशय महत्व होतें, आणि हे गुण लोकांत येण्यास ज्या प्रकारची दिनचर्या ह्मणजे नित्याची वागणूक लागते, तशी हल्लीं आपणांपैकीं किती असामीची असते, याचाच विचार केला ह्मणजे, आपण या स्थितींत कां आलों व हिजमधून आपली सुटका कां होईना हें चटदिशीं लक्षांत येणार आहे. केवळ सुखोपभोग करून चैनींत दिवस

काढण्याचा हा काल नसतांना, आपण, किती एक लोक आपला उदर-निर्वाहाचा धंदा कसाबसा करून सर्वकाळ आळसांत घालवितांना पाहतों. केवळ आळसापेक्षांही वाईट दुर्व्यसनांचा प्रसार जारी सुरू आहे ही गोष्ट राहूंद्या. प्रातःकाळीं उठण्याची अगदीं साधी व सोपी संवयसुद्धां पुष्कळ लोकांमध्यें दिसत नाहीं. सकाळचे शाळेच्या दिवसांत कोण त्रेधा उडते, याचा तुह्मींच अनुभव घेता. शिवाजी महाराजांचा प्रातरुत्थान, स्नान व व्यायाम यासंबंधानें मोठा कडक नियम असे व त्यामुळें 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्यांचे लोकही ह्या नियमित वर्तनांत चुकत नव्हते. शरीर कमावणें, ज्याला भेसळ समास करून 'तन्दुरुस्ती' असें नांव देण्यांत आलें आहे, त्या गोष्टीकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. शरीरसामर्थ्यावर मनःशक्ति अवलंबून आहे, ह्मणून हें साधण्यासाठीं जेवढी खटपट होईल तेवढी थोडी. यासाठीं ओघानें प्राप्त झाल्यानें आपणास एक महत्वाचा इशारा देऊन पुढें जाण्याचे करीन. कडकडीत ब्रह्मचर्यव्रत हें जसें शक्तिवर्धक व शरीरपोषक आहे, तसें दुसरें साधन नाहीं. विद्यार्थ्यांनीं विशेषतः ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. असो, हा कांहीं मुख्य विषय नसल्यानें या प्रसंगीं यावर मी जास्ती प्रपंच करीत नाहीं.

शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून घेण्याजोगे जे बोध आहेत, त्यांपैकीं सशास्त्र रीतीनें अहोरात्राचे विभाग करून, त्या त्या काळीं जें जें करण्याचें ठरविलें असेल तें नियमानें करणें हा एक आहे. महाराजांस लिहिणें वाचणें फारसें येत नव्हतें; परंतु शास्त्र पुराण कथांची माहिती त्यांच्या इतकी तुह्मांआह्मांस असणें शक्य नाहीं. भारतरामायणादि श्रवण करण्याची त्यांना फार हौस असे, आणि विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ती ही कीं, त्यांतील सत्पुरुषांच्या आचरणाप्रमाणें आपलेंही आचरण असावें असा त्यास नेहमीं ध्यास असे. साधारणतः ज्याला नियमबद्ध वर्तन करण्याची संवय लागली आहे, त्यास दुर्व्यसनास व दुराचारास अवकाशच सांपडत नाहीं. वेळ जर पैशापेक्षां अधिक महत्वाचा आहे आणि पैशाचा हिशेब जर आपण अत्यंत

काळजीनें लिहून ठेवतो, तर वेळेच्या व्ययाविषयीं बेफिकीर असणें हें किती असमंजसपणाचें आहे याचा विचार तुह्मींच करा. तर तुह्मां सर्वांस माझें असें सांगणें आहे कीं, एक वेळ आपला नित्यक्रम ठरवा; त्याप्रमाणें वागला कीं नाहीं हें दररोज निजावयास जाण्याचे पूर्वीं रोजनिशींत नमुद करून ठेवा. आपल्या ठराविक क्रमांत अंतर पडलें तर तेंही सकारण लिहून ठेवा. रोजनिशी लिहून ठेवण्याच्या संवयीसारखी दुसरी उपदेशाची गोष्ट मला बिलकुल माहित नाहीं. आपणावर सदासर्वदां देखरेख करणारा कोण मिळेल? पण रोजनिशी लिहिणें ह्मणजे आत्मनिरीक्षण करणें होय. वेळाचा व द्रव्याचा अपव्यय किंवा सदाचरणमार्गापासून आपलें परावर्तन, हें प्रांजळपणें कबूल करणें व तें लिहून ठेवणें, ह्मणजे आपली उत्तरोत्तर सुधारणा होण्याचे उत्तम मार्ग साधणेंच आहे. असो, याविषयींही फारसें सांगण्यास अवधि नाहीं; तथापि आजच्या व्याख्यानाचा व शिवाजीच्या जन्मतिथीचा कांहीं फायदा करून घेणें असल्यास, आजपासून तुह्मीं रोजनिशी लिहिण्यास प्रारंभ करा. एरवीं प्रथमच सांगितल्याप्रमाणें नुसता उत्सव करण्यांतच कांहीं पुरुषार्थ नाहीं. व्याख्यानें नुसतीं ऐकण्यांत फायदा नाहीं. ह्मणतात कीं नाहीं, ‘ नळी फुंकली सोनारें इकडून तिकडे जाई वारें ’ तशापैकीं प्रकार करूं नका. तर रोजनिशी लिहिण्याची संवय जर तुह्मांस लागली, तर आजचा दिवस तुह्मीं कधींही विसरणार नाहीं.

शरीरसंपत्तिबद्दल अत्यंत काळजी घेणें, व कालाचा सद्व्यय करणें या दोन गोष्टींमध्यें बहुतेक सर्व उत्तमोत्तम शिक्षणाचा अंतर्भाव होतो; परंतु ह्याहूनही सूक्ष्म रीतीनें श्रीशिवाजी महाराजांच्या चरित्राचें निरीक्षण केलें असतां, आपणास शिकण्याजोग्या गोष्टी घ्यावयास सांपडणार आहेत; परंतु त्या प्रत्येकीचें सविस्तर निरूपण आतां होणें शक्य नाहीं; तथापि त्यांचा निर्देशही केला नाहीं, तर आजचें आपलें काम अगदीं अपुरें होईल. शिवाजी महाराजांची पितृभक्ति, त्यांचें मातृप्रेम व त्यांचा प्रजेवरील लोभ, आणि सर्वांत विशेष, गुरुचे ठिकाणीं

सर्वस्वबुद्धी या प्रत्येकाबद्दल शिवाजी महाराजांचे जितकें वर्णन करावें तितकें थोडें. शहाजीराजे यांस विजापूरचे बादशहानें काचांत धरलें कीं, तुमचा पोर बहुत पुंडाई करीत आहे, त्यास ताळ्यावर आणावें; नाहींतर तुमची धडगत नाहीं, असा आपल्याबद्दल वडिलांचा छळ चाललेला ऐकून, महाराजांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें, आणि केवळ वडिलांचा छळ होऊं नये, ह्मणून आपली मुलुख काबीज करण्याची हांव चार वर्षेपर्यंत सोडून दिली. परमेश्वरकृपेनें विजापूरचे दरबारांत मुरारराव ह्मणून कारभारी होते, ते शिवाजीस अनुकूल होते, व उत्तरेंतून खुद्द बादशहाचे पत्र आणून लावल्यानें, शहाजीराजे यांचा जाच कमी झाला व पुढें अदिलशाहींतही तंजावरकडे बंडें उठून शहाजीराजे यांचेशिवाय त्यांची शांति होणें अशक्य वाटल्यावरून, बादशहानें त्यांस कामगिरीही सांगितली. ही सगळी फत्ते केल्यावर पितापुत्रांची पुण्यास गांठ पडली आहे. तेवेळीं शिवाजी महाराजांस अफझुलखानावर जय मिळाला होताच, आणि त्यांची एकसारखी चलती चालली होती, तेव्हां आपला मुलगा इतका पराक्रमी निघाला, याबद्दल शहाजीस पराकाष्ठेचा आनंद झाला. शहाजीराजे यांणीं ह्मटलें 'मोठा संतोष झाला, बहुत पराक्रम केला, देव पाठीं येईल ह्मणून वरप्रदान झालें होतें तेंच तह्मीं' असें समाधानाचे उद्गार ऐकून, त्यावेळीं पुत्रास किती धन्यता वाटली असेल, याचा तुह्मींच विचार करा. जशी बापावर तशीच आईवर महाराजांची भक्ति. कांकण-भर अधिक पण कमी नाहीं. कारण, त्यांचें सर्व संगोपन मातोश्रीच्या हातून झालेलें. शहाजीराजे विजापुरास राहिले व शिवाजीस दहाव्या वर्षापासून आईबरोबर पुण्यास ठेवल्याचें सर्वांस माहित आहेच. तिसरा गृहसंबंध पत्नी व बंधु यांच्याशीं. या दोन्हींही बाबतींत शिवाजी महाराजांचें वर्तन अत्यंत अनुकरणीय आहे. 'परस्त्रीचे ठायीं जो का नपुंसक। त्याचे गळां माळ असो नसो' त्यास खरा साधू ह्मणावा, तसे शिवाजी महाराज होते. कनक आणि कांता यांचा अनावर मोह ज्याला नाहीं असा पुरुष विरळा. ह्मणूनच महाराजांची इतकी थोरवी. संपत्ति आणि अधिकार यांच्या अत्युच्च शिखरावर असलेले

राजेरजवाडे शेकडों आहेत; पण त्यांपैकीं खरोखर स्वस्त्रीसक्त असा विरळा. फार कशाला, सभासदहो, आमच्या (आमच्या ह्मणजे कोल्हापुरच्याच नव्हे, हिंदुस्थानच्याही नव्हे तर सर्व जगांतील शिक्षित लोकांच्या) तोंडाला काळोखी लागली आहे, ती सर्व समुद्राच्या पाण्यानें पृथ्वीवरील सर्व पर्वताएवढा साबणाच्या ढिगाचा उपयोग करून धुतली, तरी जावयाची नाहीं. मोठमोठ्या परीक्षा द्याव्या, लांब लांब बाता झोकाव्या; परंतु आचरण पाहिलें तर, मदिरेचे, वारस्त्रीचे आणि त्याहूनही निंद्य परस्त्रीचे दासानुदास बनलेले असे लोक जर आढळतात, तर बेतावेताचीच आणि तीही सतरा जणाच्या जुलमानें ज्यांची, झाली आहे विद्या ज्यांच्या भोंवतीं व्यसनजालांत पकडण्यासाठीं शेकडों दुर्जनव्याधांचा गराडा आहे, अशा राजपुत्रांत 'व्यसनांचा यथेष्ट संचार असला, तर कां बरें प्रखर टीका करावी? विद्यार्थिजनहो तुह्मीं सुशिक्षित होणार, तुह्मांकडे जगाचें उपदेष्टत्व येणार, ह्मणून तुमचें आचरण निष्कलंक राहिलें पाहिजे. ह्मणून आज हा सद्गुणांचा पुतळा श्रीशिवाजी महाराज तुमच्यापुढें ठेवतों. कल्याणच्या सुभ्याची स्नुषा सर्वांगसुंदरी नारी अनन्यगतिक अशी, सेवकजनांनीं राजचरणीं अर्पण केली असतां, ज्या राजपुत्रानें स्वसुदृष्टीनेंच अवलोकिली त्याची थोरवी काय वर्णावी! कां त्याचा टाक करून आमच्या देव्हाऱ्यावर ठेवूं नये? पण तुमच्या हृदयापेक्षां त्याला अधिक चांगला देव्हारा नाहीं बरें. तेथें त्यास ठेवा; आणि जेव्हां जेव्हां तुमच्या मनीं कुविचार येतील, तेव्हां तेव्हां शिवरायाचें स्मरण होऊन, तुमच्या अंगास दरदरून घाम सुटूं द्या, आणि आपली अधमाधमता तुमच्या नेत्रापुढें मूर्तिमंत उभी राहूं द्या. या उपदेशपर बोधावर जितकें सांगावें तितकें थोडें आहे; परंतु इतर गोष्टी राहून जातात, तिकडे वळणें अत्यंत आगत्याचें आहे. तंजावरचा व्यंकोजी, महाराजांचा सावत्र बंधु, त्याच्याशीं कोणत्याही-प्रकारें कलह नसावा ही महाराजांची इच्छा, आणि तिला अनुसरून महाराजांनीं लिहिलेलें एक पत्र आहे, त्यामध्यें कुलाभिमान, बंधुप्रीति, स्वहितत्याग वगैरे गुण व्यक्त होत आहेत. तें पत्र मला मिळालें

नाहीं; पण त्याचा उल्लेख सार्वजनिकसभेच्या एका अलीकडील अंकांत आहे.

खासगी वर्तनासंबंधानें या गोष्टी शिवाजी महाराजासंबंधीं तुह्मीं एकल्या या फार महत्वाच्या आहेत. खासगी वर्तन व सार्वजनिक वर्तन अगदीं पृथक् आहे, असें प्रतिपादन करणारे कांहीं लोक आहेत; पण समाजाची योग्यता त्याच्या अवयवांच्या मानसिक व शारीरिक शक्तिवर अवलंबून आहे आणि सदाचरणाचा व या उभयविध शक्तीचा जोंपर्यंत संबंध आहे, तोंपर्यंत विचार व तर्क-दृष्ट्याही तसा सिद्धांत असमंजसच होईल. यासाठीं खासगी वर्तन ज्यांचें चांगलें त्यांचेंच बहुशः सार्वजनिक वर्तन चांगलें असण्याचा संभव आहे. एरवीं एक नाहीं दुसऱ्या प्रकारानें मनुष्याच्या वर्तनांत वैगुण्य आल्यावांचून राहणें अशक्य आहे. हा सर्व नीतिप्रांत अत्यंत विस्तीर्ण आहे, त्याचा प्रवास अल्पकालांत होणें शक्य नाहीं ह्मणून त्याच्या सीमेवरूनच आह्मांस दुसऱ्या प्रांतात जाणें भाग आहे.

आतां या पुढें जो विचार आहे, तो केवळ देशाचें स्वातंत्र्य, आपल्या लोकांचें चिरंतन कल्याण, आपल्या धर्माचा अबाधित प्रसार, व आपल्या भाषेचा पूर्ण जीर्णोद्धार ह्या अत्यंत उदात्त विषयांसंबंधानें शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून कोणते बोध घेण्याजोगे आहेत यासंबंधानें करावयाचा. त्या सर्वांत प्रथमतःच मी आपणास सांगतों कीं, जी परिस्थिति शिवाजी महाराजांचे कालीं अनुकूल होती, तिचा निदान आजला तरी हिंदुस्थानांतून सर्वथा लोप झाला आहे. आजच्या व्याख्यानांत जे जे दोष मी आपल्या लोकांस ठेवित आहें, ते येथील ह्मणजे कोल्हापुरच्याच लोकांस लागू आहेत असें नाहीं. आज मी बोलतों आहें, तें रायगडावर उभा राहून बोलल्याप्रमाणें बोलतों आहें. माझे सिद्धांत बहुतेक हिंदुस्थानास लागू आहेत. तेव्हां सांगण्यास कारण काय कीं, शिवाजीच्या कालीं जसा एक पुढें शहाणा माणूस सरसावला कीं, त्याचे मागून जाण्यास हजारों माणसें तयार. हा अग्रेसरानुयायिसंबंध त्यावेळीं जसा देशास हितकारक होता, तसा

हल्लीं कोठेंच दृष्टी पडत नाहीं. जिकडे जावें तिकडे आपसांत फूट, आपली दुही माजून राहिली. फार काय, आतां दुही हा शब्द देखील मराठी भाषेस पुरे होत नाहीं. तिहीसुद्धां कोठें कोठें वापरण्यांत आला आहे. ह्मणायचें इतकेंच कीं, गांवांत एक सन्मान्य व अनुकरणीय पुरुष असावा, आणि त्या गांवांतले लोक तरी त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागतील अशी गोष्ट बहुधा घडणें नाहीं. ज्यास त्यास आपल्या विद्येची घमेंडी, आपल्या अकलेचा डौल, आपल्या कर्तृत्वाची ऐट, मिळून एकवटून कोणतीही गोष्ट होण्याची मारामार. शिवाजी महाराजांचे अंगीं तशा अग्रेसरास हवेत असे गुण होते. त्यांची अनुयायी मंडळीही अगदीं लष्करी थाटाची; त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें वागत असत. देशास कधींकाळीं चांगले दिवस यावयाचे असतील, तर ही वृथाभिमानजन्य फाटाफूट नाहींशी झाली पाहिजे. मीपणा नष्ट होण्यास लहानपणापासून आपण या गोष्टीचा अभ्यास केला पाहिजे. लहान लहान मंडळ्या स्थापून योग्यतेप्रमाणें अध्यक्षाची नेमणूक करावी. ती अमेरिकेंतील संस्थानाप्रमाणें नियमितकालपर्यंत असणारी, पण त्यांतील खुबी इतकीच कीं, ज्यावेळीं जो मुख्य असेल, त्याणें हुकूम फर्मावण्याची फुरसत, कीं त्याची अम्मलबजावणी झालीच. नेमतेवेळीं विचार; पण एकदां नेमल्यावर मग त्याणें विष पिण्यास सांगितलें, तरी त्याच्या ठिकाणीं अमृताची भावना करून तें बिनदिक्कत प्राशन केलें पाहिजे. लहान लहान समाजापासून वाचन, लेखन इत्यादि हेतुसाठीं असले समाज स्थापन होऊन, त्यामध्यें एकदिलानें व प्रेमानें वागण्याची संवय लावून घेतली पाहिजे. हल्लीं कोणत्याही सत्कार्यास प्रारंभ करा, लाजेकाजेस्तव जेवढें साहाय्य मिळेल तेवढेंसुद्धां मिळण्याची पंचाईत. एकानें संमतिकायद्याच्या प्रतिकूल सभा केली, तर दुसरा तिला अनुकूल सभा करील. दोघांच्याही मनांत विषयासंबंधीं कळकळ तात्पुरतीच. असा प्रकार ह्मणजे वैमनस्याचा फैलावा होण्यास कांहीं कारणेंही उत्पन्न होतात. त्यांत स्थानिक स्वराज्याचे अधिकारापासून हा अंतर्भेद शहरोशहरीं फारच वाढला आहे. गेल्या राष्ट्रीयपरिषदेच्यावेळीं मद्रासचे एक प्रसिद्ध

गृहस्थांशीं बोलण्याच्या कांहीं ओघांत, त्यांनीं मला आपला बेधडक प्रश्न केला. 'Are there parties in your town?' तुमच्या शहरांत दुफळी आहे काय? यावर माझ्यानें कांहींच उत्तर देववेना. मग तेच ह्मणाले, 'या म्युनिसिपॅलिटीच्या व्यवस्थेनें आमच्यांत कलहाचें बीज फार पेरलें आहे, यायोगानें हिंदुस्थांत एकही शहर सांपडणें कठीण कीं, ज्यांत दुफळीचें नांव नाहीं.' मतभेद हा होणारच. जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति, प्रसंगविशेषीं विकृतिही होते; पण त्या सर्वांचा योग्य विचार होऊन, शिक्षित लोकांमध्यें तरी निदान शिवाजीच्या कालचा अग्रेसरानुयायिसंबंध उदय पावला पाहिजे; परंतु जेथें सर्वच गोष्टी कमी, तेथें एवढ्याबद्दल रडून काय उपयोग; पण प्रसंगानुसार सांगणें भाग पडल्यामुळें हल्लींची आपली स्थिति व शिवाजी महाराजांचे वेळची आमच्या पूर्वजांची स्थिति ह्यांची तुलना केली ह्मणजे वाटतें कीं, आपसांत कलह करून दोन मांजरें चक्का दह्याबद्दल भांडत होतीं, त्यांचा न्याय वानरानें तोडला. त्याप्रमाणेंच हल्लीं आमच्या कलहाचें फळ धूर्त सीताभक्त उपभोगीत आहेत.

शिवाजी महाराजांवर प्रसंग येऊन बेतला असतां, आपले प्राण खर्ची घालण्यास तयार असे सेवक तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, येसाजी कंक, आबाजी सोनदेव, मोरोपंत पिंगळे इत्यादि करोल कसे तयार होते. त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी आतां सांगत बसण्याचें कारण नाहीं; पण खुद्द महाराजांनीं आपण मागें राहून लोकांस पुढें ढकलण्याचें कधीं मनांत आणलें नाहीं. अगदीं साध्या शिपायाप्रमाणें लढाईंत घुसण्याची तयारी असल्यामुळें, सर्व शिपाईही त्यांचेंच अनुकरण करीत होते. प्रत्यक्ष उदाहरणासारखा शिक्षक दुसरा नाहीं. दहा पोतीं शुष्क भाषणाच्या भुसापेक्षां प्रत्यक्ष आचरणाचे दोन दाणे अधिक महत्वाचे आहेत. त्याचा शिवाजी महाराजांनीं अत्युत्तम उपयोग करून घेतला, हें त्यांच्या शाइस्तेखानावरील रात्रीचा छापा, प्रसिद्ध दिल्लीची यात्रा, यांवरून व्यक्त होत आहे. दृढनिश्चयानें आपण कामगिरी बजावणें व लोकांसही तसेंच करणेस

लावणें ह्या कामीं शिवाजी महाराजांची अगदीं हातोटी होती. स्वतःची हिम्मत दुसऱ्यांत भरविण्याची अलौकिक कला त्यांना साधली होती, ह्मणूनच त्यांच्या हातून अलौकिक कृत्यें घडलीं. चांगल्या कार्यांत अडचणी हजारों येतात. पुनः पुनः आलेल्या विघ्नांनीं कुंठित होणारे लोक अनेक. थोड्याशा यशःप्राप्तीवर फुगून जाणारे लोक त्याहून अधिक; पण हातीं धरलेलें कार्य कडेपर्यंत पोहोंचविणारे व प्रथम ठरविलेली व सगळी फलप्राप्ती होईपर्यंत सतत प्रयत्न सुरू ठेवणारे असे विरळा.

> रत्नैर्महार्हैस्तुतुषुर्न देवा न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।
> सुधां विना न प्रययुर्विरामम् न निश्चितार्थाद्विरमंति धीराः ॥

हें जसें देवांच्यासंबंधानें भर्तृहरीनें ह्मटलें आहे, तेंच आमचे शिवाजी महाराजांसंबंधानें ह्मणतां येणार आहे. पहा, औरंगजेबासरखा हा बलाढ्य व संपन्न शत्रु, ज्याच्या कृपाकटाक्षानें महाराष्ट्राच्या तिप्पट राज्य शिवाजीस प्राप्त झालें असतें, ज्याच्या कारस्थानामुळें एकेवेळीं मोठ्या पुंडाईनें तसेंच पराक्रमानें मिळविलेले बहुतेक गड सोडून द्यावे लागले पण तशा मोहांत सांपडून किंवा तशा संकटाला घाबरून आपला राष्ट्रस्थापनेचा व स्वातंत्र्यप्राप्तीचा हेतु यत्किंचितही ढळला नाहीं. या कामासाठीं शिवाजी महाराजांनीं किती कष्ट सोसले कीं, त्यासंबंधानें राजैश्वर्य उपभोगणाऱ्यास हें सर्व सहन कसें झालें, असें वाटून तो इतिहास वाचतांना आपणांस तोंडांत बोटें घालावीं लागतात. खरोखर दृढनिश्चयी व धाडसी पुरुषाचें वर्णन कविवर भर्तृहरीनें केलें आहे, तें महाराजांच्या ठिकाणीं यथार्थ वाटतें.

> क्वचिद्भूमौशायी क्वचिदपिच पर्यंकशयनः
> क्वचिच्छाखाहारी क्वचिदपिच शाल्योदनरुचिः ।
> क्वचित्कन्याधारी क्वचिदपि च दिव्यांबरधरो
> मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम् ॥

याचा विचार केला असतां, आपण त्यांचे किती लाचार आहों,

आणि त्यांणीं इतक्या युक्तिप्रयुक्तीनें, हाल अपेष्टेनें आणि पराक्रमानें जें कमाविलें, तें नुसतें राखणें देखील आमच्याहातून झालें नाहीं, ह्मणून आह्मीं किती हतभागी; पण हतभागी ह्मणून राहण्यापेक्षां शूरमर्दांचे बच्चे ह्मणून हतवीर्य झालों आहों, याची ओळख पटवून घेण्याची आह्मांला जरूर नाहीं काय? मित्रहो, सभ्यजनहो, विद्यार्थी लोकहो, आपण अशाच स्थितींत राहणार काय? शिवाजी महाराज व त्यांचे मागून मराठीमंडळांतील वीर पुरुषांची आह्मांला लाज वाटावयाची नाहीं काय? ह्या सर्वांची लाज असेल, तर शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीस नुसता उत्सव करून राहूं नका, तर त्यांचें सद्वर्तन, त्यांचा दृढनिश्चय व त्यांचें शौर्य यांचा आपल्या लोकांत पुनश्च प्रादुर्भाव होण्यासारखे प्रयत्न, देशकालवर्तमानास अनुसरून करण्यास सिद्ध व्हा.

एकंदरीनें पहातां शिवाजी महाराजांस मुख्य अभिमान होता तो आपलेपणाचा, आपला देश, आपला धर्म, आपली भाषा. देशास स्वतंत्र करण्यासाठीं त्यांनीं पराक्रम कसे केले, व एकदां जिंकून आपलासा केलेल्या प्रांताच्या राज्यव्यवस्थेविषयीं योजना काय काय केल्या, त्या इतिहासज्ञांस सांगत बसण्याचें कारण नाहीं. तसेंच धर्माचे बाबतींत सर्व एकंदर हिंदु व मुसलमान कोणीही राजनिष्ठ प्रजा ह्मणून आपला आश्रय करील त्याचा ते संग्रह करीत. आतां मुसलमान लोकांस आपआपल्या रीतीनें शांतपणें वर्तन करण्याची मुभा शिवाजी महाराजांनीं दिली, त्यांनाही सरकारी मदत असे; परंतु महाराजांचा मुख्य आश्रय हिंदुधर्मास होता. जागोजाग देवस्थानें, त्यांना उत्पन्नें करून दिलेलीं; सर्व प्रजेवर समदृष्टि असून त्यांत गोब्राह्मणाचा विशेष परिपाल करून सर्व राज्य सुखावह करण्याचा त्यांचा यत्न होता.

आतां एकाच गोष्टीविषयीं तुह्मांस सांगून आज हें लांबलेलें पण अपुरेंच व्याख्यान पुरें करितों. इंग्रज लोकांच्या अमलापासून आह्मांला विशेष सुखाच्या गोष्टी ज्या प्राप्त झाल्या, त्यांत आपण मुद्रणकलेची गणना करतों व तिजपासून फायदा खरोखर जाहला आहे; परंतु छापण्याच्या कलेपासून गद्यवाङ्मयाचा प्रसार विशेष झाला, आणि

वाटेल तें छापून निघूं लागलें. छापलेलें ह्मणून जेवढें आहे, तेवढें वाचण्यालायख असतेंच असें नाहीं; ह्मणून वाचावें कोणतें व टाकावें कोणतें याची निवड करण्यांतच कालहानि होते. शिवाय ज्यास लिहितां वाचतां येत नाहीं, त्यांस तर ज्ञानाचा मार्ग बहुतेक खुंटलाच आहे. पूर्वीची स्थिति फार वेगळी होती. त्यावेळीं सर्व वाङ्मय कवितावद्ध असल्यानें, व तें कर्णोपकर्णीं जात होतें ह्मणून, त्याचा लोकांचे मनावर ठसा उमटत असे; आणि लोकांस उपदेश करण्याचे कामीं जवळ जवळ गद्यरचनेइतकींच सोपीं वृत्तें उपयोगांत आलीं होतीं. तुकारामानें काय, चार कोटी अभंग केले. एकनाथानें किती, शाण्णव कोटी केले. अभंग, ओवी व पोवाडा हीं सुलभ वृत्तें असल्यानें, व त्यांत कवितेचें स्वारस्य रसाळ वाणींतून उतरल्यानें, जागोजाग लोकांत जागृति उत्पन्न होत असे. एकनाथ, रामदास, तुकाराम या भगवद्भक्तांनीं एकदां जो सर्वांस समदृष्टीनें लेखून सर्वव्यापी विश्वचालकाचा महिमा जनमनावर बिंबवून दिला, तो कित्ता पुढील साधुसंत मंडळींनीं गिरविला, आणि तुकारामाच्या धरतीवर निळोबा, सेनान्हावी इत्यादि संतांचे अभंग अस्तित्वांत आले. एकंदरीनें पहातां व्यवहार न सांडितां प्रपंचाचें साधन करण्यास उपदेश करणारा साधुवर्ग निपजून ओवी, अभंग व पोवाडे यायोगानें महाराष्ट्रांत चोहोंकडे सजीवता राखली. राष्ट्रीय वाङ्मयासारखा राष्ट्राचा जीवरक्षक दुसरा नाहीं. परक्यांचे भाषेंतील कितीही मनोहर पद्यसंग्रह वाचला तरी तितक्या गुदगुल्या होत नाहींत. शिवाय परकीय भाषेचें हें पद्यभांडार सर्वांस लाभेल कोठून? ह्मणून हें प्राणरक्षक व शक्तिवर्धक भोजन सर्व आबालवृद्धांस, स्त्रीपुरुषांस, गोर-गरिबांस ज्या भाषेंतून मिळालें पाहिजे ती भाषा केवळ मराठी, ही गोष्ट शिवाजी महाराजांच्या मनावर पूर्णपणें बिंबून गेली होती, ह्मणूनच त्यांणीं आपणास राज्याभिषेक झाल्याबरोबर बहुतेक पहिली गोष्ट केली ती हीच कीं, परकीय भाषेंतून आलेले सर्व शद्ब काढून टाकून तेथें मराठीशब्द योजावे. आतां मराठींत शब्द तयार करण्यास संस्कृताची मदत घेतल्याशिवाय होणें नाहीं, ह्मणून तसें करणेंत आलें. 'शाई' शब्द जाऊन 'मसी' आला, 'जमा' जाऊन 'आय',

'खर्च' जाऊन 'व्यय' असे शब्द उपयोगांत आणणेचें ठरलें. 'कारकून' शब्दास फाटा देऊन 'गणक' योजण्याचें निश्चित झालें. असो; अशा प्रकारें अमरकोशाचे धरतीवर एक 'राजव्यवहारकोश' च तयार झाला; यावरून पहा महाराजांस स्वत्वाचा केवढा अभिमान होता तो. भाषेंतील शब्द हें विचाराचें प्रतिबिंब आहे, आणि परक्याचे शब्द वापरणें ह्मणजे परक्याचे विचार आपल्या मनांत शिरकविणें आहे. ह्मणून होतां होईल तितका परकीय भाषेचा आपल्या भाषेस विटाळ होऊं न देण्याविषयीं त्यांची खबरदारी असे. आतां याचा अर्थ इतकाच कीं, शब्द नेहमीं आपले वापरावयाचे, दुसऱ्याचे विचार पोक्त व उपयोगीं असतील, तर त्याचा त्याग करण्याचें कारण नाहीं. फक्त त्यांचे वेडेवांकडे शब्द आपल्या भाषेंत आणून अशुद्धता व कर्णकटुता आणावयाची नाहीं आणि खरोखर ह्मटलें असतां दुसऱ्या भाषेंतील शब्दाचें स्वरूप जाऊन कांहीं तरी वर्ण राहतात, मग त्यांची उपपात्ति होणें कठीण. असे प्रकार करण्यापेक्षां मोठमोठ्या ग्रंथकारांचें ह्मणणें असें आहे कीं, आपल्या भाषेंत वर्णोच्चारसाहाय्यानें अधिक जुळेल असेच नवीन शब्द तयार करावे, कांहीं काळानें ते परिचित होतील. अशा यत्नास महाराजांचा आश्रय मिळाल्यावर मग काय विचारतां, भराभर संस्कृतांतून शब्द येऊं लागले. परंतु पुढें आमच्या दुर्दैवानें राजकीय स्थित्यंतराबरोबर सर्वच प्रकार निराळा झाला आहे. पूर्वीं ज्याप्रमाणें सरनोबत, हिंमतबहादर हेच शब्द प्रिय व सामान्य झाले होते, तसेंच आतां इंग्रजी शब्द सर्वतोमुखीं झाले आहेत. इंग्रज लोकांचे राज्यांत तसा प्रकार असल्यास वावगें नाहीं; पण आह्मां लोकांस स्वतंत्रता हवी आहे, आपलीं कामें आपण पहावीं असें वाटत आहे; आणि तें साधण्यासाठीं जर प्रयत्न करावयाचे आहेत, तर प्रत्येक गोष्टींत मग ती किती कां बारीक असेना, आपलेपणाचा बाहाणा असला पाहिजे. या कामांत शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून कोणता बोध घेणें शक्य व जरूर आहे, तें आतां सांगण्याचें कारणच राहिलें नाहीं. राज्याभिषेक होण्याच्या पूर्वीं आपल्या कामगारांस हिंदुस्थानी नांवें होतीं, तीं

बदलून त्यांनीं पुढें सचिव, अमात्य, सुमंत, प्रधान अशीं नांवें दिलीं. हाच कित्ता हल्लींचे आमचे राजेरजवाडे यांणीं कां गिरवूं नये हें समजत नाहीं. एकदम फेरफार करणें कठीण वाटत असल्यास, कांहीं दिवसपर्यंत दोनीही शब्दांचा एकदम उच्चार करावा लागेल, पुढें इंग्रजी शब्द हळू हळू गाळला असतां चालेल. उदाहरणार्थ, परीक्षक, शिक्षणाध्य, शालाध्यक्ष, प्रांताधिकारी, दुर्गरक्षक, नगरपाल, न्यायाधीश, न्यायाधीश्वर, न्यायाध्यक्ष, कार्यावेक्षक, आचार्य, उपाचार्य, प्रधानाचार्य, शाखाध्यक्ष, कोशाध्यक्ष असे व अशासारखे दुसरे शब्द वापरण्यास कोणताच अडथळा मला दिसत नाहीं. या प्रत्येक बाबींत आह्मांमध्यें **शिवाजीपणा** आला पाहिजे. फार कशाला, साहेब लोकांच्या चौकसपणाची तुह्मांला एक गोष्ट सांगतों. एका गृहस्थानें मुद्दाम टपाल खात्यांत शोध करून असें काढलें आहे कीं, ज्याला ह्मणून इंग्लिश येतें, तो त्या भाषेंत होतांहोईल तितका पत्रव्यवहार करतो. साहेब लोकांत चार चार भाषा चांगल्या रीतीनें शिकलेले लोक असतात; परंतु ते इंग्रजींतच पत्रव्यवहार करितात. यासंबंधानें आह्मांस अत्यंत अभिमान असला पाहिजे. होताहोईल तितका स्वतःच्या देशांतला माल वापरण्याचा जर आपण निश्चय करतों, व परकीय वापरलाच तर तो जितका अधिक टिकवेल तितका टिकवून, आपलें जेवढें ह्मणून कमी नुकसान होईल तितकें करून घेण्यासाठीं झटण्याचा ठराव करून वागतों, तर भाषेच्या बाबतींतही असेंच आपणास केलें पाहिजे. परकीयांची भाषा शिकण्यासाठीं ह्मणून तिजवर जेवढें परिशीलन होईल तेवढें थोडें; परंतु परस्परांत मित्रभावानें व विश्वासानें पत्रें लिहावयाचीं, तींसुद्धां परकीयांचे भाषेंत लिहावयाचीं हा शुद्ध वेडेपणा आहे. सध्यां आपले खासगी विचार, आपल्या खासगी संसाराच्या गोष्टीसुद्धां साहेब लोकांना कळवून घेण्यास आह्मीं खुशाल मार्ग करून देत आहों, व तितक्या प्रमाणानें आमच्या मायभाषेची अवहेलना करीत आहों. साधारण संभाषणांत देखील घेडगुजरी प्रकार किती तरी आपण आणतों. ‘ आज office work फार झालें. eleven to five. Recess नाहीं. तुह्मींच जा walk ला. मला अगदीं energy नाहीं. ’ हा

एक लहानसा संभाषणाचा चुटका तुह्मांपुढें ठेवितों, अशानें मराठीभाषा सुधारेल काय? फार काय सांगावें. हल्लीं हा प्रकार इतका अंगवळणी पडला आहे कीं, याचा त्याग करून कोणी बोलूं लागला तर तेंही एक विनोदस्थानच होतें. याचें कारण दुसरें कांहीं नाहीं, संवय; पण ही संवय नव्हे खोड आहे, ही वाईट, ही सर्वथा त्याज्य. ह्मणून तुह्मांस सांगतों कीं, आजपासून शुद्ध मराठी अगर अभ्यासासाठीं ह्मणून शुद्ध इंग्रजी तरी बोलत चला, आणि आजपासूनच हा नियम करा. जसा रोजनिशीचा तसाच हाही. प्रथमतः जरा जड जाईल; परंतु पुढें पुढें सोपें वाटेल. अगदीं वापरांत येऊन गेलेले शद्ब आहेत, त्यांचा पाहिजे तर आतां त्याग करूं नका. आमच्या लोकांत हजार ब्राह्मणांचा स्वयंपाक केला आणि त्याला कुत्रें शिवलें तर काय करावयाचें? तसें जे अगदीं मराठी शब्दवत् होऊन गेले आहेत, त्यापुढें उपाय चालत नाहीं, तर त्यांचें बिऱ्हाड हालविण्यांत खर्चणारा काल दुसऱ्या चांगल्या रीतीनें उपयोजितां येईल. असो; ही क्षुल्लक बात आहे. सांगण्याचें तात्पर्य ह्मणून एवढेंच कीं, मराठी भाषेची हयगय करूं नका, जें ज्ञान तुह्मीं मिळवीत आहा, त्याच्यापासून तुमचा उपयोग असेल, तर तें तुमच्या सर्व देशबांधवांस मिळालें पाहिजे. सर्वांना तें इंग्रजींतून मिळणें शक्य नाहीं तुह्मांस ते मराठींत केलें पाहिजे. मराठीभाषेची व विद्यार्थ्यांची हल्लींचे काळीं इतक्या लवकर फारकत होते हें सर्वस्वी घातक आहे; पण आमचा शिक्षणक्रम ठरविणारा पडला परका, आमच्या मराठी भाषेस नाआई नाबाप; पण अशा पोरक्या भाषेनेंच आमच्या देशास ऊर्जितदशेस आणावयाचें आहे, यासाठीं तिची सर्व भिस्त तुह्मांवर आहे, तुह्मीं तर आपल्या नित्याच्या आणि परीक्षेच्या नादांत असणार. तुह्मांस मराठी भाषेची दीन वाणी कोठून ऐकूं येणार? ऐकिली तरी तिच्या आरोळीस तुमचे कर्ण सर्वथा बधिर असणार. जितके दिवस अशा प्रकारची अनास्था राहील, तितके दिवसपर्यंत आमची दुर्गती नष्ट होण्याची आशा दूर दूर जाईल. तुमच्या बुद्धीस योग्य, तुमच्या कल्पनाशक्तीस अनुरूप, असें अमूप वाङ्मय आपल्या मराठीभाषेंत आहे. रामदास,

तुकाराम, एकनाथ, मोरोपंत यांचा तुमचा जितका परिचय होईल, तितकी तुह्मांस मराठीभाषेची गोडी लागेल. स्वार्थ परमार्थ समजून धर्माभिमान व देशाभिमानही जागृत होईल. जें शिक्षण हल्लीं तुह्मांस शाळांतून व पाठशाळांतून मिळत आहे, त्याचा तुह्मीं स्वत: फायदा घेऊन, लोकांस जर दिला, तर जग हें मनुष्यास अनुचित वसतिस्थान नाहीं, येथें राहून सुख व समाधान मिळणें शक्य आहे, अशाप्रकारचे विचारही तुमच्यांत येतील. जगाची माहिती, निरनिराळीं राष्ट्रें काय करीत आहेत, याचीही माहिती हल्लींच्या पद्धतीनें प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांतून मिळते. सारांश मराठींत जें वाङ्मय आहे, त्याचा तुह्मीं आतांपासून थोडथोडा अभ्यास ठेवा. इतर अभ्यास आपखुषीवर नाहीं, तो केल्याशिवाय तुह्मांस गत्यंतर नाहीं, त्याबद्दल तुह्मांस उपदेशाची गरज फार थोडीच आहे; परंतु शिवाजीच्या चरित्रापासून बोध काय काय घेण्याजोगा आहे, तें ऐकण्याच्या हेतूनें श्रोतृवृंदापैकीं जेवढा विद्यार्थिजन आला असेल, त्यास माझी सूचना अशी आहे कीं, त्यांनीं मराठी वाचन कांहींतरी ठेवावें. त्यांच्यावर फार भार पडूं नये, ह्मणून इतकेंच सुचवितों कीं, जे दिवशीं शाळेस अगर पाठशाळेस सगळी सुटी असेल, ते दिवशीं या कामाकडे एक पूर्ण तास द्यावा, व जे दिवशीं अर्धी सुटी असेल ते दिवशीं या कामाकडे अर्धा तास द्यावा, इतकें झालें ह्मणजे पुरें. हाही स्वभाषाध्ययनाचा विषय मोठा आहे; परंतु ओघानें जें सांगावेंसें वाटलें, तें थोडक्यांत कळविलें आहे. या विषयाचें महत्व फार मोठें आहे. ज्या राष्ट्रास स्वभाषा नाहीं, तें राष्ट्र स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. ज्या राष्ट्रांतील लोक भाषेची हेळसांड करतात, ते परतंत्र राहण्यास तयार आहेत, असेंच सिद्ध होतें. यासंबंधानें, खालीं बसण्यापूर्वीं एका जर्मन ग्रंथकाराचा, ट्रेंचसाहेबांनीं आपल्या पुस्तकांत उतारा घेतला आहे, तो तुह्मांस वाचवून दाखवीन.

येथवर आपले श्रीशिवाजी महाराज शककर्ते मराठी राज्याचे संस्थापक यांच्या चरित्रापासून शिकण्याजोग्या गोष्टी अनेक आहेत. यांच्या चरित्राचा प्रत्येक भाग हृदयंगम आहे, तसाच शिक्षणावहही आहे.

इतिहासापासून मिळणारें शिक्षण अशाच प्रकारचें आहे. फ्रीमन्सारख्या बऱ्या इतिहासकारानेंही असें विधान करावें कीं, खरा इतिहास ह्मणजे, इतिहास ही संज्ञा ज्यास योग्य होईल असा, काय तो पाश्चात्य देशांतच आहे. दुसरीकडे नाहीं. ह्याचें कारण त्यांचा अवलोकनप्रांत तितकाच आणि या विधानांत देखील त्यांची स्वजातिप्रीति व स्वखंडाभिमान व्यक्त होतो. आरिस्टाटलनेंही असेंच विधान ग्रीक व विशेषत: अथेनियन लोकांविषयीं केलें आहे. तो ह्मणतो राज्य करण्यास लायक असे एक ग्रीक लोकच. असो. अशा पाश्चात्य लोकांच्या भ्रमाचें निराकरण करावयाचें ह्मटलें ह्मणजे, आमचा इतिहास त्या तऱ्हेनें लिहिला पाहिजे. आणि हें काम निदान मराठ्यांच्यासंबंधानें तरी अत्युत्तम हातांत पडलें आहे. मुसलमानांचा इतिहासही लिहिण्याचें काम असेंच कोणा योग्य मुसलमानाचे हातीं पडलें असतें, तर फार बरें झालें असतें. तो भाग एका सन्मान्य इंग्रजानें लिहिला आहे; पण अलाहाबादचे मि० जस्टिस महमुद किंवा आमचे मि० जस्टिस बद्रुद्दीन तय्यबजी यांजकडे सोंपविला असतां, तर चांगलें होतें. असो; पण महाराष्ट्राविषयीं तरी निदान युरोपीयजगाची परिपूर्ण खात्री होण्याजोगा इतिहास होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. अलेक्झँडर धीग्रेट, हॅनिबॉल, जूलियस सीझर, आलिव्हर क्रॉमवेल, फ्रेडरिक धीग्रेट, नेपोलिअन बोनापार्ट यांच्या चरित्रांवर पुस्तकांची व टीकालेखांची गर्दी व्हावी व आमच्या वीरमणीचें चरित्र हंटरसाहेबासारख्या नि:पक्षपाती इंग्रज कलमबहादरास, आपल्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या चरित्रमालिकेंत येण्यास योग्य वाटूं नये हें आश्चर्य आहे. आश्चर्य तरी कसलें! आमचे आह्मीं काय केलें आहे? दुसऱ्याची आह्मांस आशा कां? पण ज्यांना नेसावयास धोतरें लोकांनीं द्यावींत, ज्यांचीं आंगरखीं शिवण्याच्या सुया व यंत्रें लोकांनीं पुरवावीं, ज्यांना लिहिण्यास कागद, व टांक दुसऱ्यांनीं पुरवावें, त्यांच्या गतकालच्या वीरांचीं चरित्रें दुसऱ्यांनींच लिहिलीं पाहिजेत. तर हंटरसाहेबानीं युरोपीयन चष्म्यांतून पाहिलेलीं चरित्रें अमान्य करून, धमक असेल तर पाश्चात्य लोकांचे डोळे उघडण्यासाठीं, आह्मांसच इंग्रजींत चरित्रें

लिहिणें भाग आहे. आतां असल्या उद्योगास आह्मांस काळ नाहीं. भूतकालापेक्षां आह्मांस वर्तमान व भविष्यकालावरच विशेष नजर दिली पाहिजे; तथापि याही उद्योगांत कांहीं निरलस मनुष्यांची मति व लेखणी चालली पाहिजे. अशाप्रकारें शिकणाऱ्यास अत्यंत बोधपर असें शिवाजी महाराजांचें चरित्र आहे; आणि आह्मीं तो बोध घेऊन त्याप्रमाणें वागलों तर, आह्मांस सुदिन येईल अशी माझी पक्की खात्री आहे. आमच्या इंग्रज मित्रांचें आह्मांस सांगणें असतें कीं, तुह्मीं फार लोक नोकऱ्याच्या पाठशीं लागला, आणि तेंच तुणतुणें आमच्यांतील कांहीं लोक वाजवीत आहेत; पण चमत्कार असा कीं, आमच्यापेक्षां अधिक लोक इंग्लंडसारख्या लहानशा देशांतून शिकून तयार होतात, आणि त्यांचा सुखासमाधानानें निर्वाह होतो. तेव्हां आह्मीं जर राणीसरकारची प्रजा आहों, आणि आह्मांस जर इतर प्रजेप्रमाणें वागविण्याचा इंग्रज सरकारचा निश्चय आहे, तर आमचेंच पोट भरत नाहीं व त्यांचें भरतें या गोष्टींत कोठें तरी स्क्रू ढिला आहे आणि तो आमच्या बाजूनें ढिला आहे हेंही आह्मांस कळतें. आमचे राज्यकर्ते तो पिळून घट्ट करतात पण घट्ट होतो त्यांच्या बाजूला आणि आमच्या बाजूला ढिला पडतो, असा हा अर्धांगशिथिल स्क्रू सर्व बाजूनें सारखा केला पाहिजे. ह्मणजे त्याना जशी स्वतंत्रता आहे तशी आह्मांसही पाहिजे. वसाहतीना जशी आपआपल्यापुर्ती स्वतंत्रता आहे, तशी आह्मांस दिली पाहिजे; पण ह्या सर्व गोष्टींस आह्मांत जागृति झाली पाहिजे. ती होण्याकडे सर्व काल व सर्व द्रव्य खर्च होईल, तरच शिवाजी महाराजांच्या आत्म्यास संतोष व समाधान होईल, असें त्यांचें स्मारक आमच्या हातून घडेल; एरवीं घडणार नाहीं. डूपरसारखे इतिहासकार तुह्मीं नादान, तुह्मीं आतां पुनः उदय पावणार नाहीं, तुमचा जगद्रंगभूमीवरील भाग झाला, आतां पाश्चात्य राष्ट्रें रंगभूमीवर येणार, तुमचा पुनः प्रवेश नाहीं असें सांगत आहेत. त्यांस मारून काढणारे दुसरे इतिहासकार आहेत ते ह्मणतात कीं, थंड हवेंतल्या लोकांचा टिकाव कायमपणें उष्ण हवेंत लागणार नाहीं ह्मणून उष्ण कटिबंधांतील लोक कांहीं दिवस

दास्यस्थितींत राहिले तरी, अखेरीस स्वतंत्र होणार. या मोठमोठ्या इतिहासकारांच्या वादांत पडण्याचें आह्मांस कारण नाहीं. आमचे पूर्व कवि आह्मांस सांगतात.

नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।—कालिदास.

छिन्नोऽपि रोहति तरुः क्षीणोऽप्युपचीयते चन्द्रः
इतिविमृशंतः सन्तः सन्तप्यन्ते न पीडिता लोके ।—भर्तृहरि.

ते इतिहासकार व हे कवी ह्या दोघांसही बाजूस ठेवलें तरी, आमचा प्रत्यक्ष ऐतिहासिक अनुभव व प्रत्यक्ष अनुभव यांची साक्षही आह्मांस अत्यंत उत्तेजन आणणारीच आहे. आज चालला आहे हाच शिवाजीचा विषय कां घ्याना? मुसलमानांचा फारा दिवसांचा अंमल जाऊन, मराठी पादशाही स्थापण्यास एक पिढी देखील लागली नाहीं. दुसरें उदाहरण याच शतकांत इतालीयन लोकांनीं आपणांस स्वतंत्र करून घेतलें, तेथेंही श्रीसमर्थ रामदासस्वामी व श्रीशिवाजीमहाराज या जोडीसारखी मॅझनी व गॅरीबॅल्डी ही जोडी उत्पन्न झाली. त्यांचा पराक्रम इतिहासप्रसिद्ध आहे, व तो पाहिलेले लोक आज शेकडों जीवंत आहेत. अमेरिकन् लोकांवर करांचा जुलूम झाल्यामुळें, त्यांनीं आपणास स्वतंत्र करून घेतलें, त्यासही पुरीं २० वर्षेंदेखील लागलीं नाहींत. हीच गोष्ट ग्रीस देशासही लागू आहे. तेथेंही प्राचीन ऑलिंपिक नांवाचें राष्ट्रीय महोत्सवाचें पुनरुज्जीवन यंदांपासून सुरू झालें आहे. त्यांच्या उत्सवास गेल्या आठवड्यांतच ६ तारखेस सुरुवात झाली. इतक्या दूर कालावर किंवा दूर स्थलावर देखील नजर देण्याची आपणांस जरूर नाहीं. आपल्याच खंडांत जपाननें जी आज दोन तीन वर्षांत सर्व जगास थक्क करून टाकण्याजोगी किमया दाखविली, तिची तयारीही एका पिढीपेक्षां फार वर्षें अधिक न लागतां, झाली आहे. फ्रीमन्प्रमाणें आह्मींही अभिमानानें ह्मणावें, ज्या खंडांत मराठ्यांनीं असा पराक्रम दाखविला, व जपानीजनीं [illegible]ी अद्भुत करणी केली, त्या खंडाची विटंबना करणारे इति[illegible]ार, अति सौम्य शब्दाचा उपयोग केला तरी, अनभिज्ञ [illegible]त असें ह्मणावें लागतें. अशीं

प्रोत्साहक उदाहरणें पुढें असतांना आलस्य टाकण्याचें आपल्या लोकांच्या मनांत जर आलें नाहीं, तर वाटेल तितकी वर्गणी गोळा केली आणि हवे तितके उत्सव केले, तरी शिवाजी महाराज ह्मणतील 'हाय हाय, काय मी कपालकरंटा, हे लोक मला इतके दिवस विसरलें होतें तेंच बरें होतें. अशा मूर्ख केवळ उत्सवप्रिय लोकांचा मी पूर्वज ह्मणून हे जगांत नादवित आहेत. यांच्या पायांत पारतंत्र्यशृंखला खळखळत आहेत, यांची मला कळकळ इतकी वाटत नाहीं. या स्थितींत राहून हे नामशेष होणार, तर रामचंद्र, कृष्ण, हनुमान यांचे प्रमाणेंच हे माझीही विटंबना करणार' असे उद्गार त्या महात्म्यास काढावयास लागण्याची जरूर पडणार नाहीं, अशी मला आज उमेद आहे. आमचे हल्लींचे इंग्रज राज्यकर्ते, आमचे शिक्षक यांच्याविना आमचे हल्लीं कांहीं चालवयाचें नाहीं. आज इंग्लिश लोक आह्मांस सोडून गेले, तर आमचे यथास्थित चालेल, असें प्रतिपादिण्याइतका मी स्वदेशाभिमानानें अंध झालों नाहीं; परंतु उलटपक्षीं पांच पंचवीस वर्षांत उद्योगसातत्यानें ती योग्यता आमच्या लोकांत येणार नाहीं, इतकाही पण स्वाभिमानरहित झालों नाहीं. आमच्या देशाचा हल्लीं पात झाला आहे हें मी जाणून आहे. आज पौणशें वर्षांत, या भागास स्वराज्याची चांगलीशी कल्पना नाहीं, हें मी पक्कें समजतों. राज्य करण्याचा प्रसंग नसल्यानें, त्या कामास लागणाऱ्या हरतऱ्हेच्या युक्ति-प्रयुक्ति काढण्याची आमच्या डोक्याची संवय अगदीं मोडली आहे, हें मी विसरून गेलों नाहीं. इंग्रजबहाद्दरांनीं सर्व कारभार आटपला व परचक्राच्या भीतीचें निवारण करण्याच्या मर्दुमकीच्या कामाची तखलीफ आह्मांकडे न ठेवल्यामुळें, तोफेचा व बंदुकीचा आवाज ऐकून आमच्या पोटांत धस्स होतें, याची कोणी आह्मांस आठवण करून देण्याचें कारण नाहीं. इतकेंही असून आमचा हल्लींचा पात हा कंदुकपातच आहे. अशी माझी बालंबाल खात्री झाली आहे. पात दोन प्रकारचे. एक [illegible]कपात ह्मणजे चेंडू पडतो, व पुनः उशी येऊन वर येतो. दुसरा मृ[illegible]त ह्मणजे मातीचा गोळा पडतो, तो पडला कीं पडला, भुईधरूनच राहतो, [illegible] कांहीं केल्या वर येत नाहीं, तशी

गोष्ट आमची नाहीं. चेंडू पडला ह्मणजे उशी येण्याला वेळ थोडा लागतो, तशीच गोष्ट इतिहासांत आहे. एकादें दुसरें शतक ह्मणजे इतिहासाच्या दृष्टीनें पलापेक्षां फार अधिक नाहीं.

सारांश सांप्रतकालीं आपणास आमचे इंग्लिश प्रभूच्या छायेखालीं राहून, निराश असण्याचें कारण नाहीं. शिवाजी महाराज व त्यांच्या तालमींत तयार झालेले इतर वीर, त्यांचें उदाहरण पुढें ठेऊन वागणारे शूर मराठे व ब्राह्मणसरदार यांची कीर्ती व पराक्रम यांस स्मरून, आळस टाकून हिंदु व मुसलमान यामधील वैमनस्याचा पूर्ण होम करा. तसेंच ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यामधील शुष्क कलहाग्नीवर विचारजलाची वृष्टि करून, तो अगदीं शांत करा. शरीरसंपात्तिपेक्षां अधिक योग्यतेची दुसरी संपत्ति नाहीं असें मानून, तिनें हिंदुस्थान देश मातबर करा. देशकालमानांस अनुसरून पाश्चात्य उद्यमधंद्याची माहिती करून घेऊन, तिचा व्यावहारिक रीतीनें उपयोग करा. देशांतील लोकांची खासगी व सार्वजनिक नीतिमत्ता सुधारून, परस्पर समागमापासून सर्वांस आनंद होऊन, यथास्थित रीतींचें अग्रेसरानुयायिसंबंध देशांत चोहोंकडे दृष्टि पडेल असे करा. एकंदरीनें स्वतः विषयीं ह्मणजे स्वदेश स्वधर्म व स्वभाषा यांच्याविषयीं योग्य अभिमान जागृत होऊं द्या, ह्मणजे हिंदुस्थान देशास चांगले दिवस येण्यास विलंब लागणार नाहीं.

आतां विद्यार्थ्यांस विनंति केली होती ती ही कीं, रोजनिशी लिहिणें, होतां होईल तितकी मराठी भाषा वापरणें व महाराष्ट्र वाङ्मयाचें यथावकाश परिशीलन करणें, त्या विनंतीचें स्मरण देऊन, पूर्वीं सांगितलेला लहानसा स्वभाषेच्या महत्वाविषयींचा उतारा वाचून दाखवून, सर्वांचे आभार मानून खालीं बसतो.

'The care of the national language, I consider, as at all times, a sacred trust and a most important privilege of the higher orders of society. Every man of education should make it the object of his unceasing

concern, to preserve his language pure and entire, and to speak it so far as is in his power, in all its beauty and perfection......... A nation whose language becomes rude and barbarous, must be on the brink of barbarism in regard to every thing else. A nation which allows her language to go to ruin is parting with the best half of her intellectual independence and testifies her willingness to cease to exist.'

'राष्ट्रीय भाषेची मशागत ह्मणजे समाजांतील उच्चवर्गांवर सोंपविलेली एक पवित्र कामगिरी आहे व ती बजाविणें ही एक त्यांच्या अत्यंत महत्वाच्या हक्काची बाब आहे असें मी समजतों. प्रत्येक शिक्षण मिळालेल्या मनुष्यानें आपली भाषा शुद्ध व अखंड राखण्याविषयीं सतत कळकळ बाळगिली पाहिजे व होतां होईल तितकें करून तिचें सौंदर्य व पूर्णत्वनित्य व्यवहारांत आणण्याचा दृढनिश्चय केला पाहिजे.........ज्या राष्ट्राची भाषा बेढब व रानटी झाली आहे, तें राष्ट्र इतर बाबतींतही रानटीपणाच्या अगदीं कांठावर असलेंच पाहिजे. जें राष्ट्र आपल्या भाषेचा नाश होऊं देतें तें आपलें मानसिक स्वातंत्र्य बहुतेक गमावितें आणि शिवाय जगांतून अजीबात नाहींसें होण्यास आपली तयारी आहे असेंही व्यक्त करून दाखवितें.'

---

........'शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें ॥ इहलोकीं परलोकीं रहावें। कीर्तिरूपें ॥ १७ ॥ शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा प्रताप ॥ शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥ १८ ॥ शिवराजाचें कैसें चालणें। शिवराजाचें कैसें बोलणें ॥ शिवराजाची सलगी देणें। कैसें असे ॥ १९ ॥ सकळ सुखांचा त्याग। करूनि साधिजे तो योग ॥ राज्यसाधनाची लगबग। कैसी असे ॥ २० ॥ त्याहून करावें विशेष। तरीच ह्मणावें पुरुष ॥ याउपरी आतां विशेष। काय लिहावें ॥ २१ ॥' [illegible]भाजीस पत्र—रामदास.

---

ॐ तत्सत्

# श्रीशिवजयंतिमहोत्सव.

( रा. रा. आर. जी. प्रधान बी. ए. यांचें व्याख्यान. )

॥ यत्रयोगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥
॥ तत्र श्रीर्विजयो भूति र्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

शिवराजास आठवावें । जीवित तृणवत् मानावें ।
इहपर लोकीं तरावें । कीर्तिरूपें ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा साक्षेप ।
शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥ — रामदास.

प्रिय देशबांधवहो,

आज आपण कोणत्या निमित्तानें येथें जमलों आहों, हें आपणांस विदित आहेच. ज्या जगच्चालक, सच्चिदानंद परमेश्वरानें आज आपणांस, सर्व विघ्नांचा अपहार करून हा सुदिन दाखविला, त्यास अनन्य भावें शरण जाऊन, व ज्या आर्यावर्तललामभूत नरपुंगवाच्या जन्मोत्सवानिमित्त आज आपण येथें एकचित्तानें एकत्र झालों आहों, त्या श्रीशिवरायाच्या सुखप्रद व स्फूर्तिकारक नामाचा जयघोष करून मी आपल्या व्याख्यानास आपल्या परवानगीनें आरंभ करितों.

ह्या श्रीशिवाजी महाराजांच्या महोत्सवाच्या इतिहासाचें

## सिंहावलोकन

करितां आपणांस आढळून येईल कीं, तो इतिहास फार मनोवेधक आहे. त्यावरून एक गोष्ट आपण करावयास तत्पर झालों असतां तिला व्यापकता प्राप्त होऊन तदनुषंगिक इतर गोष्टी आपल्या हातून साहजिक रीतीनें कशा होतात हें स्पष्टपणें दिसून येतें. ह्या सर्व महाराष्ट्रास प्रिय झालेल्या महोत्सवास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या हें आपणास

पहावयाचें असेल तर, १८८९ पर्यंत आपणास मागें गेलें पाहिजे. श्रीशिवाजी महाराजांस जो जीव कीं प्राण, ज्याला बांधण्यास महाराजांनीं लक्षावधी रुपये खर्च केले, ज्यास ते महाराष्ट्र राज्याची किल्लीच मानीत, व ज्या ठिकाणीं त्यांना राज्याभिषेक होऊन त्यांनीं दाखविलेल्या अतुल शौर्यानें, अप्रतिम मुत्सद्दीपणानें व अमूप आत्मत्यागानें प्राप्त झालेल्या मराठापातशाहीचा खंबीर पाया उभारण्यांत आला, अशा त्या इतिहासप्रसिद्ध रायगड मुक्कामीं महाराजांची समाधि आहे हें आपणांस विदित आहेच. १८१८ पर्यंत ह्मणजे जोंपर्यंत पेशवाई हयात होती तोंपर्यंत ह्या समाधीबद्दल श्रीमंत पेशवे सरकार बराचसा खर्च करून, ज्याच्यायोगानें त्यांना उन्नतावस्था प्राप्त झाली होती, व ज्याचेंच अन्न ते खात होते असें ह्मटलें असतां चालेल, त्या शिवरायाबद्दल आपली पूज्यबुद्धि व आपला अभिमान व्यक्त करित असत. पुढें १८१८त पेशवाई लयास गेली व त्याबरोबर कालावधीनें समाधीची हेळसांड होऊं लागली. इंग्रेजी राज्याची स्थापना झाल्यावर कांहीं वर्षानें इंग्रेजी शिक्षणपद्धति सुरू झाली. त्या पद्धतीचा प्रथम परिणाम असा झाला कीं, आह्मीं इंग्रेज लोकांच्या भपकेदार तेजानें दिपून गेलों, व आह्मीं हीनसत्व, आह्मांत मुळींच पाणी नाहीं, आह्मीं दास्य करावयासच कायते योग्य आमचे पूर्वज मूर्ख, त्यांच्यांत कोणत्याही प्रकारची कर्तृत्वशक्ति नव्हती अशा मूर्ख कल्पना डोक्यांत शिरल्या. अर्थातच त्यामुळें आह्मी आपल्या पूर्वजांना अनोळखी झालों, त्यांच्यासंबंधानें योग्य अभिमान बाळगावयाचा तो न बाळगतां, त्यांच्या यच्चयावत् कृतीबद्दल लज्जा वाटूं लागली व श्रीशिवराजादि आपल्या पूर्वजांबद्दल आपलें काय कर्तव्य आहे तें आह्मी विसरलों किंबहुना त्यांच्यासंबंधानें आपणास कांहीं एक कर्तव्य नाहीं अशी आमची वृत्ति झाली होती. खरोखर तो काळ ह्मणजे हिंदुस्थानच्या मानसिक उन्नतीच्या इतिहासांत मोठा आणीबाणीचा होता. राष्ट्रास मृतवत् करणाऱ्या कल्पनेनें सर्व हवा दडपून गेली होती. परंतु आपल्या ह्या भरतभूमीवर परमेश्वराची कृपा असल्याकारणानें हा नाशकारक भ्रम लवकरच लयास गेला. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरासारखे देशहिताकरितां आत्महितावर लाथ मारणारे खरे देशभक्त उत्पन्न झाले व

आमच्या अज्ञानतिमिरांध नेत्रांत ज्ञानांजन घालून आह्मांस आमच्या पूर्वजांचें खरें दिव्यतेज पहावयास लाविलें. येणेंप्रमाणें आह्मा महाराष्ट्रवासी जनांच्या विचारांत स्थित्यंतरें होऊन, आह्मी सत्यमार्गाचें पुनः अवलंबन करावयास लागलों असतां १८८५ सालीं एक महत्वाची गोष्ट घडली. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे कै० आबासाहेब कागलकर यांच्या अध्यक्षतेंखालीं श्रीशिवाजी महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धारार्थ प्रयत्न करण्याकरितां पुणें मुक्कामीं भरलेली सभा होय. सभेचा उद्देश जीर्ण झालेली महाराजांची समाधी दुरुस्त करून तेथें देवालय बांधावें असा होता. परंतु दुर्दैवानें, आबासाहेब लवकरच परलोकवासी झाल्यामुळें सभेचा उद्देश सफल झाला नाहीं. नाहीं ह्मणावयास एक मात्र फायदा झाला. तो हा कीं, मुंबईसरकारानें २५ रुपयेपर्यंत खर्च करून समाधीसभोवतीं कठडा घातला व समाधी दुरुस्त करण्याकरितां प्रतिवर्षीं ४।५ रुपये खर्च करावा असा ठराव केला. यापुढें १० वर्षें लोकांचें लक्ष या गोष्टीकडे फारसें गेलें नाहीं. पुढें १८९५ सालीं एप्रिल महिन्यांत, मुंबई येथील प्रसिद्ध 'नेटिव ओपिनियन' पत्रकारानें, प्रत्यक्ष जाऊन महाराजांच्या समाधीची दीन स्थिति पाहून आलेल्या एका गृहस्थाचें तत्संबंधीं हृदयद्रावक पत्र छापिलें. त्या पत्राकडे महाराष्ट्रांतील अग्रेसर मानलेल्या 'केसरी'चें लक्ष गेलें, व 'केसरी' कर्त्यानें लगेच आपल्या सन १८९५ एप्रिल २३ च्या अंकांत, लोकांस महाराजांची समाधि दुरुस्त करण्याकरितां जिकडेतिकडे सभा भरवून वर्गणी गोळा करण्यास आग्रहपूर्वक विनंति केली. 'केसरी'नें गर्जना केल्यावर मग काय विचारावयास पाहिजे? लगेच दुसऱ्या दिवसापासून वर्गणी गोळा होऊं लागली. येणेंप्रमाणें लोकमत जागृत झालें आहे हें पाहून आनंदानें त्या लोकमतास एकस्वरूप करणें व त्याचप्रमाणें वर्गणी गोळा करण्यास व्यवस्थित रीतीनें प्रयत्न करणें हें अत्यंत जरूर झालें. ह्मणून केसरीपत्रकर्ते रा० रा० बळवंतरावजी टिळक यांहीं आपल्या साथीदारांच्या मदतीनें मे महिन्याच्या ३० व्या तारखेस हिराबागेंत, मोठमोठे सरदार, जहागीरदार वगैरे श्रीमंत, थोर, सज्जन व वजनदार गृहस्थांनीं मंडित केलेली, अदृष्टपूर्व अशी सभा भरविली.

महाराष्ट्रांतील सर्व चळवळींचें माहेरघर जी पुण्यनगरी तेथें येणेंप्रमाणें प्रचंड सभा भरल्यावर लगेच सर्व महाराष्ट्रभर जिकडे तिकडे सभा करण्यांत आल्या. श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य ह्यांनीं आपली सभेच्या पुढाऱ्यांस प्रेमपूर्वक संमति दर्शविली व लवकरच कार्यसिद्धि होईल ह्मणून आशीर्वाद दिला. पुढें १८९५ च्या दिसेंबर महिन्यांत राष्ट्रीय सभेच्यावेळीं पुण्यांत दुसरी एक प्रचंड सभा भरण्यांत आली. त्या सभेंत राष्ट्रीयसभेकरितां आलेले इतर इलाख्यांतील पुढारी हजर होते. त्यांपैकीं सुरेंद्रनाथ बानर्जी व पंडित मदनमोहन मालवीय ह्यांचीं सुरस व्याख्यानें झालीं व त्यांनीं सभेच्या हेतूबद्दल आपली संमति प्रदर्शित केली, इतकेंच नव्हे तर ना० सुरेंद्रनाथ बानर्जींनीं ही चळवळ सर्व राष्ट्रीय सभाभक्तांस प्रिय आहे असें निश्चयात्मक रीतीनें सांगितलें. येणेप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धारार्थ वर्गणी जमविण्याकरितां खटपट चालली असतां, महाराजांचा जन्मोत्सव जिकडे तिकडे महाराष्ट्रांत करण्यांत यावा असा जनांच्या मनांत विचार उत्पन्न झाला. येणेंप्रमाणें पहिल्या चळवळीबरोबर सार्वजनिक उत्सवाची दुसरी चळवळ सुरू झाली. असें घडून आलें यांत नवल नाहीं. उत्क्रांति नियमाप्रमाणें असेंच घडून यावयाचें. महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धारार्थ भरलेल्या सभा निमित्तभूतमात्र झाल्या; परंतु त्यायोगानें श्रीशिवाजी महाराजांबद्दल महाराष्ट्रजनांच्या अंतःकरणांत असलेल्या भक्तीस भरतें आलें व ती विवक्षित रीतीनें व्यक्त होण्यास मागूं लागली. येणेंप्रमाणें १८९६ सालापासून जिकडे तिकडे महाराष्ट्रांत शिवाजीजन्मोत्सव होऊं लागले आहेत. उत्सव करणाऱ्यांच्या मार्गांत नाना प्रकारच्या अडचणी आड पडल्या नाहींत असें नाहीं. १८९७ सालीं पुण्यनगरींत दोन युरोपियन अंमलदारांचा खून झाला, त्यामुळें सरकारचें माथें फिरून गेलें व आपमतलबी, ब्राह्मणद्वेष्ट्या लोकांचे अहितपरिणामकारी सल्लयास मान दिल्यामुळें त्यांच्या मनांत श्रीशिवाजी महोत्सवाच्या चळवळीचे पुरस्कर्ते राजश्री बळवंतरावजी टिळक यांच्याबद्दल संशयरूपी पिशाच शिरलें. त्यांहीं शिवाजी उत्सवाच्या वेळीं केलेल्या भाषणांत राजद्रोह

ओतप्रोत भरला आहे अशी आपली समजूत करवून घेऊन सरकारनें त्यांच्यावर खटला केला व त्या नरपुंगवास कारागृहवास भोगावयास लाविलें. श्रीयुत बळवंतरावजींस शारीरक्लेश भोगावे लागले हें खरें; परंतु त्यांनीं, अचल धैर्याचें, अप्रतिहत सत्यनिष्ठेचें, अतुल आत्मत्यागाचें व खऱ्या पुढारीपणाचें जें जगापुढें उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे, त्याचा कधींना कधींतरी योग्य परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. कविवर्य भवभूतींनें म्हटल्याप्रमाणें काल हा अनंत आहे व पृथ्वी ही अफाट आहे. असो; सरकारची विनाकारण इतराजी झाल्यामुळें व आपला अग्रणी कारागृहांत हालअपेष्टा भोगीत असल्याकारणानें श्रीशिवाजीमहोत्सवांत पडणाऱ्या लोकांच्या मार्गांत अनेक अडचणी आल्या यांत नवल नाहीं. परंतु 'सत्यमेव जयते' ह्या न्यायानें श्रीशिवाजीमहोत्सवाचें खरें, शुद्ध व निरुपद्रवी स्वरूप लवकरच सरकारच्या ध्यानांत आलें; व हा सरकारच्या वृत्तींत झालेला चांगला फरक, श्रीयुत बळवंतरावजींस लवकरच कारागृहांतून सोडण्यांत आलें यावरून दिसून येतो याप्रमाणें पुन: जिकडे तिकडे शांतता झाली व एकंदरींत श्रीशिवाजी महोत्सव पूर्ववत् निर्धास्तपणें चालूं लागला. आज आपण महाराष्ट्रीय लोक सतत पांच वर्षें श्रीशिवाजीमहोत्सव करून महाराष्ट्रराज्यसंस्थापकाबद्दल पूज्यबुद्धि व्यक्त करीत आहों. ईश्वरकृपेनें हे उत्सव असेच पुढें निर्धास्तपणें चालतील, इतकेंच नव्हे तर कालावधीनें जसजसे इंग्रेज कामगारांचे दुराग्रह नष्ट होत जातील, तसतसे तेही उत्सवाबद्दल सहानुभूति व्यक्त करितील ह्याबद्दल मला तिळभरही संशय वाटत नाहीं.

परंतु दुर्दैवानें आमच्यांतच असे कांहीं लोक आहेत कीं ते—मग कोणत्या कां कारणानें ह्मणाना—ह्या शिवाजी उत्सवाला नाकें मुरडतात व त्यापासून अलिप्त रहातात. असल्या लोकांचे दोन वर्ग करितां येतील. (१) असल्या प्रकारचे उत्सव करण्यांत कांहींएक फायदा दिसत नाहीं इतकेंच नाहीं पण त्यापासून विनाकारण कालक्षेप व द्रव्यक्षय होतो असें ज्यांना वाटतें त्यांचा व (२) उत्सवापासून फायदे होतील असें ज्यांना वाटतें, परंतु सरकारची नाराजी होईल ह्मणून जे त्यापासून

अलिप्त रहातात त्यांचा. पहिल्या वर्गाचे लोक फार कमी आहेत ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट होय. परंतु माझ्या मतें दुसऱ्या वर्गांतील लोकांपेक्षां त्यांची योग्यता जास्त आहे. जगांतील सुधारणेच्या इतिहासांत राष्ट्रीय महोत्सवांनीं कोणकोणतीं महत्कार्यें केलीं आहेत, लोकांच्या मनांत स्वदेशाभिमान उत्पन्न करून त्यांना ऊर्जितावस्था कशी आणून दिली आहे, गायनकला, चित्रकला, नाट्यकला, वक्तृत्वकला वगैरे उच्च मनोवृत्युत्पादक वै अतएव जनहितसंवर्धक कलांना त्यांहीं कसें उत्तेजन दिलें, इतकेंच नव्हे तर परस्पराबरोबर कलह करणाऱ्या भिन्नभिन्न संस्थानांना एकत्र प्राप्त करून देऊन, त्या एकत्वापासून उत्पन्न होणारा राष्ट्रीय जोम कसा वृद्धिंगत केला, त्याचप्रमाणें भक्ति, ज्ञान, धर्मश्रद्धा ह्या गोष्टींस त्यांच्यायोगानें कशी वृद्धि प्राप्त झाली वगैरे गोष्टींच्या त्यांच्या अज्ञानाबद्दल जरी त्यांची कींव केल्यावाचून आपणास रहावत नाहीं तथापि दुसऱ्या वर्गांतील लोकांच्या अंतःकरणांत असलेला ढोंगीपणा व भित्रेपणा हे राष्ट्रीयावनतिकारक दुर्गुण त्यांच्यांत नाहींत ह्मणून त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. असो; जगाच्या इतिहासाचें अवलोकन करितां मनुष्य हा उत्सवप्रिय आहे असें जें कविकुलगुरु कालिदास ह्यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे त्याची सत्यता प्रत्ययास येते. इतकेंच नव्हे तर उत्सवलालसा उत्पन्न होणें ही एक मनुष्याच्या सुधारणेच्या महत्वाची पायरी आहे असें आढळून येतें. जोंपर्यंत समाज अस्तित्वांत आला नाहीं, प्रत्येकजण आपणास वाटेल त्याप्रमाणें वागण्यास तयार आहे, इतर लोकांस शत्रू मानून त्यांपासून जें कांहीं प्राप्त होईल तें हरण करण्यास हरकत वाटत नाहीं, ह्मणजे एकंदरींत जेव्हां मनुष्य रानटी स्थितींत असतो, तेव्हां सार्वजनिक उत्सव होणें अशक्य होय. परंतु जसजसा समाज अस्तित्वांत येतो, व त्या समाजांत सुधारणेच्या, धर्माच्या कल्पना उत्पन्न होतात, व एकत्र जमून, ईश्वराबद्दल पूज्यबुद्धि व्यक्त करणें ह्या गोष्टीपासून काय फायदे आहेत हें कळून येतात तसतसे उत्सव अस्तित्वांत येतात. मनुष्य हा समाजप्रिय आहे व त्याचप्रमाणें प्रथमतः त्याच्या मनांत ज्या कल्पना येतात त्या धर्मसंबंधी असतात असें

जरी आहे, तरी अशी स्थिति उत्पन्न होण्यापूर्वी कित्येक वर्षे रानटी स्थितींत जातात. परंतु येणेंप्रमाणें एकदां समाज बनून गेला व ईश्वराविषयीं कल्पना उत्पन्न होऊं लागल्या ह्मणजे लगेच उत्सव उत्पन्न झाले ह्मणून समजावें. प्रथमतः सर्व उत्सवांच्या मुळांशीं धर्मकल्पना असते व अद्यापिही बहुतेक उत्सवाच्या मुळांशीं तीच कल्पना आपणास आढळून येईल व यांत नवलही नाहीं. ह्या अफाट व चमत्कारिक विश्वाचे कोणी तरी उत्पादक, नियंते व संहारकर्ते हे असलेच पाहिजेत व त्यांना सार्वत्रिक रीतीनें प्रत्येक मनुष्यानें शरण गेलें पाहिजे. ही कल्पना प्रथमतः मनुष्याच्या मनांत उत्पन्न झाल्यावर समाजांतील लोक एका विवक्षित रीतीनें आपला पूज्यभाव व्यक्त करितात. याप्रमाणें आज प्रत्येक समाजांत आपणास उत्सव आढळून येतात. मेक्सिन लोक घ्या किंवा पेरुवियन घ्या किंवा इजिप्सियन घ्या, ग्रीक लोक घ्या किंवा रोमन लोक घ्या, पाहिजे तें राष्ट्र धुंडाळा. त्यांत उत्सव सांपडणार नाहीं असें कदापि होणार नाहीं. मेक्सिकन लोकांमध्यें, टेझ्कॅट्ली, पोवा वगैरे जे त्यांचे मुख्य देव, त्यांच्या सन्मानार्थ उत्सव भरत असतात. पेरुवीयन लोकांमध्यें, ' यूटिप सिटचूआ ' वगैरे चार मुख्य महोत्सव आहेत. ज्युज लोकांमध्यें ' सॅबाथ, पेन्टिकॉस्ट, ' 'पासओव्हर' वगैरे उत्सव आहेत. ख्रिश्चीयन लोकांमध्यें ' ईस्टर, ॲसेन्शनडे, ' 'गुडफ्रायडे, ख्रिसमस,' वगैरे अनेक उत्सव पाळितात. बौद्धधर्मसंस्थापकाचा संस्कार व विधि असल्या बाह्य गोष्टीवर बराच कटाक्ष होता; तथापि बौद्धधर्मानुयायीदेखील उत्सव पाळतात. बुद्धाची जन्मतिथि गृहनिर्याणतिथि व निर्वाणप्राप्ति तिथि अशा तीन तिथींला ते मोठे उत्सव करितात. ह्या आर्यभूची तर गोष्टच बोलायला नको. सर्व उच्च धर्म कल्पनेचें ज्याप्रमाणें हें आद्य स्थान होय, त्याचप्रमाणें उत्सवाचेदेखील तें घर होय. वेदकाळीं ' महासत्रा ' सारिखे महोत्सव होत असत. हे उत्सव साजरे करण्याकरितां ठिकठिकाणीं ऋषिमंडळी एकत्र जमत व सर्व लोकांच्या समक्ष नैतिक व धार्मिक विषयावर वादविवाद करीत. असल्या सत्वशील, मूर्तिमंत जणू काय धर्मच असल्या ऋषींच्या वादविवादापासून लोकांच्या मनावर अत्यंत हितकारक परिणाम घडत, असावा

ह्यांत संदेह नाहीं. 'महाभारत' हें असल्याच एका प्रसंगीं प्रथमतः सांगण्यांत आलें हें आपणांस माहीत असेलच. त्याचप्रमाणें 'याज्ञवल्क्य' व 'गार्गी' ह्यांचा ब्रह्मस्वरूपासंबंधीं झालेला वादविवाद हाही असल्याच एका प्रसंगीं झाला. पूर्वी 'कालप्रिय नाथा'ची जत्रा होत असे. त्या जत्रेस देशांतील धनिक, सत्ताधारी, विद्वान्, धार्मिक वगैरे सर्व प्रकारचे लोक येत असत, व गुणी जनांची चहा होऊन त्यांची योग्य जोपासना होत असे. भवभूतीसारख्या थोर थोर कवींना आपलीं नाटकें ह्या महोत्सवांत रंगभूमीवर यावीं ह्मणून मोठा मान वाटत असे. १४।१५।१६ शतकांत जेव्हां ह्या महाराष्ट्रांत साधूंचा जणूं काय ऊत आला होता, असे हे संतजन मोठमोठ्या जत्रेला जात व तेथें आपल्या धार्मिकत्वाचा व ज्ञानाचा सामान्यजनांस फायदा करून देणें आपलें कर्तव्य मानीत असत.

अशाप्रकारें कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां प्रत्येक राष्ट्रांत उत्सव आहेत व त्या उत्सवापासून धर्मजागृति कायम राखण्यास व लोकांना हरएक प्रकारचें शिक्षण देण्यास अत्यंत मदत झाली आहे. तथापि सार्वजनिक महोत्सवाचें स्वरूप कशा प्रकारचें असावयास पाहिजे व त्याच्यायोगानें किती अपरिमित फायदा करून घेतां येईल हें पहावयाचें असल्यास प्राचीन ग्रीक लोकांच्या इतिहासाचें अवलोकन करावें. ग्रीक लोकांत आपल्या वेदांताप्रमाणें जरी सर्वोत्कृष्ट व सर्वव्यापी, धार्मिक तत्वें उत्पन्न झालीं नाहींत, तरी ते लोक आपल्याप्रमाणेंच प्रारंभापासून फार धर्मशील होते. तेव्हां त्या लोकांत आपल्याप्रमाणें उत्सवांना महत्व यावें ह्यांत नवल नाहीं. अगदीं प्रथमतः लोकांत निरनिराळ्या जाति ( tribes. ) होत्या, प्रत्येक जातीचें आचरण निराळें, देव निराळे व देवार्चन करण्याची पद्धतिही निराळी. त्यांच्यामध्यें एकी मुळींच नव्हती इतकेंच नव्हे, तर ते परस्परामध्यें कलह करीत असत. परंतु कालावधीनें 'ऑपालो' हा देव सर्वांस प्रिय झाला व त्याच्याप्रीत्यर्थ उत्सव स्थापण्यांत आले. ह्या उत्सवांचा असा परिणाम

झाला कीं, परस्परांशीं कलह करण्यांत गुंग झालेल्या ज्या अनेक जाती होत्या, त्यांचें वैमनस्य कमी होऊन प्रथमतः त्या सर्वांचे चार मोठे वर्ग झाले. त्या वर्गांस ( Amphictyonics. ) ह्मणून ह्मणत असत. पुढें कांहीं काळानें हे चार वर्ग एकत्र होऊन The Amphictyonic League ह्मणून एक वर्ग उत्पन्न झाला. ह्या League ला ग्रीक देशांतील प्रत्येक राष्ट्र दोन प्रतिनिधी पाठवित असे व ह्या ( League. ) च्या आश्रयाखालीं 'आपॉलो' चें स्थान जें डेल्फी तेथें महोत्सव भरण्यांत येत असत. उत्सव नियमित वेळीं भरण्यांत यावे ह्मणून कालनिर्णयाकीरतां लगेच सामान्य पंचांग अस्तित्वांत आलें. देवालयें बांधण्याकरितां व तीं सुरक्षित राखण्याकरितां ग्रीक देशांतील सर्व राष्ट्रें खर्च करीत असल्या कारणानें लवकरच 'राष्ट्रीय टांकसाळ व नाणें' ह्या दोन गोष्टी उत्पन्न झाल्या. येणेंप्रमाणें ह्या उत्सवामुळें ग्रीक लोकांच्या राज्यव्यवस्थेला व त्यांच्या परस्परांशीं वर्तनाला नवीन वळण लागलें ह्यांत संदेह नाहीं. पूर्वीं कोणत्याही प्रकारचें सामान्य बंधन नसल्यामुळें परस्परांत जीं घोर वैमनस्यें होत तीं आतां कमी झालीं. परराष्ट्रांत जातांना आत्मसंरक्षणा करितां शस्त्रांचा जो पूर्वीं सतत उपयोग करावा लागत होता तो करावा लागेना व प्रत्येक राष्ट्राबरोबर दळण वळण जास्त सुरक्षित होऊं लागलें, पण ह्या सर्वांपेक्षां अत्यंत महत्वाचा फायदा ह्मटला ह्मणजे प्रत्येक ग्रीक राष्ट्रांत एकप्रकारचा स्वदेशाभिमान खेळूं लागला. आपण सर्व राष्ट्रें एकच आहोंत, ग्रीस देश हा सर्व राष्ट्रांचा सर्वसाधारण देश आहे, व त्यांच्या परशत्रूपासून संरक्षणाकरितां प्रत्येकानें प्रत्येकास मदत केली पाहिजे अशी उच्च कल्पना त्यांच्यांत उत्पन्न झाली. पॅर्शियन लोकांनीं जेव्हां ग्रीक लोकांवर स्वारी केली, तेव्हां सर्व ग्रीक राष्ट्रांचे बाहू एकसमयावच्छेदेंकरून स्फुरण पावूं लागले, व बेहेत्तर आहे प्राण गेला तरी; परंतु प्रशियन लोकांस जर्जर केल्याशिवाय आह्मी रहाणार नाहीं, असा जो बाणेदार निर्धार प्रत्येक लहानथोर ग्रीक मनुष्यानें केला व त्या निर्धाराप्रमाणें 'प्लेटिया' येथें पार्शियन लोकांची हाबेलंडी केली—ह्या सर्व गोष्टींचें कारण ( Olympic ) उत्सवापासून

उत्पन्न झालेला जोम व ऐक्यभाव हें होय. ह्या उत्सवापासून ऐक्यभाव किती वृद्धिंगत होत गेला हें एका गोष्टीवरून फार स्पष्ट दिसतें. 'होमर'च्या कालांत ग्रीक देशाला 'अकेया' ह्मणत असत व 'हेलास' हें नांव फक्त एका लहानशा भागाला दिलें जात असे; परंतु हे उत्सव जेव्हां स्थापण्यांत आले, व त्याच्यायोगानें प्रत्येक राष्ट्रांत ऐक्यभाव उत्पन्न झाला, त्यावेळेस 'हेलास' हें नांव सर्व देशाला पडलें. येणेंप्रमाणें ह्या (Olympic) उत्सवांनीं ग्रीस देशाला (१) एकी दिली, (२) स्वदेशाभिमान दिला, (३) धर्मैक्य दिलें, (४) सामान्य टांकसाळ दिली व (५) सामान्य पंचांग दिलें व एकंदरींत ते ग्रीस देशाला थोर करण्यास कारणीभूत झाले. पुढें कांहीं काळानें ह्या उत्सवांत नानाप्रकारचे खेळ होण्यास सुरवात झाली, व त्यामुळें त्याचें महत्व फारच वाढलें. ग्रीक देशांच्या कोनाकोंपऱ्यांतून लोक येत असत, व आपल्या आगमनानें उत्सव साजरा करीत. प्रसिद्ध मुत्सद्दी, सेनानायक, इतिहासकार, संतमंडळी, कवी, नाटककार, हरएकप्रकारचे शारीरिक खेळांत प्रवीण असलेले जवान–वगैरे सर्व प्रकारचे देशांतील गुणी लोक हजर असत, व धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांचा उहापोह करून लोक शिक्षण देत. 'ऑलिंपिया'च्या मैदानांत मर्दुमकी दाखवून बक्षिसादाखल 'फुलाची पाकळी' मिळविलेल्या गृहस्थास इतका सन्मान दिला जात असे कीं, त्याच्या योग्यतेपेक्षां आपली योग्यता फार कमी आहे असें अथेन्स येथील प्रसिद्ध मुत्सद्यांना व स्पार्टा येथील राजांना वाटत असे. हे विजयी गृहस्थ आपल्या संस्थानांत परत आल्यावर त्यांचे देशबांधव त्याला ४ घोड्यांच्या गाडींत घालून नेत असत, व त्याचा अत्यंत गौरव करीत. ह्या उत्सवांत मोठमोठे चित्रकार येत असत व 'ऑलिंपिया'च्या मैदानावर मर्दुमकीचे खेळ करून दाखविणाऱ्यांचीं तालमींतील सतेज शरीरें पाहून त्यांना आपल्या चित्राकरितां चांगलें चांगलें नमुने मिळत व त्याचयायोगानें चित्रकलेस फार उत्तेजन मिळे. त्याचप्रमाणें प्रसिद्ध इतिहासकार व कवी येत असत व आपले रसभरित इतिहास व काव्यें लोकांना वांचवून दाखवून त्यांच्यांत उत्साह व सहृदयता

उत्पन्न करीत. ' हिरॉडोटस ' नांवाच्या प्रख्यात ग्रीक इतिहासकारानें याच उत्सवांत आपल्या इतिहासाचे कांहीं भाग वाचून दाखविले व आपल्या इतिहासलेखनचतुरतेनें लोकांचीं मनें थक्क केलीं. ' थेमिस्टॉक्लीस ' नांवाचा ॲथेन्समधला मुत्सद्दी जेव्हां एकदां ह्या उत्सवाप्रीत्यर्थ आला, व तेथील जमलेल्या लोकांनीं त्याचें अत्यंत स्वागत केलें तेव्हां ज्याप्रमाणें आपणाकडे ' राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षाच्या जागीं ' आपली योजना झाली ह्मणजे आपण कृतकृत्य झालों असें वाटतें, त्याप्रमाणें ' थेमिस्टॉक्लीसला ' आपण त्या सन्मानानें कृतकृत्य झालों असें वाटलें. ह्या ऑलिंपिक उत्सवाबद्दल एका इतिहासकारानें असे उद्गार काढिले आहेत कीं ' आपला देह, आपली बुद्धि व आपला आत्मा—ह्या सर्वांस पूर्णतावस्थेस आणून तीं ईश्वर सेवेच्या कामीं खर्च केलीं पाहिजेत, ही उदात्त कल्पना ग्रीक लोकांच्या मनांत ह्या उत्सवामुळें पूर्णपणें बिंबली. ' येणेंप्रमाणें ह्या ' ऑलिंपिक ' उत्सवानें ग्रीस देशावर अनेक उपकार करून ठेविले व एकंदरींत त्यांच्या धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय उन्नतीस बऱ्याच अंशानें कारणीभूत झाले. ग्रीक देशांत ' पिथियिन ' ' निमियन् ' वगैरे इतरही उत्सव होत असत व जरी ' ऑलिंपिक ' उत्सवाप्रमाणें त्यांना कधींही महत्व प्राप्त झालें नाहीं तरी त्यांचाही अशाच रीतीचा परिणाम झाला.

ह्या विवेचनावरून आपणास श्रीशिवाजी महाराजांच्या उत्सवासारख्या उत्सवांत कोणकोणते फायदे करून घेतां येईल हें सहज ध्यानांत येईल. असल्या उत्सवापासून मुख्य फायदा ह्मटला ह्मणजे लोकशिक्षण हा होय. आज आपणास अनेक महत्वाचीं कामें करावयाचीं आहेत. धार्मिक उन्नति करावयाची. सांपत्तिक उन्नति करावयाची आहे व त्याचप्रमाणें राजकीयही उन्नति करावयाची. जो देश एकदां सर्व विद्यांचा, सर्व ज्ञानाचा, सर्व कलांचा, सर्व उन्नत कल्पनांचा माहेरघर होता, जेथेंच सुधारणारूपी देदीप्यमान सूर्याचा उगम झाला व ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील अनेक मोठमोठ्या नद्यांचा

उगम हिमालयांत आहे, त्याप्रमाणें इतर राष्ट्रांत दिसून येणाऱ्या नैतिक व धार्मिक कल्पना जेथें उगम पावल्या, त्या ह्या आपल्या आर्यभूची सांप्रतची स्थिति अवलोकन करून कोणालाही अनुकंपा वाटल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु नुसतें वाईट वाटून देण्यांत अर्थ नाहीं. ज्या कारणानें आपली अवनति झाली आहे, तीं कारणें नाहींशीं करण्याचा व ज्या कारणानें आपली पुनः उन्नति होईल तीं कारणें अस्तित्वांत आणण्याचा यत्न केला पाहिजे. " जनाचा प्रवाह चालविला ह्मणजे कार्यभाग आटोपला, जन ठायीं ठायीं तुंबला ह्मणजे तें खोटें " ही रामदासस्वामींची महदुक्ति ध्यानांत ठेऊन आपणास जेणेंकरून 'जनाचा प्रवाह वाहत जाईल' असें केलें पाहिजे. व अशा रीतीनें 'जनाचा प्रवाह' वाहत ठेवण्यास लोकशिक्षणासारखें दुसरें साधन नाहीं. व ह्मणून असल्या उत्सवांत अंगमेहनत करून सुशिक्षित लोकांनीं आपल्या देशबांधवांस आपल्या ज्ञानाचा, आपल्या उच्च विचारांचा फायदा करून दिला पाहिजे. पहा, यःकश्चित नाटकगृह कीं बहुधा ज्याची वस्ती वाईट परिस्थितींत असते, त्यांतील रंगभूमीवर येणारे लोक विद्वत्तेचे किंवा नीतिमत्तेचे पुतळे असतात असें नाहीं, परंतु त्याच नाटकगृहाच्यायोगानें किती मनोरंजन करितां येतें, किती ज्ञानेच्छु जनांना ज्ञान प्राप्त करून घेतां येतें, किती सहृदय लोकांची सहृदयता वृद्धिंगत होते व कितीजणांच्या उच्च मनोवृत्ती जागृत होतात. असा जर फायदा नाटकगृहापासून करून घेतां येतो, तर ज्या ठिकाणीं शिरल्याबरोबर सात्विकवृत्ती उचंबळून रहातात, व ईश्वराच्या थोरपणाविषयीं विचार येऊन मनुष्याचें हीनत्व उमगून येतें, जेथें

संत आनंदाचें स्थळ । संत सुखची केवळ ।
नानासंतोषाचें मूळ । ते हे संत ॥
संत विश्रांतीची विश्रांति । संत तृप्तीची निजतृप्ति ।
नातरी भक्तीची फलश्रुति । ते हे संत ॥
महाराजे चक्रवर्ती । झाले आहेत पुढें होती ।
परंतु कोणी सायुज्यमुक्ती । देणार नाहीं ॥

जें त्रैलोक्यीं नाहीं दान । तेंचि करिती संतसज्जन ।
तया संताचें महिमान । काय ह्मणोनी वर्णावें ॥

येणेंप्रमाणें ज्याचा अधिकार श्रीरामदासानें वर्णिला आहे असे साधुसंत, त्यांची वसति असण्याचा संभव अशा देवालयांत, ईश्वरासमोर जर सुशिक्षित लोक आपल्या अज्ञ बांधवांशीं कोणत्याही प्रकारचा परका भाव न धरितां एकत्र जमले व ईश्वरभजनांत व ज्या थोर विभूतीचा उत्सव करावयाचा त्याचे गुणानुवाद गाण्यांत जर आपला कांहीं वेळ खर्च केला, तर धर्म जागृत राहून भक्ति वृद्धिंगत होऊन व ज्ञानप्राप्ति होऊन सर्वांचा फायदा होणार नाहीं काय? त्याचप्रमाणें पुराण, कीर्तन श्रवणापासून आपल्या धर्मवृत्ती उज्वल राहणार नाहींत काय? इतकेंच नव्हे तर पुराण, हरिकीर्तन वगैरे ज्या जुन्या संस्था त्यांचें पुनुरुज्जीवन होणार नाहीं काय? आज जें काम व्याख्यानानें होतें त्याच्यापेक्षां दसपट काम पूर्वीं कीर्तनानें होत असे. आज जो संस्कार ना. सुरेन्द्रनाथ बानर्जी वगैरे वक्ते आपल्या वक्तृत्वचातुर्यानें लोकांवर करीत आहेत तोच संस्कार किंबहुना त्याच्यापेक्षां ज्यास्त संस्कार पूर्वीं हरिदासांपासून होत असे. व्याख्यानास स्त्रिया जात नाहींत, परंतु हरिकीर्तन ऐकण्यास किंवा पुराण ऐकण्यास जाण्याची त्यांना मुळींच मनाई नाहीं. तेव्हां पुराण कीर्तनाचा जास्त व्यापक परिणाम होईल हें उघड आहे. पूर्वींच्या आपल्या स्त्रियांना लिहितांवाचतां येत नसे ही गोष्ट खरी आहे, परंतु पुराण कीर्तन श्रवणाच्यायोगानें, ज्यांना हल्लीं सुशिक्षित स्त्रिया ह्मणून मानितात, त्या स्त्रियांपेक्षां त्यांचें नैतिक व धार्मिक ज्ञान दसपट जास्त होतें. आजकालच्या सुशिक्षित ह्मणून गणलेल्या स्त्रियांना रामायण महाभारतांतील बोधपर गोष्टी विचारल्या तर त्यांना सांगतां येतील किंवा नाहीं याची शंका आहे. इतकेंच नव्हे तर त्या बऱ्याच सुशिक्षित पुरुषांनादेखील सांगतां येणार नाहींत. परंतु पूर्वीं स्त्रियांना पुराणांतल्या बोधपर कथा पूर्णपणें अवगत होत्या व त्या गोष्टींचा त्यांच्या आचरणावर फार श्रेयस्कर परिणाम होत असे. पुराण कीर्तनादि

आपल्या जुन्या संस्था इतक्या चांगल्या आहेत कीं, त्या आपणास कधींही सोडतां कामा नये. त्याचें महत्व परधर्मानुयायी लोकांसदेखील कळून आले आहे. १८९१ सालीं जेव्हां मुंबई येथें मिशनऱ्यांची 'Decenni Conference' झाली, त्यावेळीं एका रेवरेंड गृहस्थानें ख्रिस्तीधर्म-प्रसारार्थ कीर्तन पुराणादि उपायांची योजना करावी ह्मणून आग्रहपूर्वक सांगितलें. ज्या संस्था पुरातन कालापासून हितकारक झाल्या आहेत, व ज्या कांहीं परधर्मी लोकांसही प्रिय व ग्रहणीय वाटतात त्या आपण टाकाव्या काय? यावर कोणी कदाचित् ह्मणेल कीं, "होय, तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें, परंतु हल्लीं चांगले पुराणीक व कीर्तनकार आहेत कोठें?" ह्यास माझें असें प्रत्युत्तर आहे कीं, "जर आपण पुराण, कीर्तनादि संस्थेस" उत्तेजन देणार नाहीं, तर चांगले कीर्तनकार व हरिदास उत्पन्न होतील काय? जर वक्त्यांना रिकाम्या थियेटरांत किंवा दिवाणखान्यांत व्याख्यान देण्याचा वारंवार प्रसंग येत चालला, तर सुरेंद्र-नाथ बानर्जीसारखे वक्ते होतील काय? जर रिकाम्या बाकांना शिक-विण्याचा प्रसंग येऊं लागला तर शिक्षक होतील काय? तीच स्थिति कीर्तनकार व पुराणीक ह्यांच्याबद्दल आहे. जर त्यांना सुशिक्षित लोकां-कडून उत्तेजन मिळत नाहीं, तर नामांकित कीर्तनकार व पुराणीक उत्पन्न व्हावेत कसे? व चांगले कीर्तनकार व पुराणीक उत्पन्न होत नाहींत, ह्मणून विचारण्यास सुशिक्षित लोकांस काय अधिकार?

येणेंप्रमाणें असल्या उत्सवापासून लोकजागृति होईल इतकेंच नव्हे, तर समाजजागृति करण्याचीं जीं कीर्तन, पुराण वगैरे जुनीं साधनें त्यांचा उद्धार केल्याचें आपणास श्रेय येईल. परंतु असें होण्यापूर्वी सुशिक्षित लोकांनीं आपली जबाबदारी ओळखली पाहिजे व त्यांच्यामध्यें अल्प ज्ञानोत्पादित ज्या कांहीं वेडगळ धार्मिक कल्पना दिसून येतात, त्या त्यांनीं टाकून दिल्या पाहिजेत. अलीकडल्या आमच्या सुशिक्षित लोकांना देवळांत पाय टाकणें ह्मणजे अग्निवर पाय टाकण्यासारखें वाटतें. मूर्तिपूजा करणें ह्मणजे धर्मभोळे-

पणा वाटतो. अशा प्रकारच्या त्यांच्या ज्या भ्रममूल कल्पना आहेत त्यांना त्यांहीं फांटा दिला पाहिजे. विश्वाच्या रचनेकडे पाहिलें असतां त्यांत भिन्नत्व व एकत्व ह्या दोन कल्पना जिकडे तिकडे भरलेल्या दिसतात. आज आपण बरेच लोक एकत्र जमलों आहों, त्यांपैकीं कोण-त्याही दोन चेहऱ्यांचें साम्य नाहीं. असें जरी आहे तरी कोणाला दोन तोंडें आहेत किंवा तीन नाकें आहेत किंवा चार डोळे आहेत असें नाहीं. समुद्र, झरा, पुष्प, बालकाचा सुकुमार चेहरा, प्रातःकाल ह्या सर्व वस्तू भिन्न आहेत. परंतु अफाट समुद्राकडे पाहिलें असतांना आपल्यास सौंदर्याची कल्पना होते, झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्याकडेही पाहिलें असतां, गुलाबासारख्या पुष्पाकडे पाहिलें असतांनाही तीच कल्पना व त्याचप्रमाणें इतर वस्तूची गोष्ट आहे. अग्नि, वीज, प्रकाश ह्या वस्तू भिन्न आहेत, परंतु त्या एकाच शक्तीचीं अनेक रूपें आहेत असें शास्त्रवेत्ते ह्मणतात. ही जी बाह्य विश्वाची स्थिति तशीच स्थिति आपल्या मनाची व आत्म्याची आहे. प्रत्येक जीवात्मा एकाच परमात्म्याचा अंश आहे, परंतु प्रत्येकाची उत्क्रांति भिन्न भिन्न प्रमाणांत झालेली आहे. ह्मणून धर्म अशाप्रकारचा पाहिजे कीं, तो सर्व प्रकारच्या आत्म्यांस समाधान देईल. आपल्या वेदांतधर्माला जें एवढें महत्व आलें आहे, विषयसुखेच्छु पाश्चिमात्य राष्ट्रांतदेखील जो एवढा त्याचा प्रवेश होत आहे, त्याचें तरी कारण हेंच आहे कीं तो सर्वव्यापी असून प्रत्येक स्थितीच्या आत्म्याला त्यापासून आपली उन्नति करून घेतां येईल. आजपर्यंत जगांत Eclectic धर्म स्थापण्याचे पुष्कळ प्रयत्न झाले आहेत, परंतु ते निष्फळ झाले. ह्याचें कारण हेंच होय कीं भिन्न उत्क्रांतिपरिणामामुळें उत्पन्न झालेलें आत्म्याचें भिन्नत्व असल्या धर्मांत मान्य केलेलें नसतें. ह्या गोष्टी अलीकडील कांहीं पाश्चिमात्य विद्वान् गृहस्थांस कळूं लागल्या आहेत; परंतु दुर्दैवानें आह्मां सुशिक्षितांस जितक्या रीतीनें कळावयास पाहिजेत, तितक्या रीतीनें अद्याप कळत नाहींत. ज्याची निर्विकल्प रीतीनें पर-ब्रह्माचें मननोपासना करण्याची योग्यता आहे त्यानें ती बेलाशक करावी, व असल्या प्रकारची योग्यता सुशिक्षित लोकांत आली असेल तर ह्या

देशाचा भाग्योदय जवळ आला आहे असें मी समजेन. तथापि असल्या थोर अधिकाराच्या लोकांची जरी गोष्ट घेतली, तरी तीपासून आमच्या सुशिक्षित लोकांच्या धार्मिक कल्पनांचें समर्थन होणार नाहीं. असले थोर लोक कीं जे मूर्तीच्या साहाय्यावांचून ब्रह्मानंदीं लीन होऊं शकतात, ते कर्मासक्त साधारण लोकांच्या बुद्धीचा भेद करीत नाहींत इतकेंच नव्हे, तर आपली स्वतःची चित्तवृत्ति सतत शुद्ध रहावी ह्मणून गौण मार्गाचाही अवलंब करितात. रामदास हे साधू कमी होते असें नाहीं. तुटपुंजा ज्ञानावर सव्वा हात लांब गप्पा मारणाऱ्या आधुनिक विद्वानांपेक्षां त्यांचा अधिकार फार थोर होता. अशी जरी गोष्ट होती तरी त्यांनीं अनेक देवालयें स्थापिलीं व लोकांस भक्तिपरायण केलें. आपल्या सर्वव्यापी हिंदुधर्मांत ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें निरनिराळे धर्ममार्ग सांगितले आहेत. ज्यांना मूर्तिपूजा करण्याची आपणास आवश्यकता नाहीं असा आपला अधिकार वाटत असेल, त्यानें बेलाशक श्रेष्ठ मार्गाचें अवलंबन करावें. परंतु ज्यांची तितकी योग्यता नाहीं, अशांनीं जर गौणमार्गाचा अवलंब केला, तर त्यांना ' धर्मभोळे ' वगैरे अनेक निंदाव्यंजक नांवें ठेऊन त्यांच्या बुद्धीचा भेद करण्याचा यत्न करणें यासारखी विघातक दुसरी गोष्ट कोणती नाहीं. ' श्रेयान् स्वधर्मो विगुणः पराधर्मात्स्वनुष्ठितात् ' ' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावाह : ' ' न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् " हीं श्रीमद्भगवद्गीतेंतील बोधवचनें आपल्या ज्ञानाचा टेंभा मिरविणाऱ्या प्रत्येक सुशिक्षित मनुष्यानें ध्यानांत ठेवावीं. व अशा प्रकारच्या आपल्या पूर्वजांनीं आपणास पुष्कळ विचार करून दिलेल्या तत्वाप्रमाणें लोक वागले, तर असल्या उत्सवापासून आपलें अपरिमित हित होणार आहे.

पूर्वीं सरकारभयामुळें ह्या श्रीशिवाजी महोत्सवापासून अलिप्त रहाणाऱ्या लोकांचा मी उल्लेख केला आहे. त्यांना माझें इतकेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं ' सरकार ' व ' सरकारी कामगार ' हा भेद विसरतां कामा नये. इंग्रेजी राज्यपद्धतींत भयंकर दोष ह्मटला ह्मणजे खालच्या

अधिकाऱ्यांना स्वैरवर्तन करण्यास साहजिक रीतीनें मिळणारी मुभा होय. सरकारचा आपल्या युरोपियन कामगारांवर अत्यंत विश्वास; ते कामगार नीतिमत्तेचे, शहाणपणाचे व कर्तव्यतेचे जणूं काय पुतळेच आहेत असा सरकारचा समज; जर त्यांच्या हातून गर्हणीय वर्तन झालें तर 'prestige'च्या नांवाखालीं त्यांच्या कृत्यावर पांघरूण घालण्याची उत्कट हाव; ह्या सर्व कारणामुळें ते स्वतःला देव मानून स्वेच्छाचारी वर्तन करितात व सरकारांनीं वेळोवेळीं प्रतिपादित उच्च तत्वें गुंडाळून ठेऊन प्रजेस त्रास देतात. असल्या प्रकारच्या कामगारांनीं राईचा हत्ती करून श्रीशिवाजी महोत्सवांत पडणाऱ्यांना कधीं कधीं त्रास देण्याचा यत्न करावा ह्यांत नवल नाहीं; परंतु आमच्या लोकांनीं इतकें ध्यानांत धरावयास पाहिजे कीं, ज्यांना आह्मीं सरकार ह्मणतों त्यांनीं आह्मांस असला उत्सव करूं नका ह्मणून कधींही सांगितलें नाहीं. उलट, ज्या ज्या सार्वजनिक चळवळीच्यायोगानें तुमच्या देशाचें हित होईल व तुह्मांस पुन्हां उन्नतावस्था प्राप्त होईल, त्या त्या चळवळीबद्दल आमची सहानुभूति आहे असें वेळोवेळीं सांगितलें आहे. १८९६ सालीं रायगडास उत्सव करण्याच्या कामीं कुलाबा जिल्ह्याच्या कलेक्टरानें जेव्हां हरकत करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां आपले माजी गव्हरनर लॉर्ड सँन्डर्स्ट यांनीं खुषीनें त्या अडचणी दूर केल्या हें आपण विसरतां कामा नये. आपणांस जें शिक्षण आज सरकार देत आहे, त्या शिक्षणाच्यायोगानें असले उत्सव करण्याची इच्छा होणें साहजिक आहे, व असल्या उत्सवापासून इंग्रेजी राज्याला तिळभरही अपाय नाहीं हें सरकार पूर्णपणें जाणून आहे. असें असतांना आपण खालच्या अधिकाऱ्यांच्या डुरकावणीला कां भ्यावें? जर त्रास सोसण्यास आपण तयार होणार नाहीं, तर आपणास ऊर्जितावस्था कशी येणार? तर माझें ह्या भित्रेभागूबाईस असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपली भीति टाकून द्यावी व सरकारच्या चांगुलपणावर भरंवसा ठेवून शुद्ध अंतःकरणानें ह्या उत्सवांत पडावें.

आतां ज्या नररत्नाच्या जन्मोत्सवार्थ आपण येथें जमलों आहों त्या श्रीशिवाजी महाराजांच्या गुणांचें अल्प वर्णन करून मी आपली रजा

घेतों. महाराजांच्या गुणांचें वर्णन करणें फार कठीण आहे. त्याच्यांत एक ना दोन, अनेक गुण होते. त्यांच्यांत पितृभक्ति होती, त्यांच्यांत मातृभक्ति होती, त्यांच्यांत बंधुप्रेम होतें, त्याच्यांत गुणग्राहकत्व होतें, मुत्सद्दीपणा होता, शौर्य होतें, देशाभिमान होता, धर्माभिमान होता, आत्मत्याग होता, भूतदया होती, नीतिमत्ता होती. असे सहस्त्रावधि गुण त्यांच्यांत होते, व ह्या सर्व गुणांपैकीं कोणता गुण विशेष होता हेंही सांगणें कठीण आहे. तथापि त्यांतल्यात्यांत त्यांचा धर्माभिमान व देशाभिमान व आत्मत्याग विशेष होता. लहानपणापासून त्यांच्या शरीरांत खऱ्या देशभक्ताचें रक्त खेळत होतें. महाराष्ट्रदेश हा आपला आहे, मुसलमान राज्यकर्त्यांचा त्याच्यावर मुळींच हक्क नाहीं. ते प्रजेवर अत्यंत जुलूम व गोब्राह्मणाचा छळ करितात. तेव्हां त्यांच्या जबड्यांतून महाराष्ट्रदेश बाहेर काढिला पाहिजे व तो बाहेर काढण्याकरितां कितीही शारीरिक त्रास सोसावा लागला, कितीही हाल काढावे लागले व कितीही आत्मत्याग करावा लागला तरी हरकत नाहीं, अशी ह्या नरवीराची लहानपणापासून दृढ समजूत झाली होती, परंतु समजूत होऊन उपयोग नाहीं. समजूत अमलांत आणण्याकरितां साधनें लागतात व तशीं साधनें जमविण्याच्या कामीं त्यांना त्यांच्या मुत्सद्दीपणानें, त्यांच्या शौर्यानें व त्यांच्या गुणग्राहकत्वानें मदत केली. पुढचें धोरण, पुढें काय होईल हें अगोदर जाणण्याची शक्ति हें मुत्सद्दीपणाचें बीज होय व ती शक्ति महाराजांत पूर्णपणें होती. तसेंच त्यांच्यांत अप्रतिम गुणग्राहकत्व असल्याकारणानें कोणत्या कामीं कोणाची योजना करावी, कोणावर किती विश्वास ठेवावा हें त्यांस पक्कें कळत असे. एवढेच गुण त्यांच्यांत असते तर शिवाजी महाराज दुसरे नेपोलियन झाले असते. आजपर्यंत अलेक्झांडर, नेपोलियनसारखे महत्वकांक्षी, आत्महितलोलुप राजे पृथ्वीतलावर थोडेथोडके झाले असें नाहीं. परंतु त्यांच्यापेक्षां ह्यांची योग्यता अधिक होण्यास ह्यांचा सात्विक स्वदेशाभिमान व आत्मत्याग होय. महाराजांस महत्वाकांक्षा नव्हती असें नाहीं; आर्थतच महत्वाकांक्षा नसती तर त्यांच्या इतर गुणांपैकीं बरेच गुण जाग-

च्याजागीं जिरून जाते व कदाचित् ते दुसरे रामदास बनते. परंतु त्यांची महत्वाकांक्षा सात्विक होती ह्मणजे तिचें बीज स्वदेशहितांत होतें व तिचें साधन आत्मत्यागांत होतें. James Douglas सारखे अर्धवट ज्ञानाच्या साहाय्यानें पुस्तकें लिहून लोकांस ज्ञानी करण्याची हाव धरणारे परकीय लोक कांहीं ह्मणोत, महाराजांची महत्वाकांक्षा आत्महित साधण्याबद्दल नव्हती तर स्वदेशहित साधण्याबद्दल होती. स्वतःचेंच स्तोम माजवायाचें हाच जर त्यांचा उद्देश असता तर त्यास इतका आत्मत्याग करावा लागताना. पहा महाराजास पहिल्यापासून कांहीं कमी होतें असें नाहीं. थोर कुळीं जन्म, वडिलांचें वैभव व दरारा जबर; अशा स्थितींत अलीकडे ज्याप्रमाणें आमच्यांतील कांहीं लोक, आपणास रावसाहेब, रावबहादूर वगैरे पदवी मिळून राजदरबारीं आपला मान वाढावा ह्मणून, किंवा आपल्या विद्याशून्य मुलास नोकरी मिळावी ह्मणून आपलीं तत्वें, आपला अभिमान व आपलीं कर्तव्यें एकीकडे गुंडाळून ठेवितात व ‘ खाविंद चरणीं मिलिंदायमान होतात ’ त्याप्रमाणें जर महाराजांनीं वागण्याचें मनांत आणलें असतें, तर विजापूर दरबारीं त्यांच्या वडिलापेक्षांही त्यांचें वैभव जास्त वाढतें, किंवा शत्रुसेनानायक जयसिंगराव ह्याच्याबरोबर युद्ध करण्याचा जेंव्हां त्यांना प्रसंग आला तेंव्हां त्याची पदवी त्यांना प्राप्त झाली असती. परंतु नाहीं; स्वदेशहित तेंच आपलें हित असें त्यांना वाटत होतें व त्याप्रमाणें त्यांचें आचरण होतें. इतक्यानेंच महाराजांचें गुणांची परिसमाप्ति झाली नाहीं. त्यांच्या सर्व इतर गुणांस मुकुटाप्रमाणें शोभणारी त्यांची नीतिमत्ता व धार्मिकता हींही अवर्णनीय होतीं. त्यांच्यासारख्या नीतिमत्तेचें उदाहरण इतर राज्यसंस्थापकांत सांपडेल कीं नाहीं ह्याची मला फार शंका आहे. लहानपणीं त्यांचें धर्माध्ययन चांगलें झालें होतें. रामायण व महाभारत ह्यांतील नीतिपर गोष्टी ऐकण्याचा त्यांना फार नाद असे. परंतु रामायण, महाभारत थोडे लोक ऐकतात असें नाहीं. परंतु त्यांच्या श्रवणानें षड्रिपूंचा नाश होऊन सत्संगलालसा व निर्मळ भक्ति ही थोड्यांच्याच अंगीं उत्पन्न होते. श्रीरामदासांची भेट

व्हावी ह्मणून जासूदामार्फत पुष्कळ निरोप पाठविले, स्वत: स्वामीच्या वसतिस्थानीं आगमन केलें, असें असूनही स्वामी कृपाळू होऊन भेट देत नाहींत हें पाहून "स्वामीच्या भेटीशिवाय मी अन्नग्रहण करणार नाहीं" असा महाराजानीं केलेला निर्धार व त्या निर्धाराचें केलेलें पालन हें पाहून कोणाच्या सात्विकवृत्ति उचंबळणार नाहींत व महाराजांच्या सत्संगलालसेबद्दल व धार्मिकतेबद्दल कोणाच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होणार नाहीं? तसेंच दरबार भरला असतांना व स्वामीचें आगमन होतांना सर्व दरबारांतील लोकांसमक्ष स्वामीस भिक्षा ह्मणून नानाप्रकारच्या काळज्या वाहून, नानाप्रकारचीं संकटें सोसून व शारीरीक क्लेश सोसून महत्प्रयासानें मिळविलेल्या राज्याचें दान करण्यास महाराज तयार झाले ही गोष्ट वाचून आपण स्वर्गांत आहोंत किंवा ह्या मर्त्यलोकीं आहोंत असा कोणांच्या मनांत क्षणभर संशय उत्पन्न होणार नाहीं व महाराजांच्या अप्रातिम निरपेक्ष देशसेवेनें मन थक्क होणार नाहीं? जे इतिहासकार महाराजांस स्वार्थलोलुप, महत्वाकांक्षी लुटारू सरदार ह्मणण्याचें धाष्टर्य करितात, त्याहीं ह्या स्वर्गवासी देवदेवतांना भूषण आणणाऱ्या ह्या गोष्टीचें मनन करावें अशी त्यांना माझी शिफारस आहे. महाराजांनीं अफाट राज्य मिळविलें, असें असूनही त्यांची ऐहिक सुखाबद्दल अनासक्ति किती होती व राज्य मिळविलें तें ते 'नियतं कुरु कर्म' ह्या गीतातत्वाप्रमाणें आपलें देशहितार्थ कर्तव्य ह्मणून मिळविलें अशी त्यांची कशी समजूत होती हें या वरील गोष्टीवरून चांगलें समजतें. महाराजांची इतिहासकार, ब्रूस्, वॉलेस, अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन, मॅझिनी, वगैरे इतर देशभक्तांशीं व राज्यसंस्थापकांशीं तुलना करितात; परंतु महाराजांच्या चरित्राचें चांगलें परीक्षण केलें असतां महाराजांची त्यांच्यापेक्षां किती जास्त योग्यता होती हें सहज समजण्यांत येणार आहे. असा अष्टपैलू नरपुंगव, ह्या आर्यावर्तांत अवतरला व त्यानें आह्मांमध्यें नवीन तेज उत्पन्न करून आह्मांस चांगले दिवस दाखविले व आपल्या देशाचा कीर्तिरूपि परिमल सर्व विश्वभर पसरविला ह्मणून आह्मांस त्याचा अभिमान वाटावा, त्याची उत्साहजनक मूर्ति आमच्या हृत्पटलावर कोर-

लेली असावी व त्यांचा जन्मोत्सव आनंदानें करण्यास उद्युक्त व्हावें ह्यांत नवल तें कोणतें?

मद्देशबांधवहो, आपल्या देशाची सांप्रतची स्थिति पाहून वाईट वाटणें साहजिक आहे. आह्मीं आपल्या वैभवास मुकलों, आमच्या कला बुडाल्या, आह्मास विशेष प्रकारचें कर्तृत्व दाखविण्यास जागा उरली नाहीं, दरदिवशीं आमचें दारिद्य वृद्धिंगत होऊं लागलें, आह्मांमध्यें त्राण उरलें नाहीं, आमचें क्षात्रतेज नाहींसें झालें वगैरे गोष्टी पाहून आपलें जीवित व्यर्थ आहे असें वाटल्यावांचून रहावत नाहीं. तथापि आपण इतकी गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे कीं, आपल्या नशीबाचीं सूत्रें सर्व-साक्षी व सर्वसत्ताधारी परमेश्वराच्या हातांत आहेत. मनुष्यमात्राची दृष्टि आकुंचित असते ह्मणून असल्या गोष्टीबद्दल त्याच्या मनांत खंति उत्पन्न होते ह्यांत नवल नाहीं. परंतु सर्वसत्ताधीश जो परमेश्वर ज्याच्यापुढें यच्चयावत् सर्व गोष्टी टाईमटेबलाप्रमाणें आहेत, त्याचा असलीं स्थित्यंतरें करण्यांत विशेष हेतु असला पाहिजे ह्यांत संदेह नाहीं. तो हेतु काय असावा हें जरी आपणा सारिख्या क्षुद्र मनुष्यानां जाणणें अशक्य आहे तरी माझ्या समजुतीनें तो आपल्या भरतभूमि सर्व पृथ्वी-मंडळावर वृद्धिंगत करणें हा होय असें वाटतें. आपली राजकीय संपत्ति नष्ट झाली ही गोष्ट खरी. परंतु धार्मिक जी संपत्ति आहे ती नष्ट न होता दिवसेदिवस वृद्धिंगतच होत चालली. आपला व पाश्चिमात्य राष्ट्रांचा जो निकटसंबंध जडला आहे, तो जर जडला नसता तर वेदांताचा प्रसार आज जो पाश्चिमात्य देशांत होत आहे तो झाला असता काय? ॲनी बिसेन्ट, स्वामी अभयानंद ह्यांसारख्या विभूती भरतखंडाची कीर्ति दिगंतरीं नेण्यास उत्पन्न झाल्या असत्या काय? रोमनें जेव्हां ग्रीस देश काबीज केला, तेव्हां ग्रीसचें जरी स्वातंत्र्य नष्ट झालें, तरी त्या देशाचा रोमन लोकांवर इतका परिणाम झाला कीं, रोमन लोक ग्रीकमय झाले. तशीच स्थिति येथें होणार आहे हें ध्यानांत धरा. आपलें आधिभौतिक साम्राज्य गेलें; परंतु अध्यात्मिक साम्राज्य आपलें कायमचें राहणार व त्या अध्यात्मिक साम्राज्याच्या आश्रयाखालीं सर्व पाश्चिमात्य

राष्ट्रें येऊन त्यांना उच्च धर्मतत्वांचा लाभ मिळावा असा ईश्वरी संकेत आहे, अशी माझी पूर्ण खात्री आहे. मात्र आपण आपल्या कर्तव्याला जागृत असलें पाहिजे, 'निरपेक्ष रीतीनें नेमिलेलें कर्म कर' हा जो गीता-मंत्र त्याचें नित्यशः पठण करून वागलें पाहिजे, ह्मणजे कालावधीनें आपणास ईश्वर पुनः चांगले दिवस दाखवील व भरतभूमीची उज्वल कीर्ति पुनः सर्व जगतीतलावर पसरेल ह्यांत संदेह नाहीं. तर मद्देशबांधवहो, शिवरायाप्रारख्या पूर्वजांचें चरित्र आपल्या डोळ्यापुढें, व त्यांचा स्वदेशाभिमान, त्यांची सत्यनिष्ठा, त्यांची नीति व त्यांची धार्मिकता ही तुमच्या अंतःकरणांत वसूंद्या, व जेणेंकरून आपली उन्नतावस्था होत जाईल असें आचरण करा हीच माझी आपणांस विनंति आहे, व जर ह्या उत्सवापासून असल्या प्रकारचे परिणाम होऊं लागले तर उत्सवाच्या पुरस्कर्त्यांना कृतकृत्य वाटेल यांत शंका नाहीं.

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापलेलें प्रकरण.

१९०२ सालांतील,

कोल्हापूर येथील श्रीशिवजयंतीच्या उत्सवांतील भाषण.

## “श्रीशिवाजी महाराजांनीं जगाचे विशेषतः

# हिंदुस्थानचे इतिहासांत केलेली कामगिरी.”

त्रिविक्रम काशीनाथ पित्रे, बी. ए. एल्‌एल्. बी.

यांनीं

केलें.

तें

कोल्हापूर ‘श्रीसमर्थप्रसाद’ छापखान्यांत छापविलें.

जून १९०२.

किंमत ८२८६.

श्री.

# श्रीशिवाजी महाराजांनीं जगाचे विशेषतः हिंदुस्थानचे इतिहासांत केलेली कामगिरी.*

देशबांधवहो, ज्या नर श्रेष्ठ वीररत्नाचें चरित्र कथन व श्रवण या दोन्ही साधनांनीं पुण्य जोडण्यासाठीं आपण सर्व महाराष्ट्रीय आज या स्थानीं जमा झालों आहों, त्या पुण्यश्लोकाचें शील व वर्तन किती अद्भुत व सर्वांगसुंदर होतें, व त्याचें अनुकरण करून आजकालच्या आपणा महाराष्ट्रीयांनीं आपलें अवनत व अधोगतीस गेलेलें शील पुनः उन्नत व उदात्त करणें आजच्या आपल्या शोचनीय व परतंत्र स्थितीचा विचार करितां व भावी अनर्थपरंपरा काय ओढवेल याचा अदमास करितां किती आवश्यक आहे, व श्रीशिवजयंतीसारख्या देशाभिमान-दर्शक उत्सवांचा त्या कामीं किती उपयोग आहे, याचें थोडक्यांत आतांच जे व्याख्यानकार बोलून गेले त्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. सभ्य-जनहो, असल्या पवित्र व वंद्य शीलाचे पुरुष ज्या राष्ट्रांत उत्पन्न होतात, त्या राष्ट्रांतील लोकांनीं केवळ त्यांच्या त्या एका शीलाकडे दृष्टि देऊन त्यांचा उत्सव करणें हें रास्त होईल; पण श्रीशिवाजीमहाराजांची उत्सवयोग्यता केवळ या एका दृष्टीनेंच नाहीं; तर एका अवाढव्य राष्ट्राचे साक्षात् जनक व हितकर्ते या दृष्टीनेंही ती दुणावली आहे. व्यक्ति-दृष्ट्याच ते महाराष्ट्रीयांच्या, हिंदुस्थानीयांच्या व तदितर परकीयांच्या गौरवास पात्र आहेत असें नाहीं; तर राष्ट्रीय दृष्ट्या, सार्वजनिक दृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्याही ते त्यांच्या गौरवास पात्र आहेत.

---

* गेल्या शिवजयन्त्युत्सवाच्यासंबंधानें झालेल्या व्याख्यानापैकीं एक, रविवार तारीख ११ मे १९०२. अध्यक्षस्थानीं रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे होते.

मित्रहो, थोड्या वर्षांपूर्वी बहुशः सार्वत्रिक व अद्यापहि पुष्कळ ठिकाणीं, शिवाजी महाराजांचें राष्ट्रीय योग्यतेसंबंधानें अज्ञान-गैरसमज फैलावला होता व अद्यापही समाजांत वागत आहे. पुष्कळ वेळां व पुष्कळ प्रसंगीं श्रीशिवाजीमहाराजांसंबंधानें व त्यांनीं स्थापिलेल्या मराठी साम्राज्य-सत्तेसंबंधानें बोलणें निघून त्याविषयींची प्रशंसा चालली असतां, व सर्व हिंदुस्थानांत त्यांचें अहोरात्र लोकांकडून स्मरण घडलें जाऊन सर्वत्र राष्ट्रीय उत्सव होत जावे असें मत प्रदर्शित केलें असतां "श्रीशिवाजी महाराज फार बुद्धिवान् होते, असामान्य पुरुष होते, वर्तनानें फार शुद्ध होते, मराठ्यांच्या राजसत्तेला त्यांचा उपयोग झाला वगैरे सर्व गोष्टी खऱ्या; व त्यासंबंधानें त्यांचे वेळीं त्यांचा गौरव झाला असेल तेंही खरें; पण आज मितीला ते जाऊन, दोनशें सव्वादोनशें वर्षे होऊन गेलीं, अशा वेळीं त्यांच्याविषयींच्या अभिमानानें उचल खावी व त्यांचे उत्सव अखिल भरतभूमींत सुरू व्हावेत, अशाविषयीं उपक्रम सुरू व्हावा, याचें इंगित काय? विसाव्या शतकांमध्येंही त्या शूरवीराचें स्तोम माजविण्याइतकी त्याची चिरकालीन राष्ट्रीय योग्यता आहे कीं काय? जगाच्या चिरस्थायी इतिहासांत त्यानें अशी कांहीं कामगिरी केली आहे कीं काय? कीं त्यायोगें त्या नररत्नाचें नांव जगाच्या इतिहासांत चिरकाल गाजत रहावें व त्याचें स्मरण कालगत्यनुसार अधिकाधिक होत जावें" इत्यादि आक्षेप निघतात. महाराजांच्या अपार राष्ट्रीय योग्यतेसंबंधाच्या या आक्षेपांचें हें सौम्य स्वरूप झालें. हा आक्षेप किंवा अशाच मासल्याचा आक्षेप निरनिराळ्या स्वरूपांनीं किंवा शब्दांनीं येतो. "महाराजांनीं स्थापिलेल्या राज्यसत्तेला राष्ट्रसत्ता असें ह्मणतां येत नाहीं;" किंवा "त्यांनीं उपस्थित केलेल्या धामधुमीला स्वराज्य किंवा महाराष्ट्रीय साम्राज्य स्थापण्याचे व्यवस्थित प्रयत्न असें ह्मणतां यावयाचें नाहीं" किंवा "मराठी राज्य किंवा साम्राज्य स्थापन करण्याच्या खटपटींत कांहीं परंपरागत असा राष्ट्रीय जोम दिसत नाहीं किंवा त्यांत व्यवस्थित असें राष्ट्रीय धोरण दिसत नाहीं" इत्यादि निरनिराळ्या प्रकारांनीं व सौम्य किंवा

कडक स्वरूपांनीं, वर निर्दिष्ट केलेला आक्षेप श्रीशिवजयंतीसंबंधानें राष्ट्रीय चळवळ असावी व सर्व हिंदुस्थानभर व विशेषतः या महाराष्ट्र देशांत सर्वत्र हा उत्सव व्हावा अशी इच्छा प्रदर्शित करणाऱ्यापुढें व तत्सद्धयर्थ खटपट करणाऱ्यांपुढें काढण्यांत येतो. हे असले आक्षेप नेहमीं दुराग्रही, अभिमानशून्य, अज्ञानी किंवा परसेवामग्न अशाच लोकांकडून येतात, असें नाहीं; तर सरळ, समंजस व सुजाण माणसांकडूनही येतात. यास्तव या आक्षेपांचें कमी अधिक शब्दांनीं निरसन करून, "श्रीशिवमहाराजांची ऐतिहासिक कामगिरी फार अमोल व असामान्य आहे, फार फार नांवाजलेले थोर थोर ऐतिहासिक पुरुषही त्यांच्या योग्यतेला पोंचले नाहींत; त्यांची चळवळ ही एक फार मोठ्या बलाढ्य राष्ट्राचा उदय होण्याचा पाया होता; व त्यांनीं स्थापन केलेल्या राजसत्तेंत राष्ट्रीयत्व व राजकीय धोरण होतें व तेंच धोरण कमी अधिक अंशानें कायम राखिल्यामुळें अखिल भरतभूमीवर मराठी साम्राज्य पसरून तें चिरस्थायी होण्याचा रंग आला होता व तें अमोल ऐक्यात्मक धोरण सुटलें नसतें तर आज मितीला आपण स्वराज्य अनुभवीत असून, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या महानंदांत निमग्न असतों व श्रीशिवमहाराजांच्या जयघोषानें अखिल भरतभूमीतील एकून एक घर व झोपडें अशा प्रसंगीं दणाणून गेलें असतें." वगैरे गोष्टी ऐतिहासिक प्रमाणांनीं व युक्तिप्रयुक्तीनें मनांत बिंबविणें हें प्रत्येक राष्ट्राभिमान्याचें व उत्सवप्रिय मनुष्याचें पहिलें कर्तव्य आहे. त्या योगानें त्या नरश्रेष्ठाची खरी योग्यता सर्वांना नीटपणें समजली जाऊन, राष्ट्रीय धर्म व उत्सव जागविण्याची स्वाभाविकपणें स्फूर्ति होईल व राष्ट्रीय काम घडेल. याच उद्देशानें सदरील विषयाचें थोडक्यांत निरूपण करण्याचें मी योजिलें आहे.

श्रीशिवमहाराजांच्या अमोल कामगिरीसंबंधानें परकीय लोकांत व आह्मांतही असा गैरसमज कां असावा, व त्यांची खरी योग्यता कां न समजली जावी, याविषयींचा थोडासा ऊहापोह करणें प्रस्तुत

स्थलीं अप्रासंगिक होणार नाहीं. त्याचें थोडक्यांत मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे " आमच्या खऱ्या इतिहासाचें अज्ञान, तो समजण्याच्या साधनसामग्रीचा अभाव; व खोट्या किंवा भ्रममूलक लिहिलेल्या इतिहासाच्या ज्ञानाचा फैलाव " हेंच होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आमच्या खऱ्या इतिहासाचीं कमीअधिक विश्वसनीय व उपयोगी साधनें जीं बखरी, सनदा, तवारिका वगैरे व अस्सल साधनें जीं पत्रें, यादी वगैरे तीं पगडीवाल्यांचा अम्मल जाऊन टोपीवाल्यांची सरशी झाल्यानंतर, किल्लचाकुलुपांत, सरकारी गुप्त दप्तरांत व अंधारकोठडींत जाऊन पडलीं. कोणा एतद्देशीयांस त्यांच्या अनुरोधानें आपल्या पूर्वजांविषयीं लिहिण्याची इच्छा झाल्यास तीं हातीं पडण्याची मारामार. कदाचित् मिळाल्यास, ऐतिहासिक दृष्ट्या निरुपयोगीं अशीं बहुधा मिळावयाचीं. शिवाय, परकीय विशेष व्यवस्थित सत्तेचा अम्मल झाल्यावर, तिच्या प्रभावानें व शिताफीनें दिपून व भुरळून जाऊन परकीयांचें स्तोम माजविण्याची व स्वतःची अवहेलना करण्याची इच्छा उत्पन्न होण्याचा किंवा बळावत जाण्याचा काळ आला; अशा संधीस, आमच्या स्वतःच्याच इतिहासाचें ज्ञान करून घेण्याचीं साधनें ह्मणजे जयशाली परकीय लोकांचे आमच्याविषयींचे विस्तीर्ण लेख व त्यांच्याच जातभाईंनीं अगदीं संपुष्टांत आणलेलीं लहान चोपडीं! अशा कोंडमाऱ्यांत आह्मांला स्वतःचें ज्ञान व्हावें कसें व आमच्या पूर्वजांची खरी योग्यता समजावी कशी! बरें, हे ओंजळीनें पाणी पाजणारे तरी किती थोर मनाचे व पुऱ्या माहितीचे तें बोलावयासच नको! बोलून चालून परकी व त्यांतही जयशाली राष्ट्रांतले! मराठे मराठे ते काय, आह्मीं सहज जिंकिले, अशी फुशारकी मारण्याची त्यांना इच्छा व्हावी, व आह्मीं पराजित, तेव्हां आमच्यांत काय सामर्थ्य, शहाणपण किंवा राम असावयाचा; कांहीं एक नाहीं, अशी त्यांची प्रथम कल्पना होणें हें साहजिकच. अशी कल्पना झाल्यावर आमच्याविषयीं कांहीं लिहावयाचें झाल्यास तें नीटपणें शोध करून व चांगली माहिती मिळवून लिहावें व त्या लिहिण्यांत निष्पक्षपातीपणा दाखवावा

अशी इच्छा त्यांना कां बरें व्हावी? पराजितांविषयीं प्रेम, कळकळ, आस्था, सहानुभूति, आदर, वगैरे त्या राष्ट्रांतील लोकांना सहसा वाटत नाहींत, मनसोक्त वाटेल त्या कल्पना कराव्या, वाटेल ते हेतू स्थापन करावे, वाटेल ते दोषारोप ठोकून द्यावे व पराजितांविषयीं वाटेल ती खरी खोटी माहिती पसरावी, त्यांत कांहीं विशेष जबाबदारी नाहीं, असें वाटून लेख लिहिण्याकडेच त्यांची प्रवृत्ति फार दिसून येते. मेकॉलेसारख्या तीव्रबुद्धीच्या, बहुश्रुत, रसिक व मर्मज्ञ ह्मणून मानला जाणाऱ्याची ही दशा, मग इतरांची काय कथा! मॉलकम साहेबांसारख्या दयाळू व थोर मनाच्या माणसालाही प्रथमतः आह्मीं अगदीं हलके असें वाटूं लागलें होतें व कोलब्रूकसारख्या संस्कृत पंडिताचेंही मन आरंभीं दुराग्रहानें झपाटलें होतें असें " ऐन अकबरी हा ग्रंथ उकिरडा आहे, " विल्किन्सनामक संस्कृतज्ञाला " संस्कृताचें वेड डोक्यांत शिरलेला " वगैरे जे अप्रगल्भ उद्गार त्यानें काढले आहेत त्यावरून दिसून येतें. मेकॉले साहेब, हेस्टिंग्जवरील लेखांत लिहितात कीं, " सर्व हिंदुलोक येथून तेथून नंदकुमारासारखे लबाड, ठक व महामूर्ख आहेत, " हिंदुस्थान देशाच्या संपत्तीविषयीं लिहितांना ते ह्मणतात कीं, " हिंदुस्थान हें पोर्तुगाल देशाहून किंवा फार काय ऐर्लंडाहूनही अधिक भिकारी " येथील धर्माविषयीं विवेचन करितांना " हिंदुस्थानांतील धर्मासारखा नीचतेस पोहोंचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंही नाहीं. त्याचा समूळ उच्छेद करून, ख्रिस्तीधर्माचें अत्यंत हीन स्वरूप जरी त्या ठिकाणीं आणलें, तरीही त्या देशांतील लोकांचें अतोनात हित होणार आहे. " वाहवा!! साहेबमजकुरांचें केवढें हें आमच्याविषयींचें अगाध ज्ञान व केवढी ही उदार बुद्धि!! असल्या दुराग्रही व कोत्या समजुतीच्या जगत्प्रसिद्ध साहेबबहादुरांचें असले आह्मांबद्दलचे पोरकट विचार वाचून स्वतःविषयीं किती अभिमान व उच्च बुद्धि उत्पन्न होईल बरें? दुसरे इतिहासकार जेम्स मिल साहेब. त्यांची तर काय, वरच्याहूनही ताण! इंग्लंडांत बसून वाटेल तसल्या खोट्या व अपुऱ्या माहितीवर कोटिक्रम रचून बिचाऱ्यानें यथास्थित

अकांडतांडव केलें आहे. त्याच्या दृष्टीनें आमची एकून एक गोष्ट वाईट. डाक्याच्या मलमली भिकार, ताजमहाल कुचकामाचा व कोरींव लेणीं निरुपयोगी! विद्वान् लेखकांची ही दशा! यांखेरीज कोठें रेसिडेंट, कर्नल, कमिशनर, वगैरे येथें अधिकारावर असलेल्या व त्यायोगें आमचा कमीअधिक परिचय झालेल्या लोकांचे लेख व वृत्तांत आहेत; पण माहिती आहे तर लिहिण्याची योग्यता नाहीं व विद्वत्ता नाहीं; विद्वत्ता आहे तर माहिती नाहीं; व दोन्हीं असलीं तर समदृष्टि नाहीं, अशी बहुतेक सरसकट स्थिति आहे. त्यांतल्या त्यांत एल्फिन्स्टन, हंटर, टेलर वगैरे कांहीं अपवाद आहेत असें मानितात; तथापि त्यांच्यांतही निरनिराळ्या प्रकारें न्यून आहे, व कांहीं केल्या आमचे एत्तद्देशीय साधार माहिती मिळवून शास्त्रीय पद्धतीनें जो सहानुभूति व प्रेमपूर्वक आमचा इतिहास लिहितील त्यांच्या तोडीला ते यावयाचे नाहींत. असल्या इतिहासांचे आधारानें जर महाराष्ट्रीयांच्या योग्यतेची व त्यांच्या राजकीय धोरणाची आह्मीं अटकळ बांधूं लागलों; “ शिवाजी हा चोर व लुटारू होता, तो लहानपणीं लहान चोऱ्या करी व मोठेपणीं मोठ्या करूं लागला ” वगैरे निरर्गळ प्रलाप करणाऱ्या मॉरिस सिंक्लेअरादि लेखकांच्या व त्यांचीं भाषांतरें करून पोट भरणाऱ्या अभिमानशून्य एतद्देशीयांच्या लहानग्या चोपड्यांचीं व चिटोऱ्यांचीं शाळांत पारायणें करून, श्रीशिवरायांच्या अमूल्य कर्तबगारीचा विचार करूं लागलों; किंवा सदरील लहान मोठ्या पुस्तकांत कोठें दहावीस ओळी किंवा दोनचार पानें खरडलीं असतील त्यांवरून आमची विद्या, कलाकौशल्य, चालीरीती, समाजसंस्था इत्यादिकांची माहिती करून घेऊं लागलों, तर कधीं तरी आह्मांला आमची खरी स्थिति व योग्यता कळेल काय? कधींही नाहीं.

देशबांधवहो, वर निर्दिष्ट केलेल्या अपुऱ्या, एकतर्फी व एकदेशीय इतिहास कषायाचें बाळकडू आमच्या पहिल्या पहिल्या विद्वान् पिढीला पोचलें व त्यायोगें बहुतेकांचे ठिकाणीं स्वाभिमानाविषयीं शून्यता

उत्पन्न होऊन आत्मविघातक अशा स्वदेशेतिहासाविषयींच्या मतांचा लेखांत व भाषणांत ते अनुवाद करूं लागले. त्या कारणानें समाजांत बराच गैरसमज फैलावून, समाजाचें नुकसान झालें व दुर्ग्रहांचा व दुर्मतांचा जो त्याजवर पगडा बसला, तो अद्यापही नाहींसा झाला असें नाहीं. त्यांच्या दृष्टीनें मराठी साम्राज्य ह्मणजे लुटारू व दरोडेखोर सैतानांचा व राक्षसांचा सुळसुळाट व हुतुतू. त्यांच्या मतें मराठी साम्राज्य हें अंदाधुंदी व अस्वस्थतेचें माहेरघर. सुखाची व आनंदाची कल्पनाही मराठी प्रजेला नसावी असा त्यांचा समज!! व अद्यापही लोकांना उमज न पडून श्रीशिवबारायासारख्या दिव्य विभूतींच्या उत्साहाचें महत्व अद्यापही लोकांना कळत नाहीं व ते फारच अल्प प्रमाणावर घडतात. ही स्थितीही सदरील गैरसमज कमी अधिक प्रमाणांवर प्रचलित असल्याचेंच द्योतक होय; पण आजकाल ही एक अत्यंत समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे कीं, गेल्या तीस पसतीस वर्षांत आपल्या पूर्वजांविषयींची आस्था आह्मां महाराष्ट्रीयांत उदय पावूं लागली आहे; व विविधज्ञानविस्तार, काव्येतिहाससंग्रह इत्यादिकांचें द्वारें व रा० कीर्तने, साने, चिपळूणकर, ओक, खरे, धनुर्धारी, राजवाडे, पारसनीस, भानू, नातू, मोडक, भागवत, न्या० रानडे इत्यादि देशाभिमान्यांच्या झालेल्या किंवा चालू असलेल्या प्रयत्नाच्या द्वारें बखरी, ऐतिहासिक लेख, चरित्रें, पत्रेंयादी वगैरे अफाट इतिहाससामुग्रीपैकीं अल्पाधिक भाग प्रकाशनांत येऊन, त्यायोगें आमच्या पूर्वजांच्या कर्तबगारीचें व खऱ्या योग्यतेचें खरें स्वरूप महाराष्ट्रीयांस व तदितरांस अधिकाधिक कळत जाऊं लागून, समाजांत खऱ्या समजुती पसरतील व त्यांच्यायोगें आमच्या राष्ट्रोत्कर्षाला अमोल साधनांची जोड होईल.

सभ्यजनहो, एवढा वेळ श्रीशिवबारायांच्या खऱ्या कामगिरीचें व त्यांनीं लाविलेल्या साम्राज्यवृक्षाचें खरें स्वरूप ध्यनांत येण्यास इतके दिवस कोणती जबर आडकाठी होती त्याचें दिग्दर्शन केलें. महाराष्ट्राच्या

परकीयांनीं लिहिलेल्या वृत्तांतांत डफ् यांचा ग्रंथ चांगला आहे व बराच निष्पक्षपातानें लिहिला आहे, तथापि अलभ्य इतिहाससामुग्री हातीं लाधल्यावरही त्यानें तिचा चांगला उपयोग न केल्या कारणानें त्याचा इतिहास त्रोटक, अपुरा, व जंत्रीसारखा झाला आहे; व तत्वविवेचन-शक्ति व शास्त्रीयपद्धतिज्ञान अंगीं नसल्याकारणानें त्याला स्वत: लाच जर श्रीशिवाजीच्या कर्तबगारीचें खरें स्वरूप काय व मराठी साम्राज्याचें गूढ काय होतें याचा उलगडा झाला नाहीं, तर त्याच्या त्या जंत्री वाचणाऱ्याला काय होणार? बांधवहो, आपणा सर्वांना अभिमान बाळ-गण्यासारखी गोष्ट आहे कीं न्या० रानडे, रा० राजवाडे, रा० चिपळूणकर प्रभृति मंडळींनीं या गोष्टीचा उलगडा करून मेकॉले, मिल्ल तर काय, पण साक्षात् डफ साहेबालाही जें गूढ उकललें नाहीं व इंगित समजलें नाहीं तें त्यांनीं सप्रमाण, साधार, व गोड रीतीनें आह्मां महाराष्ट्रीयांपुढें व इतिहासाभिलाषी जनांपुढें उघड करून ठेवलें आहे. आजमितीला श्रीशिवबारायांची खरी योग्यता जाणण्यापुरती ऐतिहासिक सामुग्री, उपलब्ध झाली त्याप्रमाणानें आमच्या एतद्देशीयांनींच आमच्या पुढें मांडून ठेवली आहे, ही फार संतोषाची गोष्ट होय. यापुढें, या नवीन साधनांच्या दृष्टीनें पाहतां श्रीशिवबारायांनीं जगाच्या किंवा हिंदु-स्थानाच्या इतिहासांत कोणती कामगिरी केली असें ठरतें तें पाहूं, व त्यामानानें डफ वगैरे परकीय इतिहासकारांच्या व तदनुयायांच्या मतानें ह्या कामगिरीची ठरलेली किंमत किती हीन आहे, त्याचा अदमास करूं.

महाराष्ट्रासंबंधानें पाहतां परकीय इतिहासलेखकांत डफ साहेब हे अधिक उदार व अधिक समबुद्धीचे आहेत, तेव्हां त्यांचें मत या बाबतींत किती रास्त आहे तें पाहिलें ह्मणजे अर्थातच बाकीच्यांच्या मतांचा त्यांच्यांत अंतर्भाव करितां येऊन त्यांची विल्हेवाट लावल्या-सारखी होते. मराठ्यांच्या उदयासंबंधानें डफ साहेब आपल्या इतिहासाचे प्रस्तावनेंत ह्मणतात:— The rise of the Mahrattas was Chiefly attributable to the confusion of other

States, and it was generally an object of their policy to render everything as intricate as possible and to destroy records of rightful possession " मराठे लोकांचा जो उदय झाला तो मुख्यत्वेंकरून भोंवतालील राज्यांत अव्यवस्था व घोटाळा हीं होतीं ह्मणून झाला. कोणतीही गोष्ट घोटाळ्याची करून टाकावी हा बहुतेक त्यांचा उद्देश असे व ह्मणून ते अस्सल कागदपत्र व लेख हे नेहमीं फाडून नाहींसे करीत. इ० " दुसरे एके ठिकाणीं सदरील ग्रंथकार लिहितात, " महाराष्ट्रांतील हिंदुलोकांचा कधींही जागचे जागीं राहूं न देणारा असा अनावर लुटारू स्वभाव थोडावेळपर्यंत दडपून गेला होता, परंतु त्या झांकलेल्या आगीनें मुसलमान विजयीवीरांच्या कलहामुळें पेट घेतली. त्याचा परिणाम सरतेशेवटीं असा झाला कीं, सह्याद्री पर्वतांतील अरण्यामध्यें वाळून तावलेला पाचोळा जसा कांहीं पेट घेतो, त्याप्रमाणें हे मराठे हिंदुलोक एकदम उसळले आणि एकसारखा भडका पसरला. " दुसरे कांहीं ह्मणतात कीं, " मराठ्यांचा अभ्युदय केवळ आकस्मिक गोष्टी घडून आल्यामुळेंच झाला, त्यांचा उत्कर्ष व्हावा असा त्यांच्या अंगीं मुळींच जोम नव्हता, दैवगती अनुकूल नसती, तर त्यांचें नांवसुद्धां ऐकूं आलें नसतें. " अशाच मासल्याचीं विधानें युरोपीय इतिहासकारांच्या ग्रंथांतरीं आढळतात. या विधानांचा विचार करितां मराठ्यांचा उत्कर्ष केवळ आकस्मिक गोष्टींनीं झाला; त्याला पाया नाहीं, शेंडी नाहीं, व बुडखा नाहीं; त्यांच्या इतिहासांत कांहीं ऐतिहासिक तत्व नाहीं; नैतिक भाग त्यांत कांहीं नाहीं; त्यांची सत्ता केवळ लुटारूपणा व धाडस यांच्यावर अवलंबून असून त्यांत राजनीतितत्व कांहीं एक नव्हतें; लुच्चेगिरी व धूर्तता यांयोगेंच त्यांचा डाव साधला; त्यांच्या कृत्यांत राजकीय धोरण नव्हतें, इत्यादि मराठी साम्राज्याच्या वस्तुस्थितीस प्रतिकूळ व त्याच्या खऱ्या उपपत्तीस विसंगत असे परकीयांचे व तदनुयायी अनेकांचे अभिप्राय प्रदर्शित झालेले दिसून येतात. या त्यांच्या अभिप्रायांप्रमाणें मराठी सत्तेचें जर खरोखरच इतकें प्राकृत व सामान्य स्वरूप असतें, तर तिच्याविषयीं एवढा अभिमान बाळग-

ण्यास जागा नव्हती. महाराष्ट्र मंडळाची प्रस्थापना करणारे शूरवीर जर केवळ हैदर व टिपू, अलीवर्दीखान किंवा रणजीतसिंग यांच्याच जोडीला बसविणें रास्त असतें, तर त्यांच्या कृत्याची एवढी मातबरी मानण्याचें कारण नव्हतें. जर मराठ्यांच्या साम्राज्यस्थापनेच्या कृत्यपरंपरेंत राजनीतितत्व नसतें; कांहीं राष्ट्रीय धोरण नसतें; क्रमोत्पन्न राष्ट्रीय जोम नसता; व महाराष्ट्रमंडळ हें केवळ लुटारू व धाडसी लोकांचें समुत्थान असतें, तर महाराष्ट्रांत व त्याच्या बाहेर पिढ्यान पिढ्या टिकणारी पादशाही स्थापित झाली नसती. महाराष्ट्राचा इतिहास पहातां, स्वराज्यस्थापनेच्या आरंभापासून स्वराज्याचा वृक्ष शेंदीडशें वर्षें सारखा फोंफावत व ताडमाड वाढतच जात होता; अशा वृक्षाच्या मुळाशीं जर नीट खत नसतें, व परिपोषक द्रव्यें नसतीं, व सतत सेचन धारा नसती, तर तो वृक्ष इतकीं वर्षें सारखा भरजोरांत व ऐटींत रहाता काय? कधींही रहाताना. महाराष्ट्रमंडळांत दहा पिढ्या मोठमोठे पुढारी उदयास आले, रणसंग्रामीं एक पडला तर दुसरा त्यापाठीं उभा, प्रत्येकाचें धैर्य संकटानें जास्तीच चढलेलें, वगैरे स्तुत्य व अभिमान बाळगण्याजोग्या गोष्टी, वर्ष दोन वर्षें नाहीं, तर शेंदीडशें वर्षें दृष्टोत्पत्तीस येतात, त्या गोष्टींची उपपत्ति आकस्मिक कारणानें लावूं पहाणें किंवा यदृच्छेनें घडून आल्या असें दर्शविणें हें इतिहासशास्त्राच्या अज्ञानाचें, कार्यकारणभाव समजण्याच्या अशक्यतेचें, व कुशाग्रबुद्धि, रसिकता व मर्मज्ञता यांच्या अभावाचें द्योतक नाहीं असें कोण ह्मणेल? बांधवहो, परकीयांची ही उपपत्ति सर्वांशानें लंगडी आहे. मराठी साम्राज्याचे बुडाशीं यदृच्छा, धाडस, लुटारूपणा, किंवा दुसऱ्यांची अव्यवस्था हीं नसून, तें आकस्मिक कारणानेंही उदयास आलेलें नव्हतें. त्याचीं कारणें फार खोलवर गेलीं होतीं; त्याचा पाया भरभक्कम तत्वांवर होता; त्याची संस्थापना करणारा जो वीरनायक शिवाजी त्याच्यांत व त्याच्या अनुयायांत एक अचल राष्ट्रीय धोरण होतें; व त्यांच्या कृत्यपरंपरेंत एक चिरस्थायी जोम आणणारें तत्व होतें. सारांश मराठी साम्राज्याची स्थापना ह्मणजे एका प्रबळ राष्ट्राची स्थापना, व आमचा

प्रस्तुतचा वीरनायक हा त्याचा पाया घालणारा, व त्याचें कमजास्त अनुकरण करणारे पिढ्यानपिढ्या झालेले शूर व मुत्सद्दी नरवीर हे ती राष्ट्ररूपी इमारत उभारणारे व तिला बळकटी आणणारे होत, असें ह्मणणें भाग पडतें. याची उपपत्ति करणें हें प्रस्तुत स्थळीं आवश्यक असल्याकारणानें थोडक्यांत त्याचें दिग्दर्शन करितों.

मित्रहो, आपणास माहीत आहेच कीं, यूरोपांतील फ्रान्स देशांत अठरावे शतकाचे अखेरीस जी जगविख्यात राज्यक्रांति झाली, ती कांहीं आकस्मिक कारणांनीं घडून आली नव्हती. त्या देशांतील राजे व उमराव यांनीं पसरिलेलें दुःसह–जुलूमरूपी–अग्निबीज अनेक वर्षे धुमसून धुमसून शेवटीं एकाएकीं मोठा भयंकर भडका झाला, व त्याच्या ज्वाळांनीं सर्व युरोपखंड होरपळून निघालें; त्याचप्रमाणें गेले सतरावे व अठरावे शतकांत महाराष्ट्रांत जी राज्यक्रांति झाली तिचें मुख्य बीज, दक्षिणेंत मुसलमान सुलतानांनीं जो हिंदुप्रजेचा धर्मद्वेष्टेपणाचा असह्य छळ चालविला होता त्यांत आहे. हें छळरूपी अग्निबीज सुमारें तीन शतकें धुमसत होतें व प्रकट होण्याचा समय आल्याबरोबर त्या अग्नीचें इतकें प्रचंड व विक्राळ स्वरूप झालें कीं, त्याच्या धगीनें व ज्वाळांनीं, प्रथमतः दक्षिणेंतील व मागाहून उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक मुसलमानी राज्यें भाजून निघून भस्मसात झालीं.

तेरावे शतकाच्या अखेरीचे सुमारास दक्षिणेंत जाधवादि हिंदुराजांचा अंमल होता व ते स्वातंत्र्यसुख भोगीत होते. पण खिलजी घराण्यांतील पहिला बादशहा जलालुद्दीन हा १२८८ त दिल्लीचे तक्तावर येऊन त्यानें सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज केलें व नंतर त्याचा पुतण्या अलाउद्दीन यानें १२९४ पासून दक्षिणेंत स्वाऱ्या सुरू केल्या, त्यावेळेपासून दहावीस वर्षांचे आंतच महाराष्ट्राचा स्वातंत्र्यनाश होऊन तो दिल्लीचे बादशाहींत सामील झाला. पुढें महंमद तघलखाचे अमदानींत दक्षिणेंतील सरदारांनीं बंड केलें, व इ० स०

१३४७ त महाराष्ट्रांत ब्राह्मणी राज्य नांवाचे एका स्वतंत्र मुसलमानी राज्याची स्थापना झाली. हें राज्य बलाढ्य होऊन सुमारें दीडशें वर्षें टिकलें व नंतर तें मोडून जाऊन त्याचीं पांच निरनिराळीं स्वतंत्र राज्यें झालीं. हींही सर्व मुसलमानीच होतीं; यांपैकीं दोन जीं आदिलशाही व निजामशाही त्यांची बरीच भरभराट झाली व तींही आणखी सुमारें दीडशें वर्षें टिकलीं. ब्राह्मणी सुलतानांचे अमदानींत त्यांचे हातून अनेक वेळां हिंदु लोकांच्या कत्तली झाल्या; त्यांचीं देवळें व पवित्र क्षेत्रें यांचा विध्वंस करून, त्यांचे धर्माची त्यांनीं फार विटंबना केली. या धर्मच्छलामुळें हिंदु लोकांचे मनांत मुसलमान लोकांविषयीं दीर्घद्वेष व हाडवैर हीं उत्पन्न झालीं. ब्राह्मणी राज्य मोडल्यानंतर, मागाहून त्या जागीं जीं पांच मुसलमानी राज्यें आलीं, त्यांच्यांत परस्पर कलागती लागून व लढाया होऊन तीं दुर्बळ झालीं, व दुर्बलावस्थेंत त्यांच्यांवर उत्तरेकडील मोंगलांच्या स्वाऱ्या सुरू होऊं लागून त्यांचे ऱ्हासाला आरंभ झाला; व पराजित झालेल्या महाराष्ट्रीय हिंदूंचें डोकें, वर निघूं लागून, मराठे सरदारांचें आदिलशाहींत व निजामशाहींत अधिकाधिक प्राबल्य वाढत गेलें. तथापि धर्मच्छल विशेषतः कमी होता असें नाहीं. या दोन शाहींतच श्रीशिवरायांचे वडील शहाजीराजे यांनीं थोर पराक्रम करून अधिकार व जहागीर संपादन केली होती. मराठ्यांचें अशा प्रकारचें प्राबल्य जरी वाढत गेलें, तरी महाराष्ट्रसमाजांतील मुसलमानांविषयींचा द्वेष व तिरस्कार हा नाश न पावतां, अधिकाधिक वाढतच होता. पंधराव्या, सोळाव्या व सतराव्या शतकाचे पूर्वार्धांत महाराष्ट्राची स्थिति किती शोचनीय झाली होती; व मुसलमानांचा छळ किती असह्य झाला होता, त्याचें श्रीसमर्थांनीं थोडक्यांत फार हृदयद्रावक वर्णन केलें आहे. तें असें:—

" तीर्थ क्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला " ॥

अशा प्रकारें उच्छेद मातल्यावर, कर्तव्यदीक्षेची वेळ आली व श्रीशिवाजी महाराज व तदनुयायी यांना 'श्रीसमर्थांकडून' महाराष्ट्र-

धर्मप्रसाराची दीक्षा मिळाली. सतरावे शतकाचे आरंभीं ह्या महाराष्ट्र धर्माच्या स्थापनेच्या व प्रसाराच्या कल्पनेनें महाराष्ट्रीय विचारी मंडळी भारून गेली होती. ह्या महाराष्ट्र धर्मानें मराठ्यांच्या चळवळींचें राष्ट्रीय धोरण ठरविलें; व श्रीशिवबारायांनीं आपल्या अचाट कर्तबगारीनें ही कल्पना सफल केली व गुरुकित्ता घालून देऊन, पिढ्यान-पिढींत शिष्यपरंपरा उत्पन्न केली. श्रीशिवमहाराजांच्या चरित्राची, मराठी साम्राज्याची व हिंदुपदपादशाहीची हीच गुरुकिल्ली होय. ही मुख्य गोष्ट ध्यानांत ठेवली ह्मणजे मराठ्यांच्या सर्व खटपटींत व धावाधावींत कांहीं शिस्त, पद्धत, विचार, धोरण व नीति होती, असा प्रत्यय आल्यावांचून रहाणार नाहीं. आतां, महाराष्ट्र धर्माची दीक्षा चालविण्यांत कोणत्या गोष्टी करणें भाग होतें, त्याचाही या स्थळीं थोडक्यांत निर्देश केला पाहिजे. महाराष्ट्रधर्माची व्याख्या हिंदुधर्माहून विशेष व्यापक आहे, तिच्यांत हिंदुधर्माचा समावेश होऊन, शिवाय यवनांचा नाश करून, धर्माची स्थापना, स्वराज्याची स्थापना, गोब्राह्मणांचा प्रतिपाल, मराठ्यांचें तत्कार्यसिद्ध्यर्थ एकीकरण व त्यांचें धुरीधरण ह्मणजे पुढारीपणाचें स्वीकरण ह्या अधिक गोष्टींचा अंतर्भाव होत होता. ह्या विशिष्ट धर्माची स्थापना व त्याचा प्रसार हीं साधण्याकरितां शिवाजी महाराजांनीं व त्यांच्या वीरपरंपरेनें आपले प्राण व जीवित हीं वाहिलीं होतीं ही गोष्ट महाराष्ट्राचा इतिहास समजून घेणारानें कधींही विसरतां कामा नये. इ० स० १६४६ पासून १७९६ पर्यंत दीडशें वर्षांत मराठ्यांनीं जी जी ह्मणून हालचाल केली तिचा मुख्य हेतू, आधार व प्राण ही कल्पना व हें धोरण होय, हें नेहमीं लक्षांत बाळगिलें पाहिजे. शिवाजीच्या राजनीतींतील प्रधान धोरण स्वराज्यसाधन व महाराष्ट्रधर्मवर्धन या दोन मुख्य गोष्टींवर होतें असें दिसतें. महाराष्ट्रधर्मप्रसाराचाच उपदेश श्रीसमर्थांनीं संभाजीस केला. राजाराम महाराज व त्यांचे सेनापती व मुत्सद्दी ह्यांनींही श्रीशिवरायांचा कित्ता फार नामी गिरविला. इ० स० १६४६ पासून १७०७ पर्यंत महाराष्ट्रधर्माची शुद्ध कल्पना महाराष्ट्रांत

प्रचलित होती. १७०७ पर्यंत अवरंगजेबाकडून स्वराज्यसाधनाला हिंदुधर्मप्रसाराला व गोब्राह्मणप्रतिपाळाला बराच व्यत्यय आला. तो गेल्यावर हा त्रास मिटला. १७२० चे सुमारास महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्माचें कायम स्वरूप झालें व स्थापना झाली. महाराष्ट्राबाहेरील लोकांत असलें महाकार्य तडीस नेण्यास लोकांचे अंगीं निश्चय, जूट वगैरे जे अपेक्षणीय गुण लागतात, ते नसल्याकारणानें व योग्य पुढाऱ्याच्या अभावामुळें त्यांना अद्याप महाराष्ट्रधर्मसंस्थापनेपासून होणारें सुख लाभलें नव्हतें. ते यवनांच्या जाचांतच हाल काढीत राहिले होते. ह्या सर्व महाराष्ट्रीयेतर हिंदु लोकांना अविंधांच्या कचाटींतून सोडवून आपल्या अमलाखालीं आणावें, व हिंदुधर्म आणि गोब्राह्मण यांचें पालन करावें, असें महाराष्ट्रांतील कर्त्या व मुत्सद्दी वीरांना वाटलें. १७२० च्या पुढें मराठ्यांनीं आपल्या सत्तेचें जाळें जें सर्व हिंदुस्थानभर पसरिलें, त्याचें मुख्य बीज सदरहू विचारांतच आहे. ह्या विचारामुळें १७६० पर्यंत त्यांनीं यवनांचे हातांतून बहुतेक सर्व हिंदुस्थान सोडविलें. १७६१ तील पानपतच्या लढाईंत ठोकर बसली, तरी तींतून सरसावून पुढेंही १७९६ पर्यंतच्या उलाढालींत महाराष्ट्रधर्माचीच कल्पना प्रमुखत्वानें दिसून येते. कोणत्याही महत्वाच्या तहांत स्वराज्याचें व स्वधर्माचें कलम नाहीं असें सहसा आढळून येत नाहीं. अव्वलपासून अखेरपर्यंतच्या सर्व महत्वाच्या कृत्यांत महाराष्ट्रधर्माचें मुख्य धोरण सुटलेलें दिसत नाहीं. महाराष्ट्रधर्माची कल्पना व त्याच्या सिद्धीचे उपायांचें व्यवस्थित स्वरूपाचें ज्ञान तत्कालीन व विचारी मुत्सद्दी पुरुषांना स्पष्टपणें कळत होतें. महाराष्ट्रधर्माच्या अंगाचा विचार खर्ड्याच्या लढाईनंतरच्या तहांतही दिसून येतो. १७४६ पासून १७९६ पर्यंत मराठ्यांचें पुढारीपण जरी निरनिराळ्या जातींकडे गेलें व अधिकारांत फेरबदल झाला, तरी मुख्य धोरण सुटलें नव्हतें हा मुद्दा विसरतां कामा नये.

बांधवहो, मराठी सत्तेच्या साम्राज्याच्या उदयकालाचा अशा प्रकारें सूक्ष्मदृष्टीचा व संगतवार विचार केला, तर परकीयांच्या कल्पना

किती भ्रममूलक आहेत व या साम्राज्याच्या उलाढालींत राष्ट्रीय धोरण, राजनीतितत्व, पद्धति, शिस्त, हिशेब वगैरे सर्व गोष्टी किती थोर प्रमाणानें होत्या, हें आपल्या सहजीं लक्षांत येईल. अशा प्रकारच्या व्यवस्थित प्रयत्नांना कांहीं तरी दूषण देणें, हें रास्त होईल काय? श्रीशिवाजी व तदनुयायी यांचे खटाटोप हे धांगडधिंगा व हुतुतू नसून, बलाढ्य राष्ट्रस्थापनेचे व त्याच्या विस्ताराचे प्रयत्न होते व एकंदर विचार करितां, मराठी साम्राज्याला मराठ्यांचें राष्ट्र हेंच नांव योग्य होय.

सभ्यजनहो, इतकें विवेचन झाल्यावर श्रीशिवाजी महाराजांची कर्तब-गारी सांगितली पाहिजे काय व त्यांच्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील कामगिरीचें वर्णन केलें पाहिजे काय? ज्या महापुरुषानें दिसण्यांत अगदीं नादान व दरिद्री अशा अक्षरशून्य मावळे लोकांना हातीं धरून व त्यांच्यामध्यें स्वदेश व स्वधर्म यांविषयीं प्रेरणा करून व विजयश्रीचा संचार भरवून त्यांजकडून स्वराज्याची स्थापना करविली व मोठ्या युक्तीनें, शौर्यानें व मुत्सद्दीपणानें पिढ्यानपिढ्या टिकणारी राष्ट्रीय उत्साहबुद्धि महाराष्ट्रीयांत उत्पन्न केली, त्या वीरनायकाचें पुरेसें वर्णन कोणाला तरी करितां येईल काय? त्यानें जी राज्यक्रांती घडवून आणिली, ती जर झाली नसती, तर मुसलमान लोक हल्लीं ज्या स्थितींत आहेत तीच स्थिति आमच्या हिंदुसमाजाची झाली असती. आज-काल जीं उरलेलीं मराठी राज्यें दिसत आहेत, त्यांचे जागीं निजामाच्या राज्याप्रमाणें मुसलमानांचींच राज्यें दिसतीं व मराठ्यांचा मागमूस नसतां, मराठ्यांना राज्याधिकाराचा संस्कार प्राप्त न होता आपणा सर्वांना रयत या नात्यानेंच सर्वत्र नांदावें लागतें; आज-काल शिंदे, होळकर, गायकवाड, कोल्हापूरकर वगैरे जे लहान मोठे हिंदू राजे व संस्थानिक दृष्टीस पडण्याचें भाग्य आह्मीं अनुभवीत आहों, त्या भाग्याचा पत्ता नसता! सारांश, हिंदुस्थाना-सारख्या या अफाट देशाचे नकाशास जो सर्वत्र मुसलमानी

सत्तेचा रंग चढत चालला होता, तो रंग बदलून मराठी राज्यसत्तेचा रंग चढविण्याचें अलौकिक व अपरंपार श्रेय सर्वतः श्रीशिवाजी महाराजांच्या सदा यशस्वी नांवाकडे आहे. बांधवहो, श्रीशिवाजी महाराज होऊन गेले, त्यांनीं स्थापिलेलें स्वराज्यही नाहींसें झालें, व स्वराज्यांतून उद्भवलेलें महाराष्ट्राचें साम्राज्यही लयाला गेलें, तत्रापि अद्यापही हिंदुस्थानांतील अठरा पगड जाती महाराष्ट्रीयांकडे अधिक कौतुकानें व ममतेनें पाहतात, त्यांतील बीज महाराज अद्यापि कीर्तिरूपानें जिवंत आहेत हेंच नव्हे काय? हिंदुस्थानांत किंबहुना हिंदुस्थानाच्या चतुःसीमेच्या बाहेर, महाराष्ट्राच्या नांवाचा जो दरारा होता, व गतगोष्टींच्या स्मृतीमुळें अद्यापिही महाराष्ट्रीयांकडे पाहून हिंदुस्थानांतील इतर देश जे प्रेमाश्रु ढाळतात, त्या निर्विशेष जादूचें बीज श्रीमन्महाराजांचा नाममंत्र नाहीं असें कोण ह्मणेल? इतर युरोपीयन लोकांमध्यें हिंदुस्थानवाल्यांनीं ज्याप्रमाणें इंग्रजांना अग्रेसरत्व दिलें, त्याचप्रमाणें त्यांनीं पगडीवाल्यांत महाराष्ट्राचे पगडीलाही पहिला मान दिला; हिंदुस्थानांतील सर्व देशांना किंबहुना हिंदुमात्राला परकीयाचे सत्तेपासून सोडविण्याचें श्रेय महाराष्ट्रानें घेतलें; व सर्व हिंदुमात्राची ही सात्विक महत्वाकांक्षा पूर्ण करून दाखविण्याचें महत्कार्य शिवाजी महाराजांनीं व तदनुयायी महाकर्त्या पुरुषांनीं तडीस नेलें ही गोष्ट आह्मां महाराष्ट्रीयांस खरोखरच फार अभिमानाची आहे. शिकंदरबादशहा, जुलियस सीझर, नेपोलियन बोनापार्ट, या जगद्विख्यात महापुरुषांनीं मोठमोठ्या लढाया मारल्या, मुलूख जिंकिले, राज्य स्थापन केलें, व आपल्या नांवाचा दरारा बसविला, पण महाराजांनीं या सर्व गोष्टी करून फार मोठें कठीण व महत्वाचें कृत्य जें त्यांपैकीं कोणीही केलें नाहीं तें केलें; तें कोणचें ह्मणाल तर 'राष्ट्रजनन' हें होय. या त्यांच्या महाकार्यास जगाचे इतिहासांत दुसरी जोड नाहीं. शिकंदर बादशहाचा बाप फिलिप हा राजा होता व त्यानें आपले पुत्राचे दिग्विजयाची सामग्री अगोदरच तयार करून ठेवली होती; शिवाय त्याची महत्वाकांक्षा अलमगीरपणा मिळविण्याची असल्याकारणानें परदेशांचें स्वातंत्र्य नष्ट करून रक्तपातही करण्यास त्यानें मागेंपुढें

पाहिलें नाहीं. सीझर बादशहा हा मोठा शूर असून मुलूख जिंकण्यांत व त्यांची व्यवस्था लावण्यांत मोठा कुशल होता; पण द्रव्यादि सर्व सामग्री अगोदरच तयार होती; व शिवाजीचें शहाणपण व धोरण त्याच्या ठिकाणीं नव्हतें. नेपोलियन बादशहानें फ्रेंच लोकांस राजांच्या व उमरावांच्या दुःसह जाचांतून मुक्त करून आरंभीं निष्काम व अप्रतिम देशसेवा केली खरी; पण पुढें स्वतःच बादशहा बनून विजिगीषुपणाच्या महत्वाकांक्षेंत सर्वस्वी बुडून गेला व अलोट रक्तपातास कारणीभूत झाला. सारांश या सर्वांच्या कृत्यांत कमजास्त स्वार्थच दिसून येतो; पण महाराजांच्या कृत्यांत सर्वस्वी परार्थच ओतप्रोत भरला होता. शिवाय वरील सर्वांना साधनसामग्री मूळची तयार होती व त्यांना नवीन राष्ट्राचा उदय करण्याची जरूर नव्हती. भिन्न भिन्न रूपानें आयत्या पिठावर रांगोळ्या ओढून, स्वार्थसाधनांतच देहाचा व बुद्धीचा त्यांनीं उपयोग केला असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. श्रीशिवरायांची महत्वाकांक्षा या सर्वांच्याहून किती भिन्न, सात्विक व उदात्त होती बरें ? स्वतःला थोर करण्याकडे त्यांचें लक्ष नसून, महाराष्ट्राला थोर करण्याकडे त्यांचें सर्व लक्ष होतें, व लोकहितासाठीं स्वहिताचा त्याग करण्याची स्पृहणीय इच्छा दुसऱ्यांत त्यानें उत्पन्न केली व शेवटपर्यंत स्वतःचें वर्तन त्या इच्छेप्रमाणें ठेवलें! त्यांच्या अलोट कर्तबगारीचें ते एकटेंच!! त्यांना स्वराज्यस्थापनेसाठीं प्रथमतः राष्ट्रजननापासूनच खटपट करावी लागली; कारण अगोदर येथें राष्ट्राचाच ठिकाणा नव्हता! दगड, चुना, विटा गोळा करून पायापासून त्यांनीं सर्व तयारी केली व नवीन महाराष्ट्रीय साम्राज्याची इमारत उभारली. हें काय सामान्य कृत्य!!

" महाराजांचे जन्मापूर्वी, मावळे ह्मणजे शेतकरी किंवा मजूर यापेक्षां अधिक योग्यतेचे नव्हते; ब्राह्मण, परभू, यांची योग्यता कुळकर्णी, मोजणीदार, कारकून यांच्याहून अधिक नव्हती; मराठ्यांची मोठी हांव ह्मणजे बारगीर, शिलेदार, मनसबदार यापेक्षां अधिक नसे; या अशा सर्व लोकांचें एकीकरण करून, त्यांचें एक नवीनच राष्ट्र बनवून, त्यांचे हातून आपलें

हयातींत स्वराज्य व स्वधर्म यांची स्थापना करून, व आपले पश्चात् परदेशीय व परधर्मी असे जे मोंगल वगैरे बलाढ्य लोकांचा पाडाव होऊन सर्व देशभर हिंदुपदपादशाहीचा व हिंदुधर्माचा प्रसार व्हावा, अशी ज्या महात्म्याची विलक्षण योजकबुद्धि, स्वदेशभक्ति, व कर्तृत्वशक्ति त्याची जोड जगाचे इतिहासांत सांपडणें कठीण जावें यांत नवल तें कोणतें? असल्या दिव्य हिऱ्याच्या तेजानें जग दिपून जावें हें स्वाभाविक नव्हे काय? असल्या अलौकिक शूर, रणधीर महावीराला लोकांनीं देवाचा अवतार मानावा, व हिंदुस्थानाच्या किंबहुना जगाच्या इतिहासांत त्याची कीर्ति अजरामर होऊन अंतकालपर्यंत त्याचे उत्सव व स्मरण चालत रहावें, हें अगदीं यथार्थ होय.

देशबांधवहो, श्रीशिवमहाराजांच्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील अप्रतिम कामगिरीचें मी संक्षेपतः यथामति वर्णन केलें. आजच्या स्थितीस आपण साक्षात् किंवा परोक्षतः इंग्रेज प्रभूंची प्रजा आहों. आमचीं सर्व सुख दुःखें त्यांच्या हातीं आहेत. आमच्या समजाला जी कांहीं उन्नत स्थिति प्राप्त करून घेणें असेल, ती त्यांच्याच तंत्रानें व आमच्या योग्यतेनें करून घ्यावयाची आहे. ब्रिटिश यजमानांशीं स्वामिभक्ति व एकनिष्ठा ठेवूनच आह्मांला आमचें राष्ट्रहित साधावयाचें आहे. याकरितां, श्रीशिवरायांच्या चरित्रावरून व मराठी साम्राज्याच्या उदयास्ताच्या इतिहासावरून, **जुटींत व एकींत सुख, व फुटींत व बेकींत दुःख.** हें महातत्व हृदयाशीं बाळगून, स्वदेशप्रीतीनें, उत्साहानें व उन्नत विचारानें देशकार्य उरकण्यास आह्मां सर्वांस श्रीसमर्थ महाराज व श्रीशिवाजी महाराज बुद्धि देवोत व प्रेरणा करोत अशी करुणा भाकून, व त्यांचा त्रिवार जयघोष करून मी हें व्याख्यान पुरें करितों.

# शिवाजीमहाराजांवरील पोंवाडा

## आणि

# त्यांतील ऐतिहासिक माहिती.

अव्वल इंग्रजीच्या तडाख्याखालीं मराठ्यांच्या इतिहासाला जी दुर्दैवानें ग्लानि आली आणि त्याविषयीं जें दुष्ट औदासिन्य, त्यावेळचें इंग्रजी वैभव पाहून दिपून गेलेल्या लोकांत दृष्टिगोचर होत होतें, तें सुदैवानें अलीकडे नष्ट होत जाऊन, हळूहळू लोकांमध्यें इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याकरितां श्लाघ्य अशी चळवळ दिसून येत आहे; आणि हा प्रयत्न नेटानें कायम ठेवण्याकरितां अशा लोकांना जणूं काय ईश्वर प्रेरणा करीत आहे, असे दाखले दिवसानुदिवस अनुभवास येत आहेत. कोणी ग्रांटडफ, एल्फिन्स्टन, मालकम वगैरे ग्रंथकारांच्या इतिहासांचें भाषान्तर करण्यांत गुंग झाले, तर कोणी त्यांनीं लिहिलेल्या एकपक्षी इतिहासाचें खंडन करण्यास पुढें सरसावले; कोणी मराठ्यांच्या इतिहासाच्या पुनरुज्जीवनार्थ स्फूर्तीनें ऐतिहासिक निबंध लिहिले, तर कोणी अश्रांत श्रम घेऊन व पुष्कळ नुकसान सोसून लागलेंच मराठी बखरी, कैफियती, यादी, पत्रें इ० सामुग्री मोठ्या कळकळीनें शोधून आणून छापण्याच्या स्तुत्य उद्योगास लागले; कोणी उपलब्ध झालेल्या माहितीवरच तृप्त होऊन स्वतंत्र ग्रंथलेखनाच्या उद्योगास लागले; कोणी केवळ निरपेक्ष बुद्धीनें आणि सद्धेतूनें विलक्षण परिश्रम घेऊन गांवोगांव फिरून मोठमोठ्या घराण्यांचीं दफ्तरें तपासून अतिशयित स्वस्तदरानें मिळविलेली ऐतिहासिक सामुग्री, मासिकपुस्तकरूपानें लोकांस देऊं लागले; कोणी सरकाराला अर्ज करून, अनेक भयंकर प्रसंगांतून आणि अग्निनारायणाच्या तडाख्यांतून अवशिष्ट राहिलेलें पेशव्यांचें दफ्तर शोधण्यास सरकारची परवानगी मिळविली; कोणी बसल्या बसल्या आपलें नोकरीचें काम संभाळून वर्गणीदारांच्या दौर्भिक्षाची

बिलकुल परवा न करितां संस्थानिकांच्या दफ्तरांतील महत्वाचीं पत्रें नियमित मासिकपुस्तकरूपानें देऊं लागले. सारांश ही जी राष्ट्रीय जागृतीची एक अभिनंदनीय अशी अनिवार्य आणि अप्रतिहत प्रतिलाट उसळली आहे, ती महाराष्ट्राच्या मागसलेल्या आणि दुर्लक्ष केलेल्या इतिहासाचा एकदांचा उत्तम प्रकारचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीं असें हल्लींच्या स्थितीवरून खास वाटतें. मात्र परमेश्वर करो आणि या आमच्या भविष्यावर कोणा दुष्ट माणसाची दृष्ट न पडो!

वरच्यासारखाच प्रयत्न मि० शाळिग्राम यांनीं प्रथम सन १८७९ त ऐतिहासिक पोंवाड्याचें पुस्तक छापून केला. हा एक नवीनच दिशेनें प्रयत्न केल्याबद्दल मि० शाळिग्राम यांचे महाराष्ट्रावर विशेष उपकार आहेत. ‘ विशेष ’ ह्मणण्याचें कारण हें कीं, बखरी, तवारीका, पत्रें, यादी वगैरे जशीं लिहून ठेवलेलीं असतात तसे पोंवाडे लिहून ठेवलेले नसतात. ते फक्त अशिक्षित, अक्षरशून्य अशा गोंधळ्यांस मात्र तोंडपाठ येतात. तेव्हां हे पोंवाडे लवकर नष्ट होण्याचा जितका जास्त संभव आहे, तितका वर निर्दिष्ट केलेल्या बखरी वगैरे होण्याचा नाहीं. शिवाय पोंवाडे ऐकण्याचा नाद पूर्वींपेक्षां आतां लोकांत अगदीं नाहींसा होत चालला आहे; त्यामुळें नवीन गोंधळी आपल्या वडील माणसांपासून ते शिकत नाहींत आणि काळाच्या अनिवार्य तडाख्या-खालीं जुने गोंधळी, जगाच्या रहाटीप्रमाणें नाहींसे होत चालल्यामुळें, पुष्कळ जुने पोंवाडे जगांमधून अजीबात नष्ट झाले आहेत. तेव्हां मि० शाळिग्राम यांनीं जर त्यांचा उद्धार केला नसता, तर आज आपणाला फारच थोडे पोंवाडे आणि तेसुद्धां अगदीं अलीकडील मिळाले असते. असो. शिवाय चमत्कार वाटण्याजोगी ही एक गोष्ट आहे कीं, मि० आक्वर्थ हे विदेशीय असूनही त्यांना मराठ्यांच्या पोंवाड्यांचा विलक्षण अभिमान होता, आणि त्यांनीं मि० शाळिग्राम यांच्या साह्यानें आणखीं जास्त पोंवाडे शोध करून मिळवून त्यांचें दुसरें पुस्तक एक तपानंतर १८९१ सालांत बाहेर आणलें. यांत कित्येक महत्वाचे जुने पोंवाडे छापले आहेत. यांत तानाजी मालुसऱ्यानें अश्रुतपूर्व पराक्रम करून,

प्रसिद्ध भयंकर किल्ला सिंहगड, स्वामीकार्यार्थ देह खर्चून आणि मोंगलांचा चुराडा करून कसा घेतला यावर एक प्रचंड पोवाडा ५५ चौकांचा असून त्यानें पुस्तकाचीं सुमारें तीस पानें आटोपलीं आहेत. हा पोवाडा त्यांनीं जर हट्टास पेटून मिळविला नसता, तर त्याचा जगांतून कायमचा लोप झाला असता यांत संशय नाहीं. तेव्हां मि० आक्वर्थ यांनीं महाराष्ट्रास किती ऋणी करून सोडलें आहे हें लक्षांत येईल.

इसवी सनाच्या १४ । १५ आणि १६ व्या शतकांत महाराष्ट्रांत मुसलमानांचा सुळसुळाट झाल्यामुळें कोणीही नामांकित रणगाजी तेथें निपजला नाहीं. त्यामुळें त्यावेळच्या कोणत्याही मराठे सरदाराची थोरवी कोणीं गाइलेली आपल्याला माहीत नाहीं. त्यावेळीं महाराष्ट्रांत जेवढे ह्मणून साधुसंत—कीं, जे त्या काळचे लोकांचे पुढारी उत्पन्न झाले, तेवढे येथून तेथून भगवद्भक्तीमध्यें अगदीं गर्क झाले होते. ह्या साधुसंतांनीं लोकांमधील देशाभिमान वरील कोरड्या पारमार्थिक विचारानें, समूळ रसातळास नेला होता. पंढरीच्या विठोबाशिवाय आपल्याला कांहीं नको असें प्रत्येकाचे डोक्यांत त्यांनीं बळेंच वेड कोंबलें होतें. पण हें सर्व विचाराचें पारडें १७ व्या शतकाच्या सुरवातीपासून पूर्ण फिरलें. त्यावेळीं "हा देश आपला आहे" "मोंगल लोक परके असून बंडखोर आहेत" "त्यांनीं आपला देश आपल्यापासून जबरदस्तीनें हिसकावला आहे." तेव्हां "त्यांची आपण उचलबांगडी करून 'स्वराज्य' परत घेतलें पाहिजे" अशा अर्थाचे लोकांच्या मनांत विचार घोळूं लागले. संतांचीही नवी पिढी अशाच मताची निर्माण झाली. "मुसलमानास निवटून काढण्यास" त्यांनीं लोकांस उपदेश करण्याचा सारखा तडाखा चालविला. शिवाजी महाराजांसारखे लोकोत्तर रणधुरंधर वीर, या देशाभिमानजागृतीनें निर्माण होऊन त्यांनीं मुसलमानांचा चेंदामेंदा केला. खुद्द जातीनें त्यांनीं पराक्रमाच्या कोटी ( Prodigies of valour ) केल्या. तेव्हां अशा अद्भुत पराक्रमांची "थोरवी गाणें" लोकांस अत्यंतावश्यक वाटून

"पोंवाडे गाण्या" ची सुरवात झाली. असा हा पोंवाड्यांच्या उगमाचा इतिहास आहे.

पोंवाडे रचण्याची विद्या जेव्हां सुरू झाली, तेव्हां ती अगदीं बाल्यावस्थेंत असली पाहिजे हें येथें निराळें सांगणें नको. कवित्व ह्मणजे मनोरंजक कल्पनाशक्तीचें साम्राज्य ऊर्फ माहेरघर. परंतु चमत्कार हा कीं, पोंवाड्यांच्या कवनांत ह्याचे भागाला मुळींच जागा मिळाली नाहीं असें ह्मटलें तरी फारशी हरकत पडणार नाहीं. जरी ते कवित्वरूपानें आपल्यास दिसतात, तरी ते तुणतुण्यावर ह्मणतां येतील इतक्या बेताचे पद्यरूप गद्यच आहेत. चालीवर न ह्मणतां ते नुसते वाचले तर कोठें अन्वय लावण्याची विशेष जरूर पडत नाहीं. सारांश ते अगदीं साधे असून त्यांचा अर्थ अगदीं सरळ आणि सोपा असतो. अतिशयोक्ति क्वचित् प्रसंगीं दृष्टीस पडते. जशी गोष्ट घडली असेल तशी ती वर्णन करण्याकडे शाहीराचें लक्ष गुंतलेलें असतें. कोणताही ऐतिहासिक प्रसंग घडल्यावर त्या प्रसंगाची त्यांतील लोकांस माहिती विचारून ते तेव्हांच रचलेले असल्यामुळें त्यांचें ऐतिहासिकदृष्ट्या मोठें महत्व आहे. त्यांत जाणूनबुजून कोठें मिथ्या वर्णन केलेलें नाहीं. कांहीं ठिकाणीं चुका आढळतात, त्याचें कारण त्यांना मिळालेली माहितीच मुळांत चूक असते.

वर निर्दिष्ट केलेल्या पोंवाड्यांच्या दोन्ही पुस्तकांत अज्ञानदासानें केलेले, बहुतेक एकाच अर्थाचे दोन पोंवाडे आहेत. दोन ह्मणण्यापेक्षां लहान पोंवाडा सुधारून, जास्त वाढवून मागाहून मोठा केलेला आहे असें ह्मणणें बरें, हें चाणाक्ष वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. जरी दोघांचा मतलब बहुतेक एकच आहे, तरी दोघांची सुरवात सारखी नाहीं, दोघांचा शेवटही सारखा नाहीं. पहिल्या पोंवाड्यांतील तात्कालिन कवित्वदर्शक "भावू" "महादेवू" "जीवू" "ठावू" वगैरे जुनीं रूपें दुसऱ्यांत मुळींच वगळलेलीं आहेत. पहिल्यांत ११ चौक आहेत, पण दुसऱ्यांत ३७ आहेत. सारांश मि॰ शालिग्राम ह्मणतात त्याप्रमाणें हे दोन्ही पोंवाडे एकाच्याच प्रति आहेत असें मात्र आह्मांस ह्मणतां येत नाहीं. लहान पोंवाड्यांतील भाषापद्धतीवरून आणि आपल्या मुलाला विजय मिळाला

तेव्हां त्या प्रसंगाला अनुरूप असा आनंदप्रदर्शक पोंवाडा करण्यास बाईनें "बाईनें शाहीर बोलाविले" आणि अज्ञानदासानही पण तडाख्यानें त्या प्रसंगाचा "कडाका गाइला" ह्यावरून हा लहान पोंवाडा प्रथम बनविला असावा, व मागाहून फुरसत सांपडल्यानंतर, लांबलचक, तपशीलवार, विशेष माहितीनें भरलेला असा त्यानें दुसरा पोंवाडा सुधारून बनविला असावा हें जास्त सयुक्तिक आणि संभवनीय वाटतें.

आतां हा पोंवाडा त्यावेळींच बनला गेला आहे हें त्यांतील अंत:प्रमाणावरून सिद्ध करून दाखविण्याची विशेष जरूरी दिसत नाहीं. तो त्यावेळींच रचला गेला हें सप्रमाण साहजिक रीतीनें सिद्ध करतां येईल. तो जिजाबाई आणि शिवाजी यांणीं स्वत: ऐकला असला पाहिजे आणि ह्मणून त्यांतील दिलेली माहिती पूर्णपणें विश्वसनीय मानली पाहिजे. रा. रा. राजवाडे यांनीं आपल्या नुकत्याच छापलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत नुसतें जातां जातां "पोंवाडे बखरींपेक्षां जास्त प्रमाण आहेत" एवढेंच ह्मटलें आहे; परंतु तसें कां ह्याचा त्यांनीं यथासांग शास्त्रोक्त कोठें विचार केला नाहीं. शिवाय पोंवाड्यांचें जर ते जास्त प्रामाण्य मानण्यास कबूल आहेत, तर शिवाजीवरील खुनाचा पाश्चात्य ग्रंथकारांनीं केलेला दुष्ट आरोप उडवून टाकण्यांत त्यांनीं त्याच्यावरील पोंवाड्याची पहिल्यानें मदत घेतली पाहिजे होती. यथास्थित विचार केला असतां, ती मदत किती महत्वाची आहे हें त्यांतून काढलेल्या खालील ऐतिहासिक माहितीवरून वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल.

## १. पोंवाड्यांतील ऐतिहासिक माहिती.

१. हा पोंवाडा रचला गेला त्यावेळीं शिवाजीच्या अमलाखालीं मुलुख:—कुणबीस्तान ऊर्फ कोंकण, इंदापुरापासून सिरवळ सुपें, कोंकण किनाऱ्याचीं बाराही बंदरें, जावळी, पुणें, महाड, गोरेगांव, श्रृंगारपूर, १२ मावळे इत्यादि; त्याचप्रमाणें चौवेचाळीस किल्ल्यांपेक्षां जास्त किल्ले त्याचे हातीं होते. त्यांत, राजगड, मर्जनगड, पारगड, प्रबळगड, तळा, घोंसाळा, रायरी, कासागड, मंडनगड, सुरगड, अवचितगड, भूषणगड,

कुवलगड, कुर्डुगड, रोहिले, प्रतापगड, मकरंदगड, बांसोटा, सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, लोडगड, पावनगड, पन्हाळा, तुंग आणि तिकोना वगैरे प्रमुख होते.

२. एवढ्या सर्व मुलखाला " राज्य " ही संज्ञा प्राप्त झाली होती हें " भाग मी राज्याचे गाईन । " या चरणावरून सिद्ध होतें.

३. शिवाजीला त्यावेळींच " राजा " " महाराजा " " छत्रपति " वगैरे अभिमानसूचक विशेषणें लाविलीं जात होतीं हें " ' हेजिम ' बोले शिवाजी राजाला " " ' महाराज ' खदखदां हांसिला " " ' छत्रपति ' राजा शिवू " वगैरे वाक्यांवरून स्पष्ट दिसतें.

४. शिवाजीच्या ' राज्या 'ची व्यवस्था उत्तम प्रकारची, न्यायी आणि शांततेची त्यावेळींच होती हें " शिवाजीच्या तळ्यांत पाणी पिती सर्व जीवू " या चरणावरून स्पष्ट दिसतें आणि अशामुळें ती फार लोकप्रिय झालेली असावी असें ह्मणण्यास सबळ कारण आहे.

५. शिवाजी त्यावेळींच मोठा धनाढ्य राजा झाला असावा यांत संशय नाहीं; कारण तसें नसतें तर " सुरंग जडताचे खांब, त्यांवर पोंवळ्यांचे घोंस; चांगल्या माणकांचे हार आणि त्याचप्रमाणें सालस वर्णाच्या पाणीदार मोत्यांचे तुरे, गगनांतील दैदीप्यमान सूर्याप्रमाणें जडीत चौकोनी चांदव्यांची मांडणी, सोनेरी पलंग, नानाप्रकारचीं वर चित्रें काढलेले असे चिकाचे मस्तानी पडदे आणि त्यांना चहूं बाजूंनीं लटकणाऱ्या हिऱ्यांच्या घोंसांच्या माळा " वगैरे मौल्यवान् सामानानें अबदुल्याकरितां सदरा बनवितां आल्या नसत्या व त्यांची चमत्कृति आणि मोल पाहून त्या पादशाई मुसलमान सरदाराचे तोंडून " ऐशा सदरा नाहीं आल्या । इदलशाबाच्छावाला । " असे मत्सरयुक्त उद्गार बाहेर पडले नसते.

६. शिवाजी मोठा हिकमती होता हें " सांगेन शिवाजीच्या हिकमती " ह्या वाक्यावरून अगदीं उघड होतें आणि हें सर्व " भले दुणेदार लोक जाणती, मराठे राजकुमार ऐकती ".

७. शिवाजीस राजगडावर भूमिगत सुवर्ण सांपडलें होतें असें दिसतें.

८. त्यानें गडासहित जावळी काबीज करून चंद्रराव मोऱ्यास कैद केला होता. ह्यावरून त्यास विश्वासघातानें मारला नाहीं हें उघड आहे.

९. "चवली (दोन आणी) पावली (चार आणी) घेऊन मुलूख काबीज केला त्यान" ह्या चरणावरून हें निर्विवाद निष्पन्न होतें कीं, एव्हांपासूनच त्यानें प्रसिद्ध चौथ आणि जवळ जवळ सरदेशमुखी मुसलमानांच्या राज्यावर बसविण्यास वस्तुत: सुरवात केली होती.

१०. शत्रूच्या मुलखावर स्वाऱ्या करून, लढाईंत शत्रूला दस्त करून तेथील दौलत लढाईच्या हक्कानें तो घेऊन जात असे. ह्याला पुरावा "कल्याण भिंवडी मारून नेली" हें वाक्य.

११. तो आपल्या अद्भुत साहसानें, अश्रुतपूर्व पराक्रमानें आणि अलौकिक हिमतीनें "सरजा" (सिंह) हें नामाभिधान पावला होता हें "परत रे माघारा, सरजा शिवाजी बोलला" यावरून सिद्ध होतें. त्याचप्रमाणें शत्रूंच्या फौजा त्यानें बुडविल्या होत्या व ह्मणून त्याला "दलभंजन" हें विशेषण लावलें आहे.

१२. तेव्हां अशा हिकमती, धनाढ्य, छत्रपति उपपद धारण करणाऱ्या आणि बहुत मुलूख, अनेक मजबूत किल्ले आणि मोठीं बंदरें यांवर अंमल चालविणाऱ्या आणि आपलीं शहरें वारंवार लुटणाऱ्या सरजा शिवाजीची खोड तोडण्यास कोणत्याही बादशाहाची हबेलंडीच उडाली असती. तशांत त्यावेळीं विजापूरच्या बाच्छाईचीं सर्व कळसूत्रें गादीवरील तरुण बादशहाच्या आईच्या हातांत असल्यामुळें राज्यांत फारसा दम नव्हता. तथापि आपलीं कल्याण भिंवडी वगैरे शहरें सरजा शिवाजीनें मारलीं हें ऐकतांच त्या तरुण यवनीबादशाहाचें तापट रक्त सळसळूं लागलें आणि (कदाचित् शहाजीच्या भीतिमुळें) "जिता धरा शिवाजीला" असें "कुळवजिरांशीं बोलला." परंतु हें असाध्य काम साध्य करून घेण्याला शिवाजीचेच डावपेंच, हिकमती वगैरे जाणणारे पदरचे मराठे, सरदार, मुख्य सेनापतिबरोबर दिले पाहिजेत हें लक्षांत

आणून त्यानें आपल्या लोकांस " बाजी घोरपडे, झुंझारराव घाटगे, कोयाजी, नाइकजी, जीवाजी देवकान्ते, मंबाजी भोंसले " वगैरे सरदारांस बोलावण्यास आज्ञा दिली. आतां शिवाजीला जिता धरण्याला आज्ञा केली खरी, पण हें काम पत्करतो कोण? कारण यापूर्वी बाजीशामरावाचा शिवाजीनें कसा चुथडा उडविला होता, हें सर्वांच्या नजरेसमोर ताजें होतें. अखेर अब्दुलाखान नामक एका गर्विष्ठ सरदारानें विजापुरांत भरदरबारांत शिवाजीस जिता धरून आणून देण्याबद्दल " विडा उचलला पैजेचा " तेव्हां बादशाहानें खुष होऊन त्याला एक घोडा, एक तलवार आणि एक तुरा पगडीस लावण्याकरितां दरबारांतच बहाल केला.

१३. अब्दुल्लाखान हा जातीचा भटारी होता. पुढें तो आपल्या अकलेनें किंवा पराक्रमानें मोठ्या पदावर चढला. नंतर त्यानें आपल्या पूर्व स्थितींतील नांवाला फांटा देऊन " परमेश्वराची पहिली कृपा " झाली असें दर्शक ' अफजलखान ' असें नांव धारण केलें असावें. ऑर्म, जे. स्कॉट, वेरिंग स्कॉट वगैरे आंग्ल इतिहासकार, आपल्या दोन तीन मराठी बखरा, आणि हा पोंवाडा त्याला अब्दुल्लाखान किंवा अब्दुलखान असें लिहितात. मुसलमानांच्या इतिहासावरून युरोपियनांनीं आपले इतिहास लिहिले आहेत त्यांवरून पहातां ते जें " अब्दुल्लाखान " लिहितात तेंच खरें असें समजलें पाहिजे. तेव्हां त्याचें पूर्वीचें नांव अब्दुल्लाखान आणि मागाहून रा० रा० राजवाडे हे ह्मणतात त्याप्रमाणें अफजलखान हीं होत. त्यावेळीं वजीर या शब्दाचा अर्थ ( मराठी बखरींवरून ) नुमता " मोठा सरदार " असा होता असें दिसतें. तेव्हां वजीर ह्मणजे मुख्य प्रधान हा अर्थ घेऊन उपयोगी नाहीं.

१४. खानाबरोबर लष्कर निवडक दिलें होतें त्याचा तपशील:— सातशें बाणांनीं भरलेले उंट आणि कसास उतरलेले असे चवदा हजार घोडेस्वार. त्याप्रमाणेंच किल्ल्यावरील तोफा ( भांड=भांडीं=तोफा ) वगैरे दिल्या असाव्यात असें वाटतें. शिवाय त्यानें तीन वर्षांचा सामानाचा पुरवठा बरोबर घेतला होता.

१५. खान विजापुर सोडून निघाला तो, तुळजापूर, माणकेश्वर, करंकभोशा, पंढरपूर, रहिमतपूर या मार्गानें वांईस आला.

१६. खान नखशिखान्त धर्मवेडा होता. चाल करून येत असतां वाटेंत त्यानें शिखंडी न्यायानें तुळजापूरच्या भवानीला "फोडलीच", पंढरपूरच्या विठोबाला भिंवरेंत जळसमाधी दिली आणि त्याच्या पवित्र जागीं आपली अपवित्र "मसूद बांधली." पालीच्या खंडोबाचीही कांहीं कुचेष्टा त्यानें केली. तेव्हां 'येळकोट मल्हारी' संतापून त्यानें लागलेच खानाचे कान उपटून हातावर ठेविले. तथापि खानाची अझूनही मोडवशी जिरली नव्हती. त्यानें औंधची देवी "येमाई"ची कांहीं खोड काढली. तिला कसला हा अपराध खपतो? तिनें लागलीच खानाला "दे माय धरणी ठाय" अशी गत करून सोडली. तेव्हां अशी खाज जिरल्यानंतर खानानें तिच्यासमोर (ती शांत होण्याकरितां) गोंधळ घातला आणि आपला पश्चात्ताप व्यक्त केला. असो. अशाप्रकारचीं रस्त्यांत दुष्ट कृत्यें करून अखेर खानसाहेब "चालुनि वांईकारणें गेला। आपल्या मुलखांत राहिला."

१७. खानाचा पराक्रमासंबंधानें नांवलौकिक बाच्छाई दरबारांत फार मोठा होता. तशीच त्याला अद्भुत शक्ति होती व तो मोठा पटाईत शिपाई होता ह्मणून प्रसिद्धि होती. या सर्व गोष्टी "जो बाच्छाई नांवाजला" आणि "अबदुलखान लष्करी भला" इत्यादि उक्तींवरून खास होतात.

१८. खान वांईस आल्यावर त्याला असें दिसून आलें कीं, चवदा हजार घोडेस्वारांच्या "करड्या" लष्कराची येथें कांहीं डाळ शिजावयाची नाहीं. तेव्हां युक्तिप्रयुक्ति करून सरजा शिवाजीस आपल्या जाळ्यांत आणून फसवावा आणि नंतर त्यास धरावें. असें मनांत आणून "बरवेपणाचे कागद" लिहून ते बरोबर देऊन, भरंवसा येण्याकरितां ह्मणून शिवाजीकडे "ब्राह्मण कृष्णाजी पाठविला" आणि आपल्या मनांत कांहीं कपट नाहीं हें दाखवून शिवाजीस भुरळ

पडण्याकरितां " खान आला भेटाया " असें सांगण्यास वकीलास शिकविलें आणि " शिवाजी जरी तूं भेटशी [ तरी ] उदंड दौलत [ खान ] देइल तुला " इत्यादि आमिषेंही दाखविण्याला त्याला सांगितलें. पण ' गांठ पडली ठका ठका ' तशी तेथें गत झाली. आपणाला जिवंत धरून नेण्याकरितां या फुशारकी खानानें विजापुरांत भरदरबारांत पैजेचा विडा उचलला आहे हें शिवाजीस पुरें माहीत होतें. त्यानें ही गोष्ट लक्षांत ठेऊन " राजा बोले हेजिबाला । कशाला बलावितां वांईला । किल्लेगडकोट । दवलतखानाच्या हवाला । जाउली खानाच्या हवाला । लिहून देतों हे जिवाला । " असें वकीलास सांगितलें. आणि " जावळीस यावें भेटायाला । मी खानाची वाट पहातों " असें नुसतें सांगून " तसलिवा दिल्या बामणाला, बामण खानापाशीं आला. " अशाप्रकारें शिवाजीनें जरी अब्दुल्याच्या वकीलाला बेफिकीरी दाखविली तरी सावधगिरीच्या, धूर्ततेच्या आणि शहाणपणाच्या ज्या कांहीं तजविजी करावयाच्या त्या त्यानें सर्व करून ठेवल्या. त्या अशा कीं:—जिवाजी महालदार याना खानाकडे आपल्याकडून हेजिबीच्या मिषानें ह्मणून पाठवून त्याचा खरा उद्देश काय, त्याची फौज किती, व तिची व्यवस्था कशी काय याबद्दलची जरूर तेवढी माहिती त्यानें मिळविली. खानाच्या फौजेची जय्यत तयारी पाहून आणि सल्लुचाचें त्याचें बोलणें ढोंगी आहे अशी आपली खात्री पटवून, त्या जवानमर्द अढळ छातीच्या मराठ्या वकीलानें, आपण एव्हां केवळ वाघाचे दाढेंत आहों याची तिळमात्र फिकीर न करितां, धडाक्यासारखा " खानापाशीं येऊन । धड न बोले अबदुल्याला—चवदाहजार घोडा तुह्मीं कशाला आणला? आवृत [ बळी ] द्याया " जगदंबेला? " आपलें दुटप्पीपणाचें ऊर्फ दगाबाजीचें हें कृत्य शिवाजीच्या चाणाक्ष माणसाच्या उग्रड नजरेस आलें असें पाहून आणि त्याचें पाणीदार बोलणें ऐकून खान जळून अगदीं खाक झाला. तरी अजून कांहीं शक्कल लढवितां येईल आणि आपल्याला आपला कार्यभाग उरकून घेतां येईल, या व्यर्थ पण दुष्ट इच्छेनें खान रडतोंडीचा घांट चार हजार

निवडक स्वारांनिशीं उतरला आणि जावळींत आला. आपल्या हेजिबाच्यामार्फत शिवाजीनें खानाचा दुष्ट हेतु समजून घेऊन आतां मात्र खानाला कळूं न देतां अडकविण्याची त्यानें तजवीज केली. त्याच्याशीं मुळीं न भांडतां त्याला निमुटपणें घांट उतरूं दिला आणि नंतर " इशारत सरजाच्या लोकांला " । " ज्यांनीं घांट बळकाविला । मग त्याची खबर नाहीं पुढल्याला । कटकाची खबर कैची त्याला । जाऊं जाणें येऊं नेणें । ही गत झाली अबदुल्याला । जावळींत उतरूनी । अबदुल दिशाभुली जाहला । " अशा प्रकारें घांटाचें हवाबंद तोंड करून शिवाजीनें खानाचा कोंडमारा केला. तसेंच वेळ पडल्यास खानाची फौज बुडविण्याकरितां शामराजपंत, रघुनाथपंत, माणकोजी दहातोंडे, सुभानराव इंगळे, जिवाजी देवकांत्या, सुभानजी करनखऱ्या, पिराजी बेलदार सरसुभा, नेताजी पालकर, बहिरजी बोबडे वगैरे सरदारांना फौजेसहित बाहेर ठिकाणांहून बलाविलें. इतकी जरी व्यवस्था त्यानें आपल्याकडून केली, तरी हल्लींचा प्रसंग नेहमींच्यासारखा नसून आगीबाणीचा आणि धोक्याचा आहे असें शिवाजीस वाटलें. " भाइनु अबदुलखान आला, त्याचा धाक तो रे देवाला । कसा जाऊं भेटायाला, बुद्धी सांगावी आह्माला " । अशी आपल्या लोकांस शिवाजीनें मसलत विचारिली. तेव्हां कृष्णाजी गाइकवाड यानें सल्ला दिली कीं, अंगात चिलखत चढवून जावें. त्याप्रमाणें करून वरून बारीक झगा घातला, रेशमी विजार पायांत घातली, बिचवा डावे हातीं घेऊन त्याच हातांत वाघनख घातलें. बरोबर जिवाजी महालदार घेतला, त्याजपाशीं आपली तलवार दिली. बादशाही पोपाख करून भेटीस जाण्यास तयार झाला. परंतु अबदुल्याचे भेटीस जाण्याचें ह्मणजे निर्वाणीचाच प्रसंग हें तो जाणून होता. कदाचित् आपल्याला दगाबाजीनें धरून विजापुराला नेलें तर तेथें दुष्ट यवन आपला जीव घेतील किंवा बंदींत ठेवितील हें ध्यानांत आणून त्यानें राज्याची निरवानिरव केली. ती अशी :—आपल्या सर्व सरदारांना रामराम करून संभाजी राजाचा सांभाळ करण्यास त्यांना आज्ञा केली. गडकऱ्यांना गडाचें

संरक्षण करण्यास सांगितलें. राज्याच्या संरक्षणाचें काम नेताजी पालकरावर सोंपवलें. अशी व्यवस्था लावून नंतर मातुश्रीची भेट घेतली. खानाचा दग्याचा हेतु जिजाबाईस माहित होताच, त्यामुळें शिवाजी खानाचे भेटीस जातो हें तिला कळतांच ती पुत्रप्रेमानें पालखींत बसून धांवत आली; आणि उपदेश केला कीं " शिवबा न जावें भेटायाला । मुसलमान बेइमान । खान राखिना तुह्मांला । " पण शिवाजीच्या मनांत कबूल केल्याप्रमाणें भेटीला जावयाचें होतें आणि दगाबाजीचा प्रकार दिसल्यास खानाची खुमखुम जिरवायाची होती, ह्मणून त्यानें आपल्या मातुश्रीस ह्मटलें कीं, " एवढें वय झालें पण कोणाला भेटलों नाहीं ; करितां आज माझ्या मनांत भेटण्याचें आलें आहे, तरी आळा घालूं नको ". असें आर्जव त्यानें केल्यामुळें व त्याचा पक्का निर्धार पाहून तिनें सांगितलें कीं, " शिवबा बुद्धीनें काम करावें । उसनें संभाजीचें घ्यावें । " पण शिवबानें उत्तर कांहींच केलें नाहीं. ह्यावेळीं दोघांनाही प्रेमाचा कळवळा आला.

इकडे अबदुल्यानें " बरवेपणाचे कागद " लिहून आणि शिवाजीस " कउल " ( अभयवचन ) देऊन " रोटीपीर " ( खात्री येण्याकरितां पीराचा प्रसाद ) पाठवून " भिऊं नको शिवाजी भाई । आहे तेरा मेरा सल्ला । तुझे गड तुझ्या हवाला । आणिक दवलत देतों तुला । " इत्यादि मधाचें बोट दाखवून मखलाशी काय केली कीं " इकडे कउल पाठविला । शिलचा राऊत ( चिलखत घातलेले घोडेस्वार निवडला ) ।....नजरे पडतां दस्त करा शिवाजीला ।." शिवाजी नजरेस पडतांच ठार करा असा हुकूम आपल्या घोडेस्वारांस त्यानें देऊन ठेविला! आणि चार हजार निवडक घोडेस्वारानिशीं रडतोंडीचा घांट उतरून जावळींत आला. पण मागच्या बाजूस व्यवस्था काय झाली तें पूर्वींच लिहिलें आहे. महाराजांनीं त्याच्या आदरातिथ्याकरितां तसेंच आरामाकरितां सदरा तयार करविल्यानंतर अबदुल्याकडे मोरोपंतास हेजिबीस पाठविला, आणि त्याच्याकडून खानास विचारवलें कीं " चार हजार घोडा । कोण्या कामा-

स्तव आणिला?" तेव्हां निरुत्तर आणि निरुपाय होऊन खानानें "बाहेर निराळा ठेविला। दहापांचानिशीं चालला।" पण मोरोपंतानें पुन्हां प्रश्न केला कीं "एकांतींच्या गोष्टी तेथें दहा पांच कशाला?" तेव्हां खान पालखींत बसून चालला. परंतु पालखीच्या भोयांचा मोरो पंतास संशय येऊन भोयांसकट पालखी त्यानें दूर करविली. पण खान पडला पक्का निगरगट्ट. त्यानें हातांत "लव्हा" (मोठी तलवार) घेतला आणि चालूं लागला, पण बऱ्यापणानें भेट घ्यावयाची असेल तर "हातचा लव्हा दूर करा" ह्मणून मोरोपंतानें निक्षून सांगितलें. तेव्हां आपल्या रेड्याचे बळावर भिस्त ठेवून खान जावळींत "त्रिन हत्याराविण मोकळा" आला. (पण पुढें दगाबाजी करण्याकरितां सदरेस बसल्यावर त्यानें तलवार जवळ घेतली होती असें निःसंशय दिसतें.) पुढें दगा करण्याच्या उतावळीनें तो शिवाजी येण्याच्या पूर्वींच सदरेस येऊन बसला; आणि इंद्रपुरीप्रमाणें शृंगारलेल्या त्या सदरांचें वैभव पाहून तो त्वेषानें जळून गेला आणि स्पष्ट बोलला कीं "ऐशी सदर नव्हती। आमच्या अल्ली इदलशहाला।" त्याचप्रमाणें तिसरी सदर पाहून कुरकुरला कीं "ऐशी सदर नाहीं। अवरंगशा बादशहाला" अशारीतीनें आपल्या बादशहावर ताण करणाऱ्या "शिवाजीला आणा भेटायाला" असें "अबदुलखान बोलला."

इकडे मातुश्रीचा आशीर्वाद घेऊन शिवाजी अबदुलखानाचें कापट्य पुरें जाणून हत्यारबंद होऊन आला. आल्याबरोबर शिवाजीनें खानास सलाम केला, पण त्या गर्विष्ठ आणि उन्मत्त खानानें त्यास उलट सलाम केला नाहीं. "शिवाजी सरजें सलाम केला। अबदुलखानें गुमान (गर्व) केला। मनीं धरलें कपट। पुरतें कळलें महाराजांला।" मग शिष्टाचारास अगदींच धाब्यावर बसवून त्या उन्मत्त अबदुलखानानें महाराजछत्रपति शिवाजीला एकदम धमकाऊन ह्मटलें कीं, "तूं तो कुणबीका छोकरा। सवरत (शृंगारली) बाच्छाई सदरा?" हें तिरस्कारयुक्त भाषण ऐकतांच तो पाणीदार आणि बाणेदार मराठा अशा

या उल्लू यवनाचें तेव्हांच डोचकें उडवायाचा; पण खान आपल्या येथें आला आहे, हें ध्यानांत ठेऊन त्यानें आपला झालेला अपमान गट्ट केला आणि त्याचे अक्षम्य अपराध त्यानें क्षमा केले; पण आपल्याला जसें तो वर्मी बोलला, तसेंच त्यालाही बोलून शरमिंधा करावा असें मनांत आणून शिवाजी त्याला उलट बोलला कीं, 'तुला लेंका भितो कोण? आह्मीं परमेश्वराला मात्र भीतों' 'तुह्मीं जातीचे कोण। आह्मीं जाणतों तुह्मांला। तूं तर भटारणीका छोरा। शिवाजी सरज्यापर लाया तोरा.' हें ऐकतांच खान शिवाजीस दांडगाईनें ह्मणतो कीं, 'शिवा तुम चलो विजापुराला।' तेव्हां शिवाजीनें त्याला धिःकारपूर्वक उत्तर दिलें कीं, 'शिवाजी सरजा नेतां। बहुत दिन लागतील खानाला। कळला पुरुषार्थ तुमचा बसल्या जागेला.' शेवटीं खानाच्या काळजास झोंबेल असें बोलला कीं, 'अबदुल जातका भटारी। तुमने करना दुकानदारी.' हें मात्र ऐकल्यावर खान मनांत पुरा 'खवळिला' आणि लागलेंच मागें पुढें कांहीं एक न पाहतां 'कव मारिली अबदुल्यानें। सर जागवसून धरला सारा। चालविली कट्यार' याप्रमाणें शिवाजीच्या अंगावर एकदम डुकरासारखी चाल करून त्यानें शिवाजीस आंवळून धरलें, आणि त्याचा आतां प्राण घेण्याकरितां कट्यार चालविली; परंतु शिवाजानें पूर्वींच सावध-गिरीनें अंगांत चिलखत घातलें असल्यामुळें त्या "सीलवर मारीन चाले जरा." खान आपला जीव घेतो असें पाहिल्याबराबर शिवाजीनें स्वसंर-क्षणार्थ "बिचव्याचा मारा केला। डावे हातीं बिचवा त्याला। वाघनख सरजाच्या पंजाला। उदरच फाडुनि। खानाची चरबी आणिली द्वारा।" पोटांतली चरबी बाहेर आली खरी, पण अबदुल्लाखान चांगला मर्द शिपाई होता. त्यानें तलवारीचा "हात खचून मारला" त्याच्यायोगानें शिवाजीच्या डोक्यावरील त्यानें 'जिरेटोप तोडिला' आणि 'सरजास जरासा लागला.' शिवाजीही कांहीं लेच्यापेच्या गुरुचा चेला नव्हता. तोही तरवारीच्या कामांत निष्णात होता. त्यानें जो पट्याचा हात ताणून मारिला त्याबराबर खानाला तरवारीच्या जखमेचें प्रत्यक्ष भयंकर जानवें घातलें. 'मान खांदा गवसुनि। जानव्याचा दोरा केला।' त्यामुळें

अबदुलखान पुरा (घायाळ) झाला. आपला धनि घायाळ झाला हें पाहतांच जवळ असलेला स्वामिभक्त ‘ कृष्णाजी ब्राह्मण उठावला. ’ तेव्हां ‘ शिवाजीराजा बोलला। ब्राह्मण मारूं नये तुला। तुजशीं मारतां। शंकर हंसेल आह्माला ’ पण तो ब्राह्मण काय असल्या तत्वज्ञानाला ऐकतो? त्यानें महाराजांवर दुसरा हात टाकिला. तेव्हां शिवाजीनें पुन्हां सांगितलें कीं बाबा ‘ ब्राह्मण मारूं नये तुला। क्रिया (शपथ) शाहाजीची आह्माला. ’ इतकेंही सांगितलें तरी आपल्या जिवाची मुळीं परवा न करतां ब्राह्मणानें तिसरा हात टाकिला. तेव्हां ‘ भोंसल्याच्या कुळास ब्रह्महत्येचें मोठें पातक लागेल ’ असें ह्मणून शिवाजीनें त्याला जिवानिशीं सोडलें. अबदुल्लाखान आणि त्याचा वकील यांची ही व्यवस्था झाल्यानंतर खानाचा शरीररक्षक सय्यद बंडू जवळच थोड्याशा अंतरावर उभा होता, तो अंगावर चालून आला. तेव्हां त्याच्यावर जिवू ह्मालया तुटून पडला आणि ‘ त्यानें सैद पुरा केला. ” पण या पुढच्या गडबडींत खानानें ‘ पळता पाय काढिला। मेळविला भोयांनीं पालखींत घालून चालविला। ’ इतक्यांत संभाजी कावजी भोंसला ‘ मोठे उडीनें आला। जखमा केल्या भोयांच्या पायां। खटारा धरणीवर पाडिला। ’ तेव्हां शिवाजीनें लागलेंच येऊन खानाचें ‘ शिर कापुनी गडावर गेला. ’ आणि अशा रीतीनें या नाटकाचा शेवट झाला.

वरील गडबड बहुधा एका क्षणांत झाली असावी. कारण अबदुल्लाखान आणि शिवाजी यांच्या मल्लयुद्धांत कोणीच परस्परांस साह्यकारी नव्हता. जें कांहीं झालें तें क्षणार्धांत झालें. जसा खानाचा शरीररक्षक सय्यद बंडू होता, त्याप्रमाणेंच शिवाजीचा संभाजी कावजी हा असावा असें दिसतें. तेव्हां या इतिहासप्रसिद्ध भेटीच्यावेळीं एका बाजूला अबदुल्लाखान, त्याचा वकील कृष्णाजी बामण आणि शरीरसंरक्षक सय्यदबंडू व दुसऱ्या बाजूस शिवाजी, त्याचा वकील जिवा म्हाल्या आणि शरीरसंरक्षक संभाजी कावजी हे होते हें सिद्ध झालें. सय्यद बंडू जसा खानापासून कांहीं अंतरावर उभा होता तसाच शिवाजीचा संरक्षक संभाजीही त्याच्या-

पासून कांहीं अंतरावर उभा होता हें खास. असें नसतें तर तो " मोठ्या उडीनें आला " असें पोंवाड्यांत ह्मटलें नसतें. ' उडी ' या शब्दानेंच अंतर व्यक्त होतें आणि " मोठ्या उडीनें आला " असें ज्याअर्थी ह्मटलें आहे, त्याअर्थी तो बऱ्याच अंतरावर उभा असला पाहिजे हें उघड होतें.

असो. याप्रमाणें वरील नाटकाचा शेवट झाल्यानंतर, चार हजार फौजेवर ठेवलेल्या अबदुल्याचे फाजिलखान नामक मुलास मोठा " क्रोध आला " व त्यानें लागलाच " बाण आणि बंदुका [ चा ] थोर वर्षाव एकच केला.' परंतु शिवाजीचा एक ' चपाटा ' बसतांच फाजिलखान दाही दिशेस उधळून गेला. त्यामुळें अबदुल्याचे लोकांचे मनस्वी हाल झाले.

याप्रमाणें फाजिलखानाला फजित करून त्याची फौज मोडून काढल्यानंतर बाकीच्या फौजेचा समाचार घेण्याकरितां महाराजांनीं 'प्रतापगडाहूनी केला हल्ला । मारिती खूण सरजाच्या लोकांला । धरल्या चारी वाटा । ज्यांनीं घांट बळकाविला । ' याप्रमाणें प्रतापगडावरून तोफेची खूण होतांच शिवाजीच्या लोकांनीं रडतोंडीचा घांट बळकाऊन सर्व वाटा बंद केल्या आणि नंतर पायदळ घेऊन, अंगद, हनुमानासारखे सिलिमकर, खोपड्या, सुरव्या, कांकड्या वगैरे मराठे सरदार मुसलमानांच्या अंगावर कोसळले. तेव्हां मुसलमानांचा पुरा मोड झाला. शिवाजीनें मोठ्या उदार अंतःकरणानें आणि भूतदयेनें आपल्या फौजेस असा हुकूम दिला कीं, ' फिरंग ( तलवार ) ठेवी त्याला । जाऊं द्या त्याला । राखूं नका तुह्मीं उगारल्या ( तलवार उगारील त्या ) पाइकाला ( शिपायाला ).' सारांश महाराजांची फत्ते झाली. फाजिलखान पळाला त्याचा पाठलाग केला आणि त्याला जखमी करून घोड्यासकट पाडाव करून आणला. त्याचा हत्तीचा तोफखाना ( जान हत्तीचा आरोबा ), हत्तीवरचीं निशाणें आणि चार हजार घोडे असें युद्धोपयोगी सामान हस्तगत केलें. याप्रमाणें ' अबदुल्या जावळींत बुडविला.' ह्याच तडाख्यासरशी पन्हाळगड महाराजांनीं काबीज केला.

## २. इतर माहिती आणि अनुमानें.

१. शिवाजीचा कुलस्वामी महादेव होता.

२. जावळी आणि श्रृंगारपूर हीं दोन्हीं राज्यें शिवाजीनें या पूर्वीच घेतलीं होतीं.

३. शिवाजी जातीचा अस्सल मराठा होता. मुसलमान लोक धिःकारानें मराठ्यांस कुणबी ह्मणत असत हें महशूर आहेच. शिवाय तो मराठाच होता ह्याला दुसरें प्रमाण मालोजी, शहाजी आणि छत्रपति शिवाजी, संभाजी, राजाराम वगैरेपैकीं कोणीही रजपुतराजाशीं किंवा सामान्य रजपुतांशींसुद्धां सोयरीक केलेली जाहीर नाहीं. त्यांनीं रजपुतांची मुलगी आपण केली नाहीं किंवा आपली रजपुतांस कधीं दिली नाहीं. जर मालोजी उदेपूरच्या घराण्यांतला असता आणि रजपुतांची आणि मराठ्यांची सोयरीक होत असती, तर तो आपल्या बरोबरीचा नाहीं ह्मणून लुकजी जाधवाच्या बायकोनें त्याचा धिःकारपूर्वक अव्हेर केला नसता. तर उलट उदेपूरच्या घराण्याशीं आपला संबंध जडतो, हें पाहून तिनें मालोजीच्या पायावर नाक घांसलें असतें आणि शहाजीस आपला घरजांवई केला असता. रजपुतांमध्यें नांवापुढें ‘ सिंग ’ असें पद लागतें, तें आपण रजपूत आहों हें वेड छत्रपतीच्या मनांत, जवळील उपद्व्यापी मंडळी भरीपर्यंत कोणत्याही छत्रपतीनें किंवा त्याच्या पूर्वजानें, ( विठोजीपर्यंतच, कारण त्याच्या मागील माहितीवर विश्वास ठेवतां येत नाहीं. ) लावलें नाहीं. मालोजीसिंग, शाहाजीसिंग, शिवाजीसिंग असें त्यांनीं आपल्यास कधींही ह्मणवून घेतलें नाहीं. त्यांच्या बायकांचीं नांवेंही मुळींच रजपुती नाहींत. छत्रपतींच्या घराण्याची चालरीतही रजपुती नाहीं. त्यांची भाषाही रजपुती नाहीं. छत्रपतींच्या येथलीं लग्नकार्येंही रजपुतांच्या चालीप्रमाणें कधींच झालीं नाहींत; उलट मराठ्यांप्रमाणेंच होत आलीं. या पोंवाड्याच्या ६ व्या चौकांत ( सुधारलेली आवृत्ति ) विजापूरच्या दरबारचा “ संभाजी भोंसला ” ह्मणून एक सरदार होता, असें ह्मटलें आहे. शिवाजी भोंसल्याचे पूर्वज जर राजपुतान्यांतून आले,

तर हा दुसरा भोंसला विजापुरांत कसा निर्माण झाला ? शिवाजीच्याच कुळांतला असून तो विजापुरास नोकर असल्याबद्दल कोठें दाखला नाहीं. यावरून भोंसल्याचें कूळ महाराष्ट्रांत पूर्वींपासून—अनादिकालापासून ह्मटलें तरी हरकत नाहीं—महशूर असलें पाहिजे. आतां ज्याअर्थी शहाण्णव कुळींच्या मराठ्यांपैकीं वाटेल त्या घराण्याशीं छत्रपतींचा शरीरसंबंध होत असे, त्याअर्थीं ते अस्सल मराठे क्षत्रिय असले पाहिजेत. अवान्तर राजेलोक उदेपूरच्या सूर्यवंशाशीं आपला संबंध जोडण्यास पूर्वींच्याच काळीं धडपड करीत असत असें नाहीं, तर हल्लींच्या कालींही तो प्रयत्न अव्याहत चालू आहे. कै० तुकोजीराव होळकरांनीं आपला वंशवृक्ष उदेपूरच्या घराण्यांतून कसा जबरदस्तीनें खेंचून काढला होता, हे इकडील लोकांना विश्रुत आहे.

४. शिवाजी मुसलमानांस सलाम करीत नसे ह्मणून जें ह्मणतात तें बरोबर नाहीं. कारण आपला प्रत्यक्ष शत्रु जो अबदुल्लाखान त्याला त्यानें सलाम केला हें ह्या पोंवाड्यांत आहे. तथापि सलाम करण्याचा त्याचा एकंदर प्रकार लक्षांत आणला ह्मणजे तसें करणें शिवाजीच्या किती जिवावर येत असे, हें दिसून येईल.

५. शिवाजीचा सर्वत्र जय होत असे. कारण तसें नसतें तर “ जिकडे जाती तिकडे । यश राजियाच्या खड्गाला । ” असें कवीनें ह्मटलें नसतें.

६. बराणपुरी चिकाचे पडदे त्यावेळीं फार महशूर होते.

७. विजापुराहून खान निघाल्यानंतर शहराबाहेर फतेमारी तोफेजवळ तो पडला असावा अगर त्याचा निशाणाचा हत्तीं मेला असावा. कांहीं-तरी त्याला दुश्चिन्ह झालें.

८. तुळजापूरची भवानी खानानें फोडिली, तेव्हां शिवाजीच्या स्वप्नांत तिनें जाऊन खानाचें पारिपत्य करण्यास त्यास आज्ञा केली.

९. देवळें फोडून झाल्यावर खानानें तेथें मशीदी बांधण्यास सुरवात करून पुढें कुच केलें असावें. त्या पूर्ण बांधण्यास त्यास वेळ नव्हता.

१०. भवानीला फोडून शिवाजीस चिडविण्याकरितां अबदुल्ला मुद्दाम तुळजापुरास गेला असें वाटतें. शिवाजीस भवानी प्रसन्न आहे, हा समज लोकांत त्यावेळीं प्रचलित होता. याकरितां त्या भवानीचाच भरडा करण्याकरितां खान प्रथमतः तिकडे गेला. आपल्याला फोडिली या रागानेंच " ह्या माजलेल्या बत्तीस दांतांच्या बोकडास मला बळी दे " असें तिनें शिवाजीपाशीं मागणें घातलें असावें.

११. अबदुल्याचें पारिपत्य करण्यास देवीनें, आणि संभाजीचें उसनें घेण्यास मातुश्रीनें, शिवाजीला प्रोत्साहन दिलें. पण यांपैकीं एकीसही ' होय ' किंवा ' नाहीं ' हा कांहींच जबाब त्यानें दिला नाहीं, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

१२. जिजाबाई पालखींतून भेटण्यास आली, तिनें खानास भेटण्यास न जाण्याविषयीं शिवाजीस उपदेश केला. तेव्हां खानाच्या नीच उद्देशाविषयीं तिची खात्री झाली होती हें निश्चित आहे. ती ह्मणाली कीं, ' खान बेइमान आहे. त्यानें इमान प्रमाण दिलें असलें तरी त्यावर विश्वास ठेऊं नको, तो तुला जिवंत राखणार नाहीं ' पण शिवाजीचा कबूल केल्याप्रमाणें भेटीस जाण्याचा पक्का निश्चय पाहून तिनें, ( पुत्रवधामुळें हृदय नेहमीं पोळत असल्यामुळें ) त्यास उपदेश केला कीं, ' बारे बुद्धीनें काम करावें । उसनें संभाजीचें घ्यावें ' व यांत कांहीं नवल नाहीं. तिचा स्वाभाविक मतलब हा कीं, खानाशीं एकांगी केवळ न करितां युक्तिप्रयुक्तीनें त्याची फौज बुडवून त्यास युद्धांत ठार करावा आणि संभाजीचा मोबदला घ्यावा. येथें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, अबदुल्यानें स्वतः संभाजीस मारलें नव्हतें. फक्त त्याच्या साह्यानें किंवा चिथावणीनें एका पाळेगाराकडून संभाजी युद्धांत मारला गेला होता. तेव्हां त्याप्रमाणेंच खानाला युद्धांत ठार कर, असा जिजाबाईचा पुत्रप्रेमामुळें शिवाजीस उपदेश. ही भेट निर्विघ्नपणें पार पडून जर सल्ला झाला नसता, तर शिवाजीनें खास तसेंच केलें असतें.

१३. शामराजपंताचें ‘ पेशवे ’ पद काढल्यानंतर आणि मोरोपंतास तें बहाल करण्याचे पूर्वीं कांहीं दिवसपर्यंत तरी तें रघुनाथपंताला दिलें होतें असें दिसतें.

१४. भेटीच्या वेळीं शिवाजीपाशीं तानाजी मालुसरा नव्हता, पण जिवा महाल्या होता.

१५. शिवाजीनें जावळीचे राजे चंद्रराव मोरे हे कैद केले होते. विश्वासघातानें त्याला मारलें ह्मणून वाचण्यांत येतें तें खोटें असलें पाहिजे.

१६. खानाच्या ब्राह्मण वकीलानें स्वामीसेवाधर्म चांगला व्यक्त केला यांत संशय नाहीं. ग्रांटडफप्रमाणें जर त्याचें आणि शिवाजीचें सूत्र होतें, तर खान पुरा झाल्यानंतर शिवाजीशीं लढण्याची त्याला कांहीं आवश्यकता नव्हती.

१७. शिवाजीनें खानास आलिंगन दिलें नाहीं. खानच अंगावर शत्रुभावानें चालून आला.

१८. शिवाजीकडून जिवाजी महालदार आणि मोरोपंत ( पिंगळे ? ) हे अबदुल्लाकडे वकीलीस गेले होते.

१९. खान मारला गेल्यानंतर फाजिलखान यानें शिवाजीशीं निकराचें युद्ध केलें. पण त्याचा पुरा पराभव होऊन घोड्यासहित तो कैद केला गेला.

२०. कोणत्याही प्रसंगीं ब्राह्मणावर शिवाजी हात टाकीत नसे.

२१. शत्रु असो अगर मित्र असो, शिवाजी शरणागताला मरण देत नसे, उलट शरणागतांचें सर्व प्रकारें रक्षण करीत असे.

२२. सदरेमध्यें झालेल्या गडबडीची हकीकत मुसलमानांपेक्षां मराठ्यांना चांगली माहीत असली पाहिजे. मुसलमानांच्या इतिहासांत आणि विशेषतः आपल्या विजयी शत्रूंविषयींच्या त्यांनीं दिलेल्या माहितींत कल्पनातिशयाच्या भुसापेक्षां जास्त कांहीं नसतें. तेव्हां अशा पक्षपाती इतिहासकारांनीं लिहिलेला इतिहास मुळींच विश्वासार्ह नाहीं. कोरड्या वाग्जाळाची जेवढी योग्यता तेवढीच त्यांची आहे.

२३. शिवाजीनें अबदुल्लाच्या भग्न फौजेस धर्मवाट देऊन जीवदान दिलें, यावरूनच त्याची सदयता दिसून येईल.

२४. अबदुल्ला सदरेपर्यंत बिनहत्यार आला होता, पण पुढें त्यानें हत्यार घेतलें. हत्यार जवळ नसतें तर त्यानें कट्यार कशी चालविली असती? कदाचित् पोंवाड्यामध्यें तलवार पुन्हां घेतलेल्या चरणाची कोठें गफलत झाली असेल.

२५. चोविसाव्या चौकांत 'डावे हातीं बिचवा त्याला' असें ह्मटलें आहे; आणि तिसाव्या चौकांत 'उजवे हातीं बिचवा त्याला' असा विरुद्ध चरण आहे. तेव्हां खरें कोणतें? उजवे हातांत बिचवा होता कीं डावे हातांत? आमचे मतें ज्या डावे हातांत वाघनख होतें, त्याच हातांत बिचवा असावा; कारण उजवा हात जर अशा रीतीनें खानास हत्यारबंद दिसता, तर त्यानें शिवाजीस दुरूनच रामराम केला असता. शिवाजीनें डावे हातांत वाघनख आणि बिचवा घेऊन तो हात त्या वेळच्या लांब अस्तनींत लपविला असेल. आणि उजवा हात—ज्यानें सलाम केला जातो तो—नि:शस्त्र ठेवला असावा. सलाम केल्यावर, समोरासमोर, प्रत्यक्ष उघडकीस आल्याशिवाय, उजव्या हातांत शस्त्र घेण्यास वेळ नव्हता हें नि:संशय आहे. शिवाजीनें ज्याअर्थी सलाम केला, त्याअर्थी त्याचा उजवा हात खानाच्या नजरेस पडला असलाच पाहिजे. त्याच हातांत जर त्यानें शस्त्र पाहिलें असतें, तर शिवाजीला आंवळून धरण्याची त्याची छाती झाली नसती. शिवाजी नि:शस्त्र आहे असें खानाला वाटूनच त्यानें दग्यानें कट्यार चालविली. सारांश, वर लिहिलेल्या विचारसरणीवरून वाघनख आणि बिचवा डाव्या हातांतच असावींत. तेव्हां 'उजवे हातांत' ही गाणाऱ्या गोंधळ्याची अगर लिहिणाराची चूक आहे.

२६. पहिल्या पोंवाड्यांत सिंहगड हें नांव कोठेंही नाहीं. पण तें दुसऱ्या पोंवाड्यांत आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं, पहिला पोंवाडा खान मारला गेल्यानंतर लवकर बनविला असावा, आणि तोच

सुधारून वाढवून, तानाजीनें सिंहगड हल्ला करून काबीज केल्यानंतर तयार झाला असावा. किंवा हा चरणच ("सिंहगड वृंदावन") क्षेपक असावा.

२७. अग्निनदासला ( किंवा अज्ञानदासाला ) इनामगांव कोणता दिला त्याचें नांव त्यानें सांगितलें नाहीं. दुसऱ्या पोंवाड्यांत ( १८९१ ) हें इनाम जप्त केलें असें वाटतें. कारण शेरभर सोन्याच्या तोड्यावर आणि एका घोड्यावरच तो खुष झाला असें दिसतें. हें इनाम बहुधा कोणी तरी, ही ओळ क्षेपक करून, अग्निनदासावर दडपलें असावें. पण शिवाजी इनाम जमीन फार करून, निदान सहज गोष्टीकरितां तरी, देत नसे हें लक्षांत आणलें ह्मणजे वरील इनामाची झूटाई तेव्हांच बाहेर पडेल.

## ६. अबदुल्ला हा गर्विष्ठ, हिंदुधर्मद्वेष्टा आणि दगाबाज होता, याला प्रमाणें.

१. आपल्या बादशहापाशीं शिवाजीस जिवंत धरून आणण्याविषयीं अबदुल्लाखान प्रतिज्ञा करून आला होता.

२. रस्त्यानें येतांना विनाकारण हिंदूंचीं देवालयें त्यानें फोडलीं आणि गाय मारली.

३. वांईला आल्यांनंतर खानानें बिनदिक्कत शिवाजीपाशीं खंड मागण्याचें जबर धारिष्ट केलें.

४. त्यानें शिवाजीला आपण होऊन वांईस भेटावयाला येण्यास बोलाविलें.

५. मुलूख बहाल करीन ह्मणून लालूच दाखवून खानाचे मनांत शिवाजीस दगा करावयाचा होता. खान मुलूख देण्याकरितां आला नव्हता. पण ज्यानें मुलूख घेतला, त्याचा बंदोबस्त करण्यास आला होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

६. इमान प्रमाण देऊन दगा करण्याचा त्याचा विचार होता.

७. सल्ल्याचें बोलणें चाललें असतांच चार हजार निवडक घोडे स्वार बरोबर घेऊन तो बेधडक सिंहाच्या गुहेंत शिरला.

८. शिवाजीस आपला विश्वास यावा याकरितां त्यानें शिष्टाई करण्यास वकील ब्राह्मण पाठविला. यावरून तो पक्का काफर असावा असें दिसतें.

९. खानाचे मनांत शिवाजीला कसेंही करून एकदाचें किल्ल्याबाहेर काढावयाचें होतें, आणि तो आपल्या तावडींत सांपडला ह्मणजे मग " शिवा तुम चलो विजापुराला " असें हळूच सांगावयाचें होतें.

१०. भेटीस जाण्याचेपूर्वीं खानानें चिलखती स्वार निवडून काढले होते, आणि त्यांस शिवाजी नजरेस पडतांच त्याला लंबा करण्यास त्यानें नीचपणानें हुकूम दिला होता.

११. शिवाजीला धरण्याकरितां किंवा ठार मारण्याकरितां तो अति उतावीळ होऊन शिवाजीचे पूर्वींच सदरेस येऊन बसला होता.

१२. सदरा करण्यांत बादशहापेक्षांही शिवाजीनें वरचढ केली हें पाहून अबदुल्ल्याच्या अंगाची लाही झाली.

१३. शिवाजी भेटीला आला असतां आणि त्यानें सलाम केला असतां, मगरूरीनें त्यानें त्यास उलट सलाम न करतां अपमानकारक अपशब्दमात्र बोलला. ह्या मस्तीबद्दल शिवाजी तेथेंच त्याला उभा चिरायचा, पण त्यानें मोठ्या मनानें गम खाल्ला.

१४. नंतर उद्धटरीतीनें " आपण विजापुराला आतां चलावें " असें खान शिवाजीस बोलला.

१५. तेव्हां शिवाजीनें त्याचा धि:कार केला. त्यावरून चवताळून एखाद्या मस्त पशूप्रमाणें खान शिवाजीवर घसरला आणि त्याला गच्च धरून त्याचे आंगावर त्यानें कट्यार चालविली.

१६. आणखीं एक कलम राहिलें तें हें कीं,—भोयांच्यासंबंधानें शिवाजीच्या वकीलांस संशय आला होता. त्यावरून असें दिसतें कीं,

ते गुप्तरीत्या हत्यारबंद लोक असून त्यांच्या साह्यानें आणि आपल्या शारीरिक अमानुष सामर्थ्यानें खानाचे मनांत शिवाजीला घायाळ करून त्याची उचलबांगडी करावयाची होती.

## ४. शिवाजीची सावधगिरी व त्याचा शहाणपणा.

### दगा कोणी केला ? खानानें कीं शिवाजीनें !

१. बाजी शामरावाला आपणास पकडण्याकरितां यापूर्वी विजापूरकरांनीं पाठविलें होतें, हें शिवाजी इतक्यांत विसरला नव्हता. तेव्हां तो पूर्वीपासूनच सावध राहावा हें साहाजिकच आहे.

२. शिवाजीनें खानास चीड येण्याजोगा प्रकार––ह्मणजे खानानें ज्याप्रमाणें हिंदूंचीं देवालयें फोडून गाई मारल्या त्याप्रमाणें––मुळींच केला नाहीं.

३. त्यानें खानाला वांईपर्यंत कोठेंही अडथळा केला नाहीं.

४. त्याला खानाचें बाह्यत: तरी भय वाटत होतें; त्याचें कारण तो कदाचित् दगा करील हेंच.

५. खानानें सल्लयाचें बोलणें लावलें तेव्हां तें शिवाजीस खरें वाटून " गड किल्ले कोट " यांची त्यानें त्यास सोडचिठी दिली.

६. खानानें आपल्या भेटीस यावें ह्मणून शिवाजीनें कोठें आग्रह केला नाहीं किंवा कांहीं आमिषही दाखविलें नाहीं. त्यानें खानाला वांईस न भेटण्याचें मुख्य महत्वाचें कारण हें कीं अबदुल्लयाचा अविश्वास आणि राजकारणरीत्या, शत्रूंच्या गोटांत जाऊन भेटून आलें असतां, लोकांत अपकीर्ति आणि कमदर्जा होईल ही भीति.

७. खानाचा आपल्यावरील रोष जाऊन त्यानें विकोपास जाऊं नये ह्मणून, त्यास खुष करण्याकरितां लाखों रुपये खर्च करून शिवाजीनें सदरा तयार करविल्या, आणि त्यांत खानानें कांहीं दिवस विश्रान्ति घ्यावी ह्मणून चिकाचे उत्तम पडदे, पिकदाण्या, लोडें, गाद्या, गिरद्या, सोनेरी उत्तम पलंग वगैरे सर्व प्रकारचें लागणारें बादशाई ऐषआरामाचें सामान ठेवलें होतें.

८. तथापि सल्ल्याचें बोलणें चाललें असतांच वांईच्या पुढें खानानें दांडगाईनें चार हजार शेलके घोडेस्वार जावळीस आणले आणि प्रतापगडास येऊन भिडला हें पाहून आणि बारीक चौकशीअंतीं खानाचा उद्देश दुष्ट आहे अशी पक्की खातरी झाल्यावर, शिवाजीनें नेपोलियन बोनापार्टासही सुचणार नाहीं अशा हुशारीनें रडतोंडीचा घांट मोठ्या सफाईनें बंद करविला. परंतु खान आपल्या सांपळ्यांत पुरा सांपडला असतांही त्याचेवर त्यानें छापा वगैरे लागलाच घातला नाहीं. खानानें आपल्यास दगा केला नाहीं तर आणि सल्ला झाला तर त्यास सोडून देण्याचें त्याच्या मनांत असावें. पण त्यानें दगा केलाच तर खुणेच्या तोफा मारून आपल्या फौजेकडून खान धुळीस मिळवावा, असा त्यानें आपल्या सरदारांस हुकूम दिला असावा.

९. शिवाजीनें अखेरपर्यंत खानाची कोणतीही खोड काढली नाहीं. मात्र प्रसंग आल्यास तयार असावें ह्मणून एखाद्या उत्तम अनुभविक सैनिकाप्रमाणें सर्व प्रकारची तयारी करण्यांत त्यानें मुळींही कसूर केली नाहीं.

१०. अबदुल्लयानें जशीं देवालयें फोडलीं आणि गाई मारिल्या, त्याप्रमाणें शिवाजीनें मुसलमानांच्या मशीदी फोडल्या नाहींत किंवा डुकरें मारून मशीदींत टाकलीं नाहींत.

११. सर्व अटी कबूल करून विशेष कारण नसतां खानाचें शिवाजीच्या भेटीस जाणें हें जितकें त्याच्या मनांतील दग्याचें झळझळीत द्योतक आहे, तितकेंच खानाला केवळ खूष करण्याकरितां—पण फारच जपून—शिवाजीचें खानाचे भेटीस येणें बहुत निर्मळ मनाचें आणि शहाणपणाचें दर्शक आहे. खान आला ह्मणूनच शिवाजी आला.

१२. एकट्या खानाला एकांगी करून मारण्यांत शिवाजीचा कांहीं तादृश फायदा नव्हता. त्याचा मतलब फार झालें तर त्याची फौज बुडविण्याचा होता. ती फौज वांईस आल्यानंतर अर्धीमुर्धी त्याच्या कैचींत सांपडलीच होती; आणि त्यांतही विशेषत: रडतोंडीचा घांट

उतरून जावळींत आल्यानंतर तर ती त्याच्या जबड्यांत अचूक पडली असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. ती अडचणीच्या जाग्यांत सांपडल्यामुळें आणि तरतरित नव्या दमाच्या शूर फौजेनें ईर्षेनें चहूंकडून कोंडली असल्यामुळें तेथें प्रत्यक्ष "इदिलशा पाच्छा" मदतीस आला असता तरी तिची धडगत नव्हती. तिचा चुराडाच व्हावयाचा हा ईश्वरी संकेत ठरल्यासारखाच होता. शिवाजीसारख्या युद्धकलाभिज्ञ मनुष्याच्या नजरेंतून ही गोष्ट गेली नसेल.

१३. शास्ताखानाच्या ८० हजार फौजेंत नुसत्या २५ लोकांनिशीं शिकारीस निघणारा सिंह, दोन तीन माणसांना फसवून आणून त्यांचा जीव घेईल असें मुळींच संभवत नाहीं.

१४. अबदुल्लयाच्या फौजेपेक्षां मोठमोठ्या फौजा घेऊन विजापुराहून आणि दिल्लीहून नामांकित वजीर त्याच्यावर चालून आले, पण त्यानें कोणाला दगा केला नाहीं.

१५. (अ) राज्यांतील बराच मोठा भाग शत्रूस तोडून देण्याचा दुर्धर प्रसंग आला तरी शिवाजीनें, असा प्रसंग आपल्यावर आणणाऱ्या मिर्झा राजा जयसिंग याच्या किंवा दिलेरखानाच्या पोटांत वाघनखें खुपसलीं नाहींत. दोघांचीही त्यानें भेट घेतली होती व दोघांनींही ती अत्यादरें दिली होती हें जगजाहीर आहे. (ब) आपल्या प्रत्यक्ष बापास कैद करून विजापुरांत त्यास भिंतींत चिणण्याची विजापुरच्या बादशहानें दगाबाजीनें तयारी करविली होती; तरी ह्या त्याच्या भागूबाई-पणाच्या कृत्याबद्दल शिवाजीनें कधीं त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं नाहींत. (क) गोंवळकोंड्याचा कुतुबशहा यानेंही त्याची भेट घेतली होती, पण आपली चरबी बाहेर पडेल अशी त्याला भीति वाटली नाहीं.

१६. अबदुल्लयानें शिवाजीचा कोठेंही पराभव अझून केला नव्हता. तेव्हां दोन हात होण्याचे पूर्वींच शिवाजीसारखा महायोद्धा त्याचा अशा निंद्य रीतीनें जीव घेईल असें बिलकुल संभवत नाहीं.

१७. झुंझारराव घाटग्यासारखा स्वामीपरायण सरदार, अबदुल्लच्यास दग्यानें मारलें असतें तर शिवाजीचा पूर्ण निषेध केल्याशिवाय राहताना, आणि त्याच्यापासून पोषाखही घेताना. ग्रांटडफच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, मुसलमानांनींसुद्धां शिवाजीपासून पोषाख उपटले असावेत. तेव्हां दगाच झाला असता, तर ह्या मंडळींनीं तो कधींही घेतला नसता.

१८. शिवाजीच्या एकंदर कारकीर्दीवरून तो मोठ्या उदार मनाचा दयाळू अंत:करणाचा, शूर छातीचा आणि पुण्यश्लोक असा राजा होता असें दिसून येईल. तेव्हां खुनासारखें नीच कृत्य त्यानें कधींच केलें नसेल. ज्या बहादूर शूर पठ्ठयानें शेंकडो रणांगणांत हजारो शत्रूंस लोळविलें, तो कधीं असें नीच कृत्य करील असें कोणाही समंजस मनुष्याचे मनांतसुद्धां येणार नाहीं. खूनच जर त्याचे मनांत करावयाचा होता, तर खान ज्या वेळेस सदरेस आला त्यावेळींच त्याचेवर आपल्या लोकांकडून गर्दी करवून ठार करता. शिवाजीनें स्वत:चा जीव कधींच धोक्यांत घातला नसता. तेवढें काम शिवाजीच्या येथल्या एखाद्या सडक्या माणसानेंसुद्धां केलें असतें. पण शिवाजीच्या मनांत होईल तोंपावेतों सामदामानें हें प्रकरण मिटवायाचें होतें. खानानें शिवाजीचा खून करण्याकरितां तलवार चालविल्यानंतर शिवाजीनें आत्मसंरक्षणार्थ त्याला मारिला, यांत त्यानें पीनल कोडच्या विरुद्ध एखादा अन्याय किंवा पातक केलें असें कोणीही ह्मणूं शकणार नाहीं. उलट केलें तें यथान्याय केलें असें ह्मणणें भाग आहे. तसें केलें नसतें तर मात्र त्याला आह्मी मठ्ठ डोक्याचा असें ह्मटलें असतें.

१९. ज्याअर्थी खानाचें डोकें कापून शिवाजी गडावर घेऊन गेला, तरी त्याचा कोणी पाठलाग केला नाहीं, त्याअर्थी खान भेटीस आला तेव्हां तो तेथें फौजबंद नव्हता हें उघड आहे. शिवाय "सदरा" प्रतापगडच्या पायथ्यास शृंगारिल्या असल्यामुळें गडावर जाऊन पोंचण्यास पाव मैलाचा तरी पल्ला असला पाहिजे. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, खानाची फौज निदान किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्याच्या बाहेर

ह्मणजे निदान एक कोसाच्या बाहेर असली पाहिजे. याच्या आंत शिवाजीनें ती येऊं दिली नसती. तेव्हां विचाराअन्तीं हें स्पष्ट दिसतें कीं, इतक्या अंतरावरून हत्यारबंद लोकांशिवाय सदरेपर्यंत येतांना रस्त्यांत कोठेंही खानाला दगा न करितां शिवाजीनें येऊं दिलें, त्यावरून त्याचे मनांत मुळींच दगा करावयाचा नव्हता हें निर्विवाद आणि निःसंशय सिद्ध होतें.

२०. शिवाजीनें खानाला जर दग्यानें मारलें असतें, तर रामदास स्वामीसारख्या जगास केवळ तुच्छ मानणाऱ्या साधूंनीं शिवाजीची कधींही स्तुति केली नसती व त्याच्या कृत्यांना " प्रताप " हें नांव दिलें नसतें. शिवाजीचें वळण संभाजीस लागावें व घरबुडव्ये व्यवहार त्यानें सोडावे, ह्मणून त्यास समर्थ उपदेश करतात कीं " शिवराजाचें आठवावें रूप ( नांवलौकिक ) । शिवराजाचा आठवावा साक्षेप । शिवराजाचा आठवावा प्रताप । भूमंडळीं " ॥

२१. भूषण कवीनेंही ठिकठिकाणीं शिवाजीची स्तुतीच केली आहे. सारांश कोणत्याही दिशेनें विचार केला तरी शिवाजीनें फक्त आत्मसंरक्षणार्थच अबदुल्लचाला मारलें हें दिसून येईल. आत्मसंरक्षणार्थ जितका शिवाजी तयार होता, तितकाच पूर्वीपासून दगा करण्याच्या विचारांत खान गर्क झाला होता असें साफ दिसून येतें. मुसलमान इतिहासकारांचा मेंदू, मत्सर, द्वेष आणि चीड या रोगांनीं ग्रस्त होऊन घाण झाल्यामुळें त्यांनीं हिंदुलोकांस आणि हिंदूच्या नामांकित राजांस—ज्यांनीं मुसलमानाचीं नाकें चांगलीं ठेंचली—त्यांस अद्वातद्वा शिव्या देऊन खोटेनाटे त्यांचेवर दोषारोप केले आहेत, हें आह्मीच ह्मणतों असें नाहीं; पण जुने आंग्ल इतिहासकारही कबूल करितात. करितां त्यांच्या ह्या सूड घेण्याच्या शिखंडी रीतीची आह्मांस अति कींव येते. आणि ग्रांटडफ केवळ हडेलहप्प असल्यामुळें त्यानें जाणून बुजून अंधत्वानें—हिंदूचा पुरावा उलट असतांही—मुसलमानांच्या कल्पनामय इतिहासावर केवळ भार ठेऊन, उज्वल कीर्तीच्या शिवाजीमहाराजांस—ते युरोपांतील महान्

योद्ध्यांपेक्षां श्रेष्ठ होतील या भीतीनें कीं काय कोण जाणे—किंवा कदाचित् त्यांच्यावर दृष्ट पडेल ह्मणून—हें एक गालबोट लावलें याबद्दल त्यांची कशी संभावना करावयाची हें गूढ पडल्याबद्दल आह्मांस दिलगिरी वाटते.

## ५. हा निबंध लिहिण्याचा हेतु.

हा खानप्रकरणांतील शिवाजीवर जबरदस्तीनें दडपलेला खुनाचा आरोप खोटा असल्याबद्दल आपआपल्यापरी पुष्कळजणांनीं लेख लिहिले आहेत. त्यांत रा० रा० राजारामशास्त्री भागवत, कैलासवासी रा० उदास बी. ए., मुंबईचे महाराष्ट्रइतिहासभक्त प्रसिद्ध करकरिया व १८९७च्या वावटळींतील प्रो० जिनसीवाले, भानु, टिळक आणि परांजपे वगैरे विद्वद्रत्नें प्रमुख आहेत. पण यांपैकीं कै० उदास खेरीज-करून कोणीही चांगला बारीक मार्मिक रीतीनें या गोष्टीचा खल केला नाहीं. त्यांच्या वेळीं शिवाजी महाराजांवरचा जो लहान पोंवाडा छापला गेला, त्याचा त्यांनीं चांगला उपयोग केला आहे. आणि सुदैवानें ते जर मोठा पोंवाडा प्रसिद्ध होईपयत वांचले असते, तर प्रस्तुतचा प्रयत्न कर-ण्याची आह्मांस कांहीं जरूरी राहिली नसती. रा० रा० राजवाडे यांनीं ‘ साधनां ’च्या ४ थ्या खंडांत शिवाजीच्या वेळच्या इतिहासाचें बरेंच उद्घाटन केलें आहे. परंतु ती “ लहानशी झटापट सहजासहजी आटोपून ” घेण्याची त्यांना फार घाई झाल्यामुळें शिवाजीच्या चरित्रांतील मुख्य मुद्याच्या गोष्टींचा यथास्थित रीतीनें सांगोपांग विचार करण्यास त्यांस फावलें नसावें. तेव्हां प्रस्तुतचा प्रयत्न करणें जरूर वाटलें. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, ‘ भारतवर्षा ’त प्रकाशकांनीं वचन दिल्याप्रमाणें अवरं-गजेबानें शिवाजीला पाठविलेलीं पत्रें छापून प्रसिद्ध झालीं असतीं तर आणि प्रो० भानूनीं सभेंत कबूल केल्याप्रमाणें शिवाजी महाराजांच्या तर्फेचा त्यांच्याजवळील पुरावा जगापुढें कबूल केल्यापासून “ दोन वर्षांनीं ” आला असता, तर त्यांच्यापासून फार फायदा झाला असता. पण दोन्ही वचनें पुरीं करण्याची त्या त्या महसुफांमध्यें कुवत दिसत नाहीं, किंवा

त्यांनीं लोकांस दिलेलीं अभिवचनें अंतःकरणापासून दिलेलीं नसतात असें अनुभवान्तीं मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. वरील दोन्ही सभ्य गृहस्थांस ह्या आमच्या बोलण्याचा राग आला तर त्यांनीं आतां मागेंपुढें न पहातां आपल्यापाशीं जो पुरावा असेल तो किंवा जो पत्रव्यवहार असेल तो छापून प्रसिद्ध करून आपला राग घालवावा हें त्यांना उचित आहे.

इतकें हल्लीं बस्स आहे. पुढें फुरसतीअंतीं वाचकांची आणखी भेट घेऊं, एवढेंच वचन देऊन आतां रजा घेतों.

# शिवाजी महाराजांवरील पोंवाडा

## आणि

# त्यांतील ऐतिहासिक माहिती.

[ एप्रिल अंकावरून समाप्त. ]

## शिवाजीच्या पोंवाड्यांचें परीक्षण.

ग्रंथमालेच्या एप्रिल महिन्याचे अंकांत, शिवाजीच्या पोंवाड्यांत ऐतिहासिक माहिती कोणती आहे व ती किती महत्वाची आहे हें बहुतेक खुलासेवार व मुद्देसूद आह्मीं दाखवून दिलें आहे. आतां ह्या अंकांत परीक्षणास घेतलेल्या ह्या दोन पोंवाड्यांत फरक कोणकोणते आहेत व अधिक विश्वसनीय पोंवाडा कोणता याचा सावकाश विचार करण्याचें मनांत योजिलें आहे. आतां हें विवेचन सर्वांगानें परिपूर्ण केलें आहे असें ह्मणण्याचें धाडस आह्मांला केव्हांही व्हावयाचें नाहीं. कारण एकाच्या दृष्टीनें जें पूर्ण आणि सुव्यवस्थित ह्मणून दिसेल तेंच दुसऱ्याचे दृष्टीनें अपूर्ण आणि अव्यवस्थित दिसावयाचें हा जगांतील स्वाभाविक नियमच आहे. तें कसेंही दिसो; आमचें ह्मणणें हें कीं ह्या लेखामध्यें जीं कांहीं योग्य व्यंगें दिसतील तीं कोणत्याही इतिहास-भक्तानें प्रसिद्धपणें कळविलीं तर त्या सद्गृहस्थाचे आह्मी फार आभारी होऊं. आह्मांला जें कांहीं ह्या इतिहासप्रसिद्ध खानवध प्रकरणीं सुचलें तें आह्मी जगापुढें ठेवित आहों. त्यापेक्षां दुसऱ्या कोणास जास्त सुच-ल्यास त्यानें तें लोकांपुढें एकदम ठेवावें. ह्मणजे सर्वांस विचार करण्यास ठीक पडेल. सत्यासत्यतेचा विचार करण्यास इतिहासज्ञ समर्थ आहेतच. आतां हातीं घेतलेल्या विषयाकडे वळूं.

### १. सदरील पोंवाड्यांच्या अस्सलपणाविषयीं विचार.

निरनिराळे पोंवाडे ज्या ज्या वेळीं रचले गेले, त्या त्या वेळीं खुद्द त्या त्या शाहिरानें ते लिहून ठेवले असते आणि त्याच अस्सल प्रती आज उपलब्ध झाल्या असत्या तर त्यांपासून इतिहासाच्या कामीं चांगलाच फायदा झाला असता यांत तिळमात्र संशय नाहीं. अशा रीतीनें उपलब्ध झालेले पोंवाडे आणि गोंधळ्यांपाशीं तेच परंपरेनें चालत असलेले पोंवाडे यामध्यें अमुक कालामध्यें अमुक फरक होतो हें दिसून आलें असतें. गोंधळी हे अशिक्षित आणि अक्षरशत्रू असल्यामुळें त्यांना मराठी भाषा शुद्ध बोलतां येत नाहीं आणि त्यामुळें पोंवाड्यांतील कित्येक शब्दांचीं त्यांचे हातून नकळत अपभ्रष्ट रूपें होतात; कित्येक शब्द अगदींच दुर्बोध होऊन जातात व अशांचा छडा लावणें अत्यंत दुर्घट होतें. तेव्हां जर अस्सल लेखी पोंवाडे मिळाले असते तर अशा दुर्बोध शब्दांचा अर्थ आपल्याला सुगम झाला असता. परंतु दुर्दैवानें अशा प्रती अझूनपर्यंत कोणास मिळाल्या नाहींत व पुढें त्या मिळण्याची आतां विशेष उमेद दिसत नाहीं. याकरितां हल्लीं जशा स्थितींत हे पोंवाडे आपल्याला मिळतील तशा स्थितींतच ते अंगीकृत केले पाहिजेत. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. शब्दांची अपभ्रष्ट रूपें जरीं गोंधळ्यांच्या पोंवाड्यांत आढळलीं तरीं बनावट मजकूर मात्र बहुधा कधींही सांपडत नाहीं हें विसरतां कामा नये. एखादेवेळीं चरणचे चरण किंवा चौकाचे चौक विस्मृतीमुळें गोंधळी गडप करितात; परंतु मुळांत स्वतःची नवीन भर घालण्याचें महत्पाप मात्र बहुतेक कधींही त्यांचे हातून घडत नाहीं. त्यामुळें शाहिरानें गोंवलेलीच ऐतिहासिक माहिती बिनधोक आपल्याला मिळते. तिची ऐतिहासिक योग्यता ठरविण्याचें काम इतिहासकारांचें आहे.

### २. शिवाजीचे दोनीं पोंवाडे शुद्ध छापलेले नाहींत.

वर चार शब्द जे लिहिले आहेत त्यांचें कारण हें कीं, मि० शालिग्राम यांनीं छापलेले शिवाजीचे दोनीं पोंवाडे बरेच अशुद्ध छापले गेले

आहेत. पहिल्यांदा छापलेला शिवाजीचा लहान पोंवाडा विविधज्ञानविस्तारांतून त्यांनीं घेतला आहे. पण मि० शाळिग्रामांच्या छपाईंत मुद्रणदोष बरेच झाले आहेत. त्या दोषांचें त्यांनीं शुद्धिपत्रही दिलें नाहीं! मुद्रणदोषांखेरीज अपभ्रष्ट शब्दांचाही त्यांनीं छडा लावला नाहीं. ह्मणून अर्थदुर्बोधत्वामुळें वाचकांचा हिरमोड होतो. दुसरा पोंवाडा त्यांनीं, श्रीमंत पंत प्रतिनिधी साहेबांनीं आपल्या संग्रहांतून पाठविलेल्या प्रतीवरून घेऊन छापला आहे. मि० शाळिग्रामांनीं, श्रीमंतांनीं पाठविलेल्या या प्रतीच्या लेखनकालाबद्दल चकार शब्दही काढला नाहीं. त्यांनीं, ती प्रत लिहिली गेली केव्हां; तिचा कागद किती जुना होता; अक्षर जुन्या वळणाचें कीं नव्या वळणाचें होतें वगैरेबद्दल चार शब्द लिहावयास पाहिजे होते तें कांहींच केलें नाहीं. जर ही लेखी प्रत फार जुनी असेल तर तिच्यांतील मजकुराचे खरेपणासंबंधानें मुळीं शंकाच घेण्यास नको. असो; एकंदरींत मि० शाळिग्रामांनीं जी ही अनास्था दाखविली आहे ती त्यांच्या चौकसबुद्धीला हानिकारक आहे. आतां आह्मीं दोनीं पोंवाडे प्रथमतः समजले तेवढे यथामति शुद्ध करण्याचा प्रयत्न करितों. कदाचित् आह्मीं शुद्ध ह्मणून जे केलें तेंच जर अशुद्ध असेल, तर ज्यांस तें अशुद्ध असें दिसून येईल ते मेहेरबानीनें शुद्ध कोणतें तें प्रसिद्ध करतील.

## ( अ ) पहिल्या पोंवाड्यांतील अशुद्धें.

| अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|
| ( १ ) कुबळघर वेढीलें इ० ( चौक २ ), | कमळगड वेढीला इ०. |
| ( २ ) देवक्या जिवाजीला ( चौ० ३ ), | देवकान्त्या जिवाजीला. |
| ( ३ ) सडंग त्रिमुखरायाला ( चौ० ३ ), | संगें तिमुख ( त्रिंबक? ) रायाला. |
| ( ४ ) न्हाटो न्हाटो रे भाई बोलला ( चौ० ४ ), | आन हटो हटो रे भाई बोलला. |

| अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|
| ( ५ ) जावळीस दर संवारितों ( चौ० ९ ), | जावळींत सदरा संवारितों. |
| ( ६ ) पिंगळ्या सुभानाला ( चौ० ९ ), | इंगळ्या सुभानाला । |
| ( ७ ) महिकुल माजी इ० ( चौ० ९ ), | मयफल माजी इ० । |
| ( ८ ) तसलीम माझी जिजा येवू तुला ( चौ० ७ ), | तसलीम माझी जिजाऊ तुला । |
| ( ९ ) पुतन्या उमाजीला । राजाला पांचशें लोक दिले त्याला । ( चौ० ७ ), | पुतण्या उमाजी राजाला । पांचशें लोक दिले त्याला. |
| ( १० ) साळस वर्णनाचें पाणी । ( चौ० ७ ), | सदरे सुवर्णाचें पाणी । |
| ( ११ ) ऐशा सदरा नाहीं आल्या । इदलशा बाछावाला । ( चौ० ८ ) | ऐशा सदरा नाहीं । अल्ली अदिलशा बाछावाला । |
| ( १२ ) भरणा दिवाणका रस्ता । ( चौ० ८ ), | भरना दिवानको रसदा । |
| ( १३ ) पटका कमरेचा सोडला । ( चौ० ९ ), | पटा कमरेचा सोडला । |
| ( १४ ) परतरे माघारा सरजा शिवाजी बोलला । ( चौ० १० ) | परत रे माघारा सरजा शिवाजी बोलला । |

## ( ब ) दुसऱ्या पोंवाड्यांतील अशुद्धें.

| अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|
| ( १ ) बाच्छाय पाठविलें प्रमाण । ( चौ० ६ ), | बाच्छायें पाठविलें फरमान । |
| ( २ ) कोतवाल तेजी धांवा घेती । ( चौ० ९ ), | कोतल ताजी धांवा घेती । |
| ( ३ ) सौंदळीं भांडता इ० । ( चौ० १३ ), | दों दळें ( ? ) भांडतां इ० । |

| अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|
| ( ४ ) खंड काय मला मागतो। ( चौ० १७ ), | खान काय मला मागतो। |
| ( ५ ) हात चालवा व्हा। ( चौ० २१ ), | हातचा लव्हा हा। |
| ( ६ ) सरदार नाहीं कोणी तिसरा। ( चौ० ३१ ), | सदरे नाहीं कोणी तिसरा। |
| ( ७ ) काकड्या सुरव्या लोटला। ( चौ० ३४ ), | कांकड्या सुरेराव लोटला। |
| ( ८ ) यश राज्याच्या खंड्याला। ( चौ० ३५ ), | यश राजियाच्या खड्गाला। |
| ( ९ ) दृष्टी पर्यंस शिवाजीला। ( चौ० ३६ ), | दृष्टीपरी यश शिवाजीला। |
| ( १० ) यश राज्याच्या खडाला। ( चौ० ३६ ), | यश राजियाच्या खड्गाला। |
| ( ११ ) बीरमाल राज्याचा गाइला। ( चौ० ३७ ), | परिमळ राजियाचा गाइला। |

### ३. पहिला पोंवाडा दुसऱ्याच्या अगोदर रचला गेला.

( १ ) पहिल्या पोंवाड्याबद्दल बक्षीस जिजाबाईनें दिलें व दुसऱ्याबद्दल खुद्द शिवाजीनें दिलें. पहिल्या पोंवाड्याच्या सरत्या शेवटच्या चौकांत ‘ कैदीन भांडण पनाळा । नही देई बाछाहाला । ’ हा चरण आहे. त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, अफजलखानाचा वध होऊन एकामागून एक वीर विजापुराहून चालून आले. त्यांचा पराभव शिवाजीच्या हातून झाल्यावर उशीर न लावितां ‘ बाइन शाहीर बोलाविले ।’ आणि आपल्या मुलाच्या पराक्रमांचा पोंवाडा बनवून घेऊन कवीला तिनें बक्षीस दिलें. आतां दुसऱ्या पोंवाड्याच्या शेवटच्या चौकांतील चरण हा आहे “ शिवाजी सरज्यानें । इनाम घोडा बक्षीस दिला । शेरभर सोन्याचा लंगर हातांत घातला ।” यावरून हें निर्विवाद सिद्ध होतें कीं लहान पोंवाडा जिजाबाईनें आणि मोठा शिवाजीनें रचविला. असें

नसतें तर निरनिराळीं बक्षीसें देण्याचें कांहीं कारण नव्हतें. शिद्धी जोहारचा पराभव करीपर्यंत शिवाजीस दम घेण्यासही फुरसत नव्हती मग सुधारून पोंवाडा बनविण्यास वेळ कोठली? तेव्हां जिजाऊनेंच तें काम अगोदर पत्करिलें. ( २ ) लहान पोंवाड्यांत जेथें तेथें 'सदर' हा शब्द उपयोगांत आणला आहे. पण दुसऱ्यांत 'सभा' हा शब्द एकदोन ठिकाणीं ( चौक ६,७. ) उपयोगांत आणला आहे. मुसलमानी शब्दांस प्रतिशब्द देणारा 'राजव्यवहारकोश' अस्तित्वांत आल्यानंतर 'सभा' हा शब्द प्रचारांत आला असावा. हा कोश शिवाजीच्या राज्याभिषेकाचे वेळीं तयार केला गेला होता. तेव्हां 'राज्यव्यवहार' कोशाचे रचनाकालानंतर थोडक्याच दिवसांनीं हा पोंवाडा झाला असें ह्मणणें भाग पडतें. ( ३ ) पहिल्या पोंवाड्यांत जेथें तेथें सलाम हा शब्द वापरला आहे. देवाला, वडील माणसांना वगैरे शिवाजीनें सलाम केल्याचें लिहिलें आहे; "पहिला सलाम महादेवाला। दुसरा सलाम शहाजीला।" इ०. पण दुसऱ्या पोंवाड्यांत एका ठिकाणीं 'रामराम' केल्याचें उदाहरण आहे; "माझा रामराम दादानु। गडच्या गड-कऱ्यां बोलला।" यावरून हें भक्कम अनुमान निघतें कीं रामराम करण्याचा प्रघात रामदास स्वामीनीं राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी-कडून घालविला. त्यानंतर लौकरच हा पोंवाडा रचला गेला असावा. या पोंवाड्यांतही देवास, वडीलमाणसांस वगैरे शिवाजीनें सलाम केल्याचें लिहिलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं सलाम करण्याची हाडीं खिळलेली लोकांची रीत अजून पुरी सुटली नव्हती. ( ४ ) दुसऱ्या पोंवाड्यांत माहिती पहिल्यापेक्षां जास्त असून अधिक विश्वासनीय आहे. तेव्हां पहिला पोंवाडा बनविला गेल्यानंतर त्यांतील चुका लक्षांत येऊन दुसरा पोंवाडा बनविण्याची शिवाजीस अवश्यकता भासली असावी.

### ४. ह्या दोन्हीं पोंवाड्यांत बराच फरक आहे.

या दोन्हीं पोंवाड्यांत बऱ्याच ठिकाणीं महत्वाचे फरक आहेत ते वाचकांच्या समोर ठेवणें इष्ट आहे. लहान पोंवाड्यापेक्षां मोठ्या

पोंवाड्यांत जास्त माहिती कोणती; कोणत्या गोष्टींची पुनरुक्ती केलेली आहे; कोणतीची नाहीं; कोणती गोष्ट सुधारली आहे आणि कोणती दुरुस्त केली आहे, वगैरे जे फरक आहेत ते वाचकांस समजले ह्मणजे मोठा पोंवाडाच जास्त विश्वसनीय आहे हें त्यांनाही दिसून येईल. आणि जरी या खानवधप्रसंगाचा पत्रव्यवहार इतःपर आपल्यास सांपडला नाहीं, तरी प्रस्तुत उपलब्ध असलेला मोठा पोंवाडा, तत्कालीन कवीनें रचला असल्यामुळें, अस्सल पुराव्यादाखल समजून, सर्वथैव भरंवशास पात्र आहे याबद्दलची त्यांची खात्री होईल. तेव्हां हा आमचा प्रस्तुतचा निबंध लिहिण्याचा प्रयत्न अगदींच अप्रस्तुत आहे, असें निदान समंजस लोकांस तरी वाटावयाचें नाहीं अशी आह्मांस मोठी उमेद आहे.

## ९. या फरकांचीं कारणें.

मागच्या निबंधांत आह्मीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, मि० शाळिग्राम यांनीं १८९१ सालीं छापलेला शिवाजीचा पोंवाडा, हा लहान पोंवाड्याचें सुधारलेलें, दुरुस्त केलेलें आणि वाढविलेलें रूपान्तर आहे. तें कसें हें आतां ह्या अंकांत खुलाशानें सांगूं. पहिला पोंवाडा घाईनें बनला गेला असल्यामुळें त्यामध्यें राहिलेल्या कांहीं चुका दुसऱ्या पोंवाड्यांत ( शिवाजीपासून खरी माहिती मिळाल्या कारणानें ) सुधारल्या गेल्या आहेत, हें खालील विवेचनावरून आमच्या वाचकांस दिसून येईल. दुसऱ्यांत कांहीं ठिकाणीं बरीच विस्तृत माहिती दिली आहे; आणि जी माहिती खरी असूनही विशेष महत्वाचीशी वाटली नाहीं, ती कवीनें पूर्वींच्यांत आली असें समजून, दुसऱ्यांत दिली नाहीं. आतां, पहिल्यांत कांहीं माहिती अविश्वसनीय आणि कांहीं अपुर्ती कां? तर या प्रश्नाचें उत्तर असें चोख देतां येईल कीं, शिवाजीच्या मातुश्रीनें शाहिरास बोलावून आणून त्या प्रसिद्ध द्वंद्वयुद्धाची आपल्याला होती तेवढीच आणि होती तशीच माहिती देऊन तो पोंवाडा रचवून घेतला, त्यामुळें त्याच्यांत थोडी उणीव राहणें साहजिकच आहे. त्या प्रसिद्ध

प्रसंगीं हजर असलेल्या जिवा महाल्यापासून किंवा खुद्द शिवाजीपासून तिनें आपली माहिती पक्की करून घेतल्याचा पोंवाड्यांत कोठेंही उल्लेख नाहीं. तेव्हां अशा स्थितींत त्या पोंवाड्यांत कांहीं थोड्याशा चुका राहाव्या यांत फारसें आश्चर्य नाहीं. पन्हाळ्यास सिद्धीजोहारनें धरलेल्या कोंयंडींतून आपला प्रिय पुत्र शिवाजी साफ निसटून गेला हें पाहून तेव्हांच्या त्या आनंदभरांत बाईनें पोंवाडा एकदांचा बनवून घेतला. बायकांची माहिती अगदीं तंतोतंत बराबर असतेच असें नाहीं. शिवाय जिजाबाईनें खानाचें आणि शिवाजीचें द्वंद्व प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलें नव्हतें. तेव्हां तिनें कवीस सांगितलेली ऐकीव माहिती आणि ज्यांनीं प्रत्यक्ष तो प्रसंग घडतांना आपल्या डोळ्यांनीं पाहिला त्यांची माहिती यांमध्यें थोडी बहुत तफावत राहणें साहजिक आहे. जिजाबाईचा मुख्य उद्देश एवढाच कीं, आपल्या पुत्राचा अद्भुत पराक्रम कवनांत गोंऊन तो प्रत्येक माणसाला ऐकावयास मिळण्याची सोय करून द्यावी व त्यायोगानें आपल्या पुत्राची कीर्ति दिगंतरीं अखंड दुमदुमत राहावी. तेव्हां कार्यपरंपरेकडे तिचें किंचित् दुर्लक्ष्य व्हावें यांत कांहीं विशेष नवल नाहीं. शिवाजी नेहमीं शत्रूंच्या राज्यांत स्वाऱ्या शिकाऱ्या करण्यांत गुंतला असल्यामुळें त्याला तो पोंवाडा तेव्हांच दुरुस्त करून घेण्यास फुरसत मिळाली नसावी. पुढें वेळ मिळाल्यानंतर शिवाजीनें त्या राहिलेल्या चुका दुरुस्त करवून दुसरा पोंवाडा रचून घेतला. याशिवाय दुसरें योग्य अनुमान कांहीं होऊं शकत नाहीं.

## ६. पहिल्या पोंवाड्यांतील चुका व त्यांची दुरुस्ती.

हे दोनीं पोंवाडे एकमेकांशीं ताडून पाहिले ह्मणजे ह्या चुका एकदम दृष्टीस पडतात. [ १ ] पहिली चुकी ह्मटली ह्मणजे खानाबरोबरच्या घोडेस्वारांची दिलेली संख्या. पहिल्या पोंवाड्यांत जेथें चवदा हजार घोडेस्वार होते असें ह्मटलें आहे तेथें मोठ्यांत बारा हजार ह्मणून स्पष्ट आहे. बऱ्याच बखरींत हीच संख्या दिली आहे त्यावरून खानाबरोबर बारा हजार उमदी फौज असावी असें वाटतें. येथें पूर्वीं सांगितलेली ही

गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं ज्या चुका पहिल्या पोंवाड्यांत राहिल्या आहेत, त्या अज्ञानदासानें दुसऱ्यांत उलट पुरावा देऊनच दुरुस्त केल्या आहेत. ज्या गोष्टींविषयीं तो स्पष्टपणें विरुद्ध बोलत नाहीं, त्या गोष्टी कदाचित् खऱ्या असतील. पण त्यास त्या विशेष महत्वाच्या न वाटल्यामुळें त्यानें त्यांचा दुसऱ्यांत समावेश केला नसावा. [ २ ] पहिल्यांत विजापूरच्या कोटाच्या बाहेर निशाणापाशीं खान पडला असें ह्मटलें आहे. पण ही चुकी दुसऱ्यांत दुरुस्त करून " फत्या लसकरा हत्ती मेला " हा अपशकुन झाल्याचें विदित केलें आहे. [ ३ ] पहिल्यांत " दोनी वाघनखें रायाच्या पंज्याला " असें ह्मटलें आहे. पण दुसऱ्या पोंवाड्यांत एकाच हातांत वाघनखें होतीं असें लिहिलें आहे. [ ४ ] पहिल्यांत खानानें " चालून रडतोंडीची घांटी । चढून गडवेढा दिला । चवदा दिवस कोंड केला।" असें ह्मटलें आहे. पण दुसऱ्यांत फक्त खानाचा आणि त्याच्या बरोबरच्या उमरावांचा शिवाजीस कोंडण्याचा विचार घाटत होता असें ह्मटलें आहे. " वजीर उंबराव बोलती । शिवाजीस गडे कोंडू ह्मणती । " यावरून प्रत्यक्ष वेढा दिला नव्हता हें उघड आहे. [ ५ ] खानानें प्रथमतः कट्यार चालविल्यानंतर शिवाजीनें विचव्याचा मारा करून खानाचा कोथळा बाहेर काढला. तेव्हां ' अबदुलखान लष्करी भला । पटका [ ? पटा ] कमरेचा सोडला । ' असें पहिल्या पोंवाड्यांत विधान केलें आहे; पण दुसऱ्यांत खानाचें दोंद फाडल्यानंतर शिवाजी जेव्हां त्याच्यापासून दूर एकीकडे सरकला तेव्हां खानानें तलवार कोठें तरी जवळच असणाऱ्या माणसापासून मागून घेतली. ' खान लव्हा लव्हा बोलिला । खानाचा लव्हा बेगिन आला. ' पण ही भेटीच्या वेळची खास घडलेली गोष्ट जिजाबाईस काय माहीत? वरील उताऱ्यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, पोट फाटलें त्यावेळीं खानाच्या कमरेस पटा नव्हता. तो कोठें तरी जवळच दुसऱ्या माणसापाशीं होता हें ' खानाचा लव्हा बेगिन आला ' या चरणावरून अगदीं उघड होतें. जिजाबाईला एवढेंच माहीत कीं, खानानें शिवाजीवर दग्यानें हात चालविल्यानंतर,

शिवाजीनें त्याला ठार केलें. [ ६ ] पहिल्या पोंवाड्यांत खान मारला गेल्यावर कार्यपरंपरा अशी दिली आहे :—

" खान पडलासा देखिला । सैद बंडू उठावला । मारिला पटा त्याचा । शिवाजीनें वरचेवर तोलला । सैद जो मारिला । खांद्यापासून केला सारा । सैद बंडू पडलासा देखिला । त्याचा बामण झोरे झाला । परतरे माघारा । सरजा शिवाजी बोलला । ब्राह्मण मारूं नये तुला । क्रिया देवाची आह्माला । महाराज खदखदां हासिला । हातिंचा पटा टांकुन दिला । शिवाजीचा जिवाजी ह्मालदार । त्याणें शीघ्र उडी घातली । काढिला बराणपुरी बरचा । त्याणें अचाट फेंकून दिला । नाभीकमळीं बैसला । बरचा पाठीला फुटला । ब्राह्मण हरहर बोलिला । त्याचा प्राण निघुनी गेला ।. "

आतां या कार्यपरंपरेंत आणि हकीकतींत किती चुका आहेत तें दुसऱ्या पोंवाड्यांतील खालील उताऱ्यावरून दिसेलः—

" अबदुलखान पुरा झाला । कृष्णाजी ब्राह्मण उठावला ॥ शिवाजीराजा बोलला । ब्राह्मणा मारूं नये तुला ॥ तुजशी मारितां । शंकर हांसेल आह्मांला ॥ नाइकतां ब्राह्मणें । हात दुसरा मारिला ॥ ब्राह्मणा मारूं नये तुला । क्रिया शाहाजीची आह्मांला ॥ कृष्णाजी ब्राह्मण । हात तिसरा टाकिला ॥ होईल ब्रह्महत्या भोंसल्यासी । शिवाजीनें राखिला ॥ कृष्णाजी ब्राह्मण मागें सरला । सैद बंडू मोहरे आला ॥ जवळ होता जिऊ ह्मालया । त्यानें सैद पुरा केला ॥. "

[ अ. ] आतां वरील दोन उताऱ्यांवरून हें दिसून येईल कीं दुसऱ्यांतील कार्यपरंपरा पहिल्यांतलया कार्यपरंपरेच्या अगदीं उलट आहे. पहिल्या उताऱ्यांत, खान पडला असें पाहिल्यावर, सैद बंडू सूड घेण्यास धांवला आणि त्याचा शिवाजीनें समाचार घेतल्यावर मग " त्याचा ब्राह्मण झोरे झाला. " दुसऱ्यांत ही गोष्ट अगदींच उलट सांगितली आहे. ह्मणजे खान पुरा झाल्यावर ' कृष्णाजी ब्राह्मण उठावला. ' पण त्याला शीवाजीनें जीवदान दिल्यावर तो ' मागें सरला. ' त्यानंतर

'सैद बंडू मोहरे आला.' मग 'जवळ होता जिऊ ह्माल्या। त्यानें सैद पुरा केला ।.' विचाराअन्तीं हें दिसून येईल कीं खानापाशीं शिपाई हजर असण्यापेक्षां वकील हजर असणें जास्त स्वाभाविक दिसतें. बोलणें चालणें जेथें व्हावयाचें तेथें वकीलाचीच गरज असावयाची. शिवाय दोघांचेही वकील हत्यारबंद होतेच. करितां सैदाची जवळ कांहीं गरज नव्हती. (ब.) शिवाजीनें कृष्णाजी ब्राह्मणास ज्याअर्थीं जिवानिशीं सोडलें, त्याअर्थीं जिवा महाल्यानें त्याला बरचाही मारला नाहीं व ब्राह्मणानें हरहर ह्मणून प्राणही सोडला नाहीं. शिवाजी प्रत्यक्ष आपल्या ब्राह्मणशत्रूला जीवदान देत असतां त्याच्याच नोकरानें त्याला, बरचा 'अचाट' मारून 'हरहर' ह्मणावयास लावणें अगदीं संभवत नाहीं. जिजाबाईला चांगली माहिती नव्हती एवढेंमात्र यावरून निश्चित ठरतें. (क.) तसेंच पहिल्या पोंवाड्यांत शिवाजीनेंच सैद बंडू मारला असें ह्मटलें आहे. परंतु त्याला जिवा महाल्यानें मारला यांत संशय नाहीं. 'जवळ होता जिवा, ह्मणून वांचला शिवा ।' अशीं गोंधळी लोकांत ह्मण आहे ती तरीं हेंच दर्शित करत्ये. कृष्णाजी ब्राह्मणानें तीनदां शिवाजीवर हात टाकून एकदांही हात कारगर झाला नाहीं, यावरून त्याच्यापासून शिवाजीला मुळींच भीति नव्हती. कारण हा ब्राह्मण तरवारीच्या कामांत अगदींच बुळकट होता असें दिसतें. त्याचा शिपायगिरीचा धंदा नसून तो खानाचा कारकून व वकील होता. सैद बंडूमात्र पटाईत शिपाई होता ह्मणून त्याचा लौकिक आहे. तेव्हां या गोष्टींचा चांगला विचार केला असतां असें दिसेल कीं शिवाजीच्या जिवाला धोका होण्याचा प्रसंग आलाच असेल (आणि तो आला होता हें वरील ह्मणीवरून सिद्ध होतें.) तर तो बंडुमुळेंच आला असेल. (७) जेव्हां शिवाजीची आणि खानाची सदरेंत भेट झाली तेव्हां दोघांपाशीं कोणकोणतीं हत्यारें होतीं याचा विचार कर्तव्य आहे. कारण लहान पोंवाड्यांत खानापाशीं हातांत कट्यार व कमरेस पटा (लांब तलवार) होती आणि शिवाजीपाशीं दोनीं हातांत

वाघनखें असून शिवाय डावे हातीं बिचवा होता असें ह्मटलें आहे. मोठ्या पोंवाड्यावरून आपल्याला हें माहीत पडतें कीं मोरोपंतानें खानास सदरेस नेताना आपल्यामतें पूर्णपणें निःशस्त्र केला होता. परंतु खानानें * कट्यार ( ऊर्फ खंजीर ) आपल्या हातांत लपवून ठेविली होती. शिवाजीनेंही गुप्तरीत्या आपल्या हातांत वाघनख आणि बिचवा ठेविला होता. एकमेक ज्याअर्थीं गुप्तरीत्या हत्यारबंद होते, त्याअर्थीं भेटीस निःशस्त्र यावयाचें पूर्वीं ठरलेलें असावें असें अनुमान बांधण्यास सबळ कारण होतें. जसें खानानें देखाव्यांत आपल्या जवळचा ल्व्हा [ फिरंग किंवा पटा ] मोरोपंताच्या सांगण्यावरून दुसऱ्यापाशीं दिला होता. त्याप्रमाणेंच शिवाजीनेंही आपला " पटा जिवा ह्मालयापाशीं दिला " होता. बिनहत्यारी होऊन जर भेट घेण्याचें ठरलें नसतें, तर नेहमीं हातांत राहणाऱ्या तलवारी कोणीही दुसऱ्यापाशीं दिल्या नसत्या. अफजुलखानाच्या मनांत दगा करावयाचा होता ह्मणून त्यानें गुप्तपणें आपल्यापाशीं कट्यार ठेविली होती. आपल्याला दगा होईल ही भीति होती ह्मणूनच शिवाजीनें अंगांत चिलखत व डोक्यांस जिरेटोप घातला होता आणि शिवाय तो गुप्तरीत्या हत्यारबंद झाला होता. शिवाजीच्या मनांत दगा करणें मुळींच नव्हतें; पण आपल्यास दगा झाला तर संरक्षणाला उपाय आपल्यापाशीं असावा ह्मणून त्यानें दूरदृष्टीनें कडेकोट तयारी केली होती. शिवाजीच्या मनांत दगा करावयाचाच असता खानरूपीं " बत्तीस दांतांचा बोकड " त्याच्या पूर्ण तावडींत सांपडला होता. कारण तो सदरेंत अगोदरच येऊन बसला होता. तेव्हां आपल्या माणसांकडून खानाला चिरगटण्यास शिवाजीला आयती उत्तम संधि सांपडली होती; परंतु त्यानें तिचा फायदा घेतला नाहीं. यावरून त्याचे मनांत काय होतें तें सहज समजेल. शिवाजी

* मागच्या निबंधांत आह्मीं कट्यारीचा अर्थ ' तलवार ' असा घेतला होता. परंतु तो चुकीचा आहे. लग्नामध्यें मराठे लोक हातांत जें लहानसें वीतभर लांबीचें हत्यार घेतात त्यास ' कट्यार ' ह्मणतात. या चुकीमुळें मागच्या निबंधांत थोडीशी-क्षुल्लक-उणीव दिसेल ती आतां दुरुस्त करून घ्यावी.

मात्र खानाच्या कचाटींत सांपडावयाचा होता. तो भेटीस आला तेव्हां कराराप्रमाणें तो भोळेपणानें बिनहत्यारी आला असेल असें समजून खानाला शिकार सांपडली असें वाटलें. मग त्याला शिव्या देऊन खानानें त्यास गच्च धरला व त्याचेवर कट्यार चालविली. कट्यारीचा प्रयोग खानानें प्रथमतः केल्यानंतर शिवाजीनें त्याच्या पोटावर वाघनख आणि बिचवा हीं कशीं चालतात हें पाहिलें; आणि खानाची मगरमिठी सोडवून तो दूर सरकला. तेव्हां खानाची वीतभर लांबीची कट्यार अर्थात् निरुपयोगी होऊन त्याला आपल्या माणसापासून लव्हा ( लांब तलवार ) मागून घेणें भाग पडलें. बिचवा आंखूड ह्मणून शिवाजीनेंही जिवा महाल्यापासून आपला पट्टा मागून घेतला. काम पडल्यास एका क्षणांत त्याचा उपयोग करतां यावा ह्मणून त्या पट्याचा बंद पूर्वीच सावधगिरीनें त्यानें सोडून ठेविला होता हें ' सरजा बंद सोडून चालिला।' या चरणावरून उघड दिसतें. असो. वरील विस्तारावरून हें दिसून येईल कीं खानाचे कमरेस पट्टा नव्हता व शिवाजीपाशीं ही तलवार नव्हती. एकापाशीं नुसती कट्यार व दुसऱ्यापाशीं वाघनख आणि बिचवा एवढींच होतीं.

## ७. लहान पोंवाड्यांतील जास्त माहिती.

[ १ ] विजापुरापासूनच कृष्णाजी ब्राह्मण खानाबराबर होता. खानास विजापुराचे कोटाबाहेर अपशकुन झाला त्यावेळीं तो कृष्णाजी ब्राह्मणानें त्याच्या नजरेस आणून दिला. " ब्राह्मण कृष्णाजी बोलला। साहेब आपसकून झाला. "। हे दोनीं चरण गफलतीनें मोठ्या पोंवाड्यांत देण्याचें राहिलें असावें अशी जबर शंका येते. कारण ज्या चौकांत ते यावयाचे तो चौक ( ८ वा ) अगदींच लहान आहे. कांहीं चौक तर बारा बारा ओळींचे आहेत; मग हाच कां केवळ साडेतीन ओळींचा असावा? यावरून ते चरण चुकीनें लिहावयाचे राहिले असतील असें वाटतें. [ २ ] खानाकडून आलेल्या कृष्णाजी ब्राह्मण वकीलास परत पाठविला त्यावेळीं आपल्याकडून जिवाजी महालदारास शिवाजीनें

वांईस खानाकडे वकीलीस पाठविलें व तेथें त्यानें इतकी फौज आणण्याचें कारण काय ह्मणून खानास ठासून विचारिलें. [ ३ ] खान सदरेस गेल्यानंतर तेथें गडकऱ्यांनीं त्याला हटकलें. [ ४ ] 'शेतीवाडी करून, एखाद्या कुणब्यासारखा सरकारी सारा भरावयाचें सोडून पातशाही सदरा बनविण्याचे ढंग तुला कोठून सुचले' ह्मणून खानानें शिवाजीस धमकाऊन विचारिलें. [ ५ ] शिवाजीनें तुक्या भिवाजीला रडतोंडीचा घांट अडविण्यास ठेविलें होतें. [ ६ ] शिवाजीनें "पनाळा चौफेरी बांधला।" आणि मोठ्या शर्तीनें किल्यांतून लढून किल्ला तो "नहिं देइ बाछाहाला।".

## ८. मोठ्या पोंवाड्यांतील जास्त माहिती.

[ १ ] तीन वर्षांची युद्धसामुग्री बराबर घेऊन खान स्वारीस निघाला होता. [ २ ] हिंदूंच्या देवालयांत खानानें गाय मारली. [ ३ ] शिवाजीनें, लढाई चांगली देतां यावी ह्मणून, "देश पाठीशीं घातला।" [ ४ ] दोघेजण बसून आपणाला खान जी "बुध सांगेल" ती आपण ऐकूं असें शिवाजीचें ह्मणणें खानाच्या वकीलापाशीं होतें. [ ५ ] शिवाजी आपणास भ्याला असें समजून त्यास आश्वासन देण्याकरतां खान पुन्हां वकीलास पाठवितो. [ ६ ] इमान प्रमाण देऊन शिवाजीस धरण्याची खान मसलत करतो. [ ७ ] रडतोंडिचा घांट शिवाजीनें बंद करविल्यामुळें अबदुल्लाखान घाबरला. [ ८ ] सदरा शृंगारून झाल्यावर खानाला बोलावण्याकरितां शिवाजीनें शामराजपंत यांस बराबर देऊन मोरोपंतास पाठविलें. [ ९ ] ब्राह्मणानें आपल्या मतें खानास निःशस्त्र केलें होतें. [ १० ] मोरोपंत आणि शामराजपंत खानापासून बहुमानाचीं वस्त्रें पावून, खान सदरेस आला ह्मणून सांगण्यास, गडावर महाराजांपाशीं परत आले. [ ११ ] सदरेस जातेवेळीं, बिचऱ्याचा शिवाजी "सरजा बंद सोडून चालिला।" [ १२ ] खानानें शिवाजीला उलट सलाम केला नाहीं. [ १३ ] खानाची आणि शिवाजीची ज्या सदरेंत 'भेट' झाली त्या सदरेंत तिसरें माणूस कोणी

नव्हतें. भेटीच्या वेळीं खुद्दांजवळ कोणी रहावयाचें नाहीं असें ठरलें होतें. कारण, असें नसतें तर खानानें जेव्हां कट्यार चालविली आणि नंतर शिवाजीनें जेव्हां उलट बिचवा आणि वाघनख यांचा मारा केला, त्यावेळीं कृष्णाजी ब्राह्मण आणि जिवा महाल्या हे जर आपआपल्या मालकांसन्निध उभे असते तर अशा प्रसंगीं ते कोणाचें तोंड पाहत उभे राहतेना. त्यांनीं आपआपल्या मालकांस तत्काळ मदत केली असती यांत तिळमात्र संशय नको. दोघेही स्वामिसेवापरायण होते हें निःसंशय आहे. आपलें पोट फाडल्यानंतर, शिवाजी कट्यारीच्या माऱ्याच्या बाहेर गेला असें पाहून खान ज्याअर्थीं ' ल्व्हा, ल्व्हा ' म्हणून ओरडला, त्याअर्थीं खानाचें माणूस तत्स्थलीं, सन्निध कोणी नव्हतें असें सिद्ध होतें. कृष्णाजी ब्राह्मण जर तेथेंच हजर असता तर त्यानें आपली तलवार शिवाजीवर खास चालविली असती व आज हा निबंध लिहिण्याचा प्रसंग आम्हांस आला नसता. ज्याप्रमाणें खानापाशीं कोणी नव्हतें, त्याप्रमाणें शिवाजीसन्निधही कोणी नव्हतें. जर शिवाजीचा जिवास जीव देणारा जिवा महाल्या तेथें असता तर त्यानें खानाचा ल्व्हा येण्याची शिवाजीला वाट पाहत बसावयास लावलें नसतें. आपल्यापाशीं दिलेला पटा देऊन शिवाजीकडून खान पुरा करविला असता. मग खानाला ल्व्ह्याचा एक हात शिवाजीच्या डोक्यावर मारण्याचें श्रेयही मिळालें नसतें. यावरून योग्य अनुमान हेंच निघतें कीं, कृष्णाजी ब्राह्मण आणि जिवा महाल्या यांपैकीं कोणीही तत्स्थलीं त्यांच्या सन्निध, कुरापतीच्या वेळीं हजर नव्हते. खान आणि शिवाजी समोरासमोर झाल्यावर बहुधा आपआपल्या वकीलांना ' एकान्तीच्यां गोष्टी ' होई तोंपावेतों जवळच्या दुसऱ्या सदरेंत बसण्यास परस्परांनीं सांगितलें असावें. खानानें केलेला कोलाहल ऐकून जसा कृष्णाजी ब्राह्मण त्यास ल्व्हा देण्यास धांवला असावा, तसेंच जिवा महाल्या व सैद बंडू हेही आपआपल्या मालकांस मदत करण्यास धावले असावेत. शिवाजीनें तीन सदरा बनविल्या होत्या, असें दोनी पोवाड्यांत म्हटलें आहे. त्यांपैकीं पहिलींत खानानें सैद ठेवला असावा; दुसरींत दोघांनीं

आपले वकील ठेवले असावेत व तिसरींत शिवाजी आणि खान 'एकान्तींच्या गोष्टी' करीत होते. संभाजी कावजी मात्र कोठें होता हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तरी तो सर्वांपेक्षां दूर अंतरावर असावा असें वाटतें. कारण तो सर्वांच्या पाठीमागून आला आणि पळपट्या खानाला गांठून त्यानें पालखीच्या भोयांचे पाय तोडले, व खानाचा 'खटारा' जमिनीवर पाडला.

आतां वर जें आह्मीं ह्मटलें आहे कीं, खान आणि शिवाजी यांपाशीं भेटीच्या वेळीं तिसरें कोणी नव्हतें, त्याला आधार ह्या पोंवाड्यांतच भरपूर आहे. मात्र लक्षपूर्वक तो हुडकून काढला पाहिजे. पहिला सुगावा पंधराव्या चौकांत आहे. तेथें शिवाजी खानाच्या वकीलास सांगतो आहे कीं, "बसूं दोघेजण। खान बुध सांगेल आह्मांला।" यावरून भेटींत तिसरा कोणी असूं नये असें उभय पक्षांनींही कबूल केलें होतें असें दिसतें. दुसरा सुगावा एकविसाव्या चौकांत आहे. तेथें मोरोपंत खानास, उभयपक्षीं ठरलेल्या अटींची आठवण देतो आणि 'एकान्तींच्या गोष्टी' करावयाचें ठरलें असतां बरोबर हत्यारबंद माणसें व हातांत शस्त्र कशास पाहिजे ह्मणून खुलासा विचारितो. तिसरा सुगावा छत्तीसाव्या चौकांत मिळतो. तेथें अज्ञानदास आपल्या श्रोत्यांस सांगतो आहे कीं रामरावणासारखे जे शिवाजी आणि खान त्यांचें "एकान्तीं भांडण" झालें. आणि आपलें मत देतो कीं, शिवाजी "एकान्तीं नाटोपे कवणाला.।" चौथा सुगावा, पुराव्याला अव्वल दर्जाचा असून, प्रस्तुत चर्चेचा अखेरचा निकाल लावणारा असा आहे. पण त्याचेवरील अपभ्रष्ट रूपाचा जमलेला उकीर पहिल्या प्रथम एकीकडे सारला पाहिजे. तेव्हां आंतील रत्न चमकणार. हें पुराव्याचें रत्न एकतिसाव्या चौकांत आज कित्येक वर्षें लपून वास करीत आहे. ह्या चौकांतला शेवटाचा चरण "सरदार नाहीं कोणी तिसरा" असा आहे. आतां या चरणांतील सत्यासत्यतेची मीमांसा करते वेळीं या चरणाचाच पहिल्या प्रथम अर्थ काय होतो हें ठरविलें पाहिजे. तो अर्थ स्पष्टच दिसतो. तो हा कीं, खान आणि शिवाजी या दोन सरदारांखेरीज

तिसरा सरदार भेटीच्या वेळीं हजर नव्हता. ह्मणजे इतर माणसें होतीं, पण तिसरा सरदार मात्र कोणीं हजर नव्हता. आतां आपल्याला दोन्हीं पोंवाड्यांवरूनच हें माहित आहे कीं, भेटीच्या वेळीं खानानें किंवा शिवाजीनें आपल्याबरोबर कोणीही सरदार आणला नव्हता. मग तो तेथें येणार तरी कसा? विचारांतीं भेटीमध्यें सरदार आणण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें असेंच दिसतें. बरें, पाठ जर शुद्ध असेल तर 'तिसरा सरदार तेथें कोणी नव्हता' या उक्तीवरून, खानाला आणि शिवाजीला कवी 'सरदार' ह्मणतो असें दिसतें. परंतु दोघांपैकीं कोणालाही तो 'सरदार' असें मुळींच ह्मणत नाहीं. अब्दुलखानाला 'वजीर' किंवा 'खान' या नांवानें तो आपल्यासमोर आणतो; आणि शिवाजीला 'राजा' 'महाराजा' असें तो लिहितो. शिवाजीला जर तो 'सरदार' ह्मणता तर त्याचे सरदारांना त्यानें दुसरें कांहीं तरी भेदव्यंजक नांव दिलें असतें; पण तेविसावे चौकाकडे नजर फेंकली तर असें दिसून येईल कीं शिवाजीला तो 'राजा' या नांवानेंच लेखतो व त्याचे सरदारांना 'सरदार' च ह्मणतो. 'राजा नवगर्जीत (?) बैसला। ........। सरदार आले भेटायाला.।' येथें कवीनें राजा आणि सरदार यांमध्यें भेद उत्तम रीतीनें व्यक्त केला आहे. असो. तेव्हां वरील कोणताही अर्थ कवीच्या खऱ्या अर्थाशीं जमत नाहीं असें स्पष्ट दिसेल. मग 'सरदार नाहीं कोणी तिसरा।' यांतील 'सरदार' हा शब्द कवीनें योजलेला आहे कीं कवीच्या दुसऱ्या कोणत्या शब्दाचें तें अपभ्रष्ट रूप आहे? आणि अपभ्रष्ट रूप असल्यास खरा शब्द कोणता? ह्या प्रश्नाला उत्तर— 'सरदार' हें 'सदरे' शब्दाचें गोंधळ्यांनीं बनविलेलें अपभ्रष्ट रूप आहे. खरा चरण असा असला पाहिजे:— 'सदरे नाहीं कोणी तिसरा।'. ह्मणजे भांडण चालत असलेल्या सदरेंत ब्राह्मण लव्हा घेऊन येईपर्यंत खान आणि शिवाजी या दोहोंशिवाय तिसरा कोणी नव्हता. 'अब्दुलखान शिवाजी दोनी। भांडती दोनी धुरा। ........। सदरे नाहीं कोणी तिसरा।'.

## ९. दोहोंसही महत्वाचा साधारण मजकूर.

( १ ) चंद्रराव मोऱ्यास शिवाजीनें कैद केलें होतें. ( २ ) त्यानें जावळींचें तसेंच श्रृंगारपुरचें राज्य घेतलें होतें; आणि त्यानें कल्याण भिंवडी काबीज केली तेव्हां मुलाना अहमद विजापूरच्या पातशहापाशीं फिर्यादीस गेला. ( ३ ) शिवाजीस जिता कोण धरील ह्मणून पातशहानें दरबारमध्यें प्रश्न केला, तेव्हां अबदुल्लाखानानें ही कामगिरी फत्ते करतों ह्मणून प्रतिज्ञा केली. ( ४ ) रस्त्यांत हिंदु देवालयांस खानानें उपद्रव केला. ( ५ ) नंतर वांईस आल्यावर बरेवेपणाचे कागद लिहून आणि दौलत देऊन मेहेरबानी करण्याचें मिष दाखवून शिवाजीस आपल्या भेटीस आणण्याकरितां खानानें आपला वकील कृष्णाजी ब्राह्मण प्रतापगडावर राजाकडे पाठविला. ( ६ ) शिवाजीनें त्या वकीलास सांगितलें कीं खानसाहेबच तसदी घेऊन जावळीस येतील तर मी त्यांस भेटेन. ( ७ ) शिवाजीला कोंडण्याचा विचार खानानें केला असावा असें वाटतें. ( ८ ) दरबार भरवून सर्व सरदारांची सल्लामसलत शिवाजीनें घेतली होती. ( ९ ) भेटीस निघतांना त्यानें राज्याची निरवणूक केली होती. ( १० ) भेटीस गेला त्यावेळीं जिवा महाल्यास आपल्या बराबर घेऊन त्याचेपाशींच आपला पटा दिला होता. ( ११ ) भेटीकरितां तीनच सदरा तयार केल्या होत्या. ( १२ ) जिजाऊनें आपला पुत्र संभाजी याच्या मृत्यूबद्दल वचपा घेण्यास शिवाजीस उपदेश केला होता, पण शिवाजीनें कांहीं उत्तर केलें नाहीं. ( १३ ) भेट होतांच जेव्हां खान शिवाजीला मर्मभेदक अपशब्द बोलला, तेव्हां शिवाजीनेंही खानाची तशाच रीतीनें पूजा केली. ( १४ ) त्यावरून संतापून खानानें उडी मारून शिवाजीस दाबलें व हातांतल्या गुप्त कट्यारीनें त्याचे अंगावर वार चालविला. तेव्हां शिवाजीनें स्वसंरक्षणार्थ बिचव्याचा आणि वाघ्रपंजाचा मारा केला; त्यायोगें खानाची इतिश्री झाली. ( १५ ) नंतर प्रतापगडावरून आपल्या लोकांना इशारत करून शिवाजीनें खानाची फौज साफ बुडविली. ( १६ ) शिवाजी शिवाचा अंशधारी असून दुष्टांच्या संहारार्थ अवतरला होता.

## १० अप्रसिद्ध सरदारांच्या नांवांचा दोन्ही पोंवाड्यांत घोंटाळा.

पहिल्या पोंवाड्यांत विजापूरच्या कांहीं मराठे सरदारांचींही नांवें आहेत :—बेदऱ्या पिलाजी, संभाजी करन्यावन्या ( ? ), सुभानजी इंगळे. याच पोंवाड्यांत शिवाजीचे सरदारांतही, विंगळ्या सुभानजीचें नांव घातलें आहे. आतां मोठ्या पोंवाड्यांत जिवाजी देवकान्ते हा दोहोंचाही सरदार ह्मणून दाखविला आहे. पहिल्या पोंवाड्यांत बेदऱ्या पिलाजी विजापूरचा सरदार ह्मणून ह्मटलें आहे; पण दुसऱ्यांत तो शिवाजीचा ह्मणून ह्मटलें आहे. तेव्हां खरें कोणतें? ह्या सर्व घोंटाळ्याबद्दल सर्वस्वी गोंधळी जबाबदार आहेत, असें आमचें मत आहे. तत्कालीन कवी असा घोंटाळा नांवामध्यें करूं शकत नाहीं.

## ११. पोंवाड्यांतील कांहीं नांवाच्या संदिग्धपणाविषयीं विचार.

लहान पोंवाड्यांत जेथें 'ह्मादजी भोंसल्याला' [चौक २] असें ह्मटलें आहे, तेथेंच दुसऱ्या पोंवाड्यांत 'मंबाजी भोंसल्याला' [चौक ६] असें ह्मटलें आहे. तेव्हां मंबाजीला ह्मादजी ह्मणत असत असें दिसतें. विठोजीराजे भोंसले यांना 'मंबाजी' ह्मणून एक पुत्र होता असें "मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत" ह्मटलें आहे. परंतु 'मंबाजी' च्या ठिकाणीं कांहीं बखरींत संभाजी असें आढळतें. दिग्विजयकार तर विठोजीचा सर्वांत वडील मुलगा संभाजी होता असें लिहितो. विठोजीच्या आजाचें नांव 'संभाजी' होतें हें लक्षांत ठेवलें ह्मणजे विठोजीराजे यानें आपल्या आजाचें नांव आपल्या वडील पुत्रास ठेवलें असावें असें वाटतें. आणि जर विठोजीच्या मुलाचें नांव 'संभाजी' हें कोणी पूर्वकालीन लेखकानें, 'संबाजी' असें अशुद्ध बालबोध लिपींत लिहून ठेवलें असेल, तर बऱ्याच कालानंतर 'स' च्या गांठीखालचा फांटा नाहींसा होऊन पुढील बखरनवीसानें 'संबाजी' च्या जागीं 'मंबाजी' असें वाचलें असेल व तीच चूक पुढील बखरनवीसानीं केली असावी असें संभवतें. पोंवाड्यांतील 'मंबाजी' हा विठोजी राजा याचा पुत्र होऊं शकत नाहीं. कारण विठोजीच्या मुलाचें जें खरें नांव संभाजी त्याचेंच

ह्मादजी असें रूप बनणें संभवत नाहीं. मंबाजीचें मात्र कदाचित् ह्मादजी होऊं शकेल. यावरून हा विजापूरचा सरदार—मंबाजी किंवा ह्मादजी भोंसला—कोणी तरी दुसरा भोंसला असावा. शिवाय तो जर विठोजीचाच पुत्र असता तर त्याचे नांवापुढें 'राजे' असें पद लागतें. तें दोनीं पोंवाड्यांत कोठेंच लावलेलें दिसत नाहीं. यामुळें हा 'मंबाजी' बाबाजी भोंसल्याच्या घराण्यांतला नाहीं असें ह्मणण्यास हरकत वाटत नाहीं. [ २ ] धाकट्या पोंवाड्यांत ७व्या चौकांत "पुतण्या उमाजी राजाला। पांचशें लोक दिले त्याला।" [ शुद्धपाठ ], असें ह्मटलें आहे; व मोठ्या पोंवाड्यांत त्याच ठिकाणीं "सराईत उमाजी। राज्य होईल तुह्मांला।" असें ह्मटलें आहे. उमाजी जर शिवाजीचा खरोखर पुतण्याच असेल तर त्याचे नांवापुढें 'राजा' हें पद जोडलें आहे तें योग्य आहे हें उघड आहे. एकदां तो शिवाजीच्या घराण्यांतला ठरला ह्मणजे मग त्याला, कांहीं दिवसांकरितां तरी राज्य होण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं. संभाजी हा अगदीं लहान असल्यामुळें जर कदाचित् मध्येंच मेला, तर जवळचा दुसरा नातलग राज्यास वारस असा उमाजीच असावा. उमाजीला 'सराईत' हें विशेषण लावलें आहे. त्यावरून तो त्यावेळीं चांगलाच नामांकित शिपाई असावा असें अनुमान निघतें. ह्मणून अशा मनुष्यावर शिवाजीनें भार सोंपविला तें ठीकच केलें. उमाजी शिवाजीचेच घराण्यापैकीं असावा असें ह्मणण्यास दुसरा महत्वाचा पुरावा हा आहे कीं तानाजी मालुसऱ्याचे पोंवाड्यांतील चवथ्या चौकांत या उमाजीचें नांव आहे. तेथें त्याला जिजाबाई आणि शिवाजी याबरोबर सोंगट्या झोडतांना कवीनें दाखविला आहे. तेव्हां तो जर शिवाजीचा निकटसंबंधी नसता तर जिजाबाईसारख्या राजघराण्यांतील बायकोबरोबर खेळण्याचा मान त्याला कधींच मिळाला नसता. यावरून तो शिवाजीचा पुतण्या असावा हें खास. आतां तो विठोजीच्या आठ मुलांपैकीं कोणत्या मुलग्याचा नातू होता हें शोधण्याचें काम इतिहासज्ञांचें आहे. [ ३ ] जसा उमाजी शिवाजीचा संबंधी ह्मणून ठरतो तसाच मोठ्या पोंवाड्यांतला "कावजीचा संभाजी भोंसला"

हाही त्याचा नातलग असावा असें वाटतें. कारण धाकट्या पोंवाड्यांत त्याला स्पष्ट 'कावजी राजाचा लेक' असें ह्मटलें आहे. आडनांवाचा भोंसला असून जर तो 'राजाचा' लेक असेल तर तो शिवाजीचा नातलग असावा. 'राजे' हें पद मालोजीपासून त्या घराण्यांतील पुरुषांस लावलेलें दृष्टीस पडतें.

याप्रमाणें ऐतिहासिक माहिती ह्या दोन पोंवाड्यांत आहे. ती जितकी आह्मांस समजली तेवढी आह्मीं लोकांपुढें ठेविली आहे. या माहितीवरून मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं गुंतागुतीचा थोडा बहुत तरी उलगडा होईल अशा समजुतीनें यथामति यत्न केला आहे, तो सुज्ञ लोकांस कितपत रुचतो हें पाहणें आहे. आमच्या मतें तर ह्या वधप्रकरणाची, प्रस्तुत स्थितींत, शक्य तेवढी माहिती ह्या दोन पोंवाड्यांतून मिळते. इतकी बारीक आणि विश्वासास पात्र अशी माहिती दुसरे कोठेंही मिळत नाहीं. हींत कांहीं व्यर्थ पाल्हाळ नाहीं. जसें वर्तमान घडलें तसें योग्य रीतीनें वर्णिलें आहे. त्यांत असंभवनीय असें कांहीं नाहीं. कांहीं थोडे ठिकाणीं विलगपणा दिसतो. त्याचें कारण त्या ठिकाणीं कांहीं चरण सुटले आहेत असें दिसतें. पण महत्वाचा मजकूर तेवढा सर्व सबंध आणि सुरळीत आहे. त्यामुळें कोठेंही कांहीं विशेषशी शंका वाटत नाहीं. खानाची शिवाजीस जिवंत धरण्याची घमेंड, त्याचा हिंदूंच्या देवांविषयीं द्वेष; शिवाजीशीं सख्याचें बोलणें करीत असतांना त्याचें सोदेगिरीचें आणि ठकबाजीचें वर्तन; शिवाजीस धरण्याविषयींची त्याची उत्सुकता आणि धडपड; एकान्तसमयीं शिवाजी जसा काय आपल्या वांईच्या सुभायतींतला एखादा यःकिंचित् जमीनदार आहे असें समजून त्याच्याशीं त्याचें उद्दामपणाचें वर्तन; शिवाजीसारख्या महावीरावर—दग्यानें कां होईना—प्रथमतः हात चालविण्यांत त्यानें दाखविलेलें आपलें उलटें काळीज; या सर्व गोष्टी ढळढळीतपणें डोळ्यांसमोर जणूं काय मूर्तिमंत उभ्या राहतात आणि त्यामुळें मनामध्यें नाना प्रकारचे तरंग उद्भवतात. असो. या दोनीं पोंवाड्यांत, विशेष

लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, पंताजीपंत, तानाजी मालुसरे, येसाजीकंक (येसा निकम), गोविंदपंत दिवाण वगैरे, बखरींतील प्रमुख मंडळींचे नांवांचा नुसता उल्लेखसुद्धां नाहीं. तेव्हां बखरकार या लोकांचें बंड कोणत्या भक्कम आधारावर माजवितात तें समजत नाहीं.

हा निबंध संपविण्याचे पूर्वी रा० रा० राजवाडे यांनीं दिलेल्या अफजलखानी प्रकरणाच्या 'खऱ्या' हकीकतीविषयीं विचार करणें फार जरूर आहे. कारण रा० राजवाडे यांचा मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास फारच दांडगा व मार्मिक आहे. त्यांच्या ह्या पारमार्थिक अभ्यासापासून लोकांना पुढें मागें बराच फायदा होण्याचा संभव आहे. परंतु त्यांच्या लेखांत नजरेस येणारा एक प्रकारचा विक्षिप्तपणा व एककल्लीपणा हा मात्र त्यांच्या उद्देशाच्या आड येईल असें आह्मांस वाटतें. त्यांचीं विधानें नेहमींच विश्वासास पात्र असतात असें नाहीं, हें दाखवणें फारसें मुष्कीलीचें आहे असें नाहीं. परंतु त्याचा सर्व विचार करण्यास आज आह्मांस फुरसत नाहीं. पुढें मागें तेंही काम हातांत घेण्याचे मनांत आहे. प्रस्तुत त्यांनीं अफजलखानी प्रकरणांत कोठें कोठें व कसाकसा मनःपूत संचार केला आहे त्याचा थोडक्यांत आह्मीं विचार करतों.

## १२. रा० राजवाडे यांचीं 'साधनें.'

मागील निबंधांत आह्मीं असें ह्मटलें आहे कीं, रा० राजवाडे यांना आपल्या साधनांच्या चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत "शिवाजीच्या चरित्रांतील मुख्य मुद्याच्या गोष्टीचा यथास्थित रीतीनें सांगोपांग विचार करण्यास फावलें नसावें." हें कितपत खरें याचा प्रस्तुत विचार कर्तव्य आहे. पहिल्याप्रथम येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं ही प्रस्तावना ह्मणजे एकप्रकारचें अठरा धान्याचें कोडबोळेंच आहे. चवथ्याखंडांत बखरी छापल्या त्या सर्व पेशव्यांच्या वेळच्या; प्रस्तावनेंत प्रपंच करतात शिवाजीच्या बखरींचा तेथून झडप टाकतात ती

पिठोर राजावर; नंतर गदाप्रहार करतात न्या० मू० रानड्यांवर आणि संताळ्यांवर, आणि अखेर "अफजलखानी प्रकरणाची खरी हकीकत" देऊन त्या खंडांत छापलेल्या बखरींची जवळ जवळ पांच पानांवर करतात बोळवण आणि घेतात रजा! १३९ पानांच्या प्रस्तावनेंत हातीं घेतलेल्या विषयाला मि० राजवाडे नुसती एक-हाताचीं बोटें दाखवितात! बरें. हातीं घेतलेल्या विषयाची इतकी चिवडाचिवड करून तरी त्यांचे सर्व सिद्धांत बिनचुक असावयाचे होते; पण तेंही दृष्टीस पडत नाहीं. विषयविवेचनांत त्यांची वळवळ मात्र खूब दृष्टीस पडते. आपण दिलेली अफजलखानी प्रकरणाची हकीकत तेवढी सर्व 'खरी' आहे ह्मणून ते वाचकांना सांगतात आणि खात्री होण्याकरितां पुढें असेंही ह्मणतात कीं "अस्सल कागदपत्रांचा उपयोग करतां आला नसता तर हा खरा इतिहास देतां आला नसता."! ह्या अस्सल कागदपत्रांचा उपयोग त्यांना कितीसा झाला आहे हें आपण आतां पाहूं.

अफजलखानी प्रकरणाची 'खरी' हकीकत देतांना मि० राजवाडे यांनीं जें तर्कशास्त्र लढविलें आहे तें अजब आहे! अफजलखानाच्या वधाची मिति ठरवितांना ते असें ह्मणतात कीं, 'अफजलखानाचा वध शके १५८१ विकारीनाम संवत्सरीं मार्गशीर्ष शुद्ध ५ भृगुवारीं ह्मणजे १६५९च्या ७ नोव्हेंबरीं झाला असें मल्हार रामराव सांगतो. 'शुद्ध १३स अबदुलखानाचा सरंजाम आणिला' ह्मणून शिवदिग्विजयकार लिहितो, त्यावरून मल्हाररामरावाची अफजलखानाच्या वधाची मित्ती खरी ठरते.'!! मार्गशीर्ष शुद्ध पंचमी आणि मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी यांमध्यें इतका काय निकट संबंध आहे कीं, त्या दोहोंचा जीव एक होऊन, पंचमी ह्मणजे त्रयोदशी हें अपूर्व गणित त्यापासून निष्पन्न व्हावें? आतां, भृगुवाराची आणि पंचमीची जर जंत्रींत सांगड बसत असेल, तर दिग्विजयकाराची १३ आणि छत्रपतीच्या ९१ कलमी बखरींतील 'मार्गशीर्ष शुद्ध १३'ची नाहीं कां बसत? येथेंही दोहोंच्या मित्तींचा

मेळ बसतो. रा० राजवाडे ह्मणतील दिग्विजयकारानें वार दिला नाहीं, ह्मणून त्याची मित्ती आह्मीं खरी मानीत नाहीं; पण त्यानें तो दिलाच असता तर खरा नसता असें कशावरून? रा० राजवाडे यांचा मल्हार रामरावावर व दिग्विजयकारावर सारखाच विश्वास असला पाहिजे. कारण दोघांनींही अस्सल कागदपत्रें आपआपल्या बखरी लिहिल्या त्यावेळीं पाहिलीं असावींत असें त्यांचेंही मत आहे. ९१ कलमी बखरींत शक खोटा आहे; पण तो एडिटरांच्या हलगर्जीपणामुळें हस्तदोष किंवा मुद्रणदोष झाला असावा; व वार रविवार दिला आहे, तो चुकलाच असेल तर तो दोष बखरकाराचा असावा. हे दोन्हीं दोष हलगर्जी-पणामुळें झाले असावेत असें वाटतें. बाकी त्यानें मित्ती दिलेली दिग्विज-काराच्या मित्तीशीं चोख मिळते. दोघांची मित्ती ज्याअर्थीं मिळते व शिवदिग्विजयकार ज्या अर्थीं विश्वासास पात्र आहे, त्याअर्थीं तीच खरी कां नसावी? निदान अमुकच खरी असें ह्मणण्यास काय सबळ पुरावा मिळतो? बरें; जर मल्हार रामरावाचीच मित्ती खरी आहे असें रा० राजवाडे यांचें ठाम मत असेल तर त्यांनीं दिग्विजयकाराची मदत कां घेतली? ज्याअर्थीं मदत घेतली, त्याअर्थीं तिचाच एकटीचा विचार केला तर ती निश्चयानें खरी नसावी असेंच राजवाड्यांना वाटलें असावें हें उघड आहे. आणि असें जर आहे तर, त्यांनीं दोन्ही तिथींचा मेळ बसत नसतां एकीला खोटी न ठरवितां दुसरीला खरी ह्मणणें ह्मणजे निव्वळ 'मी ह्मणतों ह्मणून खरें' असें ह्मणण्यासारखेंच आहे.

[ २ ] आतां खानवधप्रकरणांत खानाचें नांव 'अफजलखान कीं अफजुलखान की अब्दुलाखान कीं अबदुलखान' हें ठरविल्यापासून इतिहासाच्या कामांत आणि विशेषतः खानप्रकरणांत कितीसा फायदा होत असेल तो रा. राजवाडे यांसच माहीत. हें ठरविणें ह्मणजे एखाद्या इतिहास-कारानें, ज्यानें भिमथडीच्या घोड्यांस अटकेस पाणी पाजून तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा रोंविला, त्या महावीराचें खरें नांव 'राघोबा' कीं 'रघुनाथराव' कीं 'दादासाहेब' कीं 'भोळा सांब' व पाणिपतच्या युद्धांत, सर्व देशभर संचार करणाऱ्या मराठ्यांना एकाच ठिकाणीं, हट्टानें

कोंडून सडवून व त्यांची उपासमार करून ठार बुडविण्याचें महत्पाप आपल्या डोक्यावर घेणाऱ्या दुराग्रही आणि अदूरदृष्टी सेनापतीचें खरें नांव 'सदाशिवराव' 'सदोबा' कीं 'भाऊ' हें होतें, हें ठरविण्याइतकेंच वायफळ आहे. असो. अफजलखानाच्या १२ हुकूमनाम्यांमधून रा० राजवाडे यांनीं दिलेली एवढीच माहिती मिळत असल्यास ते हुकूमनामे धुंडाळण्यास रा० राजवाडे यांस व्यर्थ श्रम पडले असें ह्मणणें भाग पडतें. कारण कै० उदासांनीं आपल्या धौममहाबळेश्वरवर्णनाच्या ९७ पानांत, विजापूरच्या एका इमारतीवरील अफजलखानाचा लेख मुंबईच्या रायल एशिआटिक सोसायटीच्या पहिल्या पुस्तकांतून [ ३८२ पानांतून ] उतरून भाषान्तररूपानें दिला आहे, तो असा :- "अत्यंत दैवशाली, प्रस्तुतचा सेनाधिपति, दक्षिणेंतील सरदार लोकांमध्यें प्रमुख, व खोट्या धर्माचा उच्छेदक असा जो अफझुलखान महमदशाही त्याणें ही इमारत सन १६५२ इसवीमध्यें बांधली." आतां उदासांनीं खानाच्या नांवाच्या इंग्रजी स्पेलिंगचा जर खरा उच्चार दिला असेल तर खानाला 'अफझुलखान' असेंही ह्मणत असत असें दिसतें. असो. ( ३ ) मि० राजवाडे यांनीं जो 'वजीर' या शब्दाचा अर्थ घेतला आहे तोही बरोबर नाहीं हें आह्मीं मागेंच दाखविलें आहे. पोंवाड्यावरूनही त्यांचा अर्थ खोटा असें ठरतें; कारण, अफजलखानाचा पुत्र फाजिलखान, याचा शिवाजीच्या लोकांनीं मोड केल्यानंतर त्याच्या फौजेनें पोबारा केला. तेव्हां शिवाजीनें त्या फौजेंतील मोठमोठ्या सरदारांना कांहीं हरकत न करतां पळूं दिलें त्याबद्दलचा कवीचा चरण हा आहे "वाट दिली कुल वजीरांला." येथें फौजेच्या निरनिराळ्या सरदारांना 'वजीर' असें ह्मटलें आहे हें अगदीं उघड आहे. वजीर या शब्दाचा खरा अर्थ न समजल्यामुळें रा० राजवाडे यांनीं, बखरकारांनीं अफजलखानास वजीर ह्मणण्यांत चूक केली आहे असें ह्मटलें आहे; पण रा० राजवाडे हेच स्वतः चकले आहेत हें आतां उघड आहे. ( ४ ) आपल्या प्रस्तावनेंत राजवाडे ह्मणतात कीं, खान वांईस आल्यावर "वांईचा कुळकर्णी कृष्णाजी

भास्कर होता त्याला त्यानें शिवाजीकडे पाठविलें." ह्या एका वाक्यांत रा० राजवाड्यांनीं दोन गोष्टी गृहीत घेतल्या आहेत (अ) खानाची व कृष्णाजी भास्कराची गांठ वांईस पडली व तेथून त्याला शिवाजीकडे खानानें पाठविलें—ह्मणजे कृष्णाजी भास्कर विजापुरापासून खानाबरोबर नव्हता; (ब) कृष्णाजी भास्कर खानाचा नोकर नव्हता. आतां पहिल्या गोष्टीविरुद्ध लहान पोंवाड्यांत कृष्णाजी भास्कर खानाबरोबर विजापुरापासून आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. "कृष्णाजी ब्राह्मण बोलला। साहेब आपसकून झाला.।" हा 'आपसकून' खानाला विजापूरच्या कोटाबाहेर झाला. तेव्हां खानाबरोबर कृष्णाजी विजापुरापासून होता हें निःसंशय सिद्ध होतें. आतां दुसऱ्या गृहीत गोष्टीविषयीं आपण विचार करूं. शिवाजीला भेटण्याकरितां खान किल्ल्याखालीं शृंगारलेल्या सदरेस गेल्यावर तेथें एक एक सदर निरखून पाहूं लागला. तेव्हां बरोबरचा कृष्णाजी "कारकून अबदुल्याला बोले.।" असें पोंवाड्यांत ह्मटलें आहे. कृष्णाजी ब्राह्मणाशिवाय सदरेस येतांना खानाबराबर दुसरा कारकून कोण होता? कोणी नव्हता. सारांश वरील चरणावरून कृष्णाजी ब्राह्मण हा खानाचा नोकर—कारकून—होता हें निर्विवाद आहे. याविरुद्ध बोलण्यास रा० राजवाडे यांपाशीं कोणता दांडगा अस्सल पुरावा आहे तें त्यांनीं अझून प्रसिद्ध केलें नाहीं. (९) रा० राजवाड्यांच्या चमत्कारिक तर्कशास्त्राच्या कोटिक्रमाचें दुसरें एक मासलेवाईक उदाहरण देऊन हा लांबलेला लेख आटोपता घेऊं. ते ह्मणतात 'पंतोजी गोपीनाथ हा शिवाजीच्या पदरचा कारकून होता. सातारा येथील बहिरोपंत पिंगळे यांच्या कुळकर्ण्यांच्या दफ्तरांत पंताजी गोपीनाथ सर सुभेदार हें नांव एका हुकूमनाम्यावर आहे. हा हुकूमनामा यद्यपि १६६९ (इसवी) नंतरचा आहे. तत्रापि पंताजी गोपिनाथ शिवाजीच्या पदरचा होता हें खास आहे'!!! शिवाजीचा पंताजी गोपीनाथ केव्हां तरी पदरचा नोकर होता एवढेंच जर सिद्ध करण्याचा रा० राजवाड्यांचा हेतू असेल,